शाकुंतल
शैलीशास्त्रीय अभ्यास

डॉ. वामन केशव लेले

इतिहास-पत्रिका प्रकाशन
ठाणे ४०० ६०२

22702

[illegible]ाकुंतल
[illegible]ात्रीय [illegible]यास

[illegible] लेले

इतिहास [illegible] प्रकाशन
[illegible] ४०० ००२

[illegible]
[illegible] Institute [illegible] Languages
[illegible] 7002[illegible]

[illegible]
[illegible]
[illegible]

शाकुंतल
शैलीशास्त्रीय अभ्यास

डॉ. वामन केशव लेले

इतिहास-पत्रिका प्रकाशन
ठाणे ४०० ६०२

Presented free of cost with compliments
from the Central Institute of Indian Languages
(Government of India) Mysore 570006

❖ **प्रकाशक**

सौ. सुमेधा विजय बेडेकर
इतिहास-पत्रिका प्रकाशन
'शिवशक्ती', डॉ. बेडेकर हॉस्पिटल,
महर्षी कर्वे रोड, ठाणे ४०० ६०२
दूरध्वनी (०२२) ५४२१४३८, (०२२) ५४२३२६०

❖ **© प्रकाशकाच्या स्वाधीन**

❖ **प्रथमावृत्ती**

२६ डिसेंबर, १९९७

❖ **मूल्य**

रुपये २५० /-

❖ **मुद्रक**

ज्ञान प्रबोधिनी मुद्रण विभाग,
५१०, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०
दूरध्वनी ४७७६९१, ४७८०९५, ४७९४८४.

मनोगत

अर्वाचीन पाश्चात्य शैलीशास्त्राच्या मूलतत्त्वांचा यथावत परिचय करून देण्याच्या उद्देशाने मी १९८४ साली 'ललितलेखन व शैली' हे पुस्तक लिहिले. ते लिहीत असताना पाश्चात्य शैलीशास्त्रकारांनी मांडलेल्या अनेक मतांचे व सिध्दान्तांचे सविस्तर व सोदाहरण विवेचन संस्कृत काव्यशास्त्रावरील ग्रंथांमध्येही आढळून येते हे जाणवले होते व संस्कृत काव्यशास्त्रावरील एखादा प्राचीन ग्रंथ निवडून ते अभ्यासकांच्या निदर्शनास आणून द्यावे असे मनोमन ठरविले होते. तदनुसार १९९५ साली 'शैलीशास्त्रज्ञ भामह' हे पुस्तक लिहून सहाव्या शतकातील भामह नावाच्या काश्मीरस्थ विचारवंताने भारतीय शैलीशास्त्राची कशी भक्कम पायाभरणी केली, ते दाखवून दिले. पण संस्कृत भाषेतील एखादी ललित साहित्यकृती निवडून तिचे पाश्चात्य शैलीशास्त्राच्या निकषांच्या आधारे विश्लेषणात्मक अध्ययन करावे व ते पुस्तकरूपाने विद्वानांसमोर ठेवावे, असा विचार वारंवार मनात येत असे. राष्ट्रीय मानव संस्कृति शोध संस्थान, वाराणसी, ह्या संस्थेने १९९१ साली 'संस्कृति सन्धान' नामक आपल्या वार्षिक शोध-पत्रिकेसाठी एका शोधनिबंधाची मागणी केली. तिला तत्परतेने प्रतिसाद देण्याचे ठरवून मी 'A Stylistic Study of Abhijnānaśākuntalam' या शीर्षकाचा प्रायोगिक स्वरूपाचा संक्षिप्त शोधनिबंध पाठवला व तो सदरहू वार्षिक शोध-पत्रिकेच्या खंड ४-मध्ये प्रकाशितही झाला. पुढे टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या निमंत्रणावरून कालिदास-जयंतीनिमित्त ५ जुलै, १९९७ रोजी सर परशुरामभाऊ महाविद्यालयामध्ये 'अभिज्ञानशाकुन्तलम् : शैलीशास्त्रीय अभ्यास' ह्या विषयावर व्याख्यान दिले. ते ऐकल्यावर अनेकांना ह्या विषयाचे नावीन्य जाणवले आणि काही जाणकारांनी ह्या विषयावर एक स्वतंत्र पुस्तक लिहावे, अशी सूचना केली. ती मला पटली व लगेच मी ह्या विषयाच्या अध्ययनाला सुरुवात केली. सुमारे चार महिन्यांच्या अध्ययनानंतर पुस्तक लिहून हातावेगळे झाले. दरम्यानच्या काळात ठाण्याच्या प्राच्य विद्या अभ्यास संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी प्रस्तुत पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी स्वयंस्फूर्तीने स्वीकारली. त्यांच्या ह्या सक्रिय सहकार्यामुळेच हे पुस्तक आज वाचकांच्या हाती देणे शक्य झाले आहे, ह्याचा आनंद वाटतो.

शाकुंतल नाटकाचा पाश्चात्य शैलीशास्त्राच्या दृष्टिकोणातून केलेला अभ्यास निदान माझ्या तरी पाहण्यात आलेला नाही. त्यामुळे हा दृष्टिकोण अभ्यासकांना अभिनव व विचारणीय वाटेल, असा विश्वास वाटतो.

शाकुंतल नाटकाची संहिता द्वैभाषिक आहे. दुष्यंतप्रभृती पात्रे संस्कृतात बोलतात व शकुंतलाप्रभृती पात्रे प्राकृतात बोलतात. शैलीशास्त्राच्या दंडकानुसार विश्लेषणासाठी निवडलेली संहिता ज्या भाषेत लिहिलेली असेल त्या भाषेतील मजकुराचे विश्लेषण अभ्यासकाकडून अपेक्षित असते. तदनुसार मी शकुंतलाप्रभृती पात्रांच्या प्राकृत संभाषण-संवादांचे विश्लेषण करावयास हवे होते. परंतु, मला ती भाषा अवगत नसल्यामुळे तिच्या संस्कृत छायेवर निर्वाह करावा लागला आहे. ह्या अगतिकेबद्दल दिलगिरी प्रदर्शित करतो.

पाश्चात्य शैलीशास्त्राचे पौरस्त्य शाकुंतलावर केलेले हे कलम आहे असा समज करून घेणे योग्य ठरणार नाही. पाश्चात्य विश्लेषकांनी इंग्रजी भाषेतील ललित साहित्यकृतींचा अभ्यास करून शैली-उपाय शोधून काढले आणि त्यांचे आपापल्या ग्रंथांत उदाहरणांसह विवेचन केले. इंग्रजी ही जशी सध्याची अतिशय प्रगत, प्रगल्भ व विकसित भाषा आहे, तशीच संस्कृत ही प्राचीन भारतात अतिशय समृध्द, दीर्घकालीन परंपरा लाभलेली व विकसित भाषा होती. म्हणूनच आजचे पाश्चात्य शैलीशास्त्रज्ञ अचूक, प्रभावी व सुभग अर्थाभिव्यक्तीच्या ज्या युक्त्याक्लृप्त्या इंग्रजी भाषेच्या संदर्भात आपल्या निदर्शनास आणत आहेत त्या प्राचीन भारतीय संस्कृत-प्राकृत साहित्यिकांच्याही स्वाभाविकपणे परिचयाच्या होत्या; त्यांच्या त्या वाचनात आलेल्या होत्या, वापरात होत्या व त्यांना सुचलेल्याही होत्या. शिवाय, पूर्णावस्थेस पोचलेल्या पाणिनीय व्याकरणाच्या अगणित नियमोपनियमांनी अर्थच्छटांच्या अभिव्यक्तीची सूक्ष्म-सुंदर साधने प्राचीनांना उपलब्ध करून दिलेली होती व ती त्यांनी कुशलतेने व सौंदर्यदृष्टीने वापरली होती. म्हणून आधुनिक पाश्चात्यप्रणीत शैली-उपाय शाकुंतलासारख्या प्राचीन ग्रंथात अवतरलेले किंवा हाताळले गेलेले आढळतात. कोणत्याही दोन परिणत भाषांत असे प्रयोगसाम्य आढळून येणे अगदी स्वाभाविक आहे.

मी आपल्या परीने परिश्रम करून हा ग्रंथ लिहिला आहे. तरीसुध्दा सूक्ष्म बुध्दीच्या विद्वानांना ह्यात ज्या त्रुटी आढळतील त्या त्यांनी माझ्या निदर्शनास कृपया अवश्य आणाव्यात.

ह्या ग्रंथाचे प्रकाशन बृहन्महाराष्ट्र प्राच्य विद्या परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनाच्या वेळी होत आहे, हा एक अपूर्व योग आहे, असे मी मानतो.

पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी, वर उल्लेखिल्याप्रमाणे, डॉ. विजय बेडेकर ह्यांनी तत्परतेने स्वीकारली ह्याबद्दल मी त्यांचा आणि त्यांच्या पत्नी सौ. सुमेधा बेडेकर यांचा अतिशय आभारी आहे.

ज्ञान प्रबोधिनीच्या मुद्रण विभागाच्या सर्व सेवकांनी सर्व प्रकारचे सहकार्य करून पुस्तकाचे मुद्रण मुदतीत पूर्ण करून दिल्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

शाकुंतलाचा हा शैलीशास्त्रीय अभ्यास वाचून संस्कृत-प्राकृत साहित्याच्या एखाद्या अभ्यासकाला अन्य प्राचीन साहित्यकृतीचे ह्याच पध्दतीने विश्लेषण करण्याची प्रेरणा झाली तर मला खूप आनंद वाटेल.

शाकुंतलाचे वाचक, अभ्यासक, अध्यापक, समीक्षक व संशोधक ह्या पुस्तकाचे यथोचित स्वागत करतील अशी आशा आहे.

ललितापंचमी

पुणे, दि. ६-१०-१९९७ वामन केशव लेले

लेखनकाल : ५-९-९७ ते ५-१०-९७

अनुक्रमणिका

	मनोगत	
१.	प्रतिपाद्य विषय	६ - ९
२.	संभाषणाची वैशिष्ट्ये व शाकुंतल	१० - ५८
३.	संवाद व शैली-उपाय	५९ - १५०
४.	कालिदास-कल्पित शैली-उपाय	१५१ - १६२
५.	पुस्ती-दुरुस्ती	१६३ - २०२
	संदर्भ-ग्रंथ	२०३ - २०५

❖ ❖ ❖

[illegible] आपले मौलिक [illegible] हे करीत आहे असा [illegible] केले [illegible] अनुवाद [illegible] आहेत [illegible] अध्यास [illegible] शैली-उपाद [illegible] आहे [illegible] ग्रंथाचे [illegible] [illegible] जाहीर [illegible] विलक्षण [illegible] आहे. [illegible] [illegible] अनुवाद. [illegible] [illegible] झाली. [illegible] [illegible] आपल्या निदर्शनास [illegible] आणि [illegible] प्राचीन भारतीय [illegible] सामाजिकपणे [illegible]; त्यांच्या [illegible] [illegible] घोसल्या पाणिनीय व्याकरणाच्या [illegible] निरुक्तनिघण्टूंकी [illegible] मूळ-सूत्र [illegible] उपलब्ध करून [illegible] [illegible] आधुनिक [illegible] [illegible] प्राचीन [illegible] असे प्रयोग [illegible] आहे.

[illegible] लिहिता [illegible] [illegible] [illegible] त्यांनी माझ्या [illegible] आभार [illegible]

[illegible] दिल्या [illegible] वेळी [illegible] आहे. [illegible] आहे, असे मी मानतो.

[illegible] जबाबदारी, [illegible] प्रमाणे, हे [illegible] स्वीकारली [illegible] आणि [illegible] मी, [illegible] आभारी आहे.

◆ ◆ ◆

[illegible] पुस्तक [illegible] प्रकारचे सहकार्य [illegible] पुस्तक [illegible] पूर्ण [illegible] त्यांचा [illegible]

[illegible] अभ्यास [illegible] संस्कृत-प्राकृत [illegible] [illegible] [illegible] [illegible]

[illegible] वाचक, अभ्यासक, [illegible] [illegible] स्वागत करतील [illegible] आशा आहे.

ललित [illegible]

पुणे [illegible]

[illegible] ५-१० [illegible] ५-१०-१९

[illegible]

१. प्रतिपाद्य विषय

[१.१] यासम हा

प्राचीन भारतीय ललित साहित्यिकांत महाकवी कालिदासाला अग्रपूजेचा बहुमान देण्यात येतो. ए. के. वॉर्डर[१] यांनी लिहिलेल्या 'इण्डियन् काव्य लिटरेचर्' ह्या षट्-खंडात्मक ग्रंथातील नोंदींनुसार जरी प्राचीन भारतात संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश, पैशाची व देशी ह्या भाषांत विभिन्न साहित्य-प्रकार यशस्वीपणे हाताळणारे अक्षरश: हजारो ग्रंथकार होऊन गेले असले तरी कालिदास 'यासम हा' असाच मानण्यात येतो. त्याच्या एका अनन्यभक्ताने त्याला 'पुरा कवीनां गणना-प्रसङ्गे कनिष्ठिकाधिष्ठित-कालिदास: । अद्यापि तत्तुल्यकवेर् अभावाद् अनामिका सार्थवती बभूव ॥' अशी गौरवांजली वाहिली आहे, हे सर्वविदित आहे. तसे पाहता कालिदासाचा एकूण लेखन-प्रपंच अगदी मर्यादित आहे. मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय व शाकुन्तल ही तीन नाटके; कुमारसंभव व रघुवंश ही महाकाव्ये; मेघदूत हे खंडकाव्य आणि ऋतुसंहार हे षड्-ऋतुवर्णनपर लघुकाव्य, इतकीच त्याची मोजकी साहित्यसंपदा आहे. ह्या साहित्यकृतींपैकी 'शाकुन्तल' ह्या नाटकाने त्याला दिगन्त कीर्ती मिळवून दिली आहे. गेली सुमारे दीड हजार वर्षे भारताच्या विविध पाठशाळांत, महाविद्यालयांत व विद्यापीठांत ह्या अजरामर साहित्यकृतीचे अध्यापन-अध्ययन चालू आहे. प्राचीन व मध्ययुगीय साहित्यशास्त्रज्ञांनी ह्या नाटकातील कित्येक गद्य-पद्यांशांचे सरसग्रहण समीक्षण केले आहे. सुमारे दोनशे वर्षांपूर्वी विल्यम जोन्सने ह्या नाटकाचे इंग्रजीत भाषांतर केल्यापासून पाश्चात्य रसिकांना ह्या अक्षर वाङ्मयकृतीचा परिचय झाला आहे. गटे हा जर्मन कवी तर हे नाटक डोक्यावर घेऊन नाचू लागला, असे म्हणतात. मोनियर विल्यम्सने कालिदासाला भारताचा शेक्सपिअर अशी सन्मानाची पदवी अर्पण केली. आजवर देशा-विदेशांतल्या अनेक भाषांत ह्या नाटकाची भाषान्तरे झाली आहेत. अशा ह्या बहु-आस्वादित व बहु-चर्चित साहित्यकृतीच्या भाषेच्या सौंदर्याचे आणि सौंदर्यहानीचे पाश्चात्य शैलीशास्त्राच्या दृष्टिकोणातून अध्ययन करणे, हे प्रस्तुत ग्रंथाचे प्रयोजन आहे.

[१.२] शाकुन्तल : मिश्र साहित्यप्रकार

शाकुन्तल हे नाटक आहे. कोणतेही नाटक प्रेक्षकांनी प्रेक्षागृहात बसून पाहावयाचे व ऐकावयाचे असते. म्हणूनच त्याला 'प्रेक्ष्य' म्हणतात. कथा, कविता, कादंबरी इत्यादी साहित्यप्रकार वाचकाने एकांतात बसून वाचावयाचे असतात आणि आपापल्या कल्पनाशक्तीच्या मगदुरानुसार त्यांचा आस्वाद घ्यावयाचा असतो व त्यांचे कथानक

आपल्या कल्पनाचक्षूंसमोर साकार करावयाचे असते. वेगळ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे कथाप्रभृती नाटकेतर साहित्यकृती रसिकाला रसास्वादनासाठी स्वत: 'घडवाव्या' लागतात. त्याउलट नाटक हे रंगमंचावरील विविध पात्रे, त्यांचे पोषाख, अभिनय, देखावे व संवाद ह्यांच्या योगे प्रेक्षकांसमोर क्षणश: कणश: प्रत्यक्षपणे साकार होत असते; 'घडत' असते. अर्थात, ते प्रेक्षकसापेक्ष असते. एका इंग्रजी सूक्तीत No audience, no play असे जे म्हटले आहे, ते योग्यच आहे. नाटकात गद्य व पद्य ही अभिव्यक्तीची दोन्ही माध्यमे वापरलेली असतात. शिवाय, प्राचीन भारतीय नाटकांत संस्कृत, प्राकृत, शौरसेनी, मागधी, अवन्तिका, प्राच्या, शकारी, चाण्डाली, ढक्की इत्यादी अनेक भाषा वापरलेल्या आढळून येतात. एकंदरीने नाटक हा अनेक दृष्टींनी किंवा परीमाणांनी मिश्र साहित्य-प्रकार आहे, ही बाब सर्वांच्या परिचयाची व अनुभवाची आहे.

[१.३] संभाषणे : नाटकाचा कणा

नाटककाराला आपल्या प्रेक्षकांशी किंवा वाचकांशी स्वत: बोलण्याची मुभा नसते. (तशी ती कथालेखक, कादंबरीकार, कवी इत्यादी अन्य साहित्यिकांना असते.) नाटकातील पात्रे एकमेकांशी जे संभाषण करतात त्याच्या द्वारेच त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यांशी, विचारविकारांशी वा क्रियाप्रतिक्रियांशी प्रेक्षक-वाचकांचा परिचय होत असतो; त्या संभाषणांच्या द्वारेच नाटकातील घटना-प्रसंग घडत असतात आणि नाटकाचे संविधानक हळूहळू आकार धारण करून सरतेशेवटी परिपूर्ण होत असते. अर्थात, नाटकातील पात्रांची संभाषणेच नाटकाचे संपूर्ण 'विणकाम' करीत असतात. ह्याबाबतीत आणखीही एक मुद्दा विचारात घ्यावयास हवा. तो हा की, एखाद्या नाट्यकृतीचा जेव्हा रंगभूमीवर प्रयोग होत असतो तेव्हा तो प्रयोग बघणाऱ्या प्रेक्षकांना प्रतिक्षणी सावध व प्रतिसादक्षम राहावे लागत असते. कारण नाटकाचा न कळलेला भाग पुन्हा बघण्याची संधी त्यांना उपलब्ध नसते. त्यामुळे रंगभूमीवरील पात्रांची संभाषणे प्रेक्षकांना दक्षतेने ऐकावी व समजून घ्यावी लागत असतात. डोळे व कान ही दोन्ही इंद्रिये जितकी तत्पर व कार्यक्षम तितके नाटकाचे आकलन परिपूर्ण व त्याचा आस्वाद आनंददायक ! अर्थात, प्रेक्षक नाट्यकृतीच्या सर्वांगीण रसास्वादासाठी संभाषणांच्या अधीन असतो. म्हणूनच संभाषणे हा नाटकाचा मूलाधार आहे. संभाषणांचे नाटकातील हे महत्त्वपूर्ण स्थान लक्षात घेऊनच ह्यापुढच्या म्हणजे दुसऱ्या प्रकरणात कोगन, क्रिस्टल, क्रुइझर, टर्नर, डर्बीशायर, डेव्ही, ब्रॅण्ड्रेथ, व्हॅलिन्स इत्यादी पाश्चात्य शैलीशास्त्रज्ञांनी प्रतिपादिलेल्या संभाषणांच्या वैशिष्ट्यांचा प्रथमत: विस्ताराने परिचय करून घेऊ व त्यानंतर त्या वैशिष्ट्यांच्या प्रकाशात शाकुंतलाच्या गद्यपद्यात्मक तसेच संस्कृतप्राकृतमय संहितेचा (रंगसूचना, नेपथ्ये, आकाशे इत्यादींसकट) विश्लेषणात्मक व सोदाहरण अभ्यास करू.

[१.४] शाकुंतलातील संवादांची चर्चा

नाटकाची सर्वच गद्यपद्यात्मक संहिता संभाषणरूप नसते. ती तशी असल्यास तिच्यात व दैनंदिन व्यावहारिक संभाषणांत अंतर राहणार नाही व ती आस्वाद्य व संस्मरणीय ठरणार नाही. थोडक्यात, नाटकातील संभाषणे अंशतः नित्याच्या संभाषणांसारखी असतात व अंशतः ती तशी नसतात. त्यांना जेव्हा कल्पकतेचा स्पर्श होतो तेव्हा त्यांचे केवळ व्यवहारसाधक संभाषणत्व गळून पडते आणि त्यांना चित्तवेधक संवादांचे वेगळे व उज्ज्वल रूप लाभते. नाटक ही एक कलाकृती असल्यामुळे आणि ती प्रेक्षकांना जीवनातील अनुभव व विचार यांचे दर्शन घडवता-घडवता आनंद देण्यासाठीही रचली जात असल्यामुळे नाटककाराला नाटकाचा विषय, त्यातील पात्रांचे स्वभावविशेष, त्यांचे परस्परसंबंध, वातावरण, नाट्यलेखनामागील हेतू इत्यादी अनेक घटकांचा विचार करून अतिशय नेटके, समर्पक, अर्थपूर्ण व उद्दिष्टपूरक संवाद लिहावे लागत असतात. हे कार्य साधण्याच्या बाबतीत नाटककाराला भाषेच्या अंगभूत सामर्थ्यांचा विवेचकपणाने, काटकसरीने व सौंदर्यदृष्टीने वापर करावा लागत असतो. भाषेच्या ह्या अंगभूत सामर्थ्यांनाच बोल्टन, बॉवडेन, ब्रूक्स, कोहेन, डर्बीशायर, डोब्री, होग्रेफे, हफ्, नोवॉटनी, टर्नर इत्यादी पाश्चात्य शैलीशास्त्रज्ञांनी शैली-उपाय अशी संज्ञा दिली आहे. यांना ललित साहित्यातील भाषेच्या सौंदर्य-सिध्दीची साधने असे म्हणता येईल. अशी कोणती भाषाप्रसाधने पाश्चात्यांनी निरूपिलेली आहेत, त्यांची कोणती गुणवैशिष्ट्ये त्यांनी नमूद केली आहेत आणि त्यांच्या प्रत्यक्ष उपयोजनाचा आढळ कालिदासाच्या शाकुंतलात कशा स्वरूपात होतो इत्यादी मुद्यांचे विवरण, शाकुंतलातील गद्य-पद्यांची उदाहरणे उद्धृत करून, तिसऱ्या प्रकरणात करू. त्यायोगे कालिदासाच्या समुज्ज्वल प्रतिभेचे यथार्थ दर्शन घडू शकेल.

[१.५] कालिदास-कल्पित शैली-उपाय

कालिदासाला प्रतिभेची नैसर्गिक देणगी लाभलेली होती. शिवाय त्याने व्याकरणादी शास्त्रे व प्राचीन नाटककारांची नाटके यांचे कसून अध्ययन करून आपली बहुश्रुतता वाढविली होती. ह्या बौध्दिक शक्तींच्या योगे त्याने पाश्चात्यांनी प्रतिपादिलेल्या शैली-उपायांखेरीज आणखी काही उपाय स्वतंत्रपणे कल्पिले आहेत काय, असल्यास ते कोणते व त्यांची हाताळणी त्याने कशी केली आहे, ह्या मुद्यांचा उदाहरणांसह परामर्श चवथ्या प्रकरणात घेऊ.

[१.६] शाकुंतलाच्या संहितेतील उणिवा

पाश्चात्य शैलीशास्त्रज्ञ असे ठामपणे मानतात की, अगदी प्रथितयश साहित्यिकांनाही आपल्या साहित्यकृतीचा पहिला मसुदा प्रथमतः लिहून काढावा लागतो व तो पुनःपुन्हा दक्षतेने व चिकित्सकपणे वाचून त्यात एकदा किंवा अनेकदा फेरफार करून मगच त्याला अंतिम स्वरूप देण्यात यश मिळते. फेरफार करण्याच्या ह्या प्रक्रियेसाठी पाश्चात्यांनी

revision, refinement व polishing अशा तीन संज्ञा योजल्या आहेत. अशा revision-च्या योगे साहित्यकृती सर्वांगांनी परिपूर्ण व सर्वथा निर्दोष होते, अशी पाश्चात्यांची धारणा आहे. (आपले प्राचीन भारतीय काव्यमीमांसकही ह्या धारणेशी पूर्णपणे सहमत आहेत.) कालिदासाचे मूळ हस्तलिखित आज आपल्याला उपलब्ध नसल्यामुळे त्याने आपल्या मसुद्यावरून हात फिरवून त्यात दुरुस्त्या केल्या होत्या किंवा कसे, ते कळावयास साधन नाही. पण पाश्चात्य शैलीशास्त्रज्ञांनी दाखवलेल्या मार्गाचे अनुसरण करून सध्या उपलब्ध असलेल्या शाकुंतलाच्या संहितेत पुस्त्या-दुरुस्त्या करणे आवश्यक आहे काय, असल्यास कोणकोणत्या गद्य-पद्यांशांत व कोणत्या स्वरूपाच्या, इत्यादी विषयांची चर्चा पाचव्या म्हणजे अंतिम प्रकरणात करू. तशी चर्चा करताना सध्याच्या संहितेत पाश्चात्य शैलीशास्त्रदृष्ट्या बदल किंवा परिवर्तन केल्याने सध्याची संहिता अधिक संस्मरणीय कशी होईल तेही दाखवून देऊ. [ह्याबाबतीत क्षेमेन्द्राने[२] आपल्या औचित्यविचारचर्चा नामक ग्रंथात औचित्य-परिपोषाच्या विचाराबरोबर औचित्यभंगाचाही विचार करण्याची जी पध्दत अंगीकारली आहे ती आदर्श मानून तिचा अवलंब करू.] ह्या अंतिम प्रकरणाबरोबरच ग्रंथाचा समारोप करू.

प्रस्तुत ग्रंथातील विश्लेषणात्मक अभ्यासासाठी खालील मुद्रित ग्रंथ वापरला आहे :

कालिदासविरचितम् अभिज्ञानशाकुन्तलम्, संपा. अ. बा. गजेन्द्रगडकर,
पंचम संस्करण, सुरत, दि पॉप्युलर बुक स्टोअर, १९५१

ह्यापुढील प्रकरणांत जेथे-जेथे ह्या नाटकातील संहितांश उद्धृत केले आहेत, तेथे-तेथे संहितांशांपुढे कंसात (शा. असा संक्षेप न उल्लेखिता) फक्त पृष्ठांक नमूद केला आहे. तेवढा वाचकांच्या दृष्टीने पुरेसा आहे.

आता वरील ग्रंथरूपरेषेनुसार 'संभाषणाची वैशिष्ट्ये व शाकुन्तल' ह्या विषयाच्या विवेचनास दुसऱ्या प्रकरणात सुरुवात करू.

संदर्भ

1. A. K. Warder, Indian Kāvya Literature, Volumes One to Six, First, Delhi, Motilal Banarsidass, 1972, 1974, 1977, 1983, 1988, 1997

२. वा. के. लेले, समीक्षक व संपादक, क्षेमेन्द्रप्रणीत औचित्यसिध्दान्त आणि औचित्यविचारचर्चा, प्रथम, वाराणसी, सौ. मालती वामन लेले, १९६६

* * *

२. संभाषणाची वैशिष्ट्ये व शाकुंतल

[२.१] नाट्य-संहितेचे घटक

मागील प्रकरणातील [१.३] मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणामध्ये शाकुन्तल नाटकातील संभाषणाची वैशिष्ट्ये समजून घेऊ. पण तसे करण्यापूर्वी प्रस्तुत नाटकाच्या संहितेचे विभागशः पृथक्करण लक्षात घेतले की, मग संभाषणांच्या वैशिष्ट्यांचे आकलन व परीक्षण सुकर होईल. म्हणून प्रथमतः संहितेची रचना किंवा 'बांधणी' विचारात घेऊ.

प्रस्तुत नाटकाचे [इतर कोणत्याही संस्कृत-प्राकृत नाटकाचे असतात त्याप्रमाणे] तीन भाग आहेत : (१) संस्कृत व प्राकृत गद्य संवाद, (२) संस्कृत व प्राकृत पद्ये व (३) रंगसूचना (Stage directions). यांचा विस्तृत तपशील असा -

(१) या नाटकात एकूण ६१६ गद्य वाक्ये किंवा वाक्यांश संस्कृतात आहेत, तर ५९२ गद्य वाक्ये किंवा वाक्यांश प्राकृतात आहेत. मुद्रित संहितेच्या, सरासरीने प्रत्येक पृष्ठावर, संस्कृत व प्राकृत या दोन्ही भाषांतील मजकूर आहे. परंतु, पृष्ठे १२६ ते १३४ ह्या नऊ पृष्ठांवर एकही संस्कृत गद्यांश नाही, तर पृष्ठे ३ ते ९ ह्या सात पृष्ठांवर एकही प्राकृत गद्यांश नाही. ही संस्कृत व/वा प्राकृत गद्यांशांच्या अभावाची सलग उदाहरणे झाली. पण इतर काही पृष्ठांवरही असा अभाव किरकोळ स्वरूपात जाणवतोच. ह्या संदर्भात एक वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण आवर्जून नमूद करण्यासारखे आहे. ते पृष्ठ १८६ वर आढळते. तेथे 'प्रिये' व 'सुन्दरि' या दोन संस्कृत संबोधनांखेरीज बाकी सर्व मजकूर एक तर प्राकृत गद्यात तरी आहे किंवा संस्कृत पद्यात तरी आहे. उपर्युल्लिखित ६१६ संस्कृत गद्यांशांत पृष्ठे ५०-५१ व १७५ वरील 'आकाशे' म्हणजे आधुनिक नाट्यछटेसारख्या मजकुराचाही समावेश आहे.

(२) प्रस्तुत नाटकात ९ प्राकृत व २८८ संस्कृत अशी एकूण १९७ पद्ये आहेत. त्यांची पात्रनिहाय विभागणी अशी : प्राकृत पद्ये - अनसूया १, आकाशे १, गौतमी १, नटी १, परभृतिका (प्रथम उद्यानपालिका) १, पुरुष (मच्छीमार) १, प्रियंवदा १, मधुकरिका (द्वितीय उद्यानपालिका) १ व शकुन्तला १ = एकूण ९

संस्कृत पद्ये - आकाशे २, उभौ (गौतम व नारद हे ऋषिकुमार) १, ऋषयः १, कंचुकी ६, काश्यप १४, गौतम २, दुष्यन्त ११२, द्वितीय वैतालिक १, नांदी १, नारद १, नेपथ्ये ३, पुरोहित १, प्रथम वैतालिक १, प्रियंवदा १, भरतवाक्य १, मातली ९, मारीच ६, यजमानशिष्य १, वैखानस ४, शारद्वत २, शाङ्गर्रव ९, सुप्तोत्थित शिष्य २, सूत २, सूत्रधार ३, सेनापती २ = एकूण १८८

राजा, शकुन्तला, अनसूया, प्रियंवदा, ऋषिकुमार, पुरोहित इत्यादी पात्रे गातात हे पाहून नवल वाटत नाही, पण सारथी, सेनापती आणि मच्छीमार ही पात्रेही गातात हे पाहून निश्चितच अचंबा वाटतो! (दुष्यन्ताचे काम करणाऱ्या नटाला ११२ पद्ये म्हणणे खरोखरच पेलत असेल काय, अशीही एक शंका मनात रेंगाळते!)

(३) प्रस्तुत नाटकाच्या सात अंकांत मिळून एकूण ५११ रंगसूचना आहेत. त्यांमध्ये प्रविश्य, गायति, अवतीर्य, स्वगतम्, प्रकाशम् अशा एक शब्दात्मक संक्षिप्त रंगसूचना जशा आढळतात तशाच 'ततः प्रविशति मृगानुसारी सशरचापहस्तो राजा रथेन सूतश्च' (४) 'मुखं अस्याः समन्नमयितुं इच्छति। शकुन्तला परिहरति नाट्येन।' (६८), 'अनसूया निष्क्रान्ता। प्रियंवदा नाट्येन सुमनसः गृहणाति।' (८२), 'ततः प्रविशन्ति गौतमीसहिताः शकुन्तलां पुरस्कृत्य मुनयः। पुरश्चैषां कंचुकी पुरोहितश्च।' (१०८), 'रुदती प्रस्थिता। निष्क्रान्ता सह पुरोधसा तपस्विभिश्च।' (१२४) ह्या व अशासारख्या बहुशब्दात्मक विस्तृत रंगसूचनाही आढळून येतात.

एकंदरीने शाकुन्तल नाटकाची समग्र संहिता वरीलप्रमाणे तीन भागांत विभागलेली आहे. एवढ्या पार्श्वभूमीवजा आवश्यक खुलाशानंतर आता संभाषणाच्या वैशिष्ट्यांकडे वळू.

[२.२] 'संभाषणा'ची व्याख्या

ज्या संकल्पनेला इंग्रजीत Conversation म्हणतात, तिला आपण मराठीत संभाषण म्हणतो. Conversation हा शब्द Converse ह्या क्रियावाचक शब्दापासून साधलेला आहे. त्याचा अर्थ 'To convey the thoughts reciprocally in talk'[१] (अर्थात, एकमेकांनी आलटूनपालटून बोलून विचार कळवणे) असा आहे. तत्साधित Conversation शब्दाचा कोशगत अर्थ असा आहे : 'Oral exchange of sentiments, observations, opinions or ideas.'[२] अर्थात संभाषण ही एक भाषिक घटना आहे. हिचे स्वरूपवर्णन पुढील शब्दांत करता येईल : दोन किंवा अधिक व्यक्ती प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे एकमेकींच्या समोर आल्या असता आपापल्या मनोगतांची जी परस्पर-देवाणघेवाण सामान्यपणे तोंडावाटे उच्चारलेल्या शब्दांच्या (म्हणजेच भाषेच्या) द्वारे करतात तिला आपण संभाषण असे म्हणतो. आता ह्या व्याख्येतील शब्दप्रयोगांचा थोडा विचार करू. प्रथमतः सामान्यपणे ह्या शब्दाचे प्रयोजन लक्षात घेऊ.

[२.३] शारीरिक हालचालींद्वारे होणारे संज्ञापन

मनोगतांची किंवा अनुभवांची देवाणघेवाण (Communication[३]) शरीराच्या काही अवयवांच्या विशिष्ट हालचालींच्या द्वारेही होऊ शकते. उदाहरणार्थ, हाताच्या पंज्याची विशिष्ट सांकेतिक हालचाल करून आपण 'या', 'येथे ठेव/ठेवा', 'बसा', 'कोठे निघालास/निघालात ?' इत्यादी मनोगते व्यक्त करतो; 'भुवया उंचावून' आपण आश्चर्य, विस्मय, अनपेक्षित घटनेबद्दलची प्रतिक्रिया इत्यादी स्वरूपाचे आशय व्यक्त करतो; जीभ बाहेर काढून

आपण स्तिमितता प्रगट करतो; जीभ दोन कवळ्यांच्या मध्ये दाबून धरून अवांछित कल्पनेचा उच्चार झाल्याचे दर्शवितो; तोंड वाकडे करून नापसंती व्यक्त करतो; हस्तांदोलन करून मन:पूर्वक स्वागत करतो; हात जोडून एखाद्या व्यक्तीबद्दलचा पूज्यभाव प्रदर्शित करतो; चुंबन घेऊन प्रेम किंवा वात्सल्य प्रकट करतो, तर एखाद्याला मिठी मारून पराकाष्ठेचा हर्ष किंवा सद्‌भाव व्यक्त करतो [४]. परंतु मनोगतांची खरीखुरी देवाणघेवाण तोंडावाटे उच्चारल्या गेलेल्या शब्दांनीच होत असते. हीच विशदतर, 'दीर्घजीवी, प्रेरक व व्यापक असते [५]. बोलणाऱ्या व्यक्ती एकमेकींसमोर असल्यामुळे ही देवाणघेवाण स्पष्ट असते; त्या दोन्ही/अनेक व्यक्ती एकमेकींसमोर असेपर्यंत टिकते. एक व्यक्ती दुसरीला/दुसऱ्यांना बोलण्यास प्रेरित किंवा उद्युक्त करते आणि हिच्यात गप्पा, बोलणे, चर्चा, मुलाखत, वाद इत्यादी विविध स्वरूपांचा समावेश होतो. ह्यावरून हे लक्षात येईल की, शरीराच्या विशिष्ट हालचालींनी जरी मनोगतांची देवाणघेवाण शक्य होत असली तरी ती मर्यादित स्वरूपाची असते. खऱ्या देवाणघेवाणीला तोंडावाटे उच्चारलेल्या शब्दांचीच अपेक्षा असते. म्हणून वरील व्याख्येत 'सामान्यपणे' हा शब्द वापरला आहे. ह्याचा आणखीही एक बारीक पैलू लक्षात घ्यावयास हवा. तसे पाहता मनुष्य हा नेहमीच स्वत:शी बोलत असतो. प्रत्येक व्यक्तीच्या मनात प्रतिक्षणी कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचा विचार येतच असतो व विचार हा नेहमीच भाषेच्या मदतीने साकार होतो (बोलणे, ऐकणे, लिहिणे व वाचणे ही भाषेची जी चार कार्ये आहेत त्यांपैकी प्रत्येकाच्या मुळाशी विचार करणे हे कार्य अपरिहार्यपणे असते). असे असले तरी व्यक्तीच्या मनातील विचार अप्रकट असतो, त्यामुळे त्याची देवघेव संभवत नाही. तो प्रकट झाला (म्हणजेच प्रकट केला गेला) की, मगच त्याची देवघेव संभवते. अर्थात मनोगताच्या साक्षात उच्चाराची (म्हणजेच प्रकटीकरणाची) आवश्यकता असते. अनुक्त मनोगत इतरांच्या दृष्टीने अनाकलनीयच राहते [६].

[२.३.१] पात्रांच्या शारीरिक हालचाली

वरील विवेचनात अनुस्यूत असलेल्या मुद्यांची दखल कालिदासानेही कशी घेतली आहे ते प्रथमत: विचारात घेऊ आणि नंतर संभाषणाच्या इतर वैशिष्ट्यांचा परामर्श घेऊ. शारीरिक हालचालींच्या द्वारे पात्रे आपली मनोगते व्यक्त करीत असतात हे खाली उद्‌धृत केलेल्या रंगसूचनांवरून स्पष्टपणे प्रतीत होते.

गायति (३), राजानं मृगं च अवलोक्य (४), सविस्मयम् (५), रथवेगं निरूप्य (५), शरसंधानं नाटयति (६), आकर्ण्य अवलोक्य च (६), ससंभ्रमम् (६, १५), हस्तं उद्यम्य (६), बाहू उद्यम्य (७), सप्रणामम् (७), समन्तादवलोक्य (८), सूतस्य आभरणानि धनुषश्च उपनीय (१०), कर्णं दत्वा (१०), निपुणं निरूप्य (१०), वृक्षसेचनं निरूपयति (११), शिथिलयति (१२), लतां उपेत्य अवलोक्य च (१४), सत्वरं उपसृत्य (१७), शकुन्तलां दर्शयति (१८), शकुन्तलाभिमुखो भूत्वा (१८), शकुन्तला सखीं अंगुल्या तर्जयति (२३), बलाद् एनां निवर्तयति (२५), उभे नाममुद्राक्षराणि अनुवाच्य परस्परं अवलोकयत: (२६), राजानं अवलोकयन्ती सव्याजं विलंब्य सह सखीभ्यां निष्क्रान्ता (२९), दण्डकाष्ठं अवलंब्य स्थित:

(३०), राज्ञः मुखं विलोक्य (३४), निष्क्रम्य सेनापतिना सह पुनः प्रविश्य (३५), फलानि उपहरतः (४५), सप्रणामं परिगृह्य (४५), विदूषकं हस्ते गृहीत्वा (४९), मुखं अस्याः समुन्नमयितुं इच्छति। शकुन्तला परिहरति नाट्येन। (६८), शिरसि शकुन्तलां अभ्युक्ष्य (६९), पुष्पोच्चयं रूपयति। (७५), बाष्पं विहरति (८४), पितरं आश्लिष्य (९७), शकुन्तला पितुः पादयोः पतति (९७), हस्तं उरसि कृत्वा (१११), शकुन्तला भीता वेपते (१२२), ताडयित्वा (१२६), कपोतहस्तकं कृत्वा (१३४), चित्रफलकं दर्शयति (१४९), विस्मयाद् उरोनिहितहस्ते परस्परं अवलोकतः (१८३), बालं हस्तेन गृह्णाति (१९५), अशा शेकडो 'बोलक्या' रंगसूचना प्रस्तुत नाटकात आहेत.

[२.३.२] पात्रांची स्वगते

प्रत्यक्षातील स्त्रीपुरुषांप्रमाणे नाटकातील स्त्रीपुरुष पात्रांनाही आपापली मनोगते स्वतःशी बोलावीशी वाटत असतात, ह्याचे भान कालिदासाला अवश्य आहे हे त्याने दाखल केलेल्या आत्मगतम् (१९, २०, २२, २४, २६, २८, ५६, ६९, ९४, १०३, ११०, ११२, ११३, ११४, ११९, १४८, १५१, १५२, १५४, १८०, १८१, १८२, १८४, १८६, १९६) आणि स्वगतम् (१७, ३४, ३९, ४९, ११४, १२५, १८२, १९४) ह्या रंगसूचनांवरून निःसंदिग्धपणे प्रतीत होते.

[२.३.३] पात्रांचे प्रकटपणे बोलणे

नाटकातील पात्रे मनातील एखादा विचार किंवा निश्चय पक्का झाला की, त्याचा प्रकट उच्चार करतात, हेही कालिदासाने प्रकाशम् (१९, २०, २६, ३६, ३९, ४९, ५५, ५९, ६९, ११५, १५१, १५५, १८१) व सप्रकाशम् (१२०) ह्या रंगसूचनांच्या द्वारे अभ्यासकांच्या निदर्शनास आणून दिले आहे.

[२.३.४] जनान्तिके

रंगभूमीवरील पात्रांपैकी एखादे पात्र शेजारी उभ्या किंवा बसलेल्या असलेल्या दुसऱ्या विशिष्ट पात्राला अनुलक्षून 'एकीकडे' संभाषण करते याची स्वाभाविक जाणीव ठेवून कालिदासाने जनान्तिकम् (१९, २०, ३६, ५५, ५८, ९४, १६१, १६७) व अपवार्य (११५, १३९) या रंगसूचनाही निर्देशिल्या आहेत.

वरील सर्व नोंदींच्या आधारे असे निश्चितपणे म्हणता येते की, शारीरिक हालचाली, स्वगते, प्रकट भाषणे, अप्रत्यक्ष संभाषणे या संज्ञापना-माध्यमांशी कालिदासाचा उत्तम परिचय आहे आणि त्याने त्या माध्यमांचा वैपुल्याने उपयोगही केलेला आहे.

[२.४] संभाषकांचा भाषाविषयक अनुभव समान असतो.

प्रकट संभाषणात बोलणारा/बोलणारे व ऐकणारा/ऐकणारे असे दोघे/अनेकजण भाग घेत असतात. ते आलटून-पालटून परस्परांच्या भूमिका वठवत असतात. म्हणजे जेव्हा अ बोलत असतो तेव्हा ब ऐकत असतो व ब बोलत असताना अ ऐकत असतो. असे करण्यामागे

अर्थातच आपले मनोगत दुसऱ्याला/दुसऱ्यांना 'कळवणे' हे उद्दिष्ट असते. ते फलद्रूप व्हावे म्हणून बोलणारा मनोगतांचा साक्षात शब्दांद्वारे उच्चार करतो. तो ऐकून ऐकणारा बोलणाऱ्याच्या मनोगताविषयी अनुमान बांधतो. हे त्याला शक्य होते ह्याचे कारण असे की, दोघांची भाषा एक असते, ती दोघांनाही कळत असते व दोघांच्याही वापरातील असते. विशिष्ट सन्दर्भात विशिष्ट मनोगत व्यक्त करण्यासाठी बोलणाऱ्याने जे शब्द वापरलेले असतात, जवळजवळ तेच शब्द (प्रत्येकाच्या शब्दावलीत व्यक्तिनिष्ठ असा थोडा फरक पडत असतो ह्या सर्वानुभूत तथ्याचे भान ठेवूनच हे विधान केले आहे), त्याच संदर्भात व तेच मनोगत व्यक्त करण्यासाठी ऐकणाऱ्यानेही कधीतरी वापरलेले असतात. म्हणजेच बोलणारा व ऐकणारा ह्या दोघांचे भाषाविषयक व मनोगतविषयक असे उभयविध पूर्वानुभव सारखे असतात. ह्या मुद्याचे समर्पक शब्दांत विवेचन करताना टर्नरने म्हटले आहे : "Communication presupposes earlier experience shared by speaker and hearer. One such experience which must be shared is, obviously, experience of the language used. You and I communicate only because we both have experience of the English language"[७].

[२.४.१] शाकुन्तलातील पात्रांची द्वैभाषिकता

कालिदासाच्या शाकुन्तलात ह्याबाबतीत कोणती वस्तुस्थिती आहे तिचे आता अवलोकन करू.

नाट्यशास्त्रातील नियमानुसार शाकुन्तलातील ऋषी, कंचुकी, काश्यप, गौतम, दुष्यन्त, नांदीगायक, नारद, पुरोहित, भरतवाक्य-गायक, मातली, मारीच, वैखानस, वैतालिक, शारद्वत, शार्ङ्गरव, शिष्य, सूत, सूत्रधार व सेनापती ही सर्व पात्रे संस्कृत भाषा बोलणारी असून अदिती, अनसूया, गौतमी, चतुरिका, तपस्विनी, नटी, परभृतिका, पुरुष (मच्छीमार), प्रतीहारी, प्रियंवदा, मधुकरिका, यवनी, रक्षकद्वय, विदूषक, शकुन्तला, श्याल, सर्वदमन व सानुमती ही सर्व पात्रे प्राकृत भाषा बोलणारी आहेत. प्रत्येक भाषा बोलणाऱ्या पात्रांची संख्या सारखीच आहे. पण अशा ह्या दोन वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या पात्रांमध्ये संभाषण निर्वेधपणे चालू असते, एका भाषकाला दुसऱ्या भाषकाचे बोलणे अनाकलनीय वाटत नाही, ह्यावरून दोन्ही वर्गांतील पात्रांना एकमेकांच्या भाषा पूर्णपणे कळत आहेत, असा निष्कर्ष निघतो. म्हणजेच वर [२.४] मध्ये उद्धृत केलेल्या 'टर्नर'च्या वचनांत 'कळणे' व 'कळवणे' या भाषिक उद्दिष्टांच्या परिपूर्तीसाठी 'भाषेची समानता' अशी जी एक पूर्व-अट म्हणून प्रतिपादिली गेली आहे, तिचे शाकुन्तलात पालन न होताही 'कळणे' व 'कळवणे' ही दोन्ही उद्दिष्टे सफल होत असल्याचे प्रत्ययास येते. हे वेगळेपण लक्षात ठेवण्याजोगे आहे.

[२.५] एकाच वेळी दोन किंवा अधिक संभाषक बोलतात

संभाषणाला किमान दोन व्यक्तींची अपेक्षा असते. पण ह्याचा अर्थ असा नाही की, संभाषण हे नेहमी दोनच व्यक्तींत होत असते. मित्रांच्या गप्पा, आप्तांची जिव्हाळ्याची बोलणी, जिज्ञासूंची

चर्चा इत्यादी अनेक प्रसंगी संभाषणात एकाच वेळी अनेक व्यक्ती सहभागी झालेल्या आढळतात. अशा वेळी अनेकदा एकाहून अधिक व्यक्ती एकाच वेळी बोलतात हा अनुभव सार्वकालिक, सार्वत्रिक व सार्वजनीन आहे. अशा एककालिक संभाषणाला विषयाचे महत्त्व, त्याचा ताजेपणा, संभाषकांच्या समान किंवा विरुध्द प्रतिक्रिया अशी विविध व अनेक निमित्ते संभवतात. पण असा प्रकार प्राय: घडत असतो, ही मात्र वस्तुस्थिती आहे. आता ह्या बारकाव्याचीही दखल कालिदासाने कशी घेतली आहे, ते पाहू.

[२.५.१] संभाषणांची एककालिकता

शाकुन्तल नाटकात अशी एकूण ४८ स्थळे आहेत की, जेथे दोन किंवा अधिक पात्रे एकाच वेळी बोलतात. ह्यांपैकी एक नेपथ्ये म्हणजे पडद्याआडचे भाषण आहे, दोन पद्ये आहेत व इतर गद्य अनेकोक्ती आहेत. त्यांची नानाविध निमित्ते पुढीलप्रमाणे आहेत. अन्य पात्राचे स्वागत (६३), अपराध्याकडून कबुलीजबाब वदवणे (१२६), अपराध्याची सुटका करणे (१२८), अभिप्राय व्यक्त करणे (१३८, १८२), अभीष्टचिंतन करणे (४५, ४६, १०६, ११०), अज्ञानाची कबुली देणे (८६, १३५), आशीर्वाद देणे (७), आज्ञाग्रहण करणे (१२७, १३८), उत्तरगर्भ प्रश्न विचारणे (६१), दक्षतेची हमी देणे (६२), दिलासा/धीर देणे (९८), दुःखोद्‌गार काढणे (११०), माहीतगारीचे निवेदन करणे (१३७, १८४), व्याकुळ होऊन प्रश्न विचारणे (९२), शुभेच्छा देणे (८४, ११०), सूचनावजा विनंती करणे (५७, ८४, ८७, ९८, १२९, १३६), स्थानदर्शक सूचना देणे (६९).

विशेषेकरून उल्लेखनीय अनेकोक्ती खालीलप्रमाणे आहेत -

(१) उभे - (सस्मितम्) के आवां परित्रातुम्। दुष्यन्तमाक्रन्द। राजरक्षितव्यानि तपोवनानि नाम। (१७). (भुंगा शकुंतलेचा पिच्छा पुरवावयास लागला असता 'मला ह्या भुंग्यापासून वाचवा' अशी कळकळीची विनंती ती आपल्या मैत्रिणींना करते, तेव्हा त्या दोघी एकदम वरीलप्रमाणे बोलतात -) आम्ही तुझे रक्षण करणाऱ्या कोण ? दुष्यन्ताला साद घाल. खरे म्हणजे, तपोवनांचे रक्षण राजाने करावयाचे असते.

(२) सख्यौ - (उभयोराकारं विदित्वा। जनान्तिकम्) हला शकुन्तले, यद्यत्राद्य तात: संनिहितो भवेत् - (२०). शकुन्तला व दुष्यन्त प्रथमदर्शनी एकमेकांकडे आकृष्ट झाल्याचे निरीक्षणान्ती लक्षात आल्यावर तिच्या दोघी मैत्रिणी म्हणतात : गडे शकुंतले, आज जर तात येथे हजर असते तर -

(३) सख्यौ - आर्य, अनेनारण्यकवृत्तान्तेन पर्याकुला: स्म:। अनुजानीहि न उटज-गमनाय। (२८). आश्रमाच्या परिसरात एक हत्ती पिसाळला असून तो आश्रमाच्या दिशेनेच धावत येत आहे हे ऐकून घाबरून गेलेल्या प्रियंवदा व अनसूया राजाला काकुळतीने म्हणतात : महाराज, पिसाळलेल्या हत्तीचा हा वृत्तान्त ऐकून आमची भीतीने गाळण उडाली आहे. तरी झोपडीकडे जाण्यास आम्हांला अनुमती द्यावी.

(४) सख्यौ - आर्य, असंभावितातिथिसत्कारा भूयोऽपि प्रेक्षणनिमित्तं लज्जामहे आर्यं विज्ञापयितुम् । (२८). उपरिवर्णित संभ्रान्त मन:स्थितीत अनसूया व प्रियंवदा ओशाळ्या होऊन राजाला म्हणतात : महाराज, आपल्या इतमामाला साजेसा आपला उचित सत्कार आम्ही केला नाही. त्यामुळे आपण पुन्हा एकवार आश्रमास भेट द्यावी, अशी आपणास विनंती करण्यास आम्हांला लाज वाटत आहे.

(५) सख्यौ - (उपवीज्य सस्नेहम्) हला शकुन्तले, अपि सुखयति ते नलिनीपत्रवात: । (५४)

उन्हाळ्यामुळे जिच्या जीवाची तल्खली होत आहे अशा शकुंतलेला पंख्याने वारा घालीत असताना तिच्या मैत्रिणी तिला विचारतात : गडे शकुंतले, कमलिनीच्या पानांनी आम्ही तुला वारा घालीत आहोत. त्याने तुला बरे वाटत आहे ना ? (ह्या प्रश्नात दोघींच्या मनातील काळजी व जिव्हाळा ह्या भावना ओतप्रोत भरलेल्या आहेत.)

(६) सख्यौ - (विलोक्य सहर्षमुथाय) स्वागतमविलंबिनो मनोरथस्य। (६३)

एकाएकी प्रकट झालेल्या दुष्यंताला पाहून प्रियंवदा व अनसूया त्याचे स्वागत ह्या शब्दांत करतात : विलंब न लावणाऱ्या मनोरथाचे स्वागत असो ! (दुष्यंत म्हणजे शकुंतलेचा मूर्तिमंत मनोरथ !)

(७) सख्यौ - मा बिभीहि। अतिस्नेह: पापशङ्की। (९८)

राजाने तुला चटकन ओळखले नाही तर त्याचे नाव कोरलेली ही रत्नजडित आंगठी त्याला दाखव, असे अनसूया व प्रियंवदा ह्यांनी सुचवताच शकुंतला भीतीने थरथरा कापू लागते. तेव्हा तिला धीर देण्यासाठी त्या दोघीजणी म्हणतात : घाबरू नकोस. उत्कट स्नेहामुळे मनात वाईट विचार येणे स्वाभाविक असते.

(८) उभे - तात, शकुन्तलाविरहितं शून्यमिव तपोवनं कथं प्रविशाव: । (१००)

शकुंतला राजधानीकडे प्रस्थान करते. ती दाट वनातून जाताना लवकरच दृष्टीआड होते. तिच्या विरहामुळे तिच्या दोघी मैत्रिणी व्याकुळ होतात, तेव्हा त्या उद्गारतात : तात, शकुंतला आता ज्या तपोवनात नाही त्यात आम्ही दोघी कसा प्रवेश करू शकू ?

(९) ऋषय: - कुतो धर्मक्रियाविघ्न: सतां रक्षितरि त्वयि।
तमस्तपति धर्मांशौ कथमाविर्भविष्यति ॥ (१११)

शकुंतलेला राजाच्या हाती सुपूर्त करण्यासाठी गौतमीबरोबर काही ऋषीही आलेले असतात. त्यांना पाहून व वंदन करून 'आपली तपश्चर्या निर्विघ्नपणे पार पडत आहे ना ?' असा प्रश्न राजा त्यांना विचारतो. त्याचे उत्तर ऋषी वरील श्लोकात प्रतिप्रश्न विचारून देतात : तू रक्षणकर्ता असताना संतसज्जनांच्या धार्मिक कृत्यांत विघ्न कोठून (कसे) येईल ? सूर्य प्रखरपणे तळपत असताना अंधकार कसा प्रकट होऊ शकेल ? (ह्या उत्तरगर्भ प्रश्नात ऋषींचा राजाच्या दबदब्यावरील विश्वासच प्रकट होतो).

(१०) उभे - आर्य, कौतुहलं नौ। यद्यनेन जनेन श्रोतव्यं कथयतु आर्य: किंनिमित्तं भर्त्रा वसन्तोत्सव: प्रतिषिध्द:। (१३६)

राजाने वसंतोत्सवावर बंदी का घातली आहे ह्याविषयी इत्थंभूत माहिती परभृतिका व मधुकरिका ह्या उद्यानपालिकांना नसते. म्हणून त्या दोघीजणी कंचुकीला वरीलप्रमाणे प्रश्न विचारतात : अहो, आमच्या मनात कुतूहल आहे. आम्ही विचारीत असलेल्या प्रश्नाचे उत्तर देणे आपणास योग्य वाटत असेल तर महाराजांनी वसंतोत्सवावर बंदी का घातली आहे, त्याचा कृपया खुलासा करावा.

वरील विवेचनावरून व निवडक अवतरणांवरून संभाषणात एकाच वेळी अनेक व्यक्ती बोलतात ह्या स्वाभाविक सार्वत्रिक अनुभूतीची यथावत जाणीव कालिदासाने दर्शवली आहे, हे स्पष्ट होईल.

[२.६] अप्रत्यक्ष संभाषण

दोन किंवा अधिक व्यक्ती एकमेकींसमोर येऊन बोलतात तेव्हा प्रत्यक्ष संभाषण होते. पण जेव्हा त्या व्यक्ती एकमेकींपासून दूर असतात तेव्हा त्यांचे जे दूरध्वनीवरून संभाषण होते, ते अप्रत्यक्ष संभाषण होय. अशा संभाषणात सहभागी झालेल्या व्यक्ती एकमेकींना प्रत्यक्षपणे पाहत नसतात; त्यांचे फक्त आवाज परस्परांना ऐकू येत असतात. तरीदेखील त्या व्यक्ती दूरध्वनियंत्राच्या माध्यमाच्या द्वारे जणू एकमेकींसमोर आलेल्या असतात. प्राचीन काळात दूरध्वनी नव्हता. पण नाट्यशास्त्रोक्त नियमांत अशा अप्रत्यक्ष संभाषणाची तरतूद करून ठेवण्यात आलेली आहे. अशी संभाषणे 'आकाशे' व 'नेपथ्ये' ह्या रंगसूचनांच्या द्वारे निर्देशिलेली असतात. शाकुन्तल नाटकात अशी अप्रत्यक्ष संभाषणे कोठे व किती आहेत, त्यांचा आता परिचय करून घेऊ.

[२.६.१] शाकुन्तलातील अप्रत्यक्ष संभाषणे

प्रस्तुत नाटकात आकाशे (५०-५१, ७१, ९०, १०१ व १७५) अशी पाच व नेपथ्ये (२७-२८, ७४, ८३ व १६४) अशी चार मिळून एकूण नऊ अप्रत्यक्ष संभाषणे आहेत. यांचे माध्यम व भाषा यांस अनुसरून खालीलप्रमाणे वर्गीकरण होते.

पृ.	माध्यम	भाषा	प्रकार
२७-२८	दोन गद्य वाक्ये व दोन श्लोक	संस्कृत	नेपथ्ये
५०-५१	गद्य वाक्ये	- " -	आकाशे
७१	एक श्लोक	- " -	- " -
७४	गद्य संबोधन व एक श्लोक	- " -	नेपथ्ये
८३	एक गद्य वाक्य	- " -	- " -
९०	एक श्लोक	- " -	आकाशे
१०१	एक गीत	प्राकृत	- " -
१६४	एक श्लोक	संस्कृत	नेपथ्ये
१७५	गद्य वाक्ये	- " -	आकाशे

ग्रंथाचा विस्तारही होऊ नये पण त्याच वेळी कालिदासाने रचिलेल्या ह्या अप्रत्यक्ष संभाषणांचे स्वरूपही समजावे ह्यासाठी वरीलपैकी दोन ठिकाणची गद्य वाक्ये उतरून घेऊन त्यांचा अर्थ समजून घेऊ.

(१) शिष्य - (परिक्रम्यावलोक्य च । आकाशे) प्रियंवदे, कस्य इदमुशीरानुलेपनं मृणालवन्ति च नलिनीपत्राणि नीयन्ते (श्रुतिमभिनीय ।) किं ब्रवीषि । आतपलङ्घनाद् बलवद् अस्वस्था शकुन्तला । तस्याः शरीरनिर्वापणायेति । तर्हि प्रियंवदे यत्नादुपचर्यताम् । सा खलु भगवतः कुलपतेरुच्छ्वसितम् । अहमपि तावद् वैतानिकं शान्ति-उदकं अस्यै गौतमीहस्ते विसर्जयिष्यामि । (निष्क्रान्तः) (५०-५१)

अर्थात - प्रियंवदे, हे वाळ्याचे उटणे व देठांसह ही कमळाची पाने कोणासाठी घेऊन जात आहेस ? (ऐकल्याचा अभिनय करून) काय म्हणतेस/म्हणालीस ? उन्हाळ्याच्या त्रासामुळे शकुंतला खूपच बेचैन आहे ? तिच्या शरीराचा दाह शमविण्यासाठी (ह्या वस्तू) नेत आहेस ? तर मग प्रियंवदे, उपचारांच्या प्रयत्नांत कसर राहू देऊ नकोस. ती म्हणजे श्रध्देय कुलपतींचा उच्छ्वास (प्राण) आहे (हे तुला ठाऊक आहेच). दरम्यान मीही तिच्यासाठी गौतमींच्या हस्ते यज्ञीय शान्ति-उदक पाठवून देतो.

ह्या वैशिष्ट्यपूर्ण आकाशभाषितावरून कडक उन्हामुळे शकुंतलेचे शरीर कसे पोळून निघाले आहे, ते बघून आश्रमातील स्त्रीपुरुषांना किती काळजी वाटू लागली आहे, प्रत्येकजण शकुंतलेला तळहातावरील फोडाप्रमाणे जपण्याचा कसा प्रयत्न करीत आहे, कुलपती कण्वांच्या जीवनात शकुंतलेला केवढे बहुमानाचे स्थान आहे, इत्यादी अनेक बाबींवर प्रकाश पडतो. ह्या आकाशभाषिताची शब्दकळाही सरळ, साध्या पण जिव्हाळयाने ओतप्रोत भरलेल्या संभाषणासारखी असल्याचे तत्काळ लक्षात येते.

(२) मातलि : - --- (परिक्रम्य । आकाशे) अये वृध्दशाकल्य, किमनुतिष्ठति भगवान् मारीचः । किं ब्रवीषि । दाक्षायण्या पतिव्रताधर्ममधिकृत्य पृष्टस् तस्यै महर्षिपत्नीसहितायै कथयतीति । (१७५)

अर्थात - अहो, शाकल्यबाबा, ह्या घटकेस भगवान मारीच काय करीत आहेत ? काय म्हणालात ? पतिव्रतेचा धर्म कोणता असा प्रश्न दाक्षायणीने विचारल्यावरून ते तिच्या आणि इतर महर्षींच्या बायकांच्या समोर तद्विषयक विवेचन करीत आहेत ?

ह्या अप्रत्यक्ष संभाषणातील भाषेची धाटणीही अगदी स्वाभाविक आहे, हे स्पष्ट आहे. एकंदरीने कालिदासाने अप्रत्यक्ष संभाषणांचाही यथोचित परामर्श घेतला आहे, हे लक्षात येते.

[२.७] संभाषणाची प्रेरके

संभाषण करणाऱ्या व्यक्तींना संभाषण करावे असे का वाटते, म्हणजेच मनोगतांची परस्परांशी देवाणघेवाण करावी, असे का वाटते, असा प्रश्न उपस्थित करता येण्यासारखा आहे.

त्याचे उत्तर द्यावयास हवे. आपण घरात वावरत असताना एकमेकांशी अनेक गोष्टींसंबंधी बोलतो. आपल्याला आपल्या भावना, कल्पना, श्रध्दा, वैचारिक प्रतिक्रिया, मते, इत्यादी गोष्टी घरातील इतर व्यक्तींना 'कळवण्या'ची इच्छा असते. ती इच्छा आपल्याला संभाषणास प्रवृत्त करते. चार मित्र एकत्र जमले की, नाना विषयांवरील गप्पांना रंग भरतो. अभ्यासू व जिज्ञासू लोक गोळा झाले की, ते एखाद्या विषयाचा शोध घेण्यासाठी त्याच्यावर चर्चा करू लागतात. रस्त्यात आपल्याला कोणी हटकतो, माहिती विचारतो, अशा प्रसंगी त्याच्या प्रश्नाला उत्तर देण्याच्या निमित्ताने संभाषण घडते. बस, गाडी, विमान इत्यादी वाहनांतून प्रवास करीत असताना आपण केवळ वेळ घालवण्यासाठी सहउतारूंशी बोलतो. अशा प्रकारे संभाषणाची निमित्ते किंवा प्रेरके अनेक असून संभाषणाच्या ओघात सर्व इंद्रियांना येणाऱ्या अनुभूतींचे उल्लेख येऊ शकतात. संभाषणाला जगाच्या पाठीवरचा कोणताही विषय वर्ज्य नाही. (काव्यालाही जगाच्या पाठीवरचा कोणताही विषय वर्ज्य नसतो असे भामह[८] व धनंजय[९] या दोघा प्राचीन काव्यमर्मज्ञांनी म्हणून ठेवले आहे, हे विचारसाम्य लक्षात घेण्यासारखे आहे.) नाटकातील पात्रे कविकल्पित असली तरी त्यांच्यामध्ये कवीने (म्हणजेच नाटककाराने) प्राण फुंकलेला असतो; ती जिवंत स्त्रीपुरुषांसारखी भासावीत असा घाट किंवा आकार कवीने त्यांना बहाल केलेला असतो. त्यामुळे त्यांच्या संभाषणांची निमित्ते किंवा प्रेरकेही अनेक असतात. शाकुंतल ह्या सामान्य नियमाला अपवाद नाही, हे ह्यानंतरच्या विवेचनावरून स्पष्ट होईलच, त्यामुळे ह्या मुद्याचा विस्तार टाळू.

[२.८] संभाषणाच्या भाषेची वैशिष्ट्ये

डेव्हिड् क्रिस्टल् आणि डेरेक डेव्ही ह्या दोघा ग्रंथकारांनी Investigating English Style नावाचे एक पुस्तक संयुक्तपणे लिहिले आहे. त्यात प्रस्तुत मुद्याची तपशीलवार चर्चा[१०] मार्मिकपणे केली आहे. त्यांनी निदर्शनास आणून दिलेली संभाषणवैशिष्ट्ये अकारानुक्रमाने अशी :

१. अत्युक्ती, २. अपूर्ण वाक्ये, ३. एकमेकांची वाक्ये पूर्ण करणे, ४. एखाददुसरा शब्दच प्रतिसादादाखल उच्चारला जाणे, ५. ग्राम्यता, ६. चिंतनाला सामग्री पुरवणे, ७. जनात एक तर मनात दुसरेच असणे, ८. प्रश्नात्मक वाक्यांचे प्राचुर्य, ९. प्रश्नोत्तरे (साद-प्रतिसाद), १०. बोलणाऱ्याच्या आरंभाचा वा अखेरचा शब्द ऐकणाऱ्याने पुन्हा उच्चारणे, ११. मोठ्या वाक्यांच्या पोटात लहान वाक्ये असणे, १२. मौन (संभाषणात खंड पडणे), १३. लवचिकता असणे, १४. विषय सापेक्षतया घरगुती असणे, १५. विषयांची अनिश्चितता/धरसोड असणे, १६. विषयान्तरे मोठ्या प्रमाणावर होणे, १७. व्याकरणाच्या नियमांचे उल्लंघन होणे, १८. शब्दावलीची पुनरुक्ती होणे, १९. संभाषकांच्या आवाजांत फरक असणे, २०. संक्षिप्त वाक्ये वापरली जाणे, २१. संदर्भित अर्थ परिचित असणे व २२. स्वाभाविकता असणे. आता ह्या वैशिष्ट्यांची शाकुन्तलातील उदाहरणे अभ्यासू. तसे करताना संबंधित वैशिष्ट्यांची जास्तीत जास्त दहा उदाहरणे उद्धृत करून त्यांचा अर्थही देऊ. त्यायोगे वाचकांना ते-ते वैशिष्ट्य पडताळून पाहता येईल. ज्या वैशिष्ट्यांची दहा उदाहरणे उपलब्ध होणार नाहीत त्या वैशिष्ट्यांची जेवढी उदाहरणे उपलब्ध होतील तेवढी सगळी सादर करू. एवढ्या खुलाशानंतर आता प्रत्यक्षात विश्लेषणात्मक विवेचनास सुरुवात करू.

[२.८.१] अत्युक्ती

संभाषणात शब्दांच्या निवडीत व आशयाच्या अभिव्यक्तीत संयम वा काटेकोरपणा नसतो. त्यामुळे 'मी असे दृश्य जन्मात पाहिले नव्हते', 'अति गाढव आहे तो', 'हे चित्र अगदी निस्तुल आहे', 'तुमचे सगळेच पदार्थ अप्रतिम झाले आहेत', 'त्याच्याइतका हुशार मनुष्य शोधू जाता सापडणार नाही', अशी अत्युक्तिपूर्ण विधाने संभाषणात सुकाळाची असतात. क्वचित एखाद्याला हरभऱ्याच्या झाडावर चढवण्यासाठीही अशी अत्युक्ती केलेली असते. या दृष्टीने शाकुन्तलातील खालील अवतरणांचे अवलोकन करावे.

(१) वैखानस: -- जन्म यस्य पुरोर्वंशे युक्तरूपमिदं तव। (७)
अर्थात -- ज्याचा जन्म पुरूच्या वंशात झाला आहे अशा तुझे, बाण आवरून घेण्याचे हे कृत्य, अत्यंत प्रशंसनीय आहे.

(२) शकुन्तला -- सखि अनसूये, अतिपिनध्देन वल्कलेन प्रियंवदया नियंत्रितास्मि। (१२)
अर्थात -- गडे अनसूये, प्रियंवदेने वल्कल अतिशय घट्ट/आवळून बांधल्यामुळे मी जखडली गेले आहे.

(३) राजा -- अत्यन्तमेव सदृशेक्षणवल्लभाभि-
राहो निवत्स्यति समं हरिणाङ्गनाभि: ॥ (२६)
अर्थात -- की अगदी अखेरच्या घटकेपर्यंत (म्हणजे मरणापर्यंत) ही हरिणाक्षी, स्वत:ला प्रिय अशा हरिणींबरोबरच राहणार (का) ?

(४) सेनापति: -- उत्कर्ष: स च धन्विनां यदिषव: सिध्यन्ति लक्ष्ये चले। (३७)
अर्थात -- धावणाऱ्या लक्ष्यांचा वेध करणे हे धनुर्धरांचे श्रेष्ठ (= वरच्या दर्जाचे) कौशल्य होय.

(५) राजा -- स्त्रीरत्नसृष्टिरपरा प्रतिभाति सा मे। (४१)
अर्थात -- ती मला उत्कृष्ट स्त्रीची असामान्य निर्मितीशी भासते.

(६) विदूषक: -- प्रथमं सपरिवाहमासीत्। (४७)
अर्थात -- (शकुंतलेला बघण्याचे कुतूहल) पहिल्यांदा मनाबाहेर ओसंडून वाहत होते.

(७) प्रियंवदा -- अनसूये, दूरगत-मन्मथ-अक्षमा इयं कालहरणस्य .... (५८)
अर्थात -- अनसूये, हिचा प्रेमभाव खूप खोलवर रुजला आहे. त्यामुळे अधिक वेळ दवडणे योग्य नाही.

(८) शिष्य: -- इष्ट-प्रवास-जनितान्यबलाजनस्य।
दु:खानि नूनमतिमात्रसुदु:सहानि ॥ (७८)
अर्थात -- ज्यांच्या प्रिय व्यक्ती प्रवासार्थ परगावी गेल्या आहेत अशा स्त्रियांची दु:खे खरोखर प्रमाणातीत व कमालीची असह्य असतात.

(९) काश्यप: -- यास्यत्यद्य शकुन्तलेति हृदयं संस्पृष्टमुत्कण्ठया। (८७)
अर्थात -- शकुंतला आज (सासरी) जात आहे ह्या जाणिवेने मन हुरहुरीने अतिशय व्याकुळ झाले आहे.

(१०) काश्यप: -- जातो ममायं विशद: प्रकामं
प्रत्यर्पितन्यास इवान्तरात्मा ॥ (१००)
अर्थात -- माझा हा अन्तरात्मा, एखाद्याची ठेव परत केल्यावर व्हावा तसा, अत्यंत शांत झाला आहे.

[२.८.२] अपूर्ण वाक्ये

संभाषणाचा विषय संभाषणात भाग घेणाऱ्या व्यक्तींना ठाऊक असतो, विषयाची प्रगती कोठवर झाली आहे हेही त्यांना माहीत असते आणि विषयाच्या कोणत्या अंशासंबंधी प्रस्तुत क्षणी बोलणे चालले आहे ह्याचेही भान त्यांना असते. (कारण संभाषण प्रत्यक्षात चालू असते). शिवाय संभाषण हे प्रकृतित: पसरट व मोकळेझाकळे असते. त्यामुळे संभाषक वाक्यांच्या अपूर्ण भागांचा अर्थ मनातल्या मनात समजून घेऊन संभाषण चालू ठेवू शकतात. म्हणून संभाषणात अनेक वाक्ये अपूर्ण असतात. तरीही त्यांच्या अर्थांचे पूर्ण आकलन होते. आता शाकुंतलाकडे वळू .

(१) राजा -- सरसिजमनुविध्दं शैवलेनापि रम्यम्। (१३) (पूरकशब्द दृश्यते)
अर्थात -- कमळ शेवाळाने व्यापलेले असले तरीसुध्दा रमणीय (दिसते).

(२) प्रियंवदा -- हला शकुन्तले, मोचितास्यनुकम्पिनार्येण, अथवा
महाराजेन। गच्छेदानीम्। (२६)
शकुन्तला -- (आत्मगतम्) यद्यात्मन: प्रभविष्यामि। (तर्हि गमिष्यामि/गच्छामि)
अर्थात -- गडे शकुंतले, कनवाळू सद्गृहस्थांनी अथवा महाराजांनी तुला (ऋण-) मुक्त केले आहे. आता जा.
-- (स्वत:शी) जर माझा स्वत:वर ताबा असेल/जर माझी मी राहिलेली असेन (तर जाईन).

(३) सेनापति: -- यत् प्रभविष्णवे रोचते। (३७) (तत् क्रियताम्)
अर्थात -- जे स्वामींना पसंत असेल (ते करावे).

(४) राजा -- संशयच्छेदि वचनम्। (५८) (भवति/अस्ति)
अर्थात -- (हे) बोलणे संशयाचे निराकरण करणारे (आहे).

(५) प्रियंवदा -- ननूटजसंनिहिता शकुन्तला। (७४) (वर्तते)
अर्थात -- शकुन्तला नक्की झोपडीजवळच (आहे).

(६) अनसूया -- सखि, अतिथीनामिव निवेदितम्। (७४) (भासते)
अर्थात -- मैत्रिणी, हे बोलणे सन्मान्य पाहुण्यांचे आहे, हे उघड आहे.

(७) प्रियंवदा -- अग्निशरणं प्रविष्टस्य शरीरं विना छन्दोमय्या वाण्या। (८१) (काश्यपस्य)
अर्थात -- अग्निगृहात प्रवेश केलेल्या (काश्यपांना) अशरीरी छन्दोबध्द वाणीने (हे सांगितले).

(८) विदूषक: -- अथवा भवितव्यता खलु बलवती। (१४३) (इति मन्तव्यम्)
अर्थात -- किंवा दैव खरोखर बलवान असते (असे मानावयाचे).

(९) चतुरिका -- अयि अनेन सार्थवाहवृत्तान्तेन द्विगुणोद्वेगो भर्ता। (१६१) (संवृत्त:)
अर्थात -- अरेरे, व्यापाऱ्याच्या ह्या हकीगतीने स्वामींची उद्विग्नता द्विगुणित (झाली आहे).

(१०) मारीच: -- आखण्डलसमो भर्ता, जयन्तप्रतिम: सुत:।
आशीरन्या न ते योग्या, पौलोमीसदृशी भव॥ (१९१)
पूरकांसह -- आखण्डलसमो (तव) भर्ता (विद्यते), जयन्तप्रतिम: सुत: (अस्ति)।
आशीरन्या न ते योग्या (वर्तते), (त्वं) पौलोमीसदृशी भव॥
अर्थात -- तुझे पती इंद्रासारखे (आहेत), मुलगा (इंद्रपुत्र) जयंताप्रमाणे (आहे), तुला दुसरा कोणताही आशीर्वाद योग्य नाही, (तू) (इंद्रपत्नी) पौलोमीसमान हो.

[२.८.३] एकमेकांची वाक्ये पूर्ण करणे

संभाषणाच्या ओघात संभाषकांची मानसिक एकरूपता झालेली असते. एकमेकांना ऋजुतेने समजून घेण्याची त्यांची वृत्ती असते. त्यामुळे एखाद्या संभाषकाला सामान्यपणे वाक्याच्या अखेरीचा शब्द सुचला नाही तर, किंवा संभाषण रेंगाळू नये (ते झपाट्याने पुढे सरकावे) म्हणून, किंवा एखाद्या मुद्याविषयी वक्ता व श्रोता ह्या दोघांच्यात पूर्ण मतैक्य असेल तर, किंवा वक्त्याला ठासून दुजोरा द्यावयाचा असेल तर, संभाषकांपैकी एक (म्हणजे श्रोता) दुसऱ्याचे (म्हणजे वक्त्याचे) वाक्य पूर्ण करतो किंवा त्याचे म्हणणे उचलून धरतो किंवा त्याच्या म्हणण्यास रुकार देतो. आता शाकुंतलातील संभाषणांचा परामर्श घेऊ.

(१) सख्यौ -- हला शकुन्तले, यद्यत्राद्य तात: संनिहितो भवेत् -
शकुन्तला -- तत: किं भवेत्।
सख्यौ -- इमं जीवितसर्वस्वेनापि अतिथिविशेषं कृतार्थं करिष्यति। (२०)
अर्थात -- प्रिये शकुन्तले, जर येथे आज तात उपस्थित असते -
-- तर काय झाले असते ?
-- (तर) त्यांनी आपले हे जीवितसर्वस्व(म्हणजे तुला)ही देऊन (ह्या) प्रतिष्ठित पाहुण्यांना कृतार्थ केले असते.

(२) अनसूया -- ततो वसन्तावतारसमये तस्या उन्मादयितृकं रूपं प्रेक्ष्य -
(अर्धोक्ते लज्जया विरमति।)

राजा -- परस्ताज् ज्ञायत एव। सर्वथा अप्सर:संभवैषा। (२२)

अर्थात -- त्यानंतर वसंत ऋतूच्या दिवसांत तिचे उन्मादक रूप पाहून - (अर्धेच बोलून लाज वाटल्याने थांबते)

-- त्यापुढचे लक्षात आलेच (म्हणजे विश्वामित्र व मेनका यांचा समागम होऊन मेनकेला विश्वामित्रापासून दिवस राहिले.) एकंदरीने ही अप्सरेपासून झालेली आहे.

(३) प्रियंवदा -- (जनान्तिकम्) अनसूये दूरगत-मन्मथ-अक्षमेयं कालहरणस्य। यस्मिन् बध्दभावेषा स ललामभूत: पौरवाणाम्। तद् युक्तमस्या अभिलाषोऽभिनन्दितुम्।

अनसूया -- तथा यथा भणसि। (५८-५९)

अर्थात -- अनसूये, हिचा प्रेमभाव खूप खोलवर रुजला आहे (= हिचे प्रेम अत्युत्कट आहे). तेव्हा अधिक विलंब हिला सहन होणार नाही. ज्याच्यावर हिचे मन जडले आहे तो पौरवांना ललामभूत आहे. म्हणून हिच्या ह्या प्रेमप्रकरणाबद्दल (संमतिपूर्वक) आनंद व्यक्त करणे योग्य आहे.

-- तू म्हणतेस तसेच (करू या).

(४) प्रियंवदा -- (विचिन्त्य) हला, मदनलेखोऽस्य क्रियताम्। इमं देवता-अशेष-अपदेशेन सुमनोगोपितं कृत्वा अस्य हस्तं प्रापयिष्यामि।

अनसूया -- रोचते मे सुकुमार: प्रयोग:। (६०)

अर्थात -- (विचार करून), गडे, ह्याला प्रेमपत्र (लिहून) पाठवावे. ते फुलांत झाकून, देवतांच्या प्रसादाचा उरलेला भाग आहे असा बहाणा करून, मी त्याच्या (=दुष्यंताच्या) हाती सुपूर्त करीन.

-- हा नाजूक उपाय मला आवडला.

(५) अनसूया -- ---। किं वा शकुन्तला भणति।

शकुन्तला -- किं नियोगो वां विकल्प्यते। (६०)

अर्थात -- ---। पण शकुंतलेचे काय म्हणणे (मत) आहे ?

-- तुम्हां दोघींच्या योजनेविषयी मी कधी विकल्प दाखवला आहे का ? (म्हणजेच तुम्हां दोघींची योजना मला मंजूर आहे. येथे प्रतिप्रश्नाद्वारे संमती दर्शवली आहे.)

(६) अनसूया -- वयस्य, बहुवल्लभा राजान: श्रूयन्ते। यथा नौ प्रियसखी बन्धुजनशोचनीया न भवति तथा निर्वाहय।

राजा -- भद्रे, किं बहुना

परिग्रहबहुलेऽपि द्वे प्रतिष्ठे कुलस्य मे ।

समुद्ररसना चोर्वी सखी च युवयोरियम् ।। १९ ।।

उभे -- निर्वृते स्व: । (६५)

अर्थात -- मित्रा, राजे लोकांना अनेक प्रेयसी असतात, असे ऐकतो. तेव्हा आम्हां दोघींच्या ह्या प्रिय मैत्रिणीला अशा प्रकारे नांदव की, ज्यायोगे (आमच्यासारख्या तिच्या) बंधुजनांवर दु:ख करण्याची वेळ येणार नाही.

-- बाईसाहेब, अधिक काय सांगू ?

-- मला जरी अनेक बायका असल्या तरी माझ्या वंशाचे दोन आधार आहेत. एक म्हणजे समुद्राचा कमरपट्टा ल्यालेली पृथ्वी व दुसरा म्हणजे ही तुमची मैत्रीण.

-- (आता) आम्ही निश्चिंत झालो.

(७) शकुन्तला -- तात एषा उटजपर्यन्तचारिणी गर्भमन्थरा मृगवधूर्यदानघप्रसवा भवति तदा मह्यं कमपि प्रियनिवेदयितृकं विसर्जयिष्यथ ।

काश्यप: -- नेदं विस्मरिष्याम: । (९३)

अर्थात -- तात, झोपडीच्या परिसरात वावरणारी ही गर्भवती हरिणी जेव्हा निर्विघ्नपणे प्रसूत होऊन बालकाला जन्म देईल, तेव्हा ती प्रिय बातमी मला कळविण्यासाठी कोणाला तरी धाडून द्या.

-- हे आम्ही विसरणार नाही (अर्थात कोणाला तरी जरूर पाठवू).

(८) विदूषक: -- भो:, अस्ति मे तर्क: । केनापि तत्रभवत्याकाशचारिणा नीतेति ।

राजा -- ---। मेनका किल सख्यास्ते जन्मप्रतिष्ठेति श्रुतवानस्मि । तत्सहचारिणीभि: सखी ते हृतेति मे हृदयमाशङ्कते । (१४४)

अर्थात -- अरे, माझा असा तर्क आहे की, आदरणीय शकुंतलेला आकाशात संचार करणाऱ्या कोणीतरी नेले आहे.

-- मी असे ऐकले आहे की, मेनका ही तुझ्या मैत्रिणीची (=शकुंतलेची) जन्मदात्री आहे. तिच्या मैत्रिणींपैकी कोणीतरी तुझ्या मैत्रिणीला नेले आहे अशी शंका माझ्या मनात येते.

(९) राजा -- वयस्य अन्यच्च । शकुन्तलाया: प्रसाधनमभिप्रेतमत्र विस्मृतं अस्माभि: ।

विदूषक: -- किमिव ।

सानुमती -- वनवासस्य सौकुमार्यस्य विनयस्य च यत् सदृशं भविष्यति । (१५२)

अर्थात -- मित्रा, आणखीही काही (रेखाटावयाचे आहे). शकुंतलेचे सौंदर्यप्रसाधन रेखाटण्याचे योजले होते, पण ते आम्ही विसरलो.

-- कोणत्या प्रकारचे प्रसाधन ?

-- जे वनवासाला, सुकुमारतेला व शालीनतेला अनुरूप असेल असे (प्रसाधन).

हे वाक्यपूर्तीचे वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण आहे. विस्मरणाचा उल्लेख राजा करतो, तद्विषयक प्रश्न विदूषक विचारतो, पण त्याचे उत्तर राजा देत नाही तर वेलीआड लपून राहिलेली सानुमती नामक मेनकेची मैत्रीण देते.

(१०) राजा -- वयस्य, उपस्थिता देवी बहुमानगर्विता च। भवानिमां प्रतिकृतिं रक्षतु।

विदूषक: -- आत्मानमिति भण। (१५७)

अर्थात -- मित्रा, महाराणी येत आहे व तू तिला बहुमानाने वागवतोस त्याचा तिला गर्व आहे. (म्हणून शकुंतलेचे) हे चित्र आपणच सांभाळावे.

-- स्वत:ला सांभाळावे असे म्हण. (म्हणजे मी महाराणीपासून स्वत:चे रक्षण करावे, असे तू म्हण).

[२.८.४] एखाद-दुसरा शब्दच प्रतिसादादाखल उच्चारला जाणे

संभाषणाची गती विषम असते. कधीकधी संभाषक लागोपाठ दोन-चार वाक्ये उच्चारतात, तर कधीकधी एखाद-दुसऱ्या शब्दाचाच उच्चार करून संभाषण संपवतात. हा प्रकार मानवी स्वभावाला धरून असल्यामुळे स्वाभाविक असतो. आता ह्या दृष्टीने शाकुंतलाचे निरीक्षण करू.

(१) इतरौ -- (बाहू उद्यम्य) सर्वथा चक्रवर्तिनं पुत्रमाप्नुहि।

राजा -- (सप्रणामम्) प्रतिगृहीतम्। (७)

अर्थात -- (हात उंच करून), तुला खात्रीपूर्वक चक्रवर्ती पुत्राची प्राप्ती होईल.

-- (प्रणाम करून) (आपली शुभकामना) स्वीकारली.

(२) राजा -- सूत, यावदाश्रमवासिन: प्रत्यवेक्ष्याहमुपावर्ते तावदार्द्रपृष्ठा: क्रियन्तां वाजिन:।

सूत -- तथा। (१०)

अर्थात -- सूता, आश्रमवासियांना भेटून मी परत येईतोपर्यंत घोड्यांच्या पाठी पाण्याने भिजव.

-- तसे (करीन).

(३) शकुन्तला -- सखि अनसूये, अतिपिनध्देन वल्कलेन प्रियंवदया नियंत्रितास्मि। शिथिलय तावदेतत्।

अनसूया -- तथा। (१२)

अर्थात -- गडे अनसूये, प्रियंवदेने वल्कल अतिशय घट्ट बांधले/आवळले आहे. त्यामुळे मला जखडल्यासारखे झाले आहे. तरी हे सैल कर.

-- तसे (करते).

(४) राजा -- सर्वथा अप्सर:संभवैषा।

अनसूया -- अथ किम्।

राजा -- उपपद्यते। (२२)

अर्थात -- एकंदरीने अप्सरेपासून हिचा जन्म झाला आहे.

-- मग काय तर ?

-- योग्यच आहे.

(५) शकुन्तला -- हला, शृणुतमिदानीं संगतार्थं न वेति।

उभे -- अवहिते स्व:। (६२)

अर्थात -- अग, हे (प्रेमपत्र) अर्थदृष्ट्या सुसंगत आहे की नाही ते तुम्ही दोघी ऐका.

(अनसूया व प्रियंवदा)-आम्ही ऐकतो आहोत.

(६) गौतमी -- वत्स नारद, कुत एतत्।

प्रथम : -- तातकाश्यपप्रभावात्। (८५)

अर्थात -- बेटा नारदा, हे कोठून (मिळाले) ?

-- तात काश्यपांच्या प्रभावापासून (हे मिळाले).

(७) राजा -- गच्छ, नागरिकवृत्त्या संज्ञापयैनाम्।

विदूषक: -- का गति:। (निष्क्रान्त:) (१०२)

अर्थात -- जा, सुसंस्कृत नागरिकाच्या वृत्तीने हिच्याशी संभाषण कर.

-- नाइलाज आहे (निघून जातो).

(८) शकुन्तला -- भवतु। यदि परमार्थत: परपरिग्रहशङ्किना त्वयैवं प्रवृत्तं तदभिज्ञानेनानेन तवाशङ्कामपनेष्यामि।

राजा -- उदार: कल्प:। (११६)

अर्थात -- असो, मी दुसऱ्या कोणाची तरी पत्नी आहे अशी जर तुला खरोखरच शंका वाटत असेल व म्हणून तू असा वागत असशील तर मी ही खुणेची वस्तू दाखवून तुझ्या शंकेचे निरसन करते (शंका दूर करते).

-- उत्तम कल्पना (आहे).

(९) राजा -- भो: सत्यवादिन्, अभ्युपगतं तावदस्माभिरेवम्। किं पुनरिमां अतिसन्धाय लभ्यते।

शाङ्र्गरव: -- विनिपात:। (१२१)

अर्थात -- हे सत्यवक्त्या, घटकाभर आम्ही हे मान्य केले. परंतु, हिची फसवणूक करून कोणता लाभ पदरी पडणार आहे ?

-- अध:पात.

(१०) राजा -- भवतीभ्यां कदाचिदस्या: प्रत्यक्षीकृता विक्रिया।

उभे -- अनेकश:। (१८४)

अर्थात -- तुम्ही दोघींनी ह्या (अपराजिता वनस्पतीचे) (सर्पात) रूपांतर झालेले कधीतरी स्वत: पाहिले आहे काय ?

-- अनेकदा (पाहिले आहे.)

[२.८.५] ग्राम्यता

स्वत:च्या घरातील माणसे, इतर आप्त, मित्र, परिचित, सहकारी, सहाध्यायी इत्यादी संभाषक एकमेकांच्या परिचयाचे असतात. त्यामुळे त्यांना परस्परांच्या जीवनांतील सुखदु:खांच्या घटना, प्रसंग, इतर अनुभव, स्वभावविशेष, आवडीनिवडी, गरजा, अपेक्षा, सामर्थ्ये, दौर्बल्ये इत्यादी बऱ्याच गोष्टी ठाऊक असतात. त्यांच्या पार्श्वभूमीवर संभाषण चालू असताना त्यात कधीकधी ग्राम्य उल्लेख येतात. काही संभाषकांची नैसर्गिक भाषाच शिवराळ असते, त्यांच्या तोंडून अपशब्द मोठ्या प्रमाणावर उच्चारले जातात. काही संभाषकांना त्यांच्या पेशामुळे अपशब्दांचा वापर अनिवार्य बनलेला असतो. आता ह्या दृष्टिकोणातून शाकुंतलाची पाहणी करू.

(१) सेनापति: -- (प्रकाशम्) प्रलपतु एष वैधेय:। (३६)

अर्थात -- ह्या मूर्खाला बरळत राहू दे.

(२) विदूषक: -- अपेहि रे उत्साहहेतुक। अत्रभवान् प्रकृतिमापन्न:। त्वं तावद् अटवीतोऽटवीमाहिण्डमानो नरनासिकालोलुपस्य जीर्णऋक्षस्य कस्यापि मुखे पतिष्यसि। (३७)

अर्थात -- अरे उत्साहमूर्ते (उत्साहास कारण होणाऱ्या), महाराजांची प्रकृती (आता) पूर्ववत झाली आहे. तू एका जंगलातून दुसऱ्या जंगलात असा हिंडत राहशील आणि शेवटी मनुष्यप्राण्याचे नाक खाण्यास लालचावलेल्या एखाद्या म्हाताऱ्या अस्वलाच्या तोंडी पडशील !

(३) विदूषक: -- गच्छ, भो: दास्या:पुत्र। (३८)

अर्थात -- जा, अरे रांडलेका !

(४) राजा -- मूर्ख, अन्यद् भागधेयमेतेषां रक्षणे निपतति, ... । (४३)

अर्थात -- मूर्खा, ह्यांचे (म्हणजे तपस्विजनांचे) रक्षण केले असता दुसरे धन पदरात पडेल.

(५) रक्षिणौ -- अरे कुंभीरक, कथय कुत्र त्वयैतत् ... अङ्गुलीयकं समासादितम् । (१२६)

अर्थात -- अरे चोरा, ही आंगठी, तू कोठून मिळवलीस ते सांग.

(६) द्वितीयः -- पाटच्चर, किमस्माभिर् जातिः पृष्टा । (१२६)

अर्थात -- चोरा, आम्ही काय (तुला) तुझी जात विचारली होती ?

(७) रक्षिणौ -- तथा । गच्छ अरे ग्रन्थिभेदक ।

अर्थात -- तसे (करू या, म्हणजे राजाकडे जाऊ या). चल रे खिसेकापू !

(८) विदूषकः -- (सावधानं निरूप्य) आः, एष दास्याःपुत्रः कुसुमरसपाटच्चरस् तत्रभवत्या वदनमभिलङ्घते मधुकरः । (१५३)

अर्थात -- (बारकाईने पाहून) आहा, हा रांडलेक, फुलांचा मकरंद चोरणारा भुंगा येथे बाईसाहेबांच्या चेहऱ्याच्या दिशेने मुसंडी मारत आहे (चेहऱ्यावर हल्ला चढवीत आहे).

ह्या वैशिष्ट्याची संपूर्ण नाटकात एवढीच उदाहरणे आढळून येतात. त्यामुळे प्रस्तुत मुद्याची येथेच रजा घेऊन पुढच्या मुद्याकडे वळू.

[२.८.६] चिंतनाला सामग्री पुरवणे

संभाषण हे सर्व प्रकारच्या स्त्रीपुरुषांमध्ये संभवते. अशा व्यक्तींत अल्पशिक्षित व उच्चशिक्षित, गरीब व श्रीमंत, सामान्य बुद्धीची व असामान्य बुद्धीची, खुज्या कर्तृत्वाची व उत्तुंग कर्तृत्वाची अशी सर्व थरांतील माणसे असतात. त्यांना जीवन जगताना विविध व विपुल अनुभव आलेले असतात. त्या अनुभवांमुळे त्यांनी निसर्ग, मनुष्यस्वभाव, ऐहिक व्यवहार इत्यादी विविध विषयांवर आपापल्या कुवतीनुसार विचार केलेला असतो. तो त्यांच्या संभाषणाच्या ओघात सहजपणे व्यक्त होऊन जातो व इतरांच्या चिंतनाला खाद्य पुरवतो. ज्या संभाषकाला 'दुनियादारी'चा दीर्घकालीन व विशाल अनुभव असतो त्याला अशांपैकी बरेचसे विचार ठाऊक असतात, सुचलेले असतात व/वा ते त्याने इतरांना प्रसंगविशेषी ऐकवलेलेही असू शकतात. एकंदरीने अशा चिंतनकणिका ही सर्व समाजाची सामाईक मालमत्ता असते. शाकुंतलात असे कोणते विचारकण उपलब्ध होतात ते आता लक्षात घेऊ.

(१) राजा -- सर्वः कान्तमात्मीयं पश्यति । (३९)

अर्थात -- प्रत्येकाला आपले माणूस सुंदर वाटत असते (प्रत्येक मातेला आपली मुलगी रंभा किंवा तिलोत्तमा वाटत असते, तद्वत !)

(२) अनसूया -- विकारं खलु परमार्थतोऽज्ञात्वानारम्भः प्रतीकारस्य। (५५)
अर्थात -- विकाराचे खरोखरचे स्वरूप जाणून घेतल्यावाचून उपाययोजनेस सुरुवात करता येत नाही.

(३) उभे -- स्निग्धजनसंविभक्तं हि दुःखं सह्यवेदनं भवति। (५७)
(अनसूया व प्रियंवदा अशा दोघी) -- कारण दुःख हे जिव्हाळ्याच्या माणसांनी वाटून घेतले की त्याची वेदना सुसह्य बनते.

(४) राजा -- विवक्षितं ह्यनुक्तमनुतापं जनयति। (६४)
अर्थात -- जे बोलून टाकावेसे वाटते ते न बोलल्यास पश्चात्तापास कारणीभूत ठरते (अर्थात, जे मनात असेल ते बोलून मन मोकळे करावे, म्हणजे मागाहून पश्चात्तापाची पाळी येत नाही).

(५) राजा -- अहो विघ्नवत्यः प्रार्थितार्थसिद्धयः। (७०)
अर्थात -- अहो, मनोरथांच्या परिपूर्तीच्या आड अनेक अडथळे येत असतात.

(६) शाङ्‌र्गरवः -- न खलु धीमतां कश्चिदविषयो नाम। (९६)
अर्थात -- खरोखर बुद्धिमान व्यक्तींना न समजण्यासारखा विषय नसतोच.

(७) पुरुषः -- सहजं किल यद् विनिन्दितं न खलु तद् विवर्जनीयम्। (१२७)
अर्थात -- कोणाचेही जन्मजात(कर्तव्य)कर्म कितीही हलके (लोकदृष्ट्या निंद्य) असले तरी ते वर्ज्य नसते (ते कर्तव्य म्हणून आचरणीयच ठरते).

(८) पुरुषः -- नार्हति भावोऽकारणमारणो भवितुम्। (१२९)
अर्थात -- आपल्यासारख्या मान्यवरांनी कोणालाही अकारण मारून टाकणे योग्य नाही.

(९) सानुमती -- उत्सवप्रियाः खलु मनुष्याः। (१३७)
अर्थात -- खरोखर माणसांना उत्सव प्रिय असतात.

(१०) मातलिः -- उत्सर्पिणी खलु महतां प्रार्थना। (१७५)
अर्थात -- मोठ्यांची महत्त्वाकांक्षा खरोखरीच उत्तुंग असते.

[२.८.७] जनात एक तर मनात दुसरेच असणे

संभाषणप्रसंगी असे अनेकदा प्रत्ययास येते की, संभाषक व्यक्ती आपल्या मनातल्या भावना लपवून किंवा दडपून ठेवते आणि प्रकटपणे वेगळीच भावना व्यक्त करते. असे करण्यामागे धाक, उपहास, निर्भर्त्सना, गौप्यरक्षण, लटका राग, दुसऱ्याला वेडावण्याचा हेतू अशांपैकी एखादे निमित्त असते. आता ह्या दृष्टीने शाकुन्तलावर नजर टाकू.

(१) शकुंतलेच्या दोघी मैत्रिणी - अनसूया व प्रियंवदा -- 'अग शकुंतले, ह्या वेळी जर तात काश्यप येथे असते ना, तर त्यांनी प्राणप्रिय अशा तुला ह्या सन्माननीय पाहुण्यांना देऊन ह्यांना कृतार्थ केले असते', असे एकाच वेळी म्हणतात. ते ऐकून 'अगदी आपलेच मनोगत ह्यांनी व्यक्त केले आहे', असे वाटून शकुंतला वास्तविकपणे मनोमन सुखावलेली असते. पण ती लटका राग आणून म्हणते :

शकुन्तला -- युवामपेतम्। किमपि हृदये कृत्वा मन्त्रयेथे। न युवयोर्वचनं श्रोष्यामि। (२०)

अर्थात -- तुम्ही दोघी येथून निघून जा कशा ! मनात काहीबाही आणून बडबडता झालं. मी तुमचं बोलणं ऐकणारच नाही मुळी.

(२) राजा विदूषकाला सांगतो की, विधात्याने विशेष विचार करून शकुंतलेला घडवलेले आहे. तिचे रूप इतके असामान्य आहे की, ती मला अद्वितीय स्त्रीरत्नच वाटते. ते ऐकून विदूषक राजाच्या ह्या भ्रमरवृत्तीला खालील शब्दांत कोपरखळी मारतो :

विदूषकः -- यद्येवं प्रत्यादेश इदानीं रूपवतीनाम्। (४१)

अर्थात -- जर असे असेल तर आता इतर रूपवती ठोकरल्या गेल्या (असे समजावे).

(३) राजा विदूषकाला आपले मनोगत पुढील शब्दांत ऐकवतो: शकुंतला म्हणजे न हुंगलेले फूल, नखांनी न तोडलेली कोवळी पालवी, वेध न पाडलेले रत्न, न चाखलेला ताजा मध आणि पुण्यकृत्यांचे अखंड फळ आहे. विधाता हिचा उपभोक्ता म्हणून कोणाची निवड करणार ते ठाऊक नाही ! ते ऐकून विदूषक राजाला 'तू तिला त्वरित हस्तगत कर' असे वरकरणी सुचवतो पण मनातून टोमणा मारतो :

विदूषकः -- तेन हि लघु परित्रायतामेनां भवान्। मा कस्यापि तपस्विनः इङ्गुदीतैलचिक्कणशीर्षस्य हस्ते पतिष्यति। (४१)

अर्थात -- तर मग आपण हिचे ताबडतोब रक्षण करावे. इंगुदीचे तेल चोपडल्याने ज्याचे मस्तक चिकट झालेले आहे अशा एखाद्या तपस्व्याच्या हातात ही पडू नये !

(४) विदूषक राजाला विचारतो : 'शकुंतलेने नजरेने तुझ्याविषयी कोणती भावना व्यक्त केली ?' राजा खुलासा करताना सरतेशेवटी म्हणतो : 'न विवृतो मदनो न च संवृतः।' (४२)

अर्थात -- तिने आपली प्रीती प्रकटही केली नाही आणि झाकलीही नाही. तिची

शालीनता व राजाची अधीरता विदूषकाच्या लक्षात येते. तो फटकन म्हणतो :

विदूषक: -- न खलु दृष्टमात्रस्य तवाङ्कं समारोहति। (४२)

अर्थात -- तुला पाहिल्याबरोबर ती तुझ्या एकदम मांडीवर येऊन बसणार नाही. विदूषकाच्या ह्या उद्‌गारांत राजाची निर्भर्त्सना आहे, आणि संयमी शकुंतलेची प्रशंसा आहे (मात्र शब्दयोजनेत अशोभनीय उत्तानपणा आहे).

(५) राजा -- मिथ:प्रस्थाने पुन: शालीनतयापि काममाविष्कृतो भावस्तत्रभवत्या। (४२)

....

विदूषक: -- तेन हि गृहीतपाथेयो भव। कृतं त्वयोपवनं तपोवनमिति पश्यामि। (४३)

अर्थात -- त्या तिघींनी प्रस्थान केले तेव्हा तिने (शकुंतलेने) शालीनतेने का होईना, पण आपल्या मनातील (प्रेमाची) भावना पुरेशा प्रमाणात प्रकट केली.

....

-- तर मग शिदोरीची तयारी कर. तू ह्या तपोवनाचे उपवन केलेस असे माझे मत झाले आहे.

(६) विदूषक: -- न खलु मां रक्षोभीरुकं गणयसि।

राजा -- (सस्मितम्) भो महाब्राह्मण। कथमेतद् भवति संभाव्यते। (४८)

अर्थात -- मी राक्षसांना खरोखर भितो असे तू समजू नकोस.

-- (हसून) अरे महाब्राह्मणा ! हे (भिणे) तुझ्या बाबतीत कसे संभवेल ? राजाचे हे बोलणे औपरोधिक आहे. शिवाय महाब्राह्मण म्हणजे तुच्छ ब्राह्मण !

(७) राजा -- ...(विदूषकं हस्ते गृहीत्वा। प्रकाशम्) वयस्य, ऋषिगौरवादाश्रमं गच्छामि। न खलु सत्यमेव तापसकन्यकायां ममाभिलाष:। (४९)

अर्थात -- (विदूषकाचा हात धरून, प्रकटपणे) मित्रा, ऋषींबद्दलच्या आदरामुळे मी आश्रमात जात आहे. तपस्विकन्येविषयी माझ्या मनात खरीखुरी अभिलाषा खरोखरच नाही. वस्तुत: 'सत्यमेव तापसकन्यकायां ममाभिलाष:।' हे राजाचे अस्सल मनोगत आहे.

(८) विदूषक: -- तिष्ठ तावद्। अनेन दण्डकाष्ठेन कन्दर्पबाणं नाशयिष्यामि। (दण्डकाष्ठमुद्यम्य चूताङ्कुरं पातयितुमिच्छति।)

राजा -- (सस्मितम्) भवतु। दृष्टं ब्रह्मवर्चसम्। ... (१४१)

अर्थात -- क्षणभर थांब. ह्या काठीने मदनाच्या बाणाचा विध्वंस करतो. (काठी उचलून आंब्याचा मोहोर खाली पाडू इच्छितो.)

-- (हसून) राहू दे. ब्राह्मणाचे तेज दिसले !

येथे राजा विदूषकाची स्तुती करीत नाही, तर त्याचा उपहास करतो.

(९) विदूषक: -- (आत्मगतम्) यथाहं पश्यामि पूरयितव्यमनेन चित्रफलकं लम्बकूर्चानां तापसानां कदम्बैः। (१५२)

अर्थात -- मला असे वाटते की, ह्याने (म्हणजे राजाने) लांब दाढी वाढवलेल्या तपस्व्यांच्या टोळक्यांचे रेखाटन करून हा चित्रफलक पूर्ण करावा. विदूषकाला ह्या उद्‌गारांद्वारे 'मला अजून ह्या चित्रात हे रेखाटावयाचे आहे, ते रेखाटावयाचे आहे', अशा राजाच्या आकांक्षेची टर उडवावयाची आहे आणि तपस्विजनांविषयीची आपली नावडही व्यक्त करावयाची आहे.

(१०) द्वितीया -- एषा खलु केसरिणी त्वां लङ्घयति यदि तस्याः पुत्रकं न मुञ्चसि।

बाल: -- अहो, बलीयः खलु भीतोऽस्मि। (अधरं दर्शयति।) (१७७)

अर्थात -- ह्या सिंहिणीच्या छाव्याला तू सोडून दिले नाहीस ना, तर ही तुझ्यावर झडप घालील (हं).

-- बाप रे, मी केवढा घाबरून गेलो आहे ! (वेडावतो).

[२.८.८] प्रश्नात्मक वाक्यांचे प्राचुर्य

संभाषणाच्या ओघात काही संभाषकांच्या मनात काही कुतूहले, विकल्प, विचार, आत्मपरीक्षण, रोष, तर्कवितर्क, प्रतिक्रिया, अनिश्चय, आश्चर्य, औत्सुक्य, अशा नानाविध भावभावना उत्पन्न होतात. अशा प्रसंगी ते संभाषक स्वतःलाच प्रश्न विचारून अशा भावनांना वाचा फोडतात. संभाषकांनी स्वतःलाच विचारलेले असे प्रश्न संभाषकांची त्या-त्या भावनेशी झालेली एकरूपताच प्रदर्शित करतात. शाकुन्तलातही हे वैशिष्ट्य प्रतीत होते. उदाहरणार्थ,

(१) शकुन्तला, प्रियंवदा व अनसूया ह्या आश्रमातील वृक्षांना पाणी घालत असतात. त्यांना बघून राजा स्वतःलाच विचारतो:

'कथमियं सा कण्वदुहिता।' (११)

अर्थात -- ही का ती कण्व ऋषींची मुलगी ?

(२) राजा -- अपि नाम कुलपतेरियमसवर्णक्षेत्रसम्भवा स्यात्। (१५)

अर्थात -- ही कुलपतींना त्यांच्याहून वेगळ्या वर्णाच्या स्त्रीपासून झालेली मुलगी तर नसावी ?

(३) शकुन्तला -- (आत्मगतम्) किं नु खलु इमं प्रेक्ष्य तपोवनविरोधिनो विकारस्य गमनीयास्मि संवृत्ता। (१९)

अर्थात -- (स्वत:शी) ह्याला पाहिल्यापासून तपोवनाशी विसंगत अशा विकाराच्या आहारी मी गेले आहे, असे खरोखर का बरे झाले आहे ?

(४) शकुन्तला -- (प्रकाशम्) का त्वं विसर्जितव्यस्य रोध्दव्यस्य वा। (२६)

अर्थात -- मला जा म्हणून सांगणारी किंवा अडवणारी तू कोण लागून गेलीस ?

(५) राजा -- बलवदस्वस्थशरीरा शकुन्तला दृश्यते। (सवितर्कम्) तत् किमय - मातपदोष: स्यात् उत यथा मे मनसि वर्तते। (५४)

अर्थात -- शकुन्तलेची प्रकृती खूपच बिघडलेली दिसत आहे. (तर्क करून) तर मग हा तिला होणारा उन्हाळ्याचा त्रास असावा की जसे माझ्या मनात आहे (तसे असावे ?) (म्हणजे तीही माझ्याप्रमाणे प्रेमभावनेने व्याकुळ झाली आहे ?)

(६) प्रियंवदा -- कोऽन्यो हुतवहाद्दग्धुं प्रभवति। (७५)

अर्थात -- अग्नीवाचून दुसऱ्या कोणात जाळण्याचे सामर्थ्य आहे ?

(७) काश्यप: -- (आत्मगतम्) किं नु खलु तत्रभवतो दुष्यन्तस्य युक्तरूपमस्माभि: सन्देष्टव्यम्। (चिन्तयति) (९४)

अर्थात -- महाराज दुष्यन्तांना खरोखर साजेल असा कोणता संदेश आपण पाठवू या ?

(८) राजा -- (आत्मगतम्) - किं नु खलु गीतमेवंविधार्थमाकर्ण्येष्टजनविरहाद् ऋतेऽपि बलवदुत्कण्ठितोऽस्मि। (१०३)

अर्थात -- (स्वत:शी) अशा अर्थाचे हे गीत ऐकून, प्रिय जनांपासून माझा वियोग झालेला नसूनही, मी इतका अतिशय बेचैन का बरे झालो आहे ?

(९) सानुमती -- (समन्तादवलोक्य) किं नु खलु ऋतूत्सवेऽपि निरुत्सवारम्भमिव राजकुलं दृश्यते। (१३२-३३)

अर्थात -- (सभोवार पाहून) वसंत ऋतूच्या उत्सवाचा हा काळ असूनही उत्सवाला जणू आरंभच झालेला नाही असे ह्या राजकुलाचे (वातावरण) का बरे दिसत आहे ?

(१०) द्वितीया -- (सहर्षं त्वरयोपगम्य) कथमुपस्थितो मधुमास:। (१३४)

अर्थात -- (आनंदाने घाईघाईत जवळ जाऊन) काय, वसंत ऋतूचे आगमन झाले आहे ?

[२.८.९] प्रश्नोत्तरे (सादप्रतिसाद)

संभाषण जेव्हा अनेक व्यक्तींमध्ये चालू असते तेव्हा संभाषक ज्ञान मिळवणे, माहिती

काढून घेणे, एखाद्या घटनेचा तपशील जाणून घेणे, एखाद्याच्या कृति-उक्तींमागील हेतू समजून घेणे, केवळ औत्सुक्य शमवणे, विसंगतींच्या परिहाराचा उपाय शोधून काढणे, एखाद्या व्यक्तीस नीटपणे जाणून घेणे अशा अनेक कारणांनी प्रेरित होऊन परस्परांना प्रश्न विचारून त्यांची उत्तरे मिळवतात. अशा प्रकारे प्रश्नोत्तर-स्वरूपात संभाषण चालू राहाते व पुढेपुढे सरकते. असे सादप्रतिसाद शाकुंतलात कोठे व कसे ऐकू येतात त्यांचा कानोसा आता घेऊ.

(१) प्रियंवदा -- (जनान्तिकम्) अनसूये, को नु खलु एष चतुरगंभीराकृतिर्मधुरं प्रियमालपन् प्रभाववानिव लक्ष्यते ।

अनसूया -- सखि, ममाप्यस्ति कौतूहलम् । प्रक्ष्यामि तावदेनम् । (१९)

अर्थात -- (एकीकडे) अनसूये, दिसण्यात प्रसन्न व रुबाबदार, बोलण्यात गोड - आणि प्रिय तसेच प्रभावशाली भासणारा असा हा कोण असावा बरे ?

-- गडे, मलाही हेच कुतूहल आहे. विचारतेच त्याला.

(२) विदूषक: -- भो वयस्य, यद्वेतसः कुब्जलीलां बिडम्बयति, तत् किमात्मनः प्रभावेण, ननु नदीवेगस्य ।

राजा -- नदीवेगस्तत्र कारणम् ।

विदूषक: -- ममापि भवान् । (३३)

अर्थात -- अरे मित्रा, जेव्हा वेळू कुब्जवृक्षाच्या आकाराचे अनुकरण करतो तेव्हा तो तसा स्वतःच्या सामर्थ्याने / ताकदीने वाकतो की नदीच्या वेगामुळे वाकतो ?

-- त्याबाबतीत नदीचा वेग(च) कारणीभूत असतो.

-- माझ्याही (शारीरिक दुखापतीच्या) बाबतीत तूच (कारणीभूत आहेस).

(३) राजा -- सखे, तपस्विभिः कैश्चित् परिज्ञातोऽस्मि । चिन्तय तावत् केनापदेशेन पुनरप्याश्रमपदं गच्छामः ।

विदूषक: -- कोऽपरोऽपदेशः । ननु भवान् राजा ।

राजा -- ततः किम् ।

विदूषक: -- निवारषष्ठभागमस्माकमुपहरन्तु इति । (४३)

अर्थात -- मित्रा, काही तपस्व्यांनी मला ओळखले आहे . तेव्हा पुन्हा एकदा आपल्याला त्या आश्रमात जाता येईल अशा एखाद्या क्लृप्तीचा विचारपूर्वक शोध घे.

-- दुसरी कोणती क्लृप्ती ? अरे तू राजा आहेस (एवढीच क्लृप्ती पुरेशी आहे).

-- म्हणजे काय ? (= त्याचा संबंध काय ?)

-- (तपस्व्यांना जाऊन सांग की) माझ्या हक्काचा धान्याचा सहावा भाग मला द्या.

(४) राजा -- माढव्य, अप्यस्ति शकुन्तलादर्शने कुतूहलम् ।

विदूषक: -- प्रथमं सपरिवाहमासीत् । इदानीं राक्षसवृत्तान्तेन बिन्दुरपि न अवशेषित: । (४७)

अर्थात -- माढव्या, शकुन्तलेला बघण्याची उत्सुकता आहे ?

-- पहिल्यांदा ओसंडून वाहत होती. आता राक्षसांची बातमी ऐकल्यानंतर कणभरदेखील शिल्लक राहिलेली नाही.

(५) अनसूया -- यथाहं पश्यामि, तथा तस्यानुमतं भवेत् ।

प्रियंवदा -- कथमिव ।

अनसूया -- गुणवते कन्यका प्रतिपादनीयेत्ययं तावत् प्रथम: संकल्प: । तं यदि दैवमेव संपादयति नन्वप्रयासेन कृतार्थो गुरुजन: । (७३)

अर्थात -- मला असे वाटते (शब्दश: दिसते) की, त्यांना पसंत पडेल.

-- कशावरून ?

-- गुणवान व्यक्तीला मुलगी द्यायची असा त्यांचा आद्य / पहिल्यापासून संकल्प आहे. जर भाग्यानेच तो संकल्प सिद्धीस नेला तर वडीलधाऱ्यांना, आपण प्रयास न करता, कृतकृत्य झालोसे वाटते.

(६) राजा -- (सादरम्) किं काश्यपसंदेशहारिणस् तपस्विन: ।

कञ्चुकी -- अथ किम् ।

राजा -- तेन हि मद् वचनाद् विज्ञाप्यतामुपाध्याय: सोमरात: ।... (१०५)

अर्थात -- (आदरपूर्वक) काय, (आदरणीय) काश्यपांचा संदेश घेऊन तपस्वी आले आहेत ?

-- मग काय तर ?

-- तर मग मी सांगतो त्याप्रमाणे सोमरात पुरोहितांना विनंती करा की ...

(७) विदूषक: -- यद्येवमस्ति खलु समागम: कालेन तत्रभवत्या । (१४४)

राजा -- कथमिव ।

विदूषक: -- न खलु मातापितरौ भर्तृवियोगदु:खितां दुहितरं द्रष्टुं पारयत: । (१४५)

अर्थात -- जर असे असेल तर बाईसाहेबांशी तुझा संयोग कालांतराने निश्चित होईल.

-- कसा काय ?

-- कोणत्याही आईवडिलांना पतिवियोगामुळे दु:खी झालेली आपली मुलगी पाहवत नाहीच नाही.

(८) विदूषक: -- कथं धीवरकल्पितस्य रोहितमत्स्यस्य उदराभ्यन्तर आसीत् ।

राजा -- शचीतीर्थं वन्दमानाया: सख्यास्ते हस्ताद् गङ्गास्रोतसि परिभ्रष्टम् ।

विदूषक: -- युज्यते । (१४७)

अर्थात -- (ही आंगठी) मच्छीमाराने चिरलेल्या रोहित माशाच्या पोटाच्या आतल्या भागात कशी होती ? (कशी गेली होती ?)

-- तुझी मैत्रीण शचीतीर्थाला वंदन करीत असताना (ही आंगठी) तिच्या हातातून गंगेच्या प्रवाहात पडली.

-- पटले (=माशाच्या पोटात कशी गेली ते कळले).

(९) राजा -- (बालकमुपलालयन्) न चेन्मुनिकुमारोऽयम्, अथ कोऽस्य व्यपदेश: ।

तापसी -- पुरुवंश: । (१८१)

अर्थात -- (बालकाला खेळवीत) हा जर ऋषिपुत्र नसेल तर मग हा कोणत्या वंशातील ?

-- पुरुवंशातील

(१०) बाल: -- मात:, क एष: ।

शकुन्तला -- वत्स, ते भागधेयानि पृच्छ । (१८६-८७)

अर्थात -- आई, हा कोण (आहे) ?

-- बाळा, आपल्या दैवाला विचार.

[२.८.१०] बोलणाऱ्याचा आरंभाचा वा अखेरचा शब्द ऐकणाऱ्याने पुन्हा उच्चारणे

स्त्रीपुरुषांचे संभाषण लक्षपूर्वक ऐकल्यास असे लक्षात येते की, संभाषकांपैकी ऐकणारा बोलणाऱ्याच्या वाक्यातील सुरुवातीचा किंवा शेवटचा शब्द संमती दर्शवणे, विनय प्रकट करणे, ठाऊक / ऐकलेले असल्याचे सुचवणे, वस्तुस्थितीचे वर्णन करणे, एखाद्या घटनेबद्दलची बरीवाईट प्रतिक्रिया व्यक्त करणे, विनंतीस मान देणे, कुतूहल प्रदर्शित करणे, विशिष्ट मन:स्थिती प्रकट करणे इत्यादी विविध निमित्तांनी पुन्हा उच्चारतो. कालिदासाने ह्या बारकाव्याची दखल घेतली आहे, असे शाकुंतलाच्या वाचनान्ती लक्षात येते. आता उदाहरणेच पाहू.

(१) वैखानस: -- तत् साधुकृतसन्धानं प्रतिसंहर सायकम् । . . .

राजा -- एष प्रतिसंहृत: । (यथोक्तं करोति ।) (७)

अर्थात -- तू उत्तम प्रकारे नेम धरला आहेस. तो आपला बाण आवर.

-- हा आवरला. (जसे म्हणतो तसे करतो)

(२) अनसूया -- ... । उज्झितायाः शरीरसंवर्धनादिभिस् तातकाश्यपोऽस्याः पिता ।

राजा -- उज्झितशब्देन जनितं मे कौतूहलम् । आमूलाच् छ्रोतुमिच्छामि (२१)

अर्थात -- टाकलेल्या हिला खाऊपिऊ घालून लहानाची मोठी केली ह्या कारणास्तव तातकाश्यप हिचे वडील होत.

-- 'टाकलेली' ह्या शब्दाने माझे कुतूहल चाळवले आहे. सुरुवातीपासूनचे (सगळे) ऐकू इच्छितो.

(३) अनसूया -- शृणोतु आर्यः । अस्ति कोऽपि कौशिक इति गोत्रनामधेयो महाप्रभावो राजर्षिः ।

राजा -- अस्ति । श्रूयते । (२१)

अर्थात -- मान्यवरांनी ऐकावे. कौशिक असे ज्याचे गोत्रनाम आहे असा कोणी एक महाप्रभावशाली राजर्षी आहे.

-- आहे (असे) ऐकले आहे.

(४) राजा -- कुतोऽयं गात्रोपघातः ।

विदूषकः -- कुतः किल स्वयमक्षिणी आकुलीकृत्याश्रुकारणं पृच्छसि । (३३)

अर्थात -- शारीरिक इजा कोठून (कोणत्या कारणांनी) झाल्या ?

-- कोठून ? भले, स्वतःच रडवावयाचे व स्वतःच 'का रडतोस' म्हणून विचारावयाचे !

(५) प्रियंवदा -- आपन्नस्य विषयनिवासिनो जनस्यार्तिहरेण राज्ञा भवितव्यमिति एष युष्माकं धर्मः ।

राजा -- नास्मात् परं किंचिद् धर्मः । (६४)

अर्थात -- राजाने आपल्या राज्यात राहणाऱ्या दुःखितांचे दुःख दूर करावयाचे असते. तो तुझा धर्म आहे.

-- ह्याहून मोठा (दुसरा) कोणताही धर्म नाही.

(६) प्रियंवदा -- ननूटजसंनिहिता शकुन्तला ।

अनसूया -- अद्य पुनर् हृदयेनासंनिहिता । (७४)

अर्थात -- खरे तर शकुन्तला झोपडीजवळ आहे की.

-- पण आज (ती) मनाने (झोपडी)जवळ नाही.

(७) प्रियंवदा -- हा धिक् हा धिक् । अप्रियमेव संवृत्तम् । कस्मिन्नपि पूजार्हेऽपराध्दा शून्यहृदया शकुन्तला ।

अनसूया -- न खलु यस्मिन् कस्मिन्नपि । ... (७४-७५)

अर्थात -- अरेरे, अरेरे, अत्यंत अप्रिय गोष्ट घडली. कोण्या पूजनीय व्यक्तीचा शकुन्तलेकडून अनादर झाला आहे.
-- अशातल्या तशातल्या व्यक्तीचा नाही.

(८) प्रियंवदा -- ततस्ततः ।
अनसूया -- ततो मे वचनमन्यथा भवितुं नार्हति । (७६)
अर्थात -- मग पुढे ?
-- मग (ते म्हणाले-) मी जे काही बोललो त्यात कोणत्याही प्रकारे बदल होणार नाही.

(९) राजा -- ... । अथ भगवांल्लोकानुग्रहाय कुशली काश्यपः ।
शाङ्गरवः -- स्वाधीनकुशलाः सिद्धिमन्तः । .... (१११)
अर्थात -- ... लोकांवर कृपा करण्यासाठी पूज्य काश्यप सांप्रत कुशल आहेत ना ?
-- सिद्धिप्राप्त व्यक्तींचे क्षेमकुशल त्यांच्या अधीन असते.

(१०) मातलिः -- (सस्मितम्) आयुष्मन्, श्रूयतां यदस्मि हरिणा भवत्सकाशं प्रेषितः ।
राजा -- अवहितोऽस्मि ।
मातलिः -- अस्ति कालनेमिप्रसूतिर् दुर्जयो नाम दानवगणः ।
राजा -- अस्ति । श्रुतपूर्वं मया नारदात् । (१६५-६६)
अर्थात -- (स्मित करून) हे दीर्घायुषी राजा, इंद्राने मला आपल्याकडे का पाठवले आहे ते ऐक.
-- ऐकतो आहे.
-- कालनेमीची संतती असलेली दुर्जय नावाची दानवांची टोळी आहे.
-- मी नारदाच्या तोंडून पूर्वी हे ऐकले आहे.

[२.८.११] मोठ्या वाक्यांच्या पोटात (अन्तर्निविष्ट) लहान वाक्ये असणे

संभाषणाची एकूण धाटणी काहीशी गुंतागुंतीची असते. संभाषकाला मधूनमधून 'मला वाटते', 'असे म्हणतात की', 'असे जे सुभाषित आहे', 'आमचे मत विचारात घेण्याजोगे असेल तर', 'तर मी काय म्हणतो', असे वाक्यांश मोठ्या वाक्याच्या अन्तर्गत वापरण्याची लहर येते. काही संभाषकांची ती सवयच असते. कालिदासानेही आपल्या पात्रांच्या तोंडी अशी खंडप्राय वाक्ये वापरलेली आढळतात. उदाहरणार्थ,

(१) अनसूया -- शृणोतु आर्यः । पुरा किल तस्य राजर्षेरुग्रे तपसि वर्तमानस्य किमपि जातशङ्कैर् देवैर् मेनका नाम अप्सराः प्रेषिता नियमविघ्नकारिणी । (२२)

अर्थात -- मान्यवरांनी ऐकावे. असे म्हणतात की, पूर्वी (कौशिक) राजर्षीची घोर तपश्चर्या चालू झाल्यावर ज्यांच्या मनात काहीतरी शंका आली अशा देवांनी, (त्या राजर्षीच्या) व्रतात विघ्न उत्पन्न करण्यासाठी, मेनका नावाच्या अप्सरेला पाठवले.

(२) शकुन्तला -- तद् यदि वामनुमतं तदा तथा वर्तेथां यथा तस्य राजर्षेरनुकम्पनीया भवामि। --- (५८)

अर्थात -- तेव्हा, जर तुम्हां दोघींना मान्य असेल तर अशी वागणूक करा की, जिच्या योगे त्या राजर्षीला माझ्याविषयी अनुकंपा वाटेल.

(३) अनसूया -- --- । अन्यथा कथं स राजर्षिस् तादृशानि मन्त्रयित्वैतावतः कालस्य लेखमात्रमपि न विसृजति। (८०)

अर्थात -- --- । नाहीतर, तशा प्रकारच्या (म्हणजे प्रेमाच्या) गोष्टी करून इतका कालावधी लोटला तरी तो राजर्षी (साधे) पत्रसुद्धा पाठवीत नाही हे कसे (ह्याचा कसा उलगडा व्हायचा) ?

(४) राजा -- (सस्मितम्) इदं तत् प्रत्युत्पन्नमति स्त्रैणमिति यदुच्यते। (११७)

अर्थात -- स्त्रियांच्या ठायी हजरजबाबीपणा असतो असे जे म्हणतात, ते हे.

(५) शकुन्तला -- त्वयायं तावत् प्रथमं पिबतु इति अनुकम्पिना उपच्छन्दित उदकेन। न पुनस् तेऽपरिचयाध्दस्ताभ्याशमुपगतः। पश्चात् तस्मिन्नेव मया गृहीते सलिलेऽनेन कृतः प्रणयः। तदा त्वमित्थं प्रहसितोऽसि। सर्वः सगन्धेषु विश्वसिति द्वावपि युवामारण्यकाविति। (११८)

अर्थात -- (त्या क्षणी तेथे माझा दत्तक पुत्र दीर्घापांग नामक हरीण हजर झाला. तेव्हा) 'ह्याला पहिल्यांदा पाणी पिऊ दे', अशा कळकळ्याने तू पाणी पाजण्याच्या बुद्धीने त्याच्याशी लाडीगोडी केलीस. परंतु, तुझ्याशी ओळख नसल्यामुळे तो तुझ्या हाताजवळ आला नाही . नंतर (द्रोणातील) तेच पाणी मी हातात धरले असता ते तो प्रेमाने प्यायला. तेव्हा तू मोठ्याने हसून असे थट्टेत म्हणालास : प्रत्येकाचा आपल्या आप्तेष्टांवर विश्वास असतो, तुम्ही दोघंही अरण्यात राहणारी आहात (ना) !

(६) द्वितीया -- --- । यत एकमेव नौ जीवितं द्विधास्थितं शरीरम्। (१३४)

अर्थात -- --- । कारण आपल्या दोघींचे जीवित एकच आहे, (जरी) शरीर दोन भागांत विद्यमान (म्हणजे विभागलेले) असले (तरी).

(७) उभे -- आर्य, कौतुहलं नौ। यद्यनेन जनेन श्रोतव्यं कथयत्वार्यः किंनिमित्तं भर्त्रा वसन्तोत्सवः प्रतिषिद्धः। (१३६)

अर्थात -- मान्यवर, आम्हां दोघींना कुतूहल (वाटत) आहे. जर आम्ही दोघींनी ते ऐकण्याजोगे असेल (म्हणजे आम्हां दोघींना ते ऐकण्यास प्रत्यवाय नसेल) तर महाराजांनी वसंतोत्सवाला कोणत्या कारणाखातर मनाई केली आहे, ते (कृपया) सांगावे.

(८) राजा -- वयस्य, रन्ध्रोपनिपातिनोऽनर्था इति यदुच्यते तदव्यभिचारि वचः। (१४०)

अर्थात -- मित्रा, संकटे छिद्रांतून आत घुसतात असे जे म्हणतात, ते म्हणणे कधीही खोटे ठरत नाही.

[२.८.१२] मौन (संभाषणात खंड पडणे)

संभाषण अखंडपणे क्वचितच चालू राहते. ते थांबत-थांबत चालू असते. मध्येच काही क्षण निःशब्दता असते. एखाद्या विषयावरील संभाषण संपल्यावर, संभाषकांपैकी एखादा भावविवश झाल्यास, एखाद्या संभाषकाकडून एखादा प्रश्न विचारला गेल्यास, संभाषकांपैकी एखाद्यास एखादी वस्तू इतरांना दाखवण्याची इच्छा झाल्यास, मध्येच कोणी आल्यास, आकस्मिक घटना घडल्यास किंवा असेच एखादे निमित्त झाल्यास संभाषणात खंड पडतो. ही क्षणिक निःशब्दता जाणवण्याइतकी स्पष्ट असते. कालिदासाने ह्याही सूक्ष्म व तरल मुद्याकडे लक्ष पुरवले आहे. उदाहरणार्थ,

(१) राजा -- (शकुन्तलाभिमुखो भूत्वा) अपि तपो वर्धते।
(शकुन्तला साध्वसाद् अवचना तिष्ठति।) (१८)

अर्थात -- (शकुंतलेकडे तोंड करून उभा राहतो) तपःसाधना (निरंतर / व्यवस्थितपणे) चालू आहे ना ? (अथवा, तपःसाधना नेहमीप्रमाणे चालू असावी, अशी आशा आहे)

-- (शकुंतला गोंधळून गेल्यामुळे काहीही न बोलता उभी राहते)

अगोदरच शकुंतलेला भुंग्याने छळलेले असते. ती मदतीसाठी आपल्या मैत्रिणींना आवाहन करते तर मदत करण्याऐवजी उलट त्या 'दुष्यन्ताला हाक मार. तपोवनांचे रक्षण राजाने करावयाचे असते', असे म्हणून तिची गंमत बघत उभ्या राहतात. इकडे भुंगा तिचा पाठलाग सोडत नाही, अशा स्थितीत राजा चटकन पुढे होतो आणि 'कः पौरवे...' (१७) इत्यादी पद्यात्मक संभाषण करतो. त्याला बघून त्या तिघी संभ्रमात पडतात. अनसूया खुलासा करते : मान्यवरा, कोणतेही संकट कोसळलेले नाही. भुंग्याने सतावल्यामुळे आमची ही प्रिय मैत्रीण घाबरून गेली, इतकेच'(१८), असे म्हणून ती शकुंतलेकडे अंगुलिनिर्देश करते. तेव्हा राजा वरीलप्रमाणे प्रश्न विचारतो. भुंग्याने मांडलेला छळ, मैत्रिणींचा (प्रेमळ) असहकार, परपुरुषाचे अचानकपणे झालेले आगमन आणि अनसूयाकृत अंगुलिनिर्देश या सर्व घटितांच्या सामूहिक परिणामामुळे शकुंतला स्वाभाविकपणेच अवाक होऊन उभी राहते. क्षणभर त्या स्थळी

नि:शब्दता पसरते. पण अनसूया तत्परतेने 'इदानीमतिथिविशेषलाभेन' ह्या उद्गारांनी, खंडित झालेल्या संभाषणाला, पुन्हा चालना देते. संभाषणातील मौनाचे हे पहिलेच उदाहरण असल्यामुळे इतका विस्तृत खुलासा करून त्याचे स्वरूप विशद केले.

ह्यानंतरच्या उदाहरणांत संक्षिप्त स्पष्टीकरणे करू.

(२) अनसूया -- ततो वसन्तावतारसमये तस्या उन्मादयितृकं रूपं प्रेक्ष्य - (अर्धोक्ते लज्जया विरमति ।) (२२)

अर्थात -- त्यानंतर वसंत ऋतूच्या दिवसांत तिचे उन्मादक रूप पाहून -

-- (अर्धेच बोलून लाज वाटल्याने थांबते)

शकुंतलेची जन्मकथा राजाला सांगण्याच्या ओघात, शकुंतलेचे असामान्य लावण्य पाहून (व तेही कामभाववर्धक वसंत ऋतूत) विश्वामित्र कसा कामपीडित झाला, ते वर्णन करण्याच्या वेळी अनसूया वरील वाक्य अर्ध्यावरच सोडून देते. एक तर ती ऋषिकन्या आहे. दुसरे म्हणजे 'प्रेमार्त व्यक्तींच्या स्थितीचे तिला ज्ञान नाही' ('अनभ्यन्तरे खल्वावां मदनगतस्य वृत्तान्तस्य।' - ५५) आणि ती स्वभावाने गंभीर आहे. त्यामुळेच तिच्या बोलण्यात खंड पडतो.

(३) अनसूया -- --- कथय। किंनिमित्तं ते संताप:। विकारं खलु परमार्थतोऽज्ञात्वा-नारम्भ: प्रतीकारस्य।

शकुन्तला -- (आत्मगतम्) बलवान् खलु मेऽभिनिवेश:। इदानीमपि सहसैतयोर्न शक्नोमि निवेदयितुम्। (५५-५६)

अर्थात -- --- सांग. तुझी ही उलघाल का चालली आहे ? विकाराचे खरेखुरे स्वरूप समजल्यावाचून (प्रतिबंधक) उपाययोजनेस सुरुवात करता येत नाही.

-- (स्वत:शी) माझ्या मनातील प्रेम अनावर आहे. ह्या क्षणीदेखील मी ते ह्या दोघींना एकाएकी सांगू शकत नाही.

शकुंतला इतकी अत्यधिक विनयशील आहे की, ती आपल्या मनात उचंबळणारे दुर्दम्य प्रेम आपल्या अगदी जिवलग मैत्रिणींनाही विश्वासात घेऊन मोकळेपणाने सांगण्यास धजत नाही.

(४) शकुन्तला -- सखि, यत:प्रभृति मम दर्शनपथमागत: स तपोवनरक्षिता राजर्षि:- (अर्धोक्तेन लज्जां नाटयति।) (५७)

अर्थात -- गडे, तपोवनाचे रक्षण करणारा तो राजर्षी जेव्हापासून माझ्या दृष्टिपथात

आला आहे (ना--) (एवढेच अर्धे बोलून लज्जेचा अभिनय करते). 'तेव्हापासून त्याच्याविषयी माझ्या मनात आकर्षण उत्पन्न झाले आहे' हे उर्वरित शब्द शकुंतला स्वाभाविक लाजाळूपणामुळे स्पष्टपणे उच्चारू शकत नाही.

(५) प्रियंवदा -- (शकुन्तलां विलोक्य) हला अनयाभ्युपपत्त्या सूचिता ते भर्तुर् गेहेऽनुभवितव्या राजलक्ष्मीः । (शकुन्तला व्रीडां रूपयति ।) (८६)

तातकाश्यपांच्या प्रभावामुळे आश्रमातील एका वृक्षाने शकुंतलेसाठी एक सुंदर रेशमी मंगलवस्त्र दिले, दुसऱ्या एका वृक्षाने अळिता अर्पण केला, तर इतर वनस्पतींनी कोवळ्या पालवीशी स्पर्धा करणारे नाजूक दागिने घडवून दिले, हे ऋषिकुमाराने केलेले वर्णन ऐकून प्रियंवदा वरील उद्‌गार काढते.

अर्थात -- (शकुंतलेकडे पाहून) अग, वनस्पतींनी केलेल्या ह्या अनुग्रहाने असे सुचवले आहे की, पतीच्या घरी गेल्यावर तू राजलक्ष्मीचा उपभोग घेशील.

(शकुंतला लज्जेचा अभिनय करते.)

राजपत्नी झाल्यावर आपण राजलक्ष्मीचा उपभोग घेणाऱ्या होणार आहोत, ह्या जाणिवेने शकुंतला स्वाभाविकपणे लाजते व निःशब्दपणे आपले हृद्‌गत व्यक्त करते.

(६) काश्यपः -- (आत्मगतम्) किं नु खलु तत्रभवतो दुष्यन्तस्य युक्तरूपमस्माभिः सन्देष्टव्यम् । (चिन्तयति) (९४)

अर्थात -- (स्वतःशी) महाराज दुष्यंतांना योग्य असा कोणता संदेश पाठवावा ? (विचार करतो)

येथेही काश्यपांना योग्य संदेश सुचत नाही. ते विचार करू लागतात. मनाशी संदेशाच्या शब्दांची जुळवाजुळव करतात (तसे करण्यात स्वाभाविकपणे थोडा वेळ जातो). थोड्या वेळात संदेशाची शब्दावली मनाशी निश्चित करतात व मग शाङ्र्गरवाला उद्देशून म्हणतात - 'इति त्वया मद्‌वचनात् स राजा शकुन्तलां पुरस्कृत्य वक्तव्यः ।' (९५). अशा प्रकारे पात्रे विशिष्ट प्रसंगी स्वाभाविक मौन पाळतात व त्यामुळे संभाषणात खंड पडतो.

[२.८.१३] लवचिकता असणे

चर्चा, परिसंवाद, भाषण, संशोधनपर लेखन इत्यादींत वाक्यरचनेचे पूर्णापूर्ण, केवल,

मिश्र, संयुक्त, प्रधान, गौण, आज्ञार्थक, विध्यर्थक, संकेतार्थक, भूतवर्तमानभविष्यकालीन इत्यादी प्रकार साक्षेपाने व विवेकाने योजावे लागतात. नाहीतर वैचारिक म्हणजेच तार्किक त्रुटी व विसंगती उत्पन्न होण्याची धास्ती असते. त्यामुळे वरील प्रकारचे भाषाप्रयोग काहीसे बंदिस्त, नियमबध्द व जखडल्यासारखे असतात. त्यांत शिस्तीचा काटेकोरपणा असतो. पण संभाषणात शास्त्रीय तर्कशुध्दतेचा प्रश्न नसतो. संभाषण स्वैर व त्यामुळे सैल असते. ते कधी संभाषकांचा परस्परांविषयीचा जिव्हाळा व्यक्त करील, तर कधी एखाद्या संभाषकाच्या मनाचा पारदर्शी नितळपणा व्यक्त करील, तर कधी एखादा संभाषक दुसऱ्याला जरब बसवत आहे, असे वर्णन करील. एकंदरीने संभाषण लवचिक किंवा बहुरूपी असते. कालिदासाला ह्याची जाणीव आहे हे खालील उदाहरणांवरून स्पष्ट होईल.

(१) राजा -- (आत्मगतम्) अहो धिक् । सैनिका अस्मदन्वेषिणस्तपोवनमुपरुन्धन्ति । भवतु । प्रतिगमिष्यामस्तावत् । (२८)

अर्थात -- (स्वत:शी) धिक्कार ! माझा शोध घेणारे सैनिक तपोवनाला त्रास देत आहेत. बरे तर. आपण परत जाऊ या. (येथे तपोवनवासियांच्या हिताला जपण्याची राजाची तत्परता प्रतीत होते.)

(२) राजा -- विश्रान्तेन भवता ममाप्येकस्मिन्ननायासे कर्मणि सहायेन भवितव्यम् । (३५)

अर्थात -- विश्रांती घेऊन झाली की, ज्याच्यात तुला कोणतेही सायास पडणार नाहीत अशा माझ्या एका कामात मला मदत कर. (ह्यात एखाद्याच्या दाढीला हात घालून त्याच्याकडून स्वार्थ साधून घेण्याची राजाची चतुरता लक्षात येते.)

(३) अनसूया -- हला शकुन्तले, अनभ्यन्तरे खल्वावां मदनगतस्य वृत्तान्तस्य । (५५)

अर्थात -- प्रिये शकुंतले, प्रणय ह्या विषयाचे आम्हां दोघींना सखोल ज्ञान नाही. (या निवेदनात अनसूयेच्या मनाचा नितळपणा वा प्रांजळपणा जाणवतो.)

(४) रक्षिणौ -- (ताडयित्वा) अरे, कुम्भीरक, कथय कुत्र त्वयैतन् मणिबन्धनो - त्कीर्णनामधेयं राजकीयमङ्गुलीयकं समासादितम् । (१२६)

अर्थात -- (मारपीट करून) रे चोरा, राजाचे नाव कोरलेली ही रत्नजडित आंगठी तुझ्याकडे कशी आली, सांग (नाहीतर आणखी ठोकून काढतो).

(या वाक्यात रक्षकांचा निर्दयपणा वा राकटपणा प्रत्ययास येतो).

(५) कंचुकी -- भवतु । न पुनरेवं प्रवर्तितव्यम् । (१३६)

अर्थात -- टीक आहे (ठीक आहे). पण पुन्हा असे वागायचे नाही (समजलात ?) (संबंधित दोन उद्यानपालिकांना जरब बसवण्याची कंचुकीची वृत्ती झळकते).

एकंदरीने जशी भावना तशी संभाषणाची शब्दकळा.

[२.८.१४] विषय सापेक्षतया घरगुती असणे

संभाषणात प्राय: घरगुती विषयच असतात. उदाहरणार्थ, घरातील मुलाबाळांची किंवा नातलगांची दुखणीबाणी, लग्नमुंजी, पाहुण्यांचे येणेजाणे, घरातील कुरबुरी, बेबनाव, मुलांचे शिक्षण, पैशाअडक्याचे व्यवहार, वस्तूंची खरेदी, इत्यादी. क्रिस्टल व डेव्ही यांचे हे मत पटण्यासारखे नाही. कारण संभाषण नेहमीच घरगुती स्वरूपाचे वा घरगुती विषयांशी निगडित नसते. पूर्वी [२.७] मध्ये उल्लेखिल्याप्रमाणे संभाषणाची निमित्ते किंवा प्रेरके अनेक असतात. त्याला कोणत्याही विषयाचे वावडे नसते, म्हणजेच ते अनेक विषयांना स्पर्श करणारे किंवा व्यापणारे असते. जिवंत व्यक्तींची एकमेकांशी नातीगोती असतात व ती खरीखुरी असतात. ललित साहित्यातील पात्रे ही साहित्यिकाने कल्पिलेली असतात आणि त्यांची नातीगोतीही कल्पितच असतात. त्यामुळे त्यांना घरगुती बाबींविषयी बोलण्यात स्वारस्य नसते व तसे करण्याचे प्रयोजनही नसते. ललित साहित्याचे जग हे 'प्रातिभासिक' असते, पूर्णतया 'व्यावहारिक' नसते. म्हणून तर ललित साहित्यिकाला स्वनिर्मित पात्रांची संभाषणे 'व्यावहारिक' तर भासावीत पण पूर्णपणे तशी असू नयेत अशी तारेवरची कसरत करावी लागत असते. 'संभाषणे' व 'संवाद' यांतील सूक्ष्म विभाजक-रेषेचा विचार पुढील प्रकरणात करावयाचा आहेच. त्यामुळे क्रिस्टल-डेव्ही यांचा उपर्युक्त विचार संभाषणांच्या बाबतीतही एकदेशीय असल्यामुळे पटण्यासारखा नाही एवढे नमूद करून पुढच्या मुद्याकडे वळू.

[२.८.१५] विषयांची अनिश्चितता/धरसोड असणे

संभाषणाला विषयांची धरसोड मानवते. आता एक विषय तर पाच मिनिटांनी दुसराच विषय अशी अस्थिरता संभाषणात संभवते. कधी संभाषण आटोपशीर असते तर कधी ते एखाद्या विषयावर रेंगाळते किंवा पुन्हा येऊन थडकते. त्यामुळेच संभाषण कोणते स्वरूप धारण करील, ते कसे वाढत जाईल व त्याचे पर्यवसान कशात होईल, त्याबद्दल कोणताही तर्क अगोदर करता येत नाही. बदल हा संभाषणात अनुस्यूतच असतो, किंबहुना ती त्याची अंत:सुप्त शक्ती असते.

क्रिस्टल व डेव्ही यांचा हाही मुद्दा नाटकातील संभाषणाला लागू पडत नाही. कारणे अशी - नाटकातील संभाषणाला धरसोड मानवत नाही. ते संभाषण एका विशिष्ट म्हणजे पूर्वनियोजित दिशेने कणाकणांनी पुढेपुढे सरकत असते व एका विशिष्ट स्थळी त्याचे पर्यवसान होत असते. ते कधीही दिशाहीनपणे घरंगळत जात नसते. कारण नाटकाचा आराखडा लेखकाने अगोदरच आखलेला असतो, त्यातील प्रवेशांची संख्या व क्रम ठरवून ठेवलेले

असतात व त्या चौकटीला धक्का न लावता नाटकातील संभाषणे घडत असतात. उदाहरणार्थ, नटी-सूत्रधारांनी नाटकास आरंभ करणे, वैखानसाने राजाला शिकारीपासून परावृत्त करणे, राजाने आश्रमात प्रवेश करणे, राजा-शकुंतला-अनसूया-प्रियंवदांच्या प्रवेशात राजाला शकुंतलेविषयी माहिती कळणे, त्याचे तिच्यावर प्रेम बसणे, पिसाळलेल्या हत्तीची बातमी ऐकून अनसूया, प्रियंवदा व शकुंतला यांचे झोपडीकडे परत जाणे आणि राजाने आश्रमाजवळच आश्रमाच्या रक्षणासाठी तळ ठोकणे असे प्रवेश शाकुंतल नाटकाच्या पहिल्या अंकात आहेत. ह्याच पध्दतीने कालिदासाने इतरही अंकांतील प्रवेशांची आखणी केली आहे. ह्यावरून नाटकाच्या रचनेत क्रमबध्दता व सुसूत्रता अनुस्यूत आहे. त्या सुसूत्रतेला धरूनच नाटकातील संभाषणे आपले रूप धारण करतात, पुढे सरकतात, वाढतात व दुष्यंत-शकुंतला-भरत-प्रभृतींच्या मिलनात परिणत होतात. वेगळ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे नाटकातील संवादांची नियंत्रके/नियामके निराळी असतात. त्यांची चर्चा पुढील प्रकरणात करावयाचीच आहे.

[२.८.१६] विषयान्तरे मोठ्या प्रमाणावर होणे

संभाषक एखाद्या विषयाची सांगोपांग चर्चा करण्यासाठी बसलेले नसतात. त्यामुळे ते एका विषयावरून दुसऱ्या विषयावर अशा जणू उड्या मारीत असतात. ही विषयान्तरे झटक्यात व अनेकदा होतात. क्वचित संभाषणाची गाडी पुन्हा सुरुवातीच्या विषयाच्या रूळावरही येते. संभाषण हे मुक्त बोलणे असते, त्यामुळे त्याच्यावर विषयैक्याचे बंधन पाळण्याची जबाबदारी नसते. म्हणून ते कधीकधी अतिशय थोड्या वेळात अनेक विषयांना स्पर्श करते.

संभाषण हे निरुद्दिष्ट असते, तर नाटकातील संवाद सोद्दिष्ट असतात. नाटकातील पात्रांच्या संभाषणांत, वर म्हटल्याप्रमाणे, झटक्यात व अनेकदा विषयान्तरे झाली, तर असे नाटक पाहण्यास एकही प्रेक्षक प्रेक्षागृहात शिल्लक राहणार नाही ! नाटककाराने एक सुनियोजित कलाकृती सिध्द केलेली असते व ती बघण्यासाठी, तसेच तिचा आकलनपूर्वक आस्वाद घेण्यासाठी प्रेक्षक प्रेक्षागृहात (पदरमोड करून) आलेले असतात. ह्या बाबी व ह्यापूर्वी [२.८.१४] व [२.८.१५] मध्ये केलेली चर्चा लक्षात घेता क्रिस्टल व डेव्ही यांचा प्रस्तुतचाही मुद्दा नाटकातील संवादांच्या सन्दर्भात ग्राह्य मानता येत नाही.

[२.८.१७] व्याकरणाच्या नियमांचे उल्लंघन होणे

संभाषक विद्वत्तापूर्ण भाषण करीत नसतात; ते एकमेकांशी बोलत असतात. त्यांनी एकमेकांना समजून घ्यावयाचे मनोमन ठरविलेले असते. संभाषण नेहमीच निवांतपणे होत नसते, ते अनेकदा कमालीच्या घाईगर्दीने होत असते. क्वचित्प्रसंगी ते विशिष्ट (उदाहरणार्थ, दु:खी, भयभीत, अतिहर्षित इत्यादी) मन:स्थितीत होत असते. अशा अनेक कारणांमुळे त्यात व्याकरणाचे नियम काटेकोरपणे पाळले जात नाहीत किंवा भाषेच्या व्याकरणशुध्दतेविषयी दक्षता बाळगली जात नाही. परिणामी, शब्दांचे रूपभंग, लिंगभेद, वचनदोष, वाक्यरचनेतील विसंगती इत्यादी व्याकरणिक चुका संभाषणात संभवतात.

क्रिस्टल व डेव्ही यांचा हाही मुद्दा नाटकातील संवादांच्या दृष्टीने मान्य करण्यासारखा नाही. कोणत्याही ललित लेखकाचे व्याकरणदृष्ट्या सदोष लेखन हे प्रेक्षकांच्या/वाचकांच्या हेटाळणीस पात्र ठरते. ज्याला चार वाक्ये व्याकरणदृष्ट्या शुध्द लिहिता येत नाहीत त्याने कोणतीही ललित साहित्यकृती रचण्याच्या फंदात पडू नये, असे सर्वच रसिकांचे व समीक्षकांचे ठाम मत असते. भाषेची व्याकरणशुध्दता ही चांगल्या लिखाणाची अगदी प्राथमिक व किमान अट आहे. लेखन हे विचारपूर्वक व शांतपणे करावयाचे कार्य आहे. त्यामुळे त्यात व्याकरणदुष्टता उतरणे क्षम्य ठरत नाही. व्याकरणदुष्ट वाक्ये वाचकाच्या सुरळीत व प्रवाही वाचनक्रियेत अडथळा आणतात. प्राचीन भारतीय काव्यमीमांसाकार तर व्याकरणदृष्ट्या अशुध्द शब्दांना किंवा वाक्यांना 'असाधू', 'दुष्ट' किंवा 'शब्दहीन' समजत असत. एकंदरीने व्याकरणदृष्ट्या सदोष संभाषणे अग्राह्यच.

[२.८.१८] शब्दाची किंवा शब्दावलीची पुनरुक्ती होणे

वस्तुतः एखाद्या शब्दाची किंवा शब्दावलीची पुनरुक्ती करणे हे दोषास्पद मानले जाते. परंतु, मनुष्य जेव्हा भ्यालेला किंवा विस्मित झालेला असतो, अथवा जेव्हा त्याला पराकोटीचा आनंद किंवा अतिशय दुःख झालेले असते, तेव्हा त्याच्या तोंडून त्याचत्याच शब्दांची पुनरावृत्ती होते. ती भय, शोक, असूया, हर्ष, विस्मय, चीड इत्यादी भावनांची प्रभावी अभिव्यक्ती साधत असते. शिवाय, ती पुनरुक्ती मनुष्यस्वभावाला धरून म्हणजे स्वाभाविक असते. संभाषणात अशी पुनरुक्ती अनेकदा अनुभवास येते. कालिदासाने ह्या वस्तुस्थितीकडे आठवणीने लक्ष पुरवलेले असल्याचे खालील उदाहरणांवरून स्पष्ट होईल.

(१) वैखानसः -- (हस्तमुद्यम्य) राजन्, आश्रममृगोऽयं न हन्तव्यो न हन्तव्यः । (६)

अर्थात -- (हात उंचावून), राजा, हे आश्रमाचे हरीण आहे, ह्याचा वध करू नकोस, ह्याचा वध करू नकोस. (येथे राजाला वैखानस काकुळतीने विनवणी करीत आहे. अशी द्विरुक्तियुक्त विनवणी राजाचे हृदयपरिवर्तन घडवून आणील व मृगाची हत्या होणार नाही, अशी वैखानसाला आशा वाटते).

(२) राजा -- अवसरोऽयमात्मानं प्रकाशयितुम् । न भेतव्यं न भेतव्यम् - (१७)

अर्थात -- स्वतःला प्रकट करण्याची ही (योग्य) संधी आहे. घाबरू नये, घाबरू नये. (दुर्वृत्त व दुष्ट भुंगा शकुंतलेचा पिच्छा पुरवीत असतो. ती हैराण होऊन आपल्या दोघी मैत्रिणींना मदतीसाठी आवाहन करते. त्या तिची गंमत करण्यासाठी 'दुष्यंताला हाक मार', असे सुचवतात. ते शब्द ऐकून झाडाआड लपलेल्या दुष्यंताला, आपल्याला प्रकट होण्याची ही नामी संधी आयती चालून आली आहे, असे वाटते. तो प्रकटपणे 'भिऊ नये, भिऊ नये', असे दोनदा म्हणून घाबरलेल्या शकुंतलेला धीर देतो.)

(३) प्रियंवदा -- हा धिक् हा धिक् । अप्रियमेव संवृत्तम् । कस्मिन्नपि पूजार्हेऽपराध्दा शून्यहृदया शकुन्तला । (७४)

अर्थात -- घात झाला, घात झाला ! अप्रिय गोष्ट घडली. कोणातरी पूजनीय व्यक्तीचा विमनस्क शकुंतलेकडून अनादर झाला. (यात खेदोद्गार आहे).

(४) प्रियंवदा -- सखि, त्वरस्व त्वरस्व शकुन्तलाया: प्रस्थानकौतुकं निर्वर्तयितुम् । (८०)

अर्थात -- गडे, शकुंतलेचा प्रस्थान-सोहळा साजरा करण्यासाठी त्वरा कर, त्वरा कर. (या द्विरुक्तीत उत्साह व हर्ष या भावनांचे मिश्रण आहे).

(५) प्रियंवदा -- अग्निशरणं प्रविष्टस्य शरीरं विना छन्दोमय्या वाण्या ।

अनसूया -- (सविस्मयम्) कथय कथय । (८१)

अर्थात -- तात काश्यपांनी अग्निगृहात प्रवेश केल्यावर छंदोबध्द अशरीरी वाणीने त्यांना (शकुंतलेचा दुष्यंताशी गांधर्वविवाह झाल्याचे वृत्त) सांगितले.

-- (विस्मय वाटून) सांग, सांग (काय सांगितले ते).

(अशरीरी वाणी तात काश्यपांशी बोलली हे ऐकूनच अनसूयेला विस्मय वाटला. शिवाय, त्या वाणीने काश्यपांना काय सांगितले हे जाणून घेण्याचे कुतूहलही अनसूयेच्या मनात शिगोशीग दाटले. अशा प्रकारे विस्मययुक्त कुतूहल 'कथय कथय' ह्या पुनरुक्तीच्या द्वारे मुखरित झाले.)

(६) अनसूया -- (प्रियंवदामाश्लिष्य) सखि, प्रियं मे प्रियं मे । (८२)

अर्थात -- (प्रियंवदेला मिठी मारून), गडे, मला इतका आनंद झाला आहे, इतका आनंद झाला आहे. (येथे उत्कट व हार्दिक हर्षाची अभिव्यक्ती झाली आहे).

(७) (नेपथ्ये) -- अब्रह्मण्यम् अब्रह्मण्यम् । (१६२)

अर्थात -- (पडद्याआड) अहो भयंकर कृत्य, वाचवा, वाचवा.

(इंद्राचा सारथी मातली विदूषकाला मारपीट करतो. तेव्हा पडद्याआडून विदूषकाचे वरीलप्रमाणे ओरडणे ऐकू येते. तो स्वरक्षणार्थ राजाला आवाहन करतो.)

(८) (नेपथ्ये) -- भो वयस्य, अविहा अविहा । (१६३)

अर्थात -- (पडद्याआड) अरे मित्रा, हाय ! हाय ! [संदर्भ वरील (७) चाच आहे.]

(९) (नेपथ्ये) -- मा खलु मा खलु चापलं कुरु । (१७६)

अर्थात -- (पडद्याआड) (तसले) धाडस करू नकोस, धाडस करू नकोस. (सर्वदमन सिंहाच्या छाव्याला सिंहिणीपासून जबरदस्तीने ओढत असतो. ते धाडसाचे किंवा अविचाराचे दृश्य पाहून दोन तपस्विनी त्याला परावृत्त करण्यासाठी वरीलप्रमाणे धमकीवजा सूचना देत असतात.)

(१०) शकुन्तला -- (आत्मगतम्) हृदय, आश्वसिहि आश्वसिहि । (१८६)

अर्थात -- (स्वत:शी), हृदया, धीर धर, धीर धर.

(विरहिणीचे व्रत आचरणारी शकुंतला आणि दुष्यंत यांची दीर्घ कालावधीनंतर मारीच ऋषींच्या आश्रमात पुनर्भेट होते; तेव्हा राजाच्या बोलण्यावरून त्याला ती ओळखते आणि मनाला दिलासा देण्यासाठी स्वत:शीच वरीलप्रमाणे उद्‌गार काढते.)

[२.८.१९] संभाषकांच्या आवाजांत फरक असणे

आवाज व्यक्तिगणिक बदलतो. काही व्यक्तींचा आवाज मोठा, काहींचा लहान, काहींचा किरकिरा, काहींचा भसाडा, काहींचा गोड तर काहींचा कर्कश असतो. त्यामुळे दोन व्यक्तींनी केलेल्या एकाच शब्दाच्या उच्चारांच्या पोतात फरक असतो. शिवाय, वय, शरीरान्तर्गत बदल, अपघात, आहारविहार, हवामान, साथसंगत, सवयी, आजारपण इत्यादी अनेक कारणांमुळे एकाच व्यक्तीच्या आवाजात भिन्नभिन्न अवस्थांत अंतर पडते व ते जाणवते. क्रिस्टल व डेव्ही यांनी मांडलेला हा मुद्दा पटण्याजोगा असला तरी त्याची प्रस्तुत संदर्भात प्रचीती येणे शक्य नाही. कारण आपण मुद्रित नाट्यसंहितेचे विश्लेषण करीत आहोत, नाटकाचे प्रत्यक्ष मंचन बघत नाही आहोत. मूळच्या महाभारतीय कथानकात वर्णिलेल्या दुष्यंत, शकुंतला, काश्यप, मंत्री, पुरोहित, ऋषी, सर्वदमन, इत्यादी ऐतिहासिक व्यक्तींचे आवाज कसे होते हे तरी आज आपण कसे सांगू शकणार ? एकंदरीने ह्या मुद्याचा ह्याहून अधिक परामर्श घेणेच शक्य नाही.

[२.८.२०] संक्षिप्त वाक्ये वापरली जाणे

संभाषण-प्रसंगी एक संभाषक दुसऱ्या संभाषकाचा अभिप्राय, हेतू, रोख इत्यादी बाबी लक्षात घेऊन तसेच संभाषणातील गुप्तसुप्त संदर्भ ध्यानात ठेवून बोलत असतो. त्यामुळे तशीच खास गरज असल्यावाचून संभाषक पल्लेदार वाक्ये उच्चारीत नाही. लहान, आटोपशीर वा संक्षिप्त वाक्यांनी संभाषकांचे काम भागते; त्यांचे संभाषण 'सफल' होते. कालिदासाने ही बाब अचूकपणे ओळखून तदनुसार वाक्यरचना केलेली आढळते. उदाहरणार्थ,

(१) विदूषक: -- चिरं जीव । (गन्तुमिच्छति ।)

राजा -- वयस्य, तिष्ठ । सावशेषं मे वच: ।

विदूषक: -- आज्ञापयतु भवान्। (३४-३५)
अर्थात -- चिरंजीव हो (जाऊ इच्छितो).
-- मित्रा, थांब. मला आणखी काही सांगायचे आहे.
-- आपण आज्ञा करावी.

(२) उभौ -- (उपगम्य) विजयस्व राजन्।
राजा -- (आसनादुत्थाय) अभिवादये भवन्तौ।
उभौ -- स्वस्ति भवते। (फलान्युपहरत:।)
राजा -- (सप्रणामं परिगृह्य) आज्ञामिच्छामि। (४५)
अर्थात -- (जवळ जाऊन) राजा, तुझा विजय होवो.
-- (आसनावरून उठून) आपणां उभयतांस वंदन करतो.
-- तुझे कल्याण होवो. (फळांची भेट देतात).
-- (नमस्कारपूर्वक स्वीकारून) आज्ञा करावी.

(३) राजा -- (सादरम्) किमम्बाभि: प्रेषित:।
दौवारिक: -- अथ किम्।
राजा -- ननु प्रवेश्यताम्।
दौवारिक: -- तथा। एष भर्ता। उपसर्प। (४७)
अर्थात -- (आदराने) काय, आईसाहेबांनी पाठवले ?
-- मग काय ?
-- अरे, आत पाठवून दे.
-- बरे. हे महाराज (येथे बसले आहेत). जवळ जा.

(४) गौतमी -- वत्से, परिणतो दिवस:। एहि। उटजमेव गच्छाम:। (६९)
अर्थात -- मुली, दिवस ढळला आहे. चल. झोपडीकडेच जाऊ या.

(५) सख्यौ -- (उपसृत्य) सखि, सुखमज्जनं ते भवतु।
शकुन्तला -- स्वागतं मे सख्यो:। इतो निषीदतम्। (८४)
अर्थात -- (जवळ जाऊन) गडे, स्नान तुला सुखकारक होवो.
-- माझ्या मैत्रिणींचे स्वागत असो. इकडे बसा.

(६) काश्यप: -- --- क्व ते शाङ्गर्रवमिश्रा:।
(प्रविश्य) शिष्य: -- भगवन्, इमे स्म:।
काश्यप: -- शाङ्गर्रव, भगिन्यास्ते मार्गमादेशय।

शाङ्गर्रव: -- इत इतो भवती। (८८-८९)

अर्थात -- ते शाङ्गर्रव व इतर (शिष्य) कोठे आहेत ?

-- (प्रवेश करून), ऋषिवर्य, आम्ही येथे आहोत.

-- शाङ्गर्रवा, आपल्या बहिणीला मार्गदर्शन कर.

-- ताई, ह्या बाजूला, ह्या बाजूला/इकडे, इकडे.

(७) पुरोहित: -- --- तं देव: श्रोतुमर्हति।

राजा -- अवहितोऽस्मि।

ऋषय: -- (हस्तानुद्यम्य) विजयस्व राजन्।

राजा -- सर्वानभिवादये।

ऋषय: -- इष्टेन युज्यस्व। (११०)

अर्थात -- ते महाराजांनी ऐकावे.

-- मी ऐकतो आहे.

-- (हात उंचावून) राजा, विजयी हो.

-- (आपणां) सर्वांना अभिवादन करतो.

-- इष्टाशी (म्हणजे इष्ट वस्तूशी वा व्यक्तीशी) संयोग होवो.

(८) राजा -- यथा गुरुभ्यो रोचते।

पुरोहित: -- वत्से, अनुगच्छ माम्। (१२३)

अर्थात -- जे गुरुजींना पसंत (ते मलाही पसंत).

-- मुली, माझ्या मागून ये.

(९) (नेपथ्ये) -- एतु एतु भवान्।

कंचुकी -- (कर्णं दत्वा) अये, इत एवाभिवर्तते देव:। स्वकर्मानुष्ठीयताम्।

उभे -- तथा। (निष्क्रान्ते) (१३८)

अर्थात -- (पडद्याआड) महाराज, यावे, यावे.

-- (कान देऊन) अरे, महाराज इकडेच येत आहेत. आपले काम करू या.

-- तसेच. (दोघी निघून जातात).

(१०) राजा -- (उपगम्य) उभाभ्यामपि वासवनियोज्यो दुष्यन्त: प्रणमति।

मारीच: -- वत्स, चिरं जीव। पृथिवीं पालय।

अदिति: -- वत्स, अप्रतिरथो भव।

शकुन्तला -- दारकसहिता वां पादवन्दनं करोमि। (१९१)

अर्थात -- (जवळ जाऊन) हा इंद्रसेवक दुष्यंत आपणां उभयतांना प्रणाम करीत आहे.

-- पुत्रा, दीर्घायुषी हो. पृथ्वीचे पालन कर.

-- मुला, अतुल योध्दा हो.

-- मुलासह मी आपणां उभयतांच्या चरणांना वंदन करीत आहे.

[२.८.२१] संदर्भित अर्थ परिचित असणे

संभाषकांच्या जीवनातील काही घटना, प्रसंग, व्यक्ती, आठवणी, बोलणी, तारखा महत्त्वाच्या किंवा संस्मरणीय असतात. त्यांच्या भोवती अर्थाची विशिष्ट वलये असतात. ही वलये हा भाषेतर किंवा भाषाबाह्य संदर्भ होय. यांच्या उल्लेखांचा वाच्यार्थ ग्रहण करावयाचा नसून सूचित अर्थ ग्रहण करावयाचा असतो, हे बोलणारा व ऐकणारा ह्या दोघांनाही ठाऊक असते. समजा, दोन विद्यार्थी एकमेकांशी बोलत आहेत, त्यांची परीक्षा दहा तारखेस सुरू होणार आहे. संभाषणाच्या ओघात एकजण दुसऱ्यास म्हणतो : 'दहा तारीख हां हां म्हणता उजाडेल'. या वाक्यातील 'दहा तारीख' ह्या शब्दांचा 'महिन्याचा दहावा दिवस' हा जो वाच्यार्थ आहे तो अभिप्रेत नाही. तर 'परीक्षेचा प्रारंभ-दिवस' हा संदर्भागत अर्थ अभिप्रेत आहे. ह्या पृष्ठभूमीवर शाकुन्तलातील संभाषणांचे अवलोकन करू.

(१) सूत्रधार: -- आ परितोषाद् विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम्। (२)

अर्थात -- जोपर्यंत विद्वानांचे संपूर्ण समाधान होत नाही, तोपर्यंत प्रयोग सादर करण्यातील माझे ज्ञान उत्तम आहे, असे मी मानत नाही. यातील प्रयोगविज्ञानम् मागील संदर्भ, प्रयोग बघण्यास आलेल्या प्रेक्षकांत विद्वान बहुसंख्येने आहेत आणि कालिदासाचे शाकुंतल हे नाटक नवीन आहे, असा द्विदल व संमिश्र आहे.

(२) राजा -- सूत, पश्यैनं व्यापाद्यमानम् (शरसंधानं नाटयति।) (६)

अर्थात -- सूता, ह्याला मारलेच बघ. यातील एनम् म्हणजे पूर्वोल्लिखित सारंग (काळवीट).

(३) (नेपथ्ये) -- भो भो राजन्, आश्रममृगोऽयं न हन्तव्यो न हन्तव्यः। (६)

अर्थात -- (पडद्याआड) अरे राजा, हे आश्रमातील हरीण आहे, ह्याला मारू नकोस, मारू नकोस. आश्रममृगः शब्दामागील संदर्भ असा की, हे रानटी हरीण नाही; आश्रमवासियांनी पाळलेले (म्हणजे पाळीव) आहे; त्याला खाऊ-पिऊ घालून वाढवलेले आहे; त्याच्यावर त्यांचे प्रेम आहे. त्याला मारलेस तर आश्रमवासियांना दुःख होईल. शिवाय, त्या निरपराध मूक प्राण्याची हत्या करण्याचे पाप पदरी का बांधून घेतोस ?

(४) राजा -- (अवतीर्य) सूत, विनीतवेषेण प्रवेष्टव्यानि तपोवनानि नाम। (१०)

अर्थात -- (उतरून) सूता, खरे म्हणजे तपोवनात साध्या वेषात प्रवेश करावयाचा असतो. यातील विनीत शब्दामागील संदर्भ असा की, आश्रम अरण्यात आहे, तेथील स्त्रिया वल्कले नेसतात, पुरुष साधेपणाने राहतात-वावरतात. अशा साधनास्थळी उंची पोषाखात जाणे योग्य नाही.

(५) राजा -- दूरीकृता खलु गुणैरुद्यानलता वनलताभिः। (११)

अर्थात -- खरोखर वनातील वेलींनी उपवनातील वेलींना आपल्या (अंगभूत) गुणांनी मागे टाकले आहे. आश्रमातील युवतींचे नैसर्गिक सौंदर्य अंत:पुरातील स्त्रियांच्या प्रसाधनसाधित सौंदर्यातही पाहावयास मिळणे कठीण आहे याची जाणीव झालेला राजा वरील उद्‌गार काढतो. राजाच्या उपवनातील वेलींना माळी खतपाणी घालतात, त्यांची निगुतीने जोपासना करतात व त्यांची वेळोवेळी काटछाट करून त्या प्रयत्नपूर्वक सुंदर ठेवतात, हा 'उद्यानलता' शब्दामागील संदर्भ आहे.

(६) राजा -- (शकुन्तलाभिमुखो भूत्वा) अपि तपो वर्धते। (१८)

राजा शान्त आश्रमपदात आलेला असतो. त्याने आश्रमीय परिसराचे निरीक्षण केलेले असते. शिवाय, त्याच्या पराक्रमाच्या दराऱ्यामुळे ऋषिजनांच्या यज्ञयागादी धार्मिक क्रिया निर्विघ्नपणे पार पडत असतात हे त्याने वैखानसाकडून नुकतेच ऐकलेले असते. ह्या पार्श्वभूमीवर तो शकुंतलेला 'तप:साधनेत सातत्य आहे ना ?' असा प्रश्न वरील वाक्यात विचारतो.

(७) (नेपथ्ये) -- भो भोस् तपस्विनः, संनिहितास्तपोवनसत्त्वरक्षायै भवत। प्रत्यासन्नः किल मृगयाविहारी पार्थिवो दुष्यन्तः। (२७)

अर्थात -- (पडद्याआड) अहो, अहो तपस्व्यांनो, तपोवनातील पशुप्राण्यांच्या संरक्षणासाठी जवळपासच राहा. असे कानांवर आले आहे की, शिकारीच्या खेळात रमणारा, राजा दुष्यंत (आश्रमाच्या) जवळ आला आहे.

ह्यातील 'तपोवनसत्त्वरक्षायै' या शब्दामागील संदर्भ असा : शिकारीत रमणारा राजा निष्पाप पशुप्राण्यांची हत्या केवळ क्रीडानंदासाठी करतो. खेरीज, त्याला शिकारीत मदत करणारे सैनिक आश्रमात धुमाकूळ घालतात. शिवाय, शिकारीसाठी रान उठवणाऱ्यांच्या गदारोळाने आश्रमीय जनावरे बुजतात व भयभीत होतात. हा संदर्भ तपस्व्यांच्या चटकन लक्षात येतो.

(८) राजा -- --- (परिक्रम्य तथा कृत्वा । सहर्षम्) अये लब्धं नेत्रनिर्वाणम् । (५३)

अर्थात -- --- (थोडे चालून झाडाआड लपून राहून पाहतो. अत्यंत हर्षभरित होऊन) वा:, डोळ्यांना अत्यंत आनंद/सुख देणारे दृश्य दिसले (डोळ्यांचे पारणे फिटले).

राजाच्या ह्या भाषणापूर्वीच्या शिष्याच्या भाषणातील उल्लेखांवरून प्रेक्षकांना वा वाचकांना हे कळलेले असते की, प्रियंवदा व अनसूया ह्या दोघीजणी शकुंतलेच्या शरीराचा दाह शमविण्यासाठी तिच्यावर उपचार करीत आहेत. तेव्हा झाडापाशी त्या तिघी असतील आणि त्यांच्यापैकी शकुंतलेला बघून राजाने वरील हर्षोद्‌गार काढले असतील, अशी अटकळ प्रेक्षक/वाचक मनाशी बांधतात.

(९) अनसूया -- न खलु यस्मिन् कस्मिन्नपि । (७५)

अर्थात -- अशातशापैकी कोणाच्या बाबतीत नाही.

दुष्यन्तविषयक चिंतनात बुडालेल्या शकुंतलेचे आश्रमाच्या दाराशी येऊन उभ्या राहिलेल्या दुर्वास ऋषीकडे दुर्लक्ष होते. त्याला आपली अवज्ञा झाल्याचे वाटते. त्यामुळे तो शकुंतलेला शाप देऊन तरातरा निघून जातो. तेव्हा शकुंतलेकडून कोणाचा तरी अवमान झाला असे प्रियंवदा म्हणते. त्याबद्दलची प्रतिक्रिया व्यक्त करताना अनसूया वरील उद्‌गार काढते. 'यस्मिन् कस्मिन्' शब्दांमागील संदर्भ 'अत्यंत शीघ्रकोपी म्हणून कुविख्यात असलेल्या दुर्वासाच्या बाबतीत' असा आहे.

(१०) अनसूया -- प्रियंवदे, द्वयोरेव नौ मुखे एष वृत्तान्तस् तिष्ठतु । (७७)

अर्थात -- प्रियंवदे, ही हकीगत आपल्या दोघींच्या तोंडीच राहू दे. (तिसऱ्या कोणास सांगू नकोस.) यातील 'एष वृत्तान्त:' म्हणजे 'दुर्वास ऋषींनी शकुंतलेला दिलेला शाप व उ:शाप ही हकीगत' हा संदर्भित अर्थ प्रियंवदेच्या तत्काळ लक्षात येतो.

(११) श्याल: -- --- तस्य दर्शनेन भर्तुरभिमतो जन: स्मारित: । (१३१)

अर्थात -- तिच्या (त्या आंगठीच्या) दर्शनाने महाराजांना प्रिय अशा व्यक्तीची आठवण झाली. (श्यालाचा हा उद्‌गार शाकुंतलाच्या सहाव्या अंकातील आहे.) श्यालाचे हे भाषण ऐकणाऱ्या प्रेक्षकांना 'ही प्रिय व्यक्ती' कोण हे, पाचव्या अंकापर्यंतच्या घटनांशी असलेल्या परिचयामुळे, ताबडतोब समजते.

[२.८.२२] स्वाभाविकता असणे

ग्रंथविस्तारभयास्तव ह्या अखेरच्या वैशिष्ट्याचा, निवडक पाच उदाहरणे उद्धृत करून, थोडक्यात परिचय करून घेऊ. संभाषकांच्या बोलण्यात सहजता असते. त्यांची मन:स्थिती, मानवी वर्तन, व्यक्तीच्या प्रतिष्ठेबद्दलचे समाजमान्य संकेत, विशिष्ट शारीरिक अवस्था, शैक्षणिक संस्कार, पेशा इत्यादींना अनुरूप अशीच शब्दकळा व वाक्यरचना संभाषकांच्या मुखांतून बाहेर पडत असते. त्यामध्ये स्वाभाविकता किंवा अकृत्रिमता असते. नाटकातील पात्रे जरी काल्पनिक असली तरी नाटककाराला ह्या वैशिष्ट्याची जपणूक जाणीवपूर्वक करावी लागते. कालिदास ह्याही बाबतीत उणा नाही हे खालील उदाहरणांवरून प्रत्ययास येईल.

(१) वैखानस: -- राजन् समिदाहरणाय प्रस्थिता वयम् । एष खलु कण्वस्य कुलपतेरनुमालिनीतीरमाश्रमो दृश्यते । न चेदन्यकार्यातिपात:, प्रविश्य प्रतिगृह्यतामातिथेय: सत्कार: । (७)

अर्थात -- राजा, आम्ही (यज्ञासाठी) समिधा गोळा करण्यासाठी निघालो आहोत. मालिनी नदीच्या काठावर कुलपती कण्वांचा हा आश्रम दिसतच आहे. दुसऱ्या एखाद्या (महत्त्वाच्या राजकीय) कार्यात अडथळा येणार नसेल/कार्याचा खोळंबा होणार नसेल तर आश्रमात जाऊन पाहुण्यांना योग्य अशा सत्काराचा स्वीकार करावा.

एखाद्या कार्यव्यापृत सन्मान्य व्यक्तीला आपल्या घरी येण्याचे निमंत्रण देताना आपण जी आदबीची भाषा वापरतो तीच भाषा कालिदासाच्या वैखानसाने येथे काळजीपूर्वक वापरली आहे.

(२) अनसूया -- (प्रकाशम्) आर्यस्य मधुरालापजनितो विस्रम्भो मां मन्त्रयते । कतम आर्येण राजर्षेर् वंशोऽलंक्रियते, कतमो वा विरहपर्युत्सुकजन: कृतो देश:, किंनिमित्तं वा सुकुमारतरोऽपि तपोवनगमनपरिश्रमस्य आत्मा पदमुपनीत: । (१९)

अर्थात -- (प्रकटपणे), मान्यवरांच्या मधुर भाषणाने माझ्या ठायी आत्मविश्वास उत्पन्न झाला आहे. तोच मला बोलकी करीत आहे. मान्यवरांनी कोणत्या राजर्षीचा वंश भूषविला आहे, तसेच कोणत्या देशातील जनतेला आपल्या वियोगामुळे व्याकुळ बनविले आहे आणि तपोवनात येण्याच्या कष्टांनी स्वत:च्या अत्यंत सुकुमार शरीराला का शिणवले आहे ?

एखाद्या सन्मान्य व्यक्तीचा आब राखून तिच्याशी विनयाने कसे बोलावे ह्याचा जणू वस्तुपाठच अनसूयेने (म्हणजेच कालिदासाने) येथे घालून दिला आहे.

(३) विदूषक: -- भो दिष्टम् । एतस्य मृगयाशीलस्य राज्ञो वयस्यभावेन निर्विण्णोऽस्मि। ---- पत्रसंकरकषायाणि कदुष्णानि गिरिनदीजलानि पीयन्ते । अनियतवेलं शूल्यमांसभूयिष्ठ आहारो भुज्यते । तुरग-अनुधावन-कण्डितसन्धे रात्रावपि निकामं शयितव्यं नास्ति । ततो महत्येव प्रत्यूषे दास्या:पुत्रै: श्वगणिलुब्धकैर् वनग्रहण-कोलाहलेन प्रतिबोधितोऽस्मि। --- (३०-३१)

अर्थात -- काय दुर्दैव बघा ! शिकारीचा नाद असलेल्या ह्या राजाच्या मैत्रीखातर मी अगदी बेजार झालो आहे. --- पर्वतावरून वाहत येणाऱ्या ओढ्यांचे पर्णमिश्रित, तुरट व कोमट पाणी प्यावे लागते. लोखंडी सळईवर भाजलेले कच्चे मांस हाच मुख्य आहार असतो आणि तोही अनिश्चित वेळी. घोड्यावर बसून, सावजाच्या मागे धावण्यामुळे, गुडघे खरचटले आहेत. त्यामुळे रात्रीही शांतपणे झोप लागत नाही. तेवढ्यात भल्या पहाटे जंगली श्वापदांना घेरण्यासाठी रांडेचे शिकारी आरडाओरडा सुरू करतात (हाकारे घालू लागतात) आणि त्यांच्या बरोबरची कुत्री भुंकू लागतात व माझी झोपमोड करतात.

विदूषकाची निर्विण्णता शब्दाशब्दांतून जणू ओसंडून वाहात आहे.

(४) शकुन्तला -- (अपवार्य) इदमवस्थान्तंर गते तादृशेऽनुरागे किं वा स्मारितेन । आत्मा इदानीं मे शोचनीय इति व्यवसितमेतत्। (प्रकाशम्) आर्यपुत्र, (अर्धोक्ते) संशयित इदानीं परिणये नैष समुदाचार: । पौरव, युक्तं नाम ते तथा पुरा आश्रमपदे स्वभावोत्तान-हृदयमिमं जनं समयपूर्वं प्रतार्य सांप्रतमीदृशैरक्षरै: प्रत्याचष्टुम्। (११६)

अर्थात -- (एकीकडे) तसले (उत्कट) प्रेम ह्या निकृष्ट अवस्थेला आलेले असताना आठवण करून देण्याने काय लाभ होणार ? मी स्वत:च शोकास पात्र बनले आहे, हे निश्चित झाले आहे. (प्रकटपणे) पतिदेव (एवढेच बोलून थांबते), ह्याच्या मनात (माझ्याशी झालेल्या) विवाहाविषयीही संशय आहे. अशा स्थितीत हे संबोधन योग्य नाही. हे पुरुवंशीया, पूर्वी आश्रमात मला शब्द देऊन आता माझ्यासारख्या सरळ मनाच्या व्यक्तीचा अशा शब्दांनी अधिक्षेप करणे हे तुला शोभते काय ?

ह्या शब्दावलीत शकुंतलेचा हताशपणा, स्वत:बद्दल वाटणारी खंत, विचारोत्तर झालेला मनाचा निर्धार आणि सात्त्विक संताप ह्या सर्व भावच्छटा स्वाभाविकपणे व्यक्त झाल्या आहेत.

(५) पुरोहित: -- अत्रभवती तावदाप्रसवादस्मद्गृहे तिष्ठतु । कुत इदमुच्यते इति चेत् ।

त्वं साधुभिरादिष्टपूर्व: । प्रथममेव चक्रवर्तिनं पुत्रं जनयिष्यसीति । स चेन् मुनिदौहित्रस् तल्लक्षणोपपन्नो भविष्यति, अभिनन्द्य शुध्दान्तमेनां प्रवेशयिष्यसि। विपर्यये तु पितुरस्या: समीपनयनमवस्थितमेव। (१२३)

अर्थात -- तर ही प्रसूत होईपर्यंत माझ्या घरी राहू दे. मी असे का म्हणतो असे विचाराल तर सांगतो. तुला महात्म्यांनी पूर्वी असा आशीर्वाद दिला आहे की, तुझा पहिलाच मुलगा चक्रवर्ती होईल. आता मुनींचा नातू (मुलीचा मुलगा) चक्रवर्ति-लक्षणांनी युक्त असा जन्माला आला तर हिचे अभिनंदन करून हिला आपल्या अंत:पुरात स्थान दे. विपरीत घडले (म्हणजे मुलगा चक्रवर्ति-लक्षण-युक्त नसला) तर हिला आपल्या वडिलांकडे परत पाठवून देणे, हे ठरलेच आहे. येथे एखादा तार्किक बोलत असल्याची सुखद प्रतीती येते.

[२.९] निष्कर्ष

येथवर व्हॅलिन्स, क्रुइझर, कोगन, ब्रॅण्ड्रेथ, डर्बीशायर, टर्नर, क्रिस्टल, डेव्ही इत्यादी पाश्चात्य विचारवंतांनी प्रतिपादिलेल्या संभाषणांच्या वैशिष्ट्यांचा प्रथमत: विस्ताराने परिचय करून घेतला व त्यानंतर त्या वैशिष्ट्यांच्या प्रकाशात शाकुन्तलाच्या गद्यपद्यात्मक व संस्कृत-प्राकृतमय संहितेचा विश्लेषणात्मक व सोदाहरण अभ्यास केला. त्याच्या आधारे असे निश्चितपणे म्हणता येते की, कालिदासाने आपली काल्पनिक पात्रे लौकिक जिवंत स्त्रीपुरुषांसारखी भासावीत, त्यांच्या संभाषणांत जिवंत स्त्रीपुरुषांच्या संभाषणांच्या अनेक छटा जाणवाव्यात व त्यायोगे वास्तविकतेचा प्रत्यय यावा यासाठी अतिशय चोखंदळपणे, दक्षतेने व विवेचकपणे शब्द व शब्दावली यांची निवड व योजना केली आहे. कालिदासाने आपली नाटके लिहिण्यापूर्वी भास, सौमिल्ल, कविपुत्र इत्यादी पूर्वसूरींची नाटके निश्चितच वाचलेली असतील आणि त्यांच्या नाटकांतील पात्रांच्या संभाषणांचा अभ्यास केलाच असेल. शिवाय त्याने स्वत:ही आजूबाजूस वावरणाऱ्या व्यक्तींची संभाषणे साक्षेपाने ऐकून त्यांची वैशिष्ट्ये हेरून ठेवली असतीलच. म्हणूनच त्याने शाकुन्तलातील पात्रांच्या तोंडी घातलेल्या संभाषणांची वैशिष्ट्ये आणि उपर्युल्लिखित पाश्चात्यांनी विवेचिलेली वैशिष्ट्ये खूपच मिळतीजुळती आहेत. वेगवेगळ्या कालखंडांत व वेगवेगळ्या देशांत होऊन गेलेल्या विचारवंतांच्या विचारांत असे साम्य अनेकदा अनुभवास येते.

परंतु, पूर्वी एकाधिक प्रसंगी उल्लेखिल्याप्रमाणे, नाटकातील संभाषणे ही सदैव लौकिक/व्यावहारिक संभाषणांच्या पातळीवर राहात नाहीत. ती संभाषणाची कक्षा ओलांडून संवादाच्या प्रांगणात कधी पदार्पण करतात ते नेहमीच ठामपणे सांगता येत नाही. वेगळ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे संभाषणांना - मग ती संस्कृत असोत, प्राकृत असोत, गद्यमय असोत की पद्यमय असोत - कविप्रतिभेचा स्पर्श झाला की, एक वेगळी झळाळी प्राप्त होते; त्यांना सौष्ठव

लाभते व ती कायमची मनावर कोरली जातात. थोडक्यात, त्यांचे 'संभाषणत्व' हळूच गळून पडते आणि त्यांना विलोभनीय 'काव्यत्व' प्राप्त होते. हा कायापालट कोणत्या घटकांमुळे घडून येतो, काव्यमय संवादाची नियामके कोणती, ललित साहित्याच्या भाषेच्या सौंदर्याच्या सिध्दीचे कोणते उपाय पाश्चात्य शैलीशास्त्रज्ञांनी प्रतिपादिले आहेत, त्यांपैकी कोणत्या उपायांचे दर्शन शाकुंतलात घडते, त्यांव्यतिरिक्त काही उपाय कालिदासाने स्वत:च्या कल्पनेने योजले आहेत काय, इत्यादी मुद्यांचा विचार पुढील प्रकरणांत करू.

संदर्भ

१. डॉक्टर जॉन्सनकृत ही व्याख्या व्हॅलिन्सने उद्धृत केली आहे. पाहा :

G. H. Vallins, Better English, Third impression, London, Andre Deutsch, March, 1963, p. 181

२. A Merriam - Webster, Webster's New Collegiate Dictionary, Springfield, G.& C. Merriam Company, Copyright (c) 1975, p. 248

३. "Communication is essentially sharing mutual participation or exchange". पाहा : J. R. Kreuzer and Lee Cogan, Studies in Prose Writing, Alternate edition, New York, Holt, Rinehart and Winston, 1961, p. 295

४. "A twitch, a wink, a nudge, a kiss, passionate love-making and hitting someone over the head with an iron bar are forms of communication..." पाहा : G. Brandreth, Pears Book of Words, London, Pelham Books, 1979, p. 9

५. "Real communication, creative communication that can sustain and uplift and inspire is only possible with words.' वरील संदर्भ ४, पृ. ९

६. "In one sense, the spoken word has no meaning unless it is heard and understood... Certainly, without interpretation there is no communication, and one could argue that an attempted act of communication which does not succeed in communicating is meaningless."

A. E. Darbyshire, A Grammar of Style, London, Andre Deutsch, 1971, p. 17.

७. G. W. Turner, Stylistics, reprinted, England, Penguin Books, 1977, p. 138

८. 'न स शब्दो न तद्वाच्यं न स न्यायो न सा कला ।
जायते यत्र काव्याङ्गं अहो भारो महान्कवेः ॥ ४ ॥'

भामह, काव्यालङ्कार, भाष्यकार, देवेन्द्रनाथ शर्मा, पटना, बिहार-राष्ट्रभाषा-परिषद्, १९६२, पृ. १०८

९. 'रम्यं जुगुप्सितं उदारं अथापि नीच -
मुग्रं प्रसादि गहनं विकृतं च वस्तु ।
यद्वाप्यवस्तु कविभावकभाव्यमानं
तन्नास्ति यन्न रसभावमुपैति लोके ॥ ८५ ॥'

धनंजय, दशरूपकम् (सावलोकम्), हिन्दी व्याख्याकार, भोलाशङ्कर व्यास, बनारस, चौखम्बा विद्याभवन, १९५५, पृ. २८२

१०. David Crystal and Derek Davy, Investigating English Style, Fifth impression, London, Longman Group United, 1976 (English Language Series Title No. 5) pp. 95-121

* * *

३. संवाद व शैली-उपाय

[३.१] संभाषण व संवाद यांतील फरक

मागील प्रकरणाच्या अखेरीस म्हटल्याप्रमाणे सर्वसाधारण संभाषण संस्मरणीय संवादात कसे परिवर्तित होते, ते प्रथमत: जाणून घेऊ. संभाषण हे तात्कालिक असते, तर संवादात्मक लेखन चिरकालीन नसले तरी दीर्घकालीन अवश्य असते. संभाषण हे क्षणस्फूर्त असते, तर लेखन हे चिंतनानंतर साकारलेले असते. संभाषण घाईगर्दीत होते, तर लेखन निवांतपणे होत असते. संभाषण मौखिक असते, तर संवाद लिपिनिविष्ट होत असतात. म्हणजेच मौखिक संभाषण ही कानांची भाषा असते तर लिखित संवाद ही डोळ्यांची भाषा असते. संभाषण मनोगत कळवण्यासाठी होत असते, तर संवाद मनोगत कळवता-कळवता मनावर कोरण्यासाठी होत असतात. व्यावहारिक किंवा लौकिक संभाषणाला निश्चित प्रारंभ व निश्चित अंत नसतो, तर साहित्यिक संवादाचे प्रारंभ व अंत हे दोन्ही बिंदू नियोजित व निश्चित असतात. संभाषणात मागील [२-८-१४] ते [२-८-१७] मध्ये वर्णिलेले जे गुण असतात ते संवादाच्या संदर्भात दोष ठरतात. व्यक्तिव्यक्तींत संभाषण होते आणि ते वाऱ्यावर विरून जाते, ह्याउलट ललित साहित्यकृतीतील (प्रस्तुत संदर्भात नाटकातील) स्त्रीपुरुष पात्रांचे संवाद झडतात व तेही संभाषणाप्रमाणेच हवेत विलीन होत असले तरी नाट्यप्रयोग संपल्यावरही ते प्रेक्षकांच्या कानांत निनादत राहतात व मनात रुंजी घालत राहतात. किंबहुना, प्रेक्षक ते अविस्मरणीय संवाद मन:कोषात साठवून घरी घेऊन जातात व अधूनमधून गुणगुणतात. हे सर्व विवेचन सुविशद व समूर्त व्हावे ह्यासाठी शाकुंतल नाटकातील तीन उदाहरणांचे अवलोकन करू.

(१) शकुंतला दुष्यंताला उद्देशून लिहिलेल्या प्रेमपत्रात आपल्या कामबाधेचे वर्णन करते. ते ऐकून झाडाआड दडलेला दुष्यंत एकदम प्रकट होतो व म्हणतो :

तपति तनुगात्रि मदनस् त्वामनिशं मां पुनर्दहत्येव ।
ग्लपयति यथा शशाङ्कं न तथा हि कुमुदवतीं दिवस: ॥ (६३)

अर्थात -- हे शेलाट्या अंगलटीच्या तरुणी, कामदेव तुला पोळतो, पण मला अहोरात्र जाळतो. खरोखर दिवस (दिवसाचा सूर्यप्रकाश) चंद्राला जितका कोमेजवतो तितका श्वेतकमलिनीला कोमेजवत नाही.

या रचनेत त, न, य, श, द आणि व हे वर्ण पुन्हापुन्हा वापरले आहेत. ही आवृत्ती कानांना सुखावते. (ह्या आवृत्तीला अनुप्रास म्हणतात व हा शैली-उपाय पाश्चात्य शैलीशास्त्रज्ञांनीही मानलेला आहे). कवीने 'तपति'च्या तुलनेने अर्थाचा प्रकर्ष

प्रकट करणारा 'दहति' शब्द वापरून राजाच्या कामबाधेची तीव्रता व्यक्त केली आहे. दुष्यंताने स्वत:ची चंद्राशी, शकुंतलेची कमलिनीशी आणि मदनाची दिवसाशी तुलना करून मदनाची दाहकता सूर्याच्या दाहकतेसारखी असल्याचे ध्वनित केले आहे. समग्र श्लोक वाचल्यावर राजाची कामार्तता सहृदयाच्या अंत:करणाला भिडते. अशा प्रकारे हे पद्यात्मक संभाषण आपली भूमिस्पर्शी पातळी सोडून दशांगुळे वर विराजमान होते. अर्थात ते संभाषण न उरता संवादात परिणत होते.

(२) काश्यप शकुंतलेची सासरी पाठवणी करण्याचे ठरवितात. तिच्या मैत्रिणी तिला सजवतात; तपोवनदेवताही अनुज्ञा देतात. आता जाणे अटळच, हे लक्षात येताच ती प्रियंवदेला म्हणते - 'गडे, एकीकडे पतिदेवांच्या दर्शनाला मन अत्यंत उत्सुक आहे; पण हा आश्रम सोडावा लागणार ह्या विचाराने ते तितकेच दु:खीही आहे. त्यामुळे माझी पावले दु:खाने पडत आहेत' (९०). त्यावर प्रियंवदा म्हणते :

न केवलं तपोवनविरहकातरा सख्येव। त्वयोपस्थितवियोगस्य तपोवनस्यापि तावत् समवस्था दृश्यते।

उद्गलितदर्भकवला मृगा: परित्यक्तनर्तना मयूरा:।
अपसृतपाण्डुपत्रा मुञ्चन्ति अश्रूणीव लता:॥ (९१)

अर्थात -- तपोवनापासून होणाऱ्या वियोगामुळे, मैत्रिणी, केवळ तूच दु:खाने व्याकुळ झाली आहेस असे नाही. तर तुझ्यापासून होणाऱ्या वियोगामुळे तपोवनाचीही तुझ्यासारखीच अवस्था झालेली दिसत आहे. (बघ ना -)

हरिणांनी तोंडात घेतलेले दर्भगवताचे घास टाकून दिले आहेत. मोरांनी नृत्याचा त्याग केला आहे (म्हणजे नृत्य थांबवले आहे). वेलींवरून फिकुटलेली पाने खाली पडत आहेत. ती म्हणजे जणू त्यांनी गाळलेली आसवेच !

ह्या वर्णनात मानव व निसर्ग यांच्या हार्दिक एकरूपतेचे प्रभावी रेखाटन आहे. किंबहुना त्या दोघांच्या सहृदय सह-अस्तित्वाचे उत्कट शब्दांकन आहे. दु:खव्याकुळ शकुंतलेला केवळ मृग व मोर हे प्राणीच प्रतिसाद देत आहेत, असे नाही. तर वेलीही जणू अश्रू ढाळत आहेत. कवीने येथे निसर्गाचे मानुषीकरण करून प्रियंवदेच्या संभाषणाची पातळीच उंचावली आहे. जणू त्या संभाषणाने संवादाचे मुलायम मखमली वस्त्र परिधान केले आहे.

(३) दुष्यंत व शकुंतला यांचा गांधर्वविवाह होतो. दुष्यंत काही दिवस आश्रमात राहतो आणि नंतर राजधानीकडे प्रस्थान करण्याचा दिवस उजाडतो. त्याच्या संभाव्य वियोगामुळे व्याकुळ झालेली शकुंतला त्याला विचारते : 'तुम्ही मला येथून कधी घेऊन जाल ?' वस्तुत: हा अगदी सरळ व साधा प्रश्न असून त्याचे तितकेच सरळ व साधे उत्तर 'तीन दिवसांनी', या दोन शब्दांत

दुष्यंत देऊ शकला असता. पण तो तिला लोभनीय उत्तर व तेही श्लोकात देतो ते असे :

एकैकमत्र दिवसे दिवसे मदीयं। नामाक्षरं गणय गच्छसि यावदन्तम्।

तावत् प्रिये मदवरोधगृहप्रवेशं। नेता जनस्तव समीपमुपैष्यतीति ॥ (१४६-४७)

अर्थात - तू येथे माझ्या नावाचे एकेक अक्षर दररोज मोज. ज्या दिवशी तू माझ्या नावाचे शेवटचे अक्षर मोजशील त्या दिवशी तुला माझ्या अंत:पुराच्या प्रवेशापाशी घेऊन जाण्यासाठी (माझा) सेवक तुझ्याकडे येईल.

ह्या श्लोकात एक व दिवस या शब्दांची आवृत्ती, म, ग, य, व, प्र व त या अक्षरांचा अनुप्रास, शब्दावलीतील लयबध्दता, तज्जन्य श्रुतिमधुरता आणि कथ्य वस्तूचे अप्रत्यक्ष कथन एवढ्या भाषासौन्दर्यसाधनांचा इतका मनोज्ञ मिलाफ झाला आहे की, रसिकाला हा श्लोक (रंगभूमीवर प्रत्यक्षात) ऐकल्यावर किंवा (एकांतात बसून) वाचल्यावर उत्कट आनंदाची अनुभूती येते. ह्याचा अर्थ असा की, '(तुला घेऊन जाण्यासाठी माझा सेवक) तीन दिवसांनी (येईल),' असे राजाचे उत्तर हे संभाषणात जमा झाले असते, तर वरील श्लोक संवादात्मक काव्याची पदवी पटकावून बसला आहे. कालिदासाला 'तीन दिवसांनी' ह्या शब्दावलीची नीरसता सलली आणि 'एकैकमत्र---' इत्यादीची सरसता भावली. म्हणूनच त्याने या दोन विकल्पांपैकी पहिला विकल्प झिडकारला आणि दुसरा विकल्प स्वीकारला.

ह्यापूर्वीच्या दोन्ही श्लोकांचेही सौंदर्यविशेष वर निदर्शनास आणून दिले आहेतच. ते ध्यानात घेतले की, असे साधार म्हणता येते की, कवीच्या (म्हणजेच येथे नाटककाराच्या) कल्पकतेचा अथवा प्रतिभेचा संभाषणाला स्पर्श झाला की, ते आपले बोलीभाषेचे स्वरूप टाकून देते, वेगळी उंची गाठते, [१] 'सजीव' किंवा 'रसरशीत' बनते आणि आपल्या नवप्राप्त लावण्याने रसिकांना नुसताच आनंद देत नाही, तर अक्षरश: वेड लावते (It not only gladdens the appreciators, but maddens them). असे होणे का आवश्यक असते त्याचा खुलासा ग्रेगरी व स्पेन्सर ह्यांनी अत्यंत समर्पक शब्दांत असा केला आहे : "Characters in plays and novels never talk quite like people do in life; were they to do so they would be intolerable"[२].

[३.२] गद्य व पद्यबध्द काव्य यांतील अंतर

नाटक हा, पूर्वी प्रतिपादल्याप्रमाणे, अनेक दृष्टींनी मिश्र साहित्य-प्रकार आहे. त्यातील संवाद गद्यात व पद्यात अशा दोन्ही माध्यमांत असतात. पैकी गद्यात्मक संभाषणांचा विस्तृत विचार मागील प्रकरणात केला. ह्यापूर्वीच्या छेदकात ज्या तीन उदाहरणांचे विश्लेषण केले आहे त्यात गद्य व पद्य ही दोन्ही माध्यमे दृष्टिगोचर होतात (शाकुंतलातील गद्य व पद्ये यांचा संख्यात्मक तपशील पूर्वी [२.१] मध्ये सादर केलाच आहे). त्यामुळे गद्य आणि (पद्यबध्द) काव्य यांतील भेदांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. ह्या दोन माध्यमांचे स्वरूप, प्रयोजन,

कार्य व परिणाम ह्या बाबी लक्षात घेऊन रीड [३], व्हॅलिन्स [४], मरी [५] आणि बोल्टन[६] ह्यांनी ह्या संदर्भात केलेला तौलानिक विचार थोडक्यात समजून घेऊ :

(१) गद्य सामान्यपणे छंदोबध्द नसते; काव्य छंदोबध्द असते. (२) गद्य आयत्या भाषिक साधनसंपत्तीचा उपयोग करते, तर काव्य हे उपलब्ध शब्दांना जणू पैलू पाडून त्यांचा वापर करते. (३) गद्यात साधेपणा असतो, ते जणू जमिनीवर दृढ पावले टाकून चालते. काव्यात डौलदारपणा असतो, ते जणू आकाशात झेपावत असते. (४) गद्य ही सामान्यत: रचनात्मक शब्दसंहती असते; काव्य ही सर्जनात्मक (Creative) शब्दसंहती असते. (५) गद्य आडवे पसरत किंवा विस्तारत जाते; काव्य उभे 'वाढत' जाते. (६) गद्यातील शब्दसंहती सामान्यपणे प्रचारातल्या असतात, काव्यातील शब्दसंहती मुद्दाम मुरड घातलेल्या म्हणजेच अप्रचलित असतात. (७) गद्यातील शब्द सामान्यपणे एकच अर्थ व्यक्त करणारे व कल्पनांचे वाचक असतात; काव्यातील शब्द सामान्यपणे अनेक अर्थ व्यक्त करणारे व कल्पनांचे सूचक असतात. (८) सुस्पष्टता हा गद्याचा प्रमुख गुण असतो; सुस्पष्टता हा काव्याचा दुय्यम गुण असतो. (९) गद्यात प्रतिमांना हक्काचे स्थान नसते, त्यांची संख्याही अल्पच असावी अशी अपेक्षा असते. काव्यात प्रतिमांना वावरण्याचा हक्क असतो आणि त्यात प्रतिमांवर प्रतिमा वापरल्या गेल्या तरी त्या स्वागतार्हच ठरतात. (१०) गद्य दिसते सोपे (वस्तुत: चांगले गद्य लिहिणेही तसे सोपे नाही, किंबहुना सोपे गद्य लिहिणे तसे अवघड आहे), पण उत्तम गद्यलेखनासाठी प्रतिभाबळाची गरज असतेच. छंदाची बंधने पाळणारे काव्य लिहिणे सोपे नसते, त्याच्यासाठी प्रतिभाबळाबरोबर, वृत्ते व शब्दसंग्रह या दोहोंवरील प्रभुत्वांचीही आवश्यकता असते. (११) गद्यलेखन[७] हा एक विशिष्ट मानसिक व्यापार आहे; काव्यलेखन हा त्याहून वेगळा व वेगळ्या कौशल्याचा मानसिक व्यापार आहे. (१२) ह्या दोन्ही लेखन-प्रकारांमागील प्रेरणा व त्यांचा आवेग यांत फरक असतो. (१३) काही प्रकारच्या गद्यात काव्याचा आभास होतो, तर उलट काही प्रकारच्या काव्यात गद्याचा आभास होतो.[८]

[३.३] भाषा : कलात्मक अभिव्यक्तीचे साधन

शाकुंतल हे नाटक आहे. नाटक हा काव्याचा (म्हणजेच ललित साहित्याचा) एक प्रकार आहे. ललित साहित्य ही कला आहे. प्रत्येक कला मनुष्याच्या अनुभवांत भर घालीत त्याला निर्भेळ आनंद देत असते. काव्य हेच कार्य भाषेच्या माध्यमाच्या द्वारे साधत असते. बाळपणापासून होत आलेले भाषेचे संस्कार कवीने पचविलेले असतात; त्याने भाषेचे प्रयत्नपूर्वक शिक्षण घेतलेले असते; तिचा उत्तान स्वभाव (म्हणजे व्याकरण) व गूढ स्वभाव (म्हणजे व्याकरणाच्या नियमांनुसार होणारी असंख्य रूपे व वाक्ये) हा उभयविध स्वभाव नीटपणे समजून घेतलेला असतो. त्यायोगे त्याने भाषेचे 'सोने' बनविण्याची किमया हस्तगत केलेली असते. म्हणूनच तो आपला आशय व्यक्त करण्यासाठी विविध भाषिक रूपांचा यथेच्छ उपयोग करून घेतो. या भाषिक रूपांनाच Linguistic resources किंवा stylistic devices

असे म्हणतात. अर्थात हे भाषिक उपाय किंवा ही शैली-साधने कवीच्या मनोगतांची जणू वाहनेच होत. ब्रूक्स आणि वॉरेन ह्या लेखकांनी तसे म्हटलेच आहे :

"Since a good style represents an adaptation of means to a particular purpose, all the various devices of style have to be viewed as expressive devices. That is to say, even the minor ornaments of style are, strictly speaking, not ornaments but conveyors of meaning."[९] म्हणजेच हे विविध शैली-उपाय कवीचे मनोगत वाचकाच्या हृदयापर्यंत वाहून नेण्याचे कार्य करीत असतात. ह्या दृष्टीने हे उपाय म्हणजे अर्थाभिव्यक्तीची कार्यक्षम साधने होत. ही अर्थाभिव्यक्ती अचूक, प्रभावी व सौष्ठवसंपन्न असते. क्रुइझर आणि कोगन[१०] यांच्या मतानुसार सदरहू शैली-उपाय कवीला अभिप्रेत असलेल्या अर्थाच्या सूक्ष्म बिंदूंचे रेखाटन करतात; अशा प्रकारे ते कार्यसाधक असतात. म्हणूनच कवीने प्रयोजनावाचून त्यांचा वापर करू नये, असे वरील लेखकद्वयाने उन्मेखून उपदेशिले आहे. ("No device should ever be used solely as an end in itself, though in itself it may be pleasing'[११])

शैली-उपायांमुळे लेखकाच्या हृद्गताचे बारकावे तर प्रभावीपणे व्यक्त होतातच, पण त्याखेरीज लेखनात वैविध्य व वैचित्र्य उत्पन्न होऊन ते रमणीय व स्मरणीय बनते. ते ललित लेखन (Creative writing किंवा imaginative literature) ह्या पदवीस पात्र ठरते.

[३.४] शैली-उपायांची सूची

उलमन[१२], क्रुइझर आणि कोगन[१३], बॉवडेन[१४], बोल्टन[१५], ब्रूक्स आणि वॉरेन[१६], मॉरिसन[१७], व्हॅलिन्स[१८], हाएट[१९], हफ्[२०] इत्यादी पाश्चात्य शैलीशास्त्रज्ञांनी ध्वनिनिष्ठ, पदनिष्ठ, अर्थनिष्ठ व रचनानिष्ठ असे जे चार प्रकारचे अनेक शैली-उपाय प्रतिपादिले व निरूपिले आहेत, त्यांचे अकारानुक्रमाने संकलन पुढीलप्रमाणे करता येईल - १ अनुप्रास, २ अन्यधर्मारोप, ३ अलंकार, ४ 'आणि' अव्यय, ५ आवृत्ती, ६ उत्तरगर्भ प्रश्न, ७ क्रमविपर्यय, ८ नकार, ९ प्रच्छन्न संदर्भोल्लेख, १० वाक्प्रचार व म्हणी, ११ विचलन, १२ शब्दविवेक, १३ श्लेष, १४ समानांतरता, १५ समानार्थकता व १६ स्वल्पविराम.

हे शैली-उपाय विरामचिन्ह, शब्दकळा, वाक्यरचना, भाषेची रूढी, भाषेचे शोभाकर धर्म, शब्दार्थ, रम्योक्ती, संकीर्ण रचना अशा विविध वर्गांत मोडतात, हे वरील सूचीवरून स्पष्ट होईल. शाकुंतलात हे उपाय कोणत्या स्वरूपांत, किती प्रमाणात, किती कौशल्याने व किती प्रभावीपणाने वापरण्यात आलेले आहेत, ते अभ्यासण्यापूर्वी ह्यांची काही ठळक वैशिष्ट्ये ध्यानात घेऊ.

[३.५] शैली-उपायांची वैशिष्ट्ये

[३.५.१] ह्याबाबतीत अगदी सुरुवातीलाच एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे. ती गोष्ट ही की, वरीलपैकी एकही उपाय लेखकाने बाहेरून आणून भाषेवर लादलेला नसतो. हे सर्व

उपाय म्हणजे भाषेची अंगभूत सामर्थ्ये होत; ही सगळी भाषिक रूपेच (linguistic forms) असतात. पाश्चात्य शैलीशास्त्रज्ञांनी इंग्रजी भाषेतील नानाविध प्रयोगांचा पृथक्करणात्मक अभ्यास करून वरील उपाय शोधून काढले आहेत. त्यांत त्यांना जाणवलेली भाषिक रूपे संस्कृतातही आढळतात. उदाहरणार्थ, शब्दांना (म्हणजे पदांना) पूर्वप्रत्यय लागून अधिरूढ, प्रपाठक, आहार, संहार, परित्यागी इत्यादी हजारो शब्द सिध्द होतात, तसेच परप्रत्ययांनीही महत्त्व, दयालु, लोभनीय, कर्तव्य इत्यादी शब्दांची सिध्दी होत असते. दोन किंवा अधिक शब्द एकत्र येऊन शरीरलावण्य, कमलवसतिः, ज्ञातिकुल, तृणच्छन्न, परशुमारण, सैकतलीन असे अगणित सामासिक शब्द बनतात. दोन शब्दांना एकत्र आणून त्यांच्याद्वारे तिसराच अर्थ सुचवण्याची वृत्तीही संस्कृत भाषेत आहे. उदाहरणार्थ, नीलकण्ठ, महाब्राह्मण, आकाशेश, आकाशरक्षी, दिनात्मज, दिनमुखम् इत्यादी. क्षामक्षामप्रभृती आवृत्तियुक्त शब्दांनी गुणप्रकर्ष दर्शवला जातो तर शैले शैले, गजे गजे, दिने दिने इत्यादी पुनरुक्तींद्वारा 'प्रत्येकावर' हा अर्थ व्यक्त केला जातो. न्यूनत्व/लघुत्व/अनुकंपनीयत्व दर्शविणारे वृक्षक, हरिणक, अंगुलीयक, पुत्रक, भीरुक असेही शेकडो शब्द प्रचलित आहेत. 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः' इत्यादी शब्दावलीत संज्ञांचे आधिक्य प्रतीत होते, 'अन्यः करोति अन्यो भुङ्क्ते ।', 'मनसि अन्यद् वचसि अन्यत्' । इत्यादी वाक्यप्रयोगांत सर्वनामांच्या पुनरुक्तीशिवाय समानान्तर रचनाही प्रतीत होतात. 'भरताग्रजः कौसल्यानन्दवर्धनः अखिलजनप्रियः दशरथपुत्रः ससीतालक्ष्मणः रामः वनं जगाम ।' अशा वाक्यांद्वारे विशेषणांनी विशेष्ये कशी भूषवावयाची ते समजते. अभिप्राय एकवचनी असूनही दाराः, आपः, वर्षाः, सिकताः, असवः, इत्यादी शब्द नेहमी बहुवचनी वापरले जातात. यांत विचलन प्रतीत होते. खेद, विनंती इत्यादी भाव व्यक्त करताना शब्दावृत्ती अपेक्षित असते (उदाहरणार्थ, हा हन्त हन्त नलिनीं गज उज्जहार, न खलु न खलु बाणः संनिपात्योऽयमस्मिन् इत्यादी). 'गुणः भवति' ऐवजी गुणायते, 'गरुडः भवति' ऐवजी गरुडायते अशी नामधातु- साधित संक्षिप्तीकरणाची प्रवृत्ती सर्रास आढळून येते. 'च'कार वापरून तसेच 'च'कार न वापरताही शब्द किंवा वाक्ये जोडण्याची प्रथा संस्कृतात रूढ आहे. (उदाहरणार्थ, वनवासस्य, सौकुमार्यस्य, विनयस्य च --- !; अर्धपीतस्तनं मातुर् आमर्दक्लिष्टकेसरम्, इत्यादी). उच्चारलेल्या किंवा लिहिलेल्या संक्षिप्त वाक्यातून विस्तृत सूचित अर्थ प्राप्त होतो; उदाहरणार्थ, 'यद् भावि तद् भवतु' या प्रत्यक्षात वापरलेल्या शब्दांपासून 'शुभ होवो वा अशुभ होवो' हा अर्थ ध्यानात येतो. 'एकापि कलिका उपवनं भूषयति । एकापि गणिका समाजं दूषयति ।', 'यौवने भोगः शोभते, स्थविरे योगः शोभते ।' अशा असंख्य समानान्तर रचनांनी संस्कृत भाषा अलंकृत झाली आहे. पौनःपुन्यार्थक धातू, तशीच धातुसाधित विशेषणे, इच्छादर्शक भाववाचक संज्ञा इत्यादींच्या योगे संक्षिप्तपणे विस्तृत अर्थ सुचविण्याची सोय आहे. 'तो आसनावर बसून (दृश्यादी) पाहतो' या विस्तृत वाक्याऐवजी 'स आसनात् प्रेक्षते' असे संक्षिप्त वाक्य पुरेसे असते. 'नूनं त्वां अहं अपराधिनं मन्ये', 'खलु स असत्यं अभाषत' इत्यादी वाक्यांत नूनं, खलु इत्यादी शब्दांच्या अर्थांवर जोर द्यावयाचा

असल्यामुळे त्यांचा वाक्यातील क्रम बदलला जातो. 'स्थाने खलु ऋषिजनेन सर्वदमण इति कृतनामधेयोऽसि ।' इत्यादी वाक्यातही 'योग्यच आहे' या अर्थाचा 'स्थाने' शब्द वाक्यारंभी असणेच अपेक्षित आहे. कारण त्याच्या अर्थावर जोर द्यावयाचा आहे. समानार्थक शब्द, सामासिक शब्द, शब्दबंध व वाक्प्रयोग यांची संस्कृतात रेलचेल आहे. 'किं तया क्रियते धेन्वा या न सूते न दुग्धदा ?', 'काय: कस्य न वल्लभ: ?' इत्यादी उत्तरगर्भ प्रश्नांचे संस्कृतात प्राचुर्य आढळते. तद्वत 'नेयं न वक्ष्यति मनोगतं आधिहेतुम् ।', 'न ययौ न तस्थौ ।' असे नकारात्मक शब्दबंधही वैपुल्याने आढळून येतात. 'उद्यमेन नर: विभवं याति', 'प्रथमं गणितं इव तवोत्तरम्', 'त्वया स्वहस्तेन अङ्गारा: कर्षिता: ।' इत्यादी वाक्प्रयोग व म्हणी जागोजागी दृष्टिगोचर होतात. विभवाङ्कुर, सद्‌गुणसौरभ, ज्ञानजल इत्यादी शब्दावलींत मानुषीकरण आहे; तर 'हाहानिनादेन दिशो बधिरयन्त: ।' इत्यादी उक्तींत अन्यधर्मारोप आहे.[२१] तात्पर्य, वर संकलित केलेले शैली-उपाय संस्कृत भाषेच्या अंगवळणी पडलेले आहेत; ते संस्कृत बोलणाऱ्या-लिहिणाऱ्यांच्या वापरात असतात. मात्र प्रतिभाशाली लेखक त्यांचा चोखंदळपणाने वापर करून सौंदर्यनिर्मिती साधतो. त्याच्या ह्या कौशल्यातच त्याचे 'लेखकपण' झळकते.

[३.५.२] नोवॉटनी या लेखिकेने शैली-उपायांच्या एका स्वभावगत गुणाचे वर्णन पुढील शब्दांत केले आहे :"... we have ... to remember that "stylistic elements ... are "polyvalent"; the same device may produce several effects, and conversely, the same effect may be obtained from several devices."[२२] अर्थात, एकच शैली-उपाय अनेक परिणाम साधू शकतो आणि ह्याच्या उलट एकच परिणाम साधण्याची शक्ती अनेक उपायांत असू शकते. शाकुंतलातील उदाहरणांद्वारे हे समजून घेऊ.

शकुंतलेने दुष्यंताशी गांधर्वविवाह केल्याचे कळल्यावर कण्वांनी तिचे सालिंगन अभिनंदन कसे केले त्याचे निवेदन करताना प्रियंवदा म्हणते : 'वत्से, सुशिष्यपरिदत्तेव विद्याशोचनीयासि संवृत्ता ।' (८१), अर्थात - (कण्व शकुंतलेच्या कृतीला अनुमोदन देताना म्हणतात -) मुली, सत्पात्र शिष्याला दिलेली विद्या जशी अशोचनीय होते, तशी तू (दुष्यंताशी विवाहबध्द होऊन) अशोचनीय झाली आहेस. येथे शकुंतला ह्या स्त्रीलिंगी उपमेयाची विद्या ह्या स्त्रीलिंगी उपमानाशी तुलना केली आहे. म्हणजेच लिंगसाम्य सांभाळले आहे. कण्व हे कुलपती आहेत. 'मुनीनां दशसाहस्रं योऽन्नपानादिपोषणात् । अध्यापयति विप्रर्षिरसौ कुलपति: स्मृत: ।।' अशी कुलपती शब्दाची व्याख्या आहे. कण्वांच्या आश्रमात 'दशसहस्र' विद्यार्थी होते की नव्हते हे कळावयास साधन नाही. पण काही शिष्य अवश्य होते एवढे निश्चित, कारण त्यांच्या शिष्यांचे उल्लेख नाटकात आले आहेत. म्हणजेच कण्व हे विद्यादान करणारे अध्यापक होते. त्यामुळे त्यांच्या तोंडी घातलेला .. 'परिदत्ता इव विद्या' हा शब्दप्रयोग योग्य आहे. म्हणजेच हा शब्दप्रयोग त्यांच्या 'वृत्तीस' (पेशास) अनुरूप आहे. ज्ञानदान विवेकी (म्हणजे विवेचनशील=ज्ञानग्रहण करण्यास पात्र) शिष्यांनाच करावे, तरच ते सफल होते, हा प्राचीन

भारतीय दंडक होता.[२३]. म्हणूनच कण्वांनी 'सुशिष्य' हा समुचित शब्द वापरला आहे. विद्या शिष्याला दिली जाते. तशीच मुलगी वराला दिली जाते. त्या दृष्टीने परिदत्ता शब्दही योग्य आहे. ह्यावरून हे स्पष्ट होईल की, कण्वांच्या मुखी घातलेली उपमा वरीलप्रमाणे अनेक परिणाम साधण्यास समर्थ आहे.

ह्याच्या उलट एकच परिणाम साधण्याची किंवा एकच अर्थ व्यक्त करण्याची शक्ती अनेक शब्दबंधांत असू शकते. ह्याचे वा.शि. आपटे ह्यांनी दिलेले एक नमुनेदार उदाहरण उद्धृत करण्याजोगे आहे : 'उद्यमात् विभवः प्रभवति।' (उद्योगापासून वैभवाची प्राप्ती होते) ही एकच संकल्पना 'उद्यमात् विभवः उत्पद्यते/सञ्जायते', 'उद्यमः विभवाय कल्पते/भवति/जायते', 'उद्यमः विभवस्य कारणं/हेतुः', 'उद्यमप्रभवो विभवः', 'उद्यमेन नरो विभवं याति', 'उद्यमेन नरो विभवयुतो भवति', 'उद्यमी नरो विभवसम्पनो भवति', 'उद्यमं अवलम्ब्य नरो विभवं याति', 'उद्यमपरेण नरेण (प्रायः) विभवयुतेन भाव्यम्', 'उद्यमबीजाद् विभवाङ्कुरः प्ररोहति', अशा प्रकारे अनेक प्रकारच्या शब्दावलींद्वारा अभिव्यक्त करता येते.[२४]

शैली-उपायांच्या ठिकाणी असलेल्या ह्या Polyvalence चा व्यापक व मार्मिक उपयोग कवीला करून घेता येतो.

[३.५.३] वेलेक आणि वॉरेन ह्यांनी ह्या उपायांची संदर्भनिष्ठ परिवर्तनशीलता निदर्शनास आणून दिली आहे. ते प्रतिपादितात :

"It seems impossible, however, to prove that specific figures and devices must, under all circumstances, have specific effects or "expressive value". In the Bible and in chronicles, the co-ordinate sentence constructions ("and... and ... and") have a leisurely effect of narration; yet in a romantic poem, a series of and may be steps in a stair of breathlessly excited questions. A hyperbole may be tragic or pathetic but it may also be grotesque and comic. Besides, certain figures or syntactic features recur so frequently, and in so many different contexts, that they cannot have specific expressive meaning..."[२५]

वरील विधानांचा सारांश असा की, विशिष्ट अलंकारांचा किंवा शैली-उपायांचा वेगवेगळ्या संदर्भांत वेगवेगळा परिणाम होणे संभाव्य असते. उदाहरणार्थ, 'आणि' ह्या उभयान्वयी अव्ययाचा प्राचीन धर्मग्रंथातील प्रयोग आणि अर्वाचीन स्वच्छंदवादी कवितेतील प्रयोग हे निरनिराळे परिणाम साधतात. तद्वत अत्युक्ती ही गांभीर्य व हास्य असे परस्परविरुध्द परिणाम साधू शकते. शिवाय, काही शैली-उपाय वेगवेगळ्या संदर्भांत इतके वारंवार वापरले जात असतात की, ते विशिष्ट अर्थाचे व्यंजक असतात, असे म्हणताच येत नाही.

[३.५.४] नाटकासारख्या प्रदीर्घ लिखाणात अनेक शैली-उपाय स्वाभाविकपणे जाणवतात, हे अनुभवसिध्द सत्य आहे. परंतु अनेकदा एखाद्या वाक्यात किंवा श्लोकातही एकाहून अधिक

शैली-उपाय प्रतीत होतात. मागील ३.१ (१), (२) व (३) यांचे पुनरवलोकन केल्यास ह्या निरीक्षणाचा प्रत्यय येईल. म्हणून या मुद्याची पुन्हा चर्चा करण्याची गरज नाही.

[३.५.५] ह्यापूर्वी [३.४] मध्ये १६ शैली-उपाय उल्लेखिले आहेत. पण ह्याचा अर्थ असा नव्हे की, भाषेत तेवढेच उपाय असतात. कोणतीही वापरातील व प्रगल्भ दशेला पोचलेली भाषा जितकी लवचिक तितकीच सर्वसमावेशक अथवा सर्वस्पर्शी असते. तिच्या ठायी मुळातच अभिव्यक्तीचे अमर्याद सामर्थ्य असते. त्यामुळे नोवॉटनी नावाच्या लेखिकेने म्हटल्याप्रमाणे शैली-उपाय अनेक असतात. (devices are numerous[२६]) किंवा हफ्ने म्हटल्याप्रमाणे ते असंख्य असतात (Stylistic devices are almost innumerable[२७]). शिवाय, प्रत्येक प्रतिभाशाली भाषाप्रभू मुळात अस्तित्वात असलेल्या उपायांत स्वत:च्या कल्पकतेने भर घालून त्यांची संख्या वाढवीत असतोच. अशा प्रकारे भाषेचे अभिव्यक्ति-सामर्थ्य काळागणिक व लेखकागणिक वृध्दिंगत होत असते.

एवढ्या प्रास्ताविकानंतर आता वरील १६ शैली-उपायांचा आढळ शाकुंतलात कोठे व कसा होतो ते क्रमश: जाणून घेऊ. तसे करताना संबंधित उपायाचे स्वरूप प्रथमत: थोड्क्यात समजून घेऊ. नंतर प्रत्येक उपायाच्या जास्तीत जास्त दहा उदाहरणांची चर्चा करू. ज्या उपायाची कमी उदाहरणे प्राप्त होतील, त्या उपायाची सर्व उदाहरणे विचारात घेऊ. उदाहरणांच्या सुरुवातीस एखाद-दोन वाक्यांत त्यांची पार्श्वभूमी नमूद करू. त्यायोगे ज्यांनी शाकुंतल वाचले नसेल त्यांची अंशत: तरी सोय होईल.

[३.६] अनुप्रास

प्रत्येक भाषेत व तिच्यातील साहित्यात हमखास आढळणारा असा हा शैली-उपाय आहे. कोहेनने ह्याची व्याख्या पुढील शब्दांत केली आहे :

"Alliteration, a technique which enhances verbal music, is generally considered the repetition of initial sounds of words, usually consonants."[२८]

अर्थात जेव्हा दोन निकटच्या शब्दांच्या सुरुवातीच्या व्यंजनांची आवृत्ती झालेली असते तेव्हा अनुप्रास होतो. ह्याच्या योगे नादमाधुर्य उत्पन्न होते. आता शाकुंतलातील उदाहरणे अवलोकू.

(१) नान्दी -- या सृष्टि: स्रष्टुराद्या वहति विधिहुतं या हविर्या च होत्री। (१)
शाकुंतलाच्या या मंगलाचरणातच 'या' ची पुनरावृत्ती चार वेळा झाली आहे.

(२) सूत्रधार: -- --- । अद्य खलु कालिदासग्रथितवस्तुनाभिज्ञानशाकुन्तल-
नामधेयेन नवेन नाटकेनोपस्थातव्यमस्माभि: । (२)

अर्थात -- आज खरोखर, कालिदासाने ज्याचे संविधानक रचले आहे ते

अभिज्ञानशाकुंतल नावाचे नवीन नाटक आपल्याला सादर करावयाचे आहे. यातील 'न' चा अनुप्रास स्वत:स्पष्ट आहे. ह्याच्यामुळे प्रस्तुत वाक्यात लय उत्पन्न झाली आहे.

(३) राजा -- सत्यमतीत्य हरितो हरींश्च वर्तन्ते वाजिन: । (५)

अर्थात -- खरोखरच (आपले घोडे इतक्या वेगाने धावत आहेत की त्यांनी) सूर्याच्या व इंद्राच्या घोड्यांवरही मात केली आहे/त्यांना मागे टाकले आहे. यात 'हरि' व 'व' यांची पुनरावृत्ती प्रतीत होते.

(४) वैखानस: -- मृदुनि मृगशरीरे पुष्पराशाविवाग्नि: । (६)

अर्थात -- हरिणाच्या मृदुमुलायम शरीरावर बाण मारणे म्हणजे फुलांच्या राशीवर निखारा ठेवणे होय. यातील 'मृ'च्या आवृत्तीने हरिणांच्या मृदू शरीराचा जणू स्पर्शच होतो !

(५) राजा -- मलिनमपि हिमांशोर्लक्ष्म लक्ष्मीं तनोति । (१३)

अर्थात -- चंद्रावरील डाग जरी काळा असला तरी तो त्याचे (चंद्राचे) सौंदर्य वृध्दिंगत करतो. यात लक्ष्म हे अक्षरयुग्म पुनरावृत्त झाले आहे.

(६) शकुन्तला -- हला परित्रायेथां मामनेन दुर्विनीतेन दुष्टमधुकरेण परिभूयमानाम् । (१७)

अर्थात -- सखे, हा दुर्वर्तनी व दुष्ट भुंगा मला सतावत आहे. त्याच्यापासून माझे रक्षण करा. यातील 'दु' ची पुनरावृत्ती उघड आहे.

(७) प्रियंवदा -- तेन हि नार्हत्येतदङ्गुलीयकमङ्गुलीवियोगम् । (२६)

अर्थात -- तर मग ह्या आंगठीचा बोटापासून वियोग होणे योग्य नाही. यात तर अंगुली ही तिन्ही अक्षरे पुनरावृत्त झालेली आहेत.

(८) राजा -- --- । विवक्षितं ह्यनुक्तमनुतापं जनयति । (६४)

अर्थात -- --- जे बोलण्याची इच्छा असते ते (प्रकटपणे) न बोलल्यास पश्चात्तापास कारणीभूत ठरते. व्यावहारिक शहाणपणाने भरलेल्या ह्या वाक्याला 'अनु'च्या आवृत्तीने खुलावट लाभली आहे.

(९) राजा -- --- स्थिता तिष्ठेत्युच्चैर्वदति गुरुशिष्ये गुरुसमे । (१४४)

अर्थात -- 'थांब', असे गुरुसमान असलेल्या गुरुशिष्यांनी मोठ्याने ओरडून सांगितले असता. येथील 'गुरु' ची पुनरावृत्ती तत्काळ लक्षात येते. हिच्या योगे अंतिम दोन शब्द एकमेकांत गुंफल्यासारखे भासतात.

(१०) सानुमती -- रमणीया खल्ववधिर्विधिना विसंवादित: । (१४७)

अर्थात -- (दुर्) दैवाने मुदतीचे हे रमणीय आश्वासन पाळले नाही. यातील 'वि'-

च्या पुनरावृत्तीमुळे संपूर्ण वाक्याला कारुण्याचा स्पर्श झाला आहे. संस्कृत भाषा मुळात गोड व श्रवणीय आहे. तिच्यात अनुप्रासांचे प्राचुर्य आढळते. अनुप्रासांमुळे संस्कृतची नैसर्गिक मधुरता द्विगुणित होते.

[३.७] अन्यधर्मारोप

आशय मनोरम करण्याची ही एक क्लृप्ती आहे. हिला विपरीतता असेही म्हणतात. जेव्हा एका इंद्रियाची अनुभूती दुसऱ्या इंद्रियाला येत असल्याचे वर्णन केलेले असते, किंवा अचेतनाला चेतन रूप बहाल केलेले असते किंवा अमूर्ताचे मूर्त स्वरूपात रूपान्तर केलेले असते किंवा चेतन वस्तू जडासारखी असल्याचे दर्शवलेले असते तेव्हा अन्यधर्मारोप होतो. अशा वर्णनापासून वाचकाला वैपरीत्याचा चमत्कार जाणवतो व आनंद होतो. अशा प्रकारच्या वर्णनात अर्थदृष्ट्या अननुकूलता, अननुरूपता, अशक्यता अथवा असंभाव्यता अवश्य जाणवते. परंतु लेखकाने तिचा अवलंब वाचकाला चमत्कृतीचा आनंद देण्यासाठी जाणूनबुजून केलेला असतो; क्वचित्प्रसंगी तशी चमत्कृती अपरिहार्यही असते. ज्यात चमत्कृती (म्हणजे सुंदरता) नाही ते लेखन नाही आणि ज्याला चमत्कृती साधता येत नाही तो ललित लेखक नाही ![२९] आता शाकुंतलाकडे वळू.

(१) वैखानसाच्या विनंतीस मान देऊन दुष्यंत कण्वाश्रमात प्रवेश करून आश्रमाच्या द्वारातून आत शिरतो.

राजा -- शान्तमिदमाश्रमपदं स्फुरति च बाहुः कुतः फलमिहास्य ।
अथवा भवितव्यानां द्वाराणि भवन्ति सर्वत्र ॥ (१०)

अर्थात -- आश्रमाचे हे ठिकाण शांत आहे. (तरीसुध्दा माझा उजवा) बाहू स्फुरण पावत आहे. येथे (ह्या शांत आश्रमात) याचे फळ कोठून मिळणार ? अथवा भविष्यकाळात होणाऱ्या गोष्टींची दारे सर्वत्र असतात.

भवितव्य म्हणजे होऊ घातलेली किंवा संभाव्य असलेली गोष्ट वा घटना. ती अमूर्त असते. दार हे घर ह्या मूर्त वस्तूला असते. त्यातून मनुष्य व मनुष्येतर प्राणी आत येतात. ते मूर्त असतात. येथे कवीने अमूर्त भवितव्ये मूर्त असल्याची कल्पना करून ती जणू दारातून प्रवेश करतात असे वर्णन केले आहे. म्हणजेच अमूर्तावर मूर्ताचा आरोप केला आहे.

(२) भुंग्याने सतावल्यामुळे घाबरलेल्या शकुंतलेला धीर देण्यासाठी राजा एकाएकी प्रकट होतो. त्याला पाहाताच पाहुण्याच्या स्वागताच्या नित्याच्या प्रघातास अनुसरून अनसूया शकुंतलेला फळे व अर्घ्य[३०] घेऊन येण्यास सांगते. तेव्हा राजा म्हणतो -

राजा -- भवतीनां सूनृतयैव गिरा कृतमातिथ्यम् । (१८)

अर्थात -- आपणां सर्वांच्या मधुर भाषणानेच (माझे) आतिथ्य केले.

भाषण ही अमूर्त वस्तू आहे. मूर्त व्यक्तीच दुसऱ्या मूर्त व्यक्तीचे आतिथ्य करू शकते. पण येथे अमूर्त भाषणाने मूर्त व्यक्तीचे कार्य केल्याचे वर्णन केलेले आहे. येथेही अमूर्तावर मूर्ताचा आरोप आहे.

(३) शकुन्तलेकडे पाहून तिच्यावर अनुरक्त झालेल्या दुष्यंताच्या मनात विचार येतो की, जसे आपले मन तिच्यावर जडले आहे तसे तिचे आपल्यावर जडले असेल का ? पण हा संदेह पळार्धात मनातून निपटून काढून तो एक श्लोक गातो :

राजा -- वाचं न मिश्रयति यद्यपि मद्वचोभि:
कर्णं ददात्यभिमुखं मयि भाषमाणे ।
कामं न तिष्ठति मदाननसंमुखीना
भूयिष्ठमन्यविषया न तु दृष्टिरस्या: ॥ (२७)

अर्थात -- जरी ती माझ्या बोलण्यात बोलणे मिसळत नसली (म्हणजे माझ्या प्रश्नाला ती उत्तर देत नसली किंवा माझ्या बोलण्याबद्दल ती आपला अभिप्राय व्यक्त करीत नसली तरी) मी बोलत असताना तिचा कान माझ्याकडे पाहून (माझे बोलणे) ऐकत असतो. ती माझ्या चेहऱ्याकडे बघून माझ्यासमोर उभी राहत नाही हे मान्य, पण तिची नजर दुसऱ्या कोणत्याही वस्तूवर खिळलेली नसते (हेही तितकेच खरे).

वस्तुत: एखादा मनुष्य बोलत असताना दुसरा मनुष्य त्याचे ते बोलणे कानांनी ऐकत असतो. पण येथे कवीने मनुष्याचे कार्य कान या इंद्रियावर सोपवले आहे. म्हणून येथे अन्यधर्मारोप झाला आहे. वरील श्लोकातील तिसऱ्या चरणात 'ती माझ्या चेहऱ्याकडे बघून माझ्यासमोर उभी राहत नाही', असे वर्णन आहे. म्हणूनच 'मी बोलत असताना ती आपली मान वळवून आपला कान माझ्या चेहऱ्यासमोर आणते आणि तसा तिचा तो कान माझे बोलणे ऐकतो', असा अर्थ ग्रहण करणे अपरिहार्य आहे. मनुष्य कानांनी ऐकतो; कान (म्हणजे लक्ष) देऊन ऐकतो, असे प्रयोग प्रचलित आहेत. परंतु मनुष्याचा कान ऐकतो, असा प्रयोग प्रचलित नाही. परंतु येथे तसा अप्रचलित म्हणजेच विचलित प्रयोग केलेला आहे. तोच येथील अन्यधर्मारोपाचा जन्मदाता ठरला आहे.

(४) शाकुंतलाच्या तिसऱ्या अंकाच्या मुख्य प्रवेशाची सुरुवातच कामपीडित दुष्यंताच्या गद्यपद्यात्मक प्रदीर्घ संवादाने होते. मालिनी नदीच्या काठावरील लतामंडपात शकुन्तला बसलेली असेल अशी अटकळ मनाशी बांधून तो तेथे जातो. तेथे सुखावह वारा वाहात असतो. त्याच्या स्पर्शाच्या सुखाचा अभिनय करून दुष्यंत गातो :

शक्यमरविन्दसुरभिः कणवाही मालिनीतरङ्गाणाम् ।
अङ्गैरनङ्गतप्तैर्विरलमालिङ्गितुं पवनः ॥ (५३)

अर्थात -- कमळांमुळे सुगंधित आणि मालिनी नदीच्या लाटांच्या तुषारांनी युक्त अशा वाऱ्याला, कामबाधेने तापलेल्या अवयवांनी, घट्ट आलिंगन देणे शक्य आहे.

आलिंगन मूर्त व चेतन वस्तूला दिले जाते. येथे वारा ह्या अचेतन व अमूर्त वस्तूला आलिंगन देणे शक्य असल्याचे वर्णन केलेले आहे. म्हणजेच अमूर्ताला मूर्ताचे रूप बहाल केले आहे. म्हणून येथे अन्यधर्मारोप आहे.

(५) वरील प्रसंगातील आपले भाषण चालू ठेवताना दुष्यंत म्हणतो :

एषा मे मनोरथप्रियतमा सकुसुमास्तरणं शिलापट्टमधिशयाना सखीभ्यामन्वास्यते । (५३-५४)

अर्थात -- ही माझी अत्यंत प्रिय अभिलाषा फुलांनी अंथरलेल्या दगडी पाटावर पहुडलेली असून दोन मैत्रिणी हिची शुश्रूषा करीत आहेत.

वस्तुतः शकुंतला मूर्त व सचेतन आहे. अभिलाषा अमूर्त व अचेतन असते. पण येथे मूर्त व सचेतन शकुंतलेवर अमूर्त व अचेतन अभिलाषेचा आरोप केला आहे. म्हणजे येथील वर्णनाचा प्रकार ह्या अगोदरच्या उदाहरणांतील वर्णनांच्या प्रकाराच्या उलटा आहे. म्हणूनच येथे अन्यधर्मारोप झाला आहे. ह्या शैली-उपायाला विपरीतता असे जे दुसरे नाव आहे, ते ह्या उदाहरणात सार्थ झाले आहे.

(६) शकुंतला कामबाधेने कृश होत चाललेली पाहून तिच्या मैत्रिणी तिला तिच्या मनोव्यथेचे कारण सांगण्याचा आग्रह धरून बसतात; 'तू आपले दुःख मन मोकळे करून आम्हांला सांग, म्हणजे ते थोडे हलके होईल', असे जिव्हाळ्याने सुचवतात. त्यावरील दुष्यंताची प्रतिक्रिया अशी :

पृष्टा जनेन समदुःखसुखेन बाला । नेयं न वक्ष्यति मनोगतमाधिहेतुम् ।
दृष्टो विवृत्य बहुशोऽप्यनया सतृष्ण -। मत्रान्तरे श्रवणकातरतां गतोऽस्मि ॥ (५७)

अर्थात -- ह्या युवतीला तिच्या सुखदुःखांशी समरस झालेल्या व्यक्तींनी विचारले आहे. (त्यामुळे) ती आपल्या मनातील व्यथेचे कारण सांगणार नाही असे नाही (म्हणजेच निश्चितपणे सांगेल / सांगेलच सांगेल). जरी तिने अनेकदा मागे (वळून)वळून माझ्याकडे अभिलाषेने पाहिले असले तरी ह्या घटकेस माझा कान भयव्याकुळ झाला आहे.

वास्तविकपणे राजाचे मन कातर झाले आहे. मन म्हणजे हृदय हेही एक इंद्रिय आहे आणि श्रवण म्हणजे कान हेही एक इंद्रिय आहे. पण प्रस्तुत वर्णनात कान कातर झाल्याचे म्हटले आहे. म्हणजेच हृदय या इंद्रियाची अनुभूती कान ह्या दुसऱ्या इंद्रियाला येत असल्याचे वर्णन केले आहे. म्हणून येथे अन्यधर्मारोप झाला आहे.

ह्या श्लोकातील पहिल्या चरणात 'जनेन' ह्या विशेष्याला 'समदु:खसुखेन' हे समर्पक विशेषण लावले आहे. यात शब्दविवेक (choice of proper word) हा शैली-उपाय आहे. दुसऱ्या चरणात दोन 'न'कार वापरून अभिप्रेत अर्थ दृढ केला आहे, यात नकार हा शैली-उपाय आहे. तिसऱ्या चरणात बहुश: व सतृष्णं ही क्रमश: भूयस्त्व व भावोत्कटता यांची बोधक समुचित अव्यये वापरलेली आहेत, तीही शब्दविवेकाचीच उदाहरणे आहेत आणि चवथ्या चरणात वर दर्शवल्याप्रमाणे अन्यधर्मारोप आहे. अशा प्रकारे एकाच श्लोकात अनेक शैली-उपायांचा वापर केलेला आहे [मागील ३.५.४ पाहा].

(७) प्रियंवदा व अनसूया यांना शकुंतलेच्या कामबाधेची तीव्रता व असह्यता जाणवते. अधिक वेळ दवडला तर शकुंतलेची पार दुरवस्था होईल, अशी धास्ती तिच्या मैत्रिणींना वाटते. म्हणून त्या दोघीजणी शकुंतलेचे तिच्या योग्य वरपसंतीबद्दल अभिनंदन करण्याचे ठरवितात. तेव्हा त्या दोघी व राजा अशी तिघंही उत्तरगर्भ प्रश्नांद्वारे शकुंतलेच्या या सत्कृतीबद्दल आनंद व्यक्त करतात. त्यांपैकी राजाचा प्रश्न वैशिष्ट्यपूर्ण आहे, तो असा :

राजा -- किमत्र चित्रं यदि विशाखे शशाङ्कलेखामनुवर्तेते । (५९)

अर्थात -- जर विशाखा ह्या नक्षत्रांनी चंद्रकलेचे अनुसरण केले तर त्यात काय नवल आहे ?

विशाखा ही दोन नक्षत्रे आहेत. ती अचेतन आहेत. शशांकलेखा म्हणजे चंद्राची कोर, तीही अचेतन आहे. पण विशाखानक्षत्रे चंद्रकोरीच्या मागेमागे जातात (जणू तिचा अनुनय करतात). तद्वत अनसूया व प्रियंवदा ह्या दोन सचेतन युवती शकुंतला ह्या आपल्या सचेतन मैत्रिणीच्या कलाचे (=मन:प्रवृत्तीचे) अनुसरण करतात; तिचे मन जपतात. येथे सचेतन मैत्रिणींवर अचेतन विशाखांचा आरोप केला आहे. येथील अन्यधर्मारोप स्पष्ट आहे. मैत्रिणी शकुंतलेचे अभिनंदन करतात, तर राजा मैत्रिणींच्या त्या कृतीची प्रशंसा करतो.

(८) कामदेव आपल्याला रात्रंदिवस पोळत आहे, अशी आपली प्रेमविव्हल स्थिती शकुंतला प्रेमपत्रात व्यक्त करते. ते पत्र ती अनसूया व प्रियंवदा यांना वाचून दाखवते. तेव्हा झाडाआड लपून बसलेला राजा एकदम प्रकट होऊन एका श्लोकाद्वारे शकुंतलेच्या प्रीतीला प्रतिसाद देतो. त्याला बघितल्याबरोबर अनसूया व प्रियंवदा यांची जी प्रसन्न प्रतिक्रिया होते ती कालिदासाने पुढील शब्दांत वर्णिली आहे.

सख्यौ -- (विलोक्य सहर्षमुत्थाय) स्वागतमविलम्बिनो मनोरथस्य । (६३)

अर्थात -- (पाहून आनंदाने उभ्या राहून) उशीर न करणाऱ्या मनोरथाचे स्वागत असो.

मनोरथ हा वस्तुत: अमूर्त आहे. पण अमूर्त मनोरथ म्हणजेच समूर्त दुष्यंत, असा आरोप करून त्या दोघींनी मनोरथाचे स्वागत केले आहे.

(९) संदर्भ वरील प्रसंगाचाच आहे. राजाला पाहून शकुंतलाही उठून उभी राहण्याच्या प्रयत्नात असते. तेव्हा राजा तिला उठण्याचे कष्ट न घेण्याची विनंती करतो आणि अनसूयेच्या सूचनेनुसार एका दगडावर बसतो. शकुंतला लाजेने चूर होऊन उभीच राहाते. प्रियंवदा राजाला उद्देशून बोलते.

प्रियंवदा -- द्वयोरपि युवयोरन्योन्यानुराग: प्रत्यक्ष: । सखीस्नेह: पुनर्मां पुनरुक्तवादिनीं करोति । (६३)

अर्थात -- तुमचे दोघांचे एकमेकांवर प्रेम आहे हे (आता) उघड (झाले) आहे (म्हणजे लपून राहिलेले नाही). परंतु, मैत्रिणीवरील माझे प्रेम मला अनावश्यक असे (काही) बोलण्यास भाग पाडीत आहे.

सखीस्नेह हा अमूर्त भाव एखाद्या मूर्त मनुष्यासारखे कार्य करीत असल्याचे हे वर्णन अन्यधर्मारोपात मोडते.

(१०) शकुंतला आज पतिगृही जाणार ह्या कल्पनेने काश्यप कमालीचे व्याकुळ होतात. त्यांचा गळा दाटून येतो आणि नजर काळजीने 'लुळी' बनते. त्यांच्याकडे पाहून गौतमी शकुंतलेला समुचित शिष्टाचाराचे पालन करण्यास सुचवते.

गौतमी -- जाते, एष ते आनन्दपरिवाहिणा चक्षुषा परिष्वजमान इव गुरुरुपस्थित: । आचारं तावत् प्रतिपद्यस्व । (८७)

अर्थात -- बाळे, आनंदाने ओसंडून वाहणाऱ्या डोळ्यांनी तुला जणू आलिंगन देणारे (तुझे) हे वडील उपस्थित झाले आहेत. शिष्टाचारास धरून त्यांना वंदन कर.

मनुष्य बाहूंनी आलिंगन देतो. पण कवीने येथे काश्यप 'आनंदाने ओसंडणाऱ्या नजरेने' आलिंगन देत आहेत अशी कल्पना केली आहे.

म्हणजेच एका इंद्रियाच्या कार्याचा दुसऱ्या इंद्रियाच्या कार्यावर अध्यारोप केला आहे. म्हणून येथे अन्यधर्मारोप आहे.

या शैली-उपायाची अन्य उदाहरणे विचक्षण वाचकांनी शोधून काढावीत.

[३.८] अलंकार

आपले नेहमीचे बोलणे साधे व रंगहीन असते. परंतु, तरीदेखील आपल्याला कधीकधी नेहमीची चाकोरी सोडून बोलावेसे वाटते. अशा प्रसंगी आपण 'तो पहा, कसा हत्तीसारखा हलतडुलत चालला आहे', 'तिचे डोळे म्हणजे टपोरी जांभळेच', 'तो हरणाहून चपळ आहे बरं', अशा शब्दसंहती वापरून जातो. ह्यांत नेहमीची बोलण्याची रीत बाजूला सारलेली असते. तरीही, किंबहुना त्यामुळेच, हे बोलणे अधिक जिवंत व 'डोळ्यांना दिसणारे' बनते. ह्यालाच आलंकारिक भाषा असे आपण म्हणतो. अशा भाषाप्रयोगांत शब्दांचे वाच्यार्थ (=शब्दश:

अर्थ) घ्यावयाचे नसतात तरीदेखील असे भाषाप्रयोग अर्थ अचूकपणे, प्रभावीपणे[३१] व परिणामकारकपणे[३२] व्यक्त करून वर वाचकाला आनंद देतात.

क्रुइझर आणि कोगन ह्या लेखकांनी आलंकारिक भाषा वर्ण्य विषय परिणामकारकपणे अभिव्यक्त का करते त्याची पुढील तीन कारणे सांगितली आहेत : ह्या भाषेत दोन वस्तूंची परस्परांशी तुलना करून त्यांतील रमणीय व सूक्ष्म साम्य निदर्शनास आणलेले असते; शब्दांचा अत्यंत नावीन्यपूर्ण व विस्मित करणाऱ्या पद्धतीने वापर केलेला असतो; आणि ही भाषा कवीच्या सर्जनशील शक्तीचा आविष्कार असते व म्हणून नेहमीच आल्हाददायक असते.[३३])

बेकर नावाच्या अलंकार-विश्लेषकाने अलंकारांच्या कार्यांनुसार त्यांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण केले आहे : प्रचलित म्हणी व वाक्प्रचार नव्या संदर्भाला लागू करणे; समानार्थक शब्द वापरून कल्पना-विचारांवर जोर देणे, वाक्य मध्येच थांबवून वाचकाचे कुतूहल चाळवणे, विरोधाभास साधणे; अविश्वसनीय विधान करणे, ऊनोक्ती उच्चारणे; वाक्याच्या पूर्वार्धातील शब्दरचना उत्तरार्धात एकदम उलटी करणे, परस्परविरुद्ध गुणधर्म एकत्र आणणे, प्रत्येक वाक्याच्या सुरुवातीस तोच शब्द वापरून अशा अनेक वाक्यांद्वारे एखाद्या कल्पनेचा प्रकर्ष प्रकट करणे, अचेतन किंवा मानवेतर वस्तूंच्या ठायी मानवी गुण, भावना इत्यादी असल्याचे वर्णन करणे आणि संकीर्ण (म्हणजे ज्यात कोणत्याही प्रकारच्या अलंकारांचा समावेश होऊ शकतो.)[३४]

ज्याअर्थी बेकरला 'संकीर्ण' असा अनिश्चित स्वरूपाचा व समावेशक वर्ग मानावा लागला आहे, त्याअर्थी तात्त्विक दृष्ट्या अलंकार असंख्य आहेत आणि त्यांचे पद्धतशीर पृथक्करण करू असे म्हणण्यात काही अर्थ नाही, असे विंटरौड[३५] ने सयुक्तिकपणे म्हटले आहे.

गद्य निरलंकृत असू शकते; एखादी दीर्घ कथा एकाही अलंकाराचा प्रयोग न करता सांगता येते, उलट काव्याला अलंकार नितान्त आवश्यक असतात, असा मार्जोरी बोल्टन [३६] यांचा युक्तिवाद आहे. तो कोहेन[३७], क्रुइझर व कोगन ह्या विचारवंतांना मान्य नाही. त्यांच्या मते अलंकार काव्याला जितके आवश्यक असतात तितकेच गद्यालाही आवश्यक असतात. क्रुइझर व कोगन ह्यांनी ह्याबाबतीत पुढीलप्रमाणे नि:संदिग्ध व मननीय विधाने केली आहेत :

"Like rhythm and imagery, figurative language might be thought to be the province of poetry rather than prose. But it does have its place in prose : it can make the difference between dull, lifeless prose and sparkling, imaginative prose; between prose that only partially communicates and prose that communicates exactly, efficiently and effectively."[३८]

तात्पर्य, अलंकारांना गद्यातही स्थान असते. निरलंकृत गद्य मंद, निर्जीव व कळाहीन असते, तर सालंकृत गद्य सजीव, तजेलदार व कल्पनासमृद्ध असते; त्याच्या द्वारे आशय अचूकपणे, समर्थपणे आणि परिणामकारकपणे व्यक्त होतो. ही रास्त भूमिका मान्य करून

खाली वेगवेगळ्या अलंकारांची उदाहरणे उद्‌धृत करताना गद्य-उतारेही उद्‌धृत केले आहेत. आता अर्धोक्ती, उपमा, प्रतीक, मानुषीकरण, रूपक, विरुद्धोक्ती व संकीर्ण हे अलंकार ह्याच क्रमाने विचारात घेऊ.

[३.८.१] अर्धोक्ती

एखादे वाक्य उच्चारावयास सुरुवात करावयाची आणि त्यातील काही शब्द उच्चारल्यानंतर अचानकपणे थांबावयाचे. असे केल्याने उरलेले शब्द किंवा उरलेला वाक्यांश ऐकण्याची श्रोत्याची उत्सुकता चाळवली जाते. ती तशीच अतृप्त ठेवावयाची व त्याला अनुक्त वाक्यांशाविषयी अनुमान करण्याच्या स्थितीत ठेवावयाचे. अशी अर्धोक्ती ऐकणाऱ्याच्या कुतूहलाचा प्रकर्ष साधणारी ठरते. शेरिडन बेकरने अशा उक्तीचे प्रकार्य intensifying असते असे म्हटले आहे. आता ह्या दृष्टीने शाकुन्तलाची पाहणी करू.

(१) राजा -- अवसरोऽयमात्मानं प्रकाशयितुम् । न भेतव्यं न भेतव्यं (इत्यर्धोक्ते) (१७)

अर्थात -- स्वत:ला प्रकट करण्याची (म्हणजेच प्रकट होण्यास) ही (नामी) संधी आहे, भिऊ नये, भिऊ नये (एवढे बोलून थांबतो).

(२) अनसूया -- ततो वसन्तावतारसमये तस्या उन्मादयितृकं रूपं प्रेक्ष्य (अर्धोक्ते ऽज्जया विरमति ।) (२२)

अर्थात -- त्यानंतर वसंत ऋतूच्या दिवसांत तिचे उन्मादक लावण्य बघून (अर्धेच बोलून लाज वाटल्याने गप्प बसते).

(३) शकुन्तला -- सखि, यत:प्रभृति मम दर्शनपथमागत: स तपोवनरक्षिता राजर्षि: - (अर्धोक्तेन लज्जां नाटयति) (५७)

अर्थात -- मैत्रिणी, जेव्हापासून तपोवनाचे संरक्षण करणारा तो राजर्षी माझ्या दृष्टिपथात आला आहे (ना) - (अर्धेच बोलून लज्जेचा अभिनय करते).

(४) श्याल: -- सूचक, कथयतु सर्वमनुक्रमेण । मैनमन्तरा प्रतिबधान । (१२७)

अर्थात -- अरे सूचका, त्याला सगळे क्रमाक्रमाने सांगू दे. मध्येच बोलून (म्हणजे त्याला अर्धेच बोलू देऊन) त्याच्या बोलण्यात व्यत्यय आणू नकोस.

(५) शकुन्तला -- जयतु जयतु - (अर्धोक्ते बाष्पकण्ठी विरमति ।) (१८६)

अर्थात -- विजय असो, विजय असो - (एवढेच अर्धवट बोलून गहिवर आल्यामुळे बोलण्याचे थांबते).

[३.८.२] उपमा

आपण आपल्या नित्याच्या बोलण्या-लिहिण्यात 'कागदाचा रंग चुन्यासारखा पांढरा

आहे', 'वानर मनुष्याप्रमाणे दोन पायांवर उभे राहते', इत्यादी विधानांत जी एका वस्तूची दुसऱ्या वस्तूशी तुलना करतो, तिला literal comparison असे म्हणतात. पण 'गुळगुळीत दाढी केल्यानंतर त्याची तुळतुळीत हनुवटी नारिंगासारखी दिसू लागली', अशा वाक्यात जे साम्य वर्णिलेले असते ते वास्तविक नसते तर ते बोलणाऱ्याच्या मनातील असते. ("The resemblance is in writer's mind, not in the nature of the things compared"[३९]) अशा तुलनांना imaginative comparisons म्हणतात. ह्याच उपमा होत. उपमेच्या दोन उल्लेखनीय व्याख्या उद्धृत करून समजून घेऊ.

(१) 'A simile expresses a comparison between two unlike things which have one or more points in common.'[४०].

(२) 'Simile is a figure of speech which makes a direct comparison between two elements and which is usually introduced by like or as.'[४१]

अर्थात जेव्हा दोन विसदृश वस्तूंमध्ये काही बाबतींत सादृश्य असते तेव्हा त्यांच्या तुलनेचे जे विधान केलेले असते, त्याला उपमा म्हणतात. ती सारखा, सदृश, प्रमाणे इत्यादी शब्दांद्वारे व्यक्त केलेली असते. दण्डी नामक प्राचीन भारतीय काव्यशास्त्रकाराने इव, वत्, वा, यथा, निभ इत्यादी ६६ सादृश्यसूचके सांगितली आहेत.[४२]

कोणत्याही ग्राह्य उपमेतील साम्य सौंदर्यपोषक असले पाहिजे आणि ते मोजक्या शब्दांत व 'डोळ्यांना जाणवेल' अशा पद्धतीने व्यक्त झालेले असले पाहिजे. अशी उपमा, शेकडो शब्दांना जे साधत नाही ते ती एकटी साधून जाते, असे बॉवडेनचे अभिमत आहे.[४३]

शाकुन्तलात सुमारे सत्तर उपमा आहेत. कालिदास हा 'उपमापति' म्हणून प्रसिद्ध आहे ('उपमा कालिदासस्य----' ही उक्ती सर्वविदित आहे). त्यामुळे उपमांची चर्चेसाठी निवड करताना मनाचा गोंधळ उडतो. पण स्थलमर्यादेचे बंधन पाळावयाचे असल्यामुळे पाच गद्य व पाच पद्यबद्ध उपमांची चर्चा करू.

(१) प्रियंवदा -- यावत् त्वयोपगतया लतासनाथ इवायं केसरवृक्षक: प्रतिभाति। (१३)

अर्थात -- तू जवळ असलीस की हा बकुलवृक्ष लतेने युक्त असल्याप्रमाणे दिसतो.

(२) (नेपथ्ये) - - ... तुरगखुरहतस्तथा हि रेणु -

विटपविषक्तजलार्द्रवल्कलेषु ।

पतति परिणतारुणप्रकाश:

शलभसमूह इवाश्रमद्रुमेषु ॥ (२७)

अर्थात -- घोड्याच्या खुरांनी उडवलेली आणि प्रात:कालीन संधिकाळाच्या रंगाची धूळ आश्रमातील झाडांवर टांगून ठेवलेल्या ओल्या वल्कलांवर

टोळांच्या थव्याप्रमाणे (=मोठ्या प्रमाणावर) पडत आहे. टोळधाड ज्याप्रमाणे पिकांचा नाश करते त्याप्रमाणे धूळ वल्कले खराब करीत आहे.

(३) राजा -- मम हि
गच्छति पुर: शरीरं धावति पश्चादसंस्थितं चेत: ।
चीनांशुकमिव केतो: प्रतिवातं नीयमानस्य । (२९)

(पिसाळलेल्या हत्तीचा वृत्तांत ऐकून शकुंतला व तिच्या मैत्रिणी भयभीत होऊन, राजाची संमती मिळवून, झोपडीकडे निघून जातात. राजा एकटाच आश्रमाच्या परिसरात उभा असतो. तो आश्रमाजवळच तळ ठोकतो आणि शकुंतलेसंबंधीच चिंतन करीत वरील उद्गार काढतो.)

अर्थात -- जसे ध्वजाचे तलम रेशमी वस्त्र वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने नेले जात असताना फडफडते तसे माझे शरीर पुढेपुढे चालले आहे (खरे, पण) मन (शकुंतलेच्या) मागेमागे/पाठीमागे धावत आहे.

(४) विदूषक: -- (विहस्य) यथा कस्यापि पिण्डखर्जूरैरुद्वेजितस्य तिन्तिण्यामभिलाषो भवेत्, तथा स्त्रीरत्नपरिभोगिणो भवत इयमभ्यर्थना । (४०)

(मेनकेपासून झालेल्या शकुंतलेवर आपले मन जडले आहे, असे जेव्हा राजा विदूषकाला सांगतो तेव्हा विदूषक हसून म्हणतो -)

अर्थात -- ज्याप्रमाणे (उत्तमातला) उत्तम खजूर खाणाऱ्या एखाद्याला त्या खजुराचा वीट येऊन चिंच खावीशी वाटू लागते त्याप्रमाणे श्रेष्ठ सुंदरींचा उपभोग घेणाऱ्या तुझी ही अभिलाषा आहे.

(५) विदूषक: -- यद् भवानाज्ञापयति। (उत्थाय) भो वयस्य, गृहीतस्य तया परकीयैर्हस्तै: शिखण्डके ताड्यमानस्याप्सरसा वीतरागस्य इव नास्तीदानीं मे मोक्ष: । (१०२) /

अर्थात -- एखाद्या अप्सरेने एखाद्या विरक्त तपस्व्याला धरून ठोकून काढावयास सुरुवात केली की जशी (त्याची तिच्या तावडीतून सुटका होत नाही) तशीच हंसपदिकेने इतर जणींच्या हातांनी माझी शेंडी धरून मला बडवावयास सुरुवात केली की, माझी सुटका होणार नाही.

(६) कञ्चुकी -- भानु: सकृद् युक्ततुरङ्ग एव
रात्रिंदिवं गन्धवह: प्रयाति ।
शेष: सदैवाहितभूमिभार:
षष्ठांशवृत्तेरपि धर्म एष: ॥ (१०४)

(राजा धर्मकार्याची कधीच टाळाटाळ करीत नाही. पण तो न्यायालयातून नुकताच परतला आहे. त्यामुळे कण्वशिष्य आलेले असल्याची वर्दी देण्यास कंचुकीचे मन धजावत नाही. किंवा ज्याच्या हाती राज्यकारभाराची सूत्रे असतात त्याला विश्रांती घेण्याची मुभाच नसते. कशावरून ?)

अर्थात -- सूर्याने आपल्या रथाला एकदा घोडे जोडले ते (कायमचे) जोडले. वारा रात्रंदिवस (न खळता) वाहात राहतो. (ब्रह्मदेवाच्या विनंतीला मान देऊन) शेषाने पृथ्वीचा भार आपल्या माथ्यावर घेण्याचे कार्य पत्करले ते कायमचे. राजाचे कर्तव्यही ह्याप्रमाणेच आहे. ते त्याला सूर्य, वारा व शेष यांच्याप्रमाणे निरंतर कार्यमग्न ठेवते. राजाची ह्या त्रयीशी केलेली तुलना योग्य आहे.

(७) शकुन्तला -- क इदानीमन्यो धर्मकञ्चुकप्रवेशिनस् तृणच्छन्नकूपोपमस्य तवानुकृतिं प्रतिपत्स्यते । (११९)

अर्थात -- धर्माच्या वेषात प्रवेश केलेला तू गवताने झाकलेल्या विहिरीसारखा आहेस. अशा विहिरीवरून अजाणता चालणारा खड्ड्यात पडणार. तद्वत तुझे अनुकरण करणारा दुसऱ्याचा सर्वनाश करणार !

(८) राजा -- भोस्तपस्विन्, किमत्रभवतीं विप्रलभसे ।

कुमुदान्येव शशाङ्कः सविता बोधयति पङ्कजान्येव ।
वशिनां हि परपरिग्रहसंश्लेषपराङ्मुखी वृत्तिः ॥ (१२२)

अर्थात -- अहो संन्यासीबाबा, ह्या बाईसाहेबांना का फसवताहात ? पाहा - चंद्र फक्त कुमुदे उमलवितो (तो पंकजांना स्पर्श करीत नाही), तर सूर्य फक्त पंकजे फुलवतो (तो कुमुदांना स्पर्श करीत नाही). तद्वत संयमी माणसाची वृत्ती दुसऱ्याच्या पत्नीला आलिंगन देण्यापासून दूर असते.

(९) विदूषकः -- अहं येनेष्टिपशुमारं मारितः सोऽनेन स्वागतेनाभिनन्द्यते । (१६५)

अर्थात -- यज्ञीय पशूला जसे बुक्क्यांनी मारतात तसे त्याने मला बुकलले, तरी तू त्याचे स्वागतपूर्वक अभिनंदन करीत आहेस.

(१०) राजा -- .... । तथा ह्यस्य

प्रलोभ्यवस्तुप्रणयप्रसारितो । विभाति जालग्रथिताङ्गुलिः करः ।
अलक्ष्यपत्रान्तरमिध्दरागया । नवोषसा भिन्नमिवैकपङ्कजम् ॥ (१७८)

अर्थात -- सर्वदमनाने खेळणे घेण्यासाठी तळहात पसरला असता त्याची बोटे इतकी जुळलेली होती की, त्यांतील फटी दिसत नव्हत्या. तो हात

उष:कालाने उमलवलेल्या आणि ज्याच्या पाकळ्यांतील अंतर दिसत नव्हते (म्हणजेच ज्याच्या पाकळ्या एकमेकांना भिडलेल्या होत्या) अशा लाल रंगाच्या एकमेव कमळाप्रमाणे दिसत होता.

वरीलपैकी प्रत्येक उपमा आपापल्या परीनें वैशिष्ट्यपूर्ण आहे. कोठे ग्रामीण वातावरणाचा मनावर ठसा उमटतो, तर कोठे संबंधित पात्राची मन:स्थिती जाणवते, तर कोठे वक्त्याचा हेतू / रोख लक्षात येतो, तर कोठे संबंधित पात्राच्या स्वभावावर प्रकाशकिरण पडतो, तर कोठे संबंधित व्यक्तीच्या कर्तव्यकठोरतेची जाणीव मनावर कोरली जाते, तर कोठे नैसर्गिक सत्य प्रतीत होते, तर कोठे कवीच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीला दाद द्यावीशी वाटते. दोन-तीन उपमा तर कमालीच्या चित्रदर्शी आहेत.

[३.८.३] प्रतीक

अदृश्य अशा कशाचे तरी जे दृश्य असे चिह्न असते त्याला प्रतीक म्हणतात. उदाहरणार्थ, सिंह धैर्याचे प्रतीक मानला जातो. शाकुंतल नाटकात राजाचे नाव कोरलेली रत्नजडित आंगठी हे दुष्यंत व शकुंतला यांच्या उत्कट प्रेमाचे चिन्ह आहे. दुष्यंत शकुंतलेच्या प्रथमदर्शनी प्रेमात पडतो. तिला प्रियंवदेच्या ऋणातून मुक्त करण्यासाठी आपली नाममुद्रा देऊ करतो (२६). तिच्यावरील राजाच्या नावाची अक्षरे वाचून प्रियंवदा शकुंतलेला ऋणमुक्त करते (तत्रैव). पुढे राजाचा शकुंतलेशी गांधर्वविवाह होतो. तो काही दिवस आश्रमात राहातो आणि राजधानीकडे परतण्यास निघताना शकुंतलेच्या बोटात ती आंगठी घालतो (१४६). शकुंतला ती आंगठी बोटात घालून राजधानीकडे यावयास निघते, तेव्हा वाटेत शचीतीर्थाला वंदन करताना ती आंगठी तिच्या बोटातून निसटते व गंगाप्रवाहात पडते (१४७). ती एका मच्छीमाराला मिळते आणि ती बहुमूल्य आंगठी विकण्यासाठी म्हणून तो सराफकट्ट्यावर गेलेला असता राजसेवकांकडून पकडला जातो (१२८). सेवक जेव्हा राजाला ती आंगठी दाखवतात तेव्हा राजाला शकुंतलेशी आपण विवाह केल्याचे, तिच्या सहवासात आश्रमात काही दिवस घालवल्याचे व तिच्याशी समागम केल्याचे सर्व आठवते (१३१) आणि शकुंतला राजदरबारात ऐनवेळी आंगठी न दाखवू शकल्यामुळे आपण तिला झिडकारले ह्याबद्दल त्याला पश्चात्ताप वाटू लागतो. ह्या अपराधाबद्दल तो शकुंतलेच्या पाया पडतो (१८७). दुर्वासाच्या शापामुळे त्याला शकुंतलेचा विसर पडलेला असतो, पण त्याच्याच उ:शापामुळे खुणेची आंगठी पाहिल्यावर त्याला शकुंतलेशी झालेल्या विवाहाची व इतर सर्व घटनांची आठवण होते. तसा खुलासा तो शकुंतलेपाशी करतो (१८८). अशाप्रकारे शकुंतला व दुष्यंत यांचा पहिला संयोग आंगठीमुळेच होतो, त्यांचा वियोगही ती हरवल्यामुळे होतो आणि पुनर्मिलनही ती सापडल्यामुळे होते. एकंदरीने आंगठी हे प्रतीक दुष्यंत व शकुंतला या दोघांच्या जीवनात बरीच उलथापालथ घडवून आणते आणि त्यांच्या सुखदु:खांस कारणीभूत होते.

शाकुंतल नाटकात ह्या आंगठीचा उल्लेख एकूण पंधरा ठिकाणी आला आहे. त्यांपैकी

निवडक भावपूर्ण स्थळे खाली उद्धृत केली आहेत.

(१) प्रियंवदा -- तेन हि नार्हत्येतदङ्गुलीयकमङ्गुलीवियोगम् । (२६)
अर्थात -- तर मग ह्या आंगठीचा बोटापासून वियोग होणे योग्य नाही.

(२) शकुन्तला -- हा धिक् हा धिक् । अङ्गुलीयकशून्या मेऽङ्गुलिः । (११७)
अर्थात -- घात झाला, घात झाला ! माझे बोट आंगठी-विरहित आहे.

(३) रक्षिणौ -- अरे कुम्भीरक, कथय कुत्र त्वयैतन्मणिबन्धनोत्कीर्णनामधेयं राजकीयमङ्गुलीयकं समासादितम् । (१२६)
अर्थात -- अरे चोरा, जिच्यावर राजाचे नाव कोरलेले आहे अशी ही राजाची रत्नजडित आंगठी तू कोठून मिळवलीस ते सांग.

(४) श्यालः -- ... तस्य दर्शनेन भर्तुरभिमतो जनः स्मारितः । (१३१)
अर्थात -- आंगठीतील रत्नाने महाराजांना प्रिय व्यक्तीची आठवण करून दिली.

(५) शकुन्तला -- आर्यपुत्र, एतत् तदङ्गुलीयकम् । (१८८)
अर्थात -- महाराज, ही(च) ती आंगठी (जिने एवढा अनर्थ घडवला !)

(६) शकुन्तला -- विषमं कृतमनेन यत् तदार्यपुत्रस्य प्रत्यायनकाले दुर्लभमासीत् । (१८८)
अर्थात -- महाराजांची खात्री पटवण्याच्या वेळी ही दुर्लभ होती, त्यामुळे अनिष्ट घटना घडल्या.

(७) शकुन्तला -- अतः सखीभ्यां संदिष्टास्मि भर्तुरङ्गुलीयकं दर्शयितव्यमिति । (१९४)
अर्थात -- पतिराजांना आंगठी दाखव असे दोघी मैत्रिणींनी म्हणून सांगितले होते तर.

[३.८.४] मानुषीकरण

व्यावहारिक भाषेतील ज्या काही वाक्यरचना ललित साहित्यातही आढळतात त्यांमध्ये प्रस्तुत प्रकारच्या वाक्यरचनांचा समावेश होतो. मनुष्याच्या भोवती पसरलेल्या सृष्टीत सजीव, निर्जीव, मानवी, अमानवी, मूर्त व अमूर्त अशा सर्व प्रकारच्या वस्तू पसरलेल्या आहेत. प्रचंड पर्वत हलत नाहीत; नद्या वाहात असतात, पण बोलत नसतात; झाडांची पाने सळसळतात, पण गात नाहीत. वाऱ्याचे अस्तित्व जाणवते, पण तो प्रत्यक्षात दिसत नाही. आकाश प्रत्यक्षात दिसते (म्हणजे भासते), पण शास्त्रतः असत नाही. परंतु असे असले तरीही आपण आपल्या नित्याच्या भाषेत 'वारा जणू गुणगुणत आहे', 'झाडे काय कुजबुजत आहेत, नकळे', 'सृष्टी कशी न्हाऊन निघाली आहे', 'नदी कसले गीत गात आहे कुणास ठाऊक', 'पर्वत ताठ मानेने उभा आहे', अशी वाक्ये उच्चारतो. तसे करताना आपण निर्जीव वस्तूंवर किंवा मानवेतर वनस्पतींवर मानवी रूपाचे, गुणांचे वा स्वभावधर्मांचे अध्यारोप करतो; टर्नरने म्हटल्याप्रमाणे असे वाक्यप्रयोग 'belong to the very language of men.'[४४] ह्यांना इंग्रजीत Personification

किंवा Actualization असे म्हणतात. त्याच्यासाठी मराठीत मानुषीकरण हा शब्द रूढ आहे. त्याची व्याख्या अशी : "attribution of personal qualities : esp : representation of a thing or abstraction as a person or by the human form."[४५] आता शाकुंतलाकडे दृष्टी वळवू.

शाकुंतलात ह्या शैली-उपायाची चाळीसहून जास्त उदाहरणे आढळतात. शाकुंतलातील सर्वाधिक घटना कण्वाश्रमात किंवा निसर्गाच्या पार्श्वभूमीवर घडत असल्यामुळे असे होणे स्वाभाविक आहे. त्यातील निवडक दहा उदाहरणांचा परिचय करून घेऊ.

(१) शकुन्तला -- एष वातेरितपल्लवाङ्गुलीभिस् त्वरयतीव मां केसरवृक्षकः । यावदेनं सम्भावयामि । (१३)

अर्थात -- वाऱ्याने हलणाऱ्या आपल्या पर्णरूपी बोटांनी हा बकुलवृक्ष 'लवकर ये', असे मला खुणावीत आहे. तेव्हा त्याचा मान राखते.

(२) द्वितीयः -- ... । तत्रभवता वयमाज्ञप्ताः शकुन्तलाहेतोर्वनस्पतिभ्यः कुसुमान्याहरतेति । तत इदानीं
क्षौमं केनचिदिन्दुपाण्डुतरुणा माङ्गल्यमाविष्कृतं
निष्ठ्यूतश्चरणोपभोगसुलभो लाक्षारसः केनचित् ।
अन्येभ्यो वनदेवताकरतलैरापर्वभागोत्थितै -
र्दत्तान्याभरणानि नः किसलयोद्भेदप्रतिद्वन्द्विभिः । (८५)

अर्थात -- वनस्पतींकडून फुले घेऊन या, अशी गुरुदेवांनी आम्हांला आज्ञा केली. तेव्हा

एका वृक्षाने (आम्हांला) चंद्रासारखे शुभ्र रेशमी मंगलवस्त्र दिले. तर दुसऱ्याने पायाला लावण्यास योग्य असा अळिता उपलब्ध करून दिला. इतरांनी कोवळ्या पालवीसारखे दागिने, वनदेवतांच्या, मनगटांपर्यंत बाहेर आलेल्या, हातांनी दिले.

(३) गौतमी -- जाते, ज्ञातिजनस्निग्धाभिरनुज्ञातगमनासि तपोवनदेवताभिः । प्रणम भगवतीः । (९०)

अर्थात -- बेटा, नातलगांप्रमाणे स्नेहशील असणाऱ्या तपोवनदेवतांनी तुला (पतिगृही) जाण्याची परवानगी दिली आहे. देवतांना वंदन कर.

(४) शकुन्तला -- तात, लताभगिनीं वनज्योत्स्नां तावदामन्त्रयिष्ये (९१)

अर्थात -- बाबा, लताभगिनी वनज्योत्स्नेला अंमळ (भेटून तिचा) निरोप घेऊन येते.

(५) शकुन्तला -- वत्स, किं सहवासपरित्यागिनीं मामनुसरसि । अचिरप्रसूतया जनन्या विना विवर्धित एव । इदानीमपि मया विरहितं त्वां तातश्चिन्तयिष्यति । निवर्तस्व तावत् । (रुदती प्रस्थिता) (९३)

अर्थात -- बाळा, तुझी सोबत सोडून जाणाऱ्या माझ्या मागेमागे का येत आहेस ? तुझ्या जन्मानंतर लवकरच तुझी आई गेली. तेव्हापासून मी तुला आईवाचूनच वाढवले. आतासुद्धा माझ्या अनुपस्थितीत बाबा तुझी काळजी घेतील. म्हणून परत फीर. (रडत-रडत जाऊ लागते).

खुद्द शकुंतलेला तिच्या जन्मानंतर तिच्या आईने म्हणजे मेनकेने टाकले होते. म्हणजे ती स्वत:ही आईविना झाली होती. तात काश्यपांनी तिचा सांभाळ केला होता. स्वाभाविकपणे शकुंतलेला त्या मातृरहित मृगशावकाबद्दल जिव्हाळा वाटत होता. कारण दोघांची समान अवस्था होती. म्हणूनच ती त्या हरिणबालकाला परत जाण्यास कळवळून प्रवृत्त करीत आहे. ती त्याला आश्वासन देऊ इच्छिते की, जरी इत:पर तुझी काळजी घेण्यास मी येथे नसले तरी बाबा माझ्या इतक्याच जिव्हाळ्याने तुझी काळजी घेतील, तू निश्चिंत राहा. येथे मानव व निसर्ग यांची परमोच्च एकरूपता प्रतीत होते.

(६) शकुन्तला -- तत्क्षणं स मे पुत्रकृतको दीर्घापाङ्गो नाम मृगपोतक उपस्थित: । (११८)

अर्थात -- त्याचवेळी ज्याचे मी दीर्घापांग असे नामकरण केले होते ते माझे पुत्रवत हरीण (तेथे) उपस्थित झाले.

शाकुंतलातील (विशेषेकरून कण्वाश्रमातील) स्त्रीपुरुष इतके सहृदय आणि निसर्गाशी एकरूप झालेले आहेत की, ते आश्रमातील वनस्पती, प्राणी इत्यादींचीही (मनुष्यांची करतात त्याप्रमाणे) नामकरणे करतात.

(७) कञ्चुकी -- न किल श्रुतं युवाभ्यां यद्वासन्तिकैस्तरुभिरपि देवस्य शासनं प्रमाणीकृतं तदाश्रयिभि: पत्रिभिश्च । (१३५)

अर्थात -- वसंत ऋतूत बहरणाऱ्या वृक्षांनी व त्यांच्या आश्रयास राहणाऱ्या पक्ष्यांनीही महाराजांचा आदेश प्रमाण मानला आहे, हे तुम्ही खरेच ऐकलेले नाही काय ?

(८) राजा -- कथं नु तं बन्धुरकोमलाङ्गुलिं । करं विहायासि निमग्नमम्भसि ।

अथ वा

अचेतनं नाम गुणं न लक्षये - । न्मयैव कस्मादवधीरिता प्रिया ॥ (१४८)

अर्थात -- सुंदर व सुकुमार बोटांच्या त्या हातापासून दूर होऊन पाण्यात खोलवर बुडालीस हे कसे घडले ? अथवा, अचेतन वस्तूच्या लक्षात गुण येणार नाहीत, हे मी मान्य करतो. पण मी (सचेतन असूनही) आपल्या प्रियेला का म्हणून झिडकारले ?

(९) राजा -- युज्यते। अपि भोः कुसुमलताप्रियातिथे, किमत्र परिपतनखेदमनुभवसि।
एषा कुसुमनिषण्णा तृषितापि सती भवन्तमनुरक्ता।
प्रतिपालयति मधुकरी न खलु मधु विना त्वया पिबति ॥ (१५४)

अर्थात -- बरोबर आहे. अरे, बहरलेल्या लतांच्या प्रिय पाहुण्या ! तू येथे घोटाळण्याचे कष्ट का घेत आहेस ?
ही फुलावर बसलेली व तुझ्यावर अनुरक्त असलेली (भुंग्याची) मादी तहानलेली असूनही तुझी वाट पाहत आहे. खरेच, ती तुझ्यावाचून मध पीत नाही.

(१०) प्रथमा -- अविनीत, किं नोऽपत्यनिर्विशेषाणि सत्त्वानि विप्रकरोषि। (१७७)

अर्थात -- अरे धटिंगणा, आम्ही ज्यांच्यावर अपत्यवत प्रेम करीत आहोत त्या प्राण्यांना तू असा का छळत आहेस ?

[३.८.५] रूपक

रूपक हे मानवी स्वभावात व म्हणून भाषेत रुजलेले आहे. अश्रूंची फुले, हास्याचे फवारे, शब्दांचे बुडबुडे, नदीचे मुख, डोंगराचा माथा, खुर्चीचा हात, बटाट्याचा डोळा, लग्नाचा बाजार इत्यादी सर्व शब्दप्रयोग रूपकात्मक आहेत. आपण असे शब्दप्रयोग सर्रास करीत असतो, पण ही रूपके आहेत, हे आपणास अतिपरिचयामुळे जाणवत नसते. रूपक उपमामूलकच असते, फक्त रूपकात उपमेतल्याप्रमाणे सादृश्यवाचक शब्द नसतात ('Simile is the starting place or origin of metaphor. The step from one to the other is a short one. Metaphor gets rid of the sign''[४६]). 'मुखं कमलं इव कमनीयं अस्ति।' ही उपमा (कारण हिच्यात 'इव' हा सादृश्यवाचक शब्द आहे). तर 'अहो, कमनीयं मुखकमलम्।' हे रूपक (कारण त्यात इव नाही). अर्थात उपमेतल्याप्रमाणेच रूपकातील साम्याची अनुभूती काल्पनिक असते, हे वेगळे सांगावयास नकोच.

केनेथ बर्कने पुढील चित्तवेधक शब्दांत रूपकाची व्याख्या केली आहे :

'Metaphor is a device for seeing something in terms of something else. It brings out the thisness of a that, or the thatness of a this.''[४७]

ब्रूक्स आणि वॉरेन ह्यांनी अतिशय वक्तृत्वपूर्ण शब्दांत रूपकाची व्याख्या केली आहे, ती अशी : ''Metaphors are new namings which seize upon the thing and interpret it lovingly, reverently, contemptuously, mockingly, coldly or warmly as the skillful author may desire.''[४८]

रूपकात होणारा दोन दृश्यांचा आभास, रूपकातील घटक, रूपकाचे चार प्रकार, रूपक व गद्य यांचे अन्योन्यसंबंध इत्यादी मुद्यांच्या विवरणासाठी जिज्ञासूंनी प्रस्तुत लेखकाचे 'ललितलेखन व शैली' हे पुस्तक अवलोकावे.[४९]

शाकुंतलात मोजकीच रूपके आहेत, त्यामुळे त्या सर्वांचा परिचय करून घेऊ.

(१) वैखानसः -- सदृशमेतत् पुरुवंशप्रदीपस्य भवतः। (७)

अर्थात -- आपणास, पुरुवंशाच्या देदीप्यमान दीपकास, हे साजेसे(च) आहे.

(२) शकुन्तला -- एष वातेरितपल्लवाङ्गुलीभिस्त्वरयतीव मां केसरवृक्षकः। (१३)

अर्थात -- हा बकुळवृक्ष वाऱ्याने हलणाऱ्या पर्णरूप बोटांनी मला लवकर येण्यासाठी खुणावत आहे.

(३) उभौ -- (सहर्षम्) --- आपन्नाभयसत्रेषु दीक्षिताः खलु पौरवाः। (४६)

अर्थात -- (हर्षभराने) --- पुरुवंशातील राजे संकटग्रस्तांच्या अभयदानरूपी यज्ञाची दीक्षा घेतलेले आहेत.

(४) शकुन्तला -- वनज्योत्स्ने, चूतसंगतापि मां प्रत्यालिङ्गेतोगताभिः शाखाबाहाभिः। (९१)

अर्थात -- वनज्योत्स्ने, आम्रवृक्षाशी जरी तुझा समागम झालेला असला तरी ह्या बाजूला असलेल्या शाखारूपी बाहूंनी मला आलिंगन दे.

(५) शकुन्तला -- पावकः खलु वचनोपन्यासः। (११२)

अर्थात -- खरोखर, त्याच्या बोलण्याचा सूचितार्थ अग्नी आहे.

(६) राजा -- एवमादिभिरात्मकार्यनिर्वर्तिनीनाममृतमयवाङ्मधुभिराकृष्यन्ते विषयिणः। (११८)

अर्थात -- आपले कार्य साधणाऱ्या (स्त्रियांद्वारे) अशा प्रकारच्या अमृतमय वाणीरूप मधाने विषयलोलुप (पुरुष) मोहित केले जातात.

(७) विदूषकः -- (अपवार्य) लङ्घितं एष भूयोऽपि शकुन्तलाव्याधिना। (१३९)

अर्थात -- (एकीकडे) हा पुन्हा एकदा शकुंतलारूप रोगाने ग्रस्त झालेला दिसतो.

(८) राजा -- --- त्वां कारयामि कमलोदरबन्धनस्थम्। (१५४)

अर्थात -- (हे भुंग्या) मी तुला कमळाच्या अन्तर्भागरूप कारागृहात डांबून टाकीन.

(९) मातलिः -- --- त्रिदिवमुध्दृतदानवकण्टकम्। (१६९)

अर्थात -- दानवरूप काटा उपटून टाकल्यामुळे स्वर्ग (मुक्त झाला).

(१०) राजा -- प्रिये,

स्मृतिभिन्नमोहतमसो दिष्ट्या प्रमुखे स्थितासि मे सुमुखि। (१८६)

अर्थात -- ज्याचे मोहरूप अज्ञान आठवणींद्वारे निरस्त झाले आहे अशा

(माझ्यासमोर), हे सुंदरी, तू उभी आहेस.

वरीलसारख्या रूपकांमुळे त्या-त्या ठिकाणच्या वर्ण्य-विषयाला रेखीव स्वरूप प्राप्त झाले असून त्याचा अन्त:स्थ अर्थ वाचकाच्या मनाला जाऊन भिडतो.

[३.८.६] विरुध्दोक्ती

जेव्हा लेखक उत्कृष्ट व निकृष्ट, उच्चस्तरीय व नीचस्तरीय, चांगल्या व वाईट, जवळच्या व दूरच्या अशा परस्परविरुध्द गुणधर्मांच्या वस्तूंचे, एकाच वाक्यात किंवा पद्यात वर्णन करतो व एक प्रकारची चमत्कृती साधतो तेव्हा विरुध्दोक्ती होते. हिला विपर्ययोक्ती असेही म्हणता येईल. इंग्रजीत हिला opposition, contrast किंवा antithesis असे म्हणतात.[५०] ह्या उपायाची सुमारे साठ उदाहरणे शाकुन्तलात आढळतात; त्यांत गद्य उदाहरणांची संख्या कमी असून पद्य उदाहरणांची संख्या अधिक आहे. आता त्यांचा परिचय करून घेऊ.

(१) राजा -- (सस्पृहमवलोक्य)

चलापाङ्गां दृष्टिं स्पृशसि बहुशो वेपथुमतीं
रहस्याख्यायीव स्वनसि मृदु कर्णान्तिकचर: ।
करं व्याधुन्वत्या: पिबसि रतिसर्वस्वमधरं
वयं तत्त्वान्वेषान्मधुकर हतास्त्वं खलु कृती ॥ (१६)

अर्थात -- (आशाळभूतपणे पाहून)

हे भुंग्या, ज्याचे कोपरे थरथरत आहेत अशा तिच्या उघडझाप होणाऱ्या डोळ्याला तू अनेकदा स्पर्श करीत आहेस; तिच्या कानांभोवती घिरट्या घालून मंजुळ गुंजारव करीत जणू काही (तिच्या कानांत) गुपित सांगत आहेस; ती हाताने (झटकून) तुला दूर घालवीत असली तरी रतिक्रीडेच्या सर्वस्वरूप अशा तिच्या अधराचे तू चुंबन घेत आहेस. तत्त्वाचा शोध घेत बसणारे आम्ही दुर्दैवी, पण तू मात्र सुदैवी खरा !

शकुंतला ही कण्वांना क्षत्रिय स्त्रीपासूनच झालेली मुलगी असावी असा मनाचा पक्का ग्रह झाल्यावरही राजा 'तथापि तत्त्वत एनामुपलप्स्ये ।' (१५) असा निश्चय करून तिच्याकडे नुसता अभिलाषेने पाहात राहतो. तिकडे धीट भुंगा मागचापुढचा विचार न करता (राजाला जे मनोमन हवे असते ते) तिचे चुंबन घेऊन मोकळा होतो. तेव्हा राजा खंतावून वरील उद्‌गार काढतो, ज्यांत हत: (म्हणजे अभागी) आणि कृती (म्हणजे सद्‌भागी) असे परस्पर-विरुध्द अर्थांचे शब्द वापरलेले आहेत.

(२) कण्वर्षी शकुंतलेला पतिगृही पाठवतात. तिच्याबरोबर गौतमी व इतर मुनी असतात. ते

सगळे दुष्यंताच्या राजधानीच्या नगरीत येतात. सतत आश्रमात राहणाऱ्या ऋषींना नगरीतील एकूण वातावरण विचित्र वाटते. तेथील स्त्रीपुरुषांची गजबज बघून शाङ्गर्रवाला राजवाडा आग लागलेल्या घरासारखा वाटतो. तर शारद्वत शाङ्गर्रवाशी आपली सहमती दर्शवून म्हणतो :

शारद्वतः -- --- । अहमपि

अभ्यक्तमिव स्नातः शुचिरशुचिमिव प्रबुध्द इव सुप्तम् ।

बध्दमिव स्वैरगतिर्जनमिह सुखसङ्गिनमवैमि ॥ (१०८)

अर्थात -- मलासुध्दा सुखाला चटावलेली येथील माणसे स्नान केलेली असूनही पारोशी, शुचिर्भूत असूनही ओंगळ, जागृत असूनही झोपलेल्यांसारखी आणि मुक्त असूनही बध्द (बंधनात टाकल्यागत) वाटतात. कवीने येथे चार परस्परविरुध्द शब्द-युग्मे वापरली आहेत.

(३) दुष्यंत शकुंतलेला खोटारडी म्हणतो. ते ऐकल्यावर सापाने फणा काढावा त्याप्रमाणे उसळून ती राजाला 'तू स्वतःच खोटारडा आहेस; धार्मिकपणाचा नुसता अंगरखा चढवला आहेस', असे कठोर शब्द बोलते. राजा तिचा हा आरोप फेटाळतो. तेव्हा शकुंतला त्याला परखडपणे खालीलप्रमाणे ऐकवते -

शकुन्तला -- सुष्ठु तावदत्र स्वच्छन्दचारिणी कृतास्मि याहमस्य पुरुवंशप्रत्ययेन मुखमधोर्हृदयविषस्य हस्ताभ्याशमुपगता । (१२०)

अर्थात -- मी येथे स्वैरिणी बनवली गेले हे खरोखर योग्यच झाले ! पुरुवंशावर विश्वास ठेवून ज्याच्या जिभेवर मध पण हृदयात विष आहे अशा ह्याच्या हाती स्वतःला अर्पण केले ना !

(४) शकुंतलेच्या पोळलेल्या अंतःकरणावर फुंकर न घालता शाङ्गर्रव उलट तिलाच दूषणे देऊन 'अविश्वसनीय पुरुषावर प्रेम केले की त्याचे पर्यवसान असेच दुःखात होणार', अशा शब्दांत राजाला टोचून बोलतो. राजाला ते सहन होत नाही व तो शाङ्गर्रवाला हटकतोः तू माझी निर्भर्त्सना का करतोस ? त्यावर -

शाङ्गर्रवः-- (सासूयम्) श्रुतं भवद्भिरधरोत्तरम् ।

आ जन्मनः शाठ्यमशिक्षितो यस्तस्याप्रमाणं वचनं जनस्य ।

परातिसंधानमधीयते यैर्विद्येति ते सन्तु किलाप्तवाचः ॥ (१२०-२१)

अर्थात -- (रागाने) ऐकलीत आपण ही उलटापालट ?

ज्या व्यक्तीने जन्मापासून आजतागायत फसवणूक अभ्यासलेली नाही त्या व्यक्तीचे बोलणे अविश्वसनीय मानावयाचे आणि दुसऱ्याची फसवणूक करणे ही एक विद्या म्हणून जे अभ्यासतात ते यथार्थवक्ते (खरे बोलणारे) मानावयाचे ! (हा कुठला न्याय ?)

(५) राजा थोडासा कृश झाला असला तरी त्याचे तेज कमी झालेले नाही, असा अभिप्राय कंचुकी व्यक्त करतो. तो सानुमतीला इतका काही पटतो की, अशा राजावर शकुंतलेचे - अगदी राजाकडून झिडकारल्या गेलेल्या व अपमानित झालेल्याही शकुंतलेचे - प्रेम असले तर ते योग्यच आहे, असे तिला वाटते. राजा शकुंतलेच्या चिंतनात निमग्न झालेला असल्यामुळे हळूहळू पावले टाकीत थोडे चालतो.

राजा -- (ध्यानमन्दं परिक्रम्य)
प्रथमं सारङ्गाक्ष्या प्रियया प्रतिबोध्यमानमपि सुप्तम् ।
अनुशयदुःखायेदं हतहृदयं संप्रति विबुध्दम् ॥ (१३९)

अर्थात -- (ध्यानात बुडून गेल्यामुळे मंद पावले टाकीत थोडा चालतो).
हरिणीसारख्या डोळे असलेल्या माझ्या प्रियेने माझ्या ह्या नष्ट हृदयाला जागे केले असता ते झोपून(च) राहिले आणि आता (मात्र) पश्चात्तापाचे दुःख भोगण्यासाठी जागे झाले आहे. (हा दैवदुर्विलास नव्हे तर काय ?) कवीने प्रथमं-संप्रति आणि सुप्तम्-विबुध्दम् ह्या परस्परविरुध्दार्थक दोन शब्दजोड्यांच्या द्वारे राजाच्या दुःखाला वाचा फोडली आहे.

(६) मातली विदूषकाला बदडून काढतो. विदूषक बिचारा 'वाचवा, वाचवा' म्हणून ओरडत असतो. तो राजाला बघू शकत असतो, पण राजा मात्र त्याला बघू शकत नसतो. तेव्हा राजा अभिनिवेशाने म्हणतो :

राजा -- भोस्तिरस्करिणीगर्वित, मदीयं शस्त्रं त्वां द्रक्ष्यति । एष तमिषुं संदधे
यो हनिष्यति वध्यं त्वां रक्ष्यं रक्षिष्यति द्विजम् ।
हंसो हि क्षीरमादत्ते तन्मिश्राः वर्जयत्यपः ॥ (१६४-६५)

अर्थात -- अरे, अदृश्य पडद्यामुळे गर्विष्ठ बनलेल्या तुला माझे शस्त्र बघू शकेल. धनुष्याला हा बाण जोडला -
जो वधाला योग्य अशा तुला ठार करील आणि रक्षणाला योग्य अशा ब्राह्मणाचे रक्षण करील. कारण हंस दूध घेतो (वेगळे करून पितो) आणि त्याच्यात मिसळलेले पाणी टाकून देतो.
यातील वध्य-रक्ष्य व हनिष्यति-रक्षिष्यति ह्या जोड्या समुचित आहेत. पण एका कठोर कृत्याच्या पुष्टीसाठी दिलेला हंसाचा दाखला विजातीय असल्यामुळे 'वर्ज्य' आहे !

(७) इंद्राच्या 'अपूर्व' रथात बसून राजा स्वर्गातून पृथ्वीवर येत असतो. रथ हाकणारा मातली, 'राजा, तुझ्या आधिपत्याखाली असलेल्या प्रदेशावर आता आपण क्षणार्धात उतरणार आहोत', असे सांगतो. तेव्हा राजा पृथ्वीकडे बघून म्हणतो -

राजा -- (अधोऽवलोक्य) मातले । वेगावतरणादाश्चर्यदर्शनः संलक्ष्यते मनुष्यलोकः। तथा हि

शैलानामवरोहतीव शिखरादुन्मज्जतां मेदिनी

पर्णाभ्यन्तर-लीनतां विजहति स्कन्धोदयात् पादपाः।

संतानात् तनुभावनष्टसलिला व्यक्तिं भजन्त्यापगाः

केनाप्युत्क्षिपतेव पश्य भुवनं मत्पार्श्वमानीयते। (१७१-७२)

अर्थात -- (खाली पृथ्वीकडे पाहून) मातली, (अतिशय) वेगाने (आपण) खाली उतरत असल्यामुळे पृथ्वीचे दर्शन अद्‌भुत (असे) भासत आहे. उदाहरणार्थ, वरवर येणाऱ्या पर्वतशिखरांवरून पृथ्वी जणू खालीखाली उतरत आहे. झाडांची खोडे (आता स्पष्टपणे) दिसू लागल्यामुळे पानांच्या आड दडलेली आपली स्थिती त्यांनी (आता) टाकली आहे. ज्यांचे जलप्रवाह संकोचामुळे नष्टप्राय झाले होते अशा नद्या (आता) विस्तारामुळे स्पष्ट दिसू लागल्या आहेत. पाहा, हा पृथ्वीगोल कोणीतरी वर उडवून माझ्याजवळ आणत आहे. ह्या श्लोकातील समर्पक विरुध्दार्थक शब्दांचे कौतुक करता-करता असा एक सुखद विचार मनात येऊन जातो की, कालिदासाने आकाशातून जमिनीवर उतरणाऱ्या विमानात बसण्याचा अनुभव घेतलेला असावा !

(८) शकुंतला व दुष्यंत यांच्या मुलाचा - सर्वदमनाचा - जन्म मारीच ऋषींच्या आश्रमात झालेला असतो. जन्मानंतरच्या धार्मिक संस्काराच्या वेळी मारीचांनी सर्वदमनाच्या मनगटावर एक ताईत बांधलेला असतो. त्यात अपराजिता नावाची एक अशी वनस्पती ठेवलेली असते की, तिला स्वतः सर्वदमन व त्याचे आईवडील ह्यांच्याखेरीज इतर कोणी स्पर्श केल्यास तिचे तत्काळ सापात रूपांतर होत असे आणि तो साप स्पर्श करणाऱ्यास दंश करीत असे. असा प्रकार प्रत्यक्षात अनेकदा घडलेलाही असतो. सर्वदमनाच्या मनगटावरून घसरून खाली पडलेला ताईत राजा उचलतो तरी वरीलप्रमाणे कोणताही प्रकार घडत नाही, ही आश्चर्यकारक बातमी सर्वदमनाला सांभाळणाऱ्या दोन तापसी शकुंतलेला सांगतात. तेव्हा -

शकुन्तला -- विकारकालेऽपि प्रकृतिस्थां सर्वदमनस्यौषधिं श्रुत्वा न मे आशासीदात्मनो भागधेयेषु। --- (१८५)

अर्थात -- सर्वदमनाच्या (हातावर बांधलेली) वनस्पती रूपांतर पावण्याच्या काळीदेखील मूळ स्वरूपात(च) राहिली हे ऐकून(देखील) मला स्वतःच्या (सु)दैवाविषयी आशा वाटली नाही. (आपले पतीशी

पुनर्मिलन घडेल ही आशाच शकुंतलेने सोडली होती.) विकार म्हणजे विकृती आणि प्रकृती म्हणजे मूळ नैसर्गिक स्थिती असे दोन विरुध्दार्थक शब्द ह्या एका वाक्यात वापरलेले आहेत.

(९) 'माझा मानसिक मोह प्रबळ झाल्यामुळे मी तेव्हा तुझा अस्वीकार केला', असा खुलासा करून दुष्यंत अक्षरश: शकुंतलेच्या पाया पडतो. तेव्हा -

शकुन्तला -- उत्तिष्ठतु उत्तिष्ठत्वार्यपुत्रः । नूनं मे सुचरितप्रतिबन्धकं पुराकृतं तेषु दिवसेषु परिणाममुखमासीद्येन सानुक्रोशोऽपि आर्यपुत्रो मयि विरसः संवृत्तः (१८७)

अर्थात -- उठावे, उठावे, महाराज ! कल्याणाच्या आड येणारे असे माझे पूर्वजन्मीचे (कुकृत्य) त्या कालखंडात संपण्याच्या टप्प्यावर आलेले होते. त्यामुळे महाराज वस्तुतः सदय असूनही (तेव्हा) माझ्याविषयी उदासीन/विरक्त झाले.

(१०) सर्व संकटांतून तावून-सुलाखून निघालेल्या राजाला प्रथमतः पुत्रदर्शन होते, नंतर त्याचे पत्नीशी मिलन होते आणि ह्या दोन शुभ घटना ज्यांच्या कृपेमुळे घडू शकतात त्या मारीच ऋषींशी त्याची सर्वांत शेवटी भेट होते. घटनांचा हा उलटा क्रम राजाला बुचकळ्यात टाकतो. तेव्हा तो म्हणतो :

राजा -- भगवन्, प्रागभिप्रेतसिध्दिः । पश्चाद् दर्शनम् । अतोऽपूर्वः खलु वोऽनुग्रहः । कुतः

उदेति पूर्वं कुसुमं ततः फलम् । घनोदयः प्राक् तदनन्तरं पयः ।
निमित्तनैमित्तिकयोरयं क्रम- । स्तव प्रसादस्य पुरस्तु सम्पदः ॥(१९२)

अर्थात -- पूज्यपाद, अगोदर मनोरथाची प्राप्ती. त्यानंतर (आपली) भेट. म्हणून(च) (म्हणावेसे वाटते की) आपली कृपा खरोखर अपूर्व आहे. कशावरून ? तर - पहिल्यांदा फूल उगवते व मग फळ येते. पहिल्यांदा मेघदर्शन होते, नंतर वृष्टी होते. निमित्त व तदुत्पन्न कार्य यांचा हा (नियत) क्रम आहे. पण तुमचा कृपाप्रसाद होण्यापूर्वी(च) वैभव प्राप्त झाले.

यातील प्राक् व पश्चात् यांतील 'अधरोत्तर'-त्व स्वतःस्पष्ट आहे.

[३.८.७] संकीर्ण

या सदरात ऊनोक्ती, गुणोक्ती व परोक्ष संबोधन अशा तीन भाषा-प्रसाधनांचा विचार कर्तव्य आहे. प्रथमतः ऊनोक्तीचे अवलोकन करू.

(१) **ऊनोक्ती** -- हिचा कोशगत अर्थ असा आहे: "Understatement in which an affirmative is expressed by the negative of the contrary

(as in "not a bad singer")[५१] अर्थात, एखादी सकारात्मक संकल्पना नकाराच्या आधारे, तिचे महत्त्व कमी होऊ न देता, व्यक्त केलेली असते. उदाहरणार्थ, 'अध्यक्ष हा चांगलाच प्रभावशाली मनुष्य आहे', हा आशय 'The president is a man of considerable influence' अशा सकारात्मक विधानाने व्यक्त करण्याऐवजी 'The president is a man of no little influence', अशा नकारात्मक वाक्यानेही व्यक्त करता येतो. कालिदासाला या शैली-उपायाची जाणीव आहे. शाकुंतलात एकूण दहा उदाहरणे आढळतात, त्यांपैकी पाच, अर्थासह, उद्धृत करू.

(१) राजा -- यावदनुयात्रिकान् समेत्य नातिदूरे तपोवनस्य निवेशयामि। (२९)

अर्थात -- दरम्यान अनुयायांसह तपोवनापासून फार दूर नसलेल्या (ठिकाणी) तळ ठोकतो.

(२) राजा -- कामं प्रिया न सुलभा ---। (३२)

अर्थात -- प्रेयसी प्राप्त करण्यास सुलभ नाही, हे मान्य ---

(३) प्रियंवदा -- --- वत्से, सुशिष्यपरिदत्तेव विद्याशोचनीयासि संवृत्ता। (८१)

अर्थात -- --- मुली, सत्पात्र शिष्याला प्रदान केलेल्या विद्येप्रमाणे तू अशोचनीय झाली आहेस (म्हणजे प्रशंसनीय झाली आहेस.)

(४) शाङ्गरव: --न खलु धीमतां कश्चिदविषयो नाम। (९६)

अर्थात -- खरोखर बुध्दिमंतांना अगम्य असा (कोणताही) विषय नसतो हे खरे. (येथे खलु व नाम हे दोन्ही 'खरोखर' या अर्थाचे शब्द वापरले आहेत. हा पुनरुक्तीचा दोष आहे). वाक्याचा सकारात्मक अर्थ, बुध्दिमंतांना सगळे विषय आकलनीय/सुगम असतात, असा आहे.

(५) राजा -- (प्रकाशम्) न पुनरात्मगत्या मानुषाणामेष विषय:। (१८१)

अर्थात -- (स्वर्गाचा) हा प्रदेश (पृथ्वीवरील) माणसे स्वत:च्या गतीने येऊ शकतील असा नाही (येथे येऊन पोचण्यासाठी स्वर्गीय वाहनच हवे). या अलंकाराची अन्य उदाहरणे पृ. ३४,४२, १०४, १०९ व ११४ वर आहेत.

(२) **गुणोक्ती** -- इंग्रजीत Metonymy व Synecdoche नावाचे दोन अलंकार मानण्यात आले आहेत. त्यांचे एकत्रीकरण करून त्यांना गुणोक्ती हे नाव सुचवले आहे. एखाद्या व्यक्तीच्या किंवा वस्तूच्या ठिकाणच्या गुणाच्या आधारे तिचा उल्लेख करणे. शाकुंतलातील मारीचांच्या एका पद्योक्तीच्या आधारे याचे स्पष्टीकरण करू. ती उक्ती अशी : -

इहायं सत्त्वानां प्रसभदमनात् सर्वदमन: ।

पुनर्यास्यत्याख्यां भरत इति लोकस्य भरणात् । (१९५)

अर्थात -- हा दांडगाई करून प्राण्यांना वठणीवर आणतो म्हणून याला येथे (मारीचाश्रमात) सर्वदमन म्हणतात. (पृथ्वीवर गेल्यावर) जगताचे भरणपोषण करण्याच्या कृतीमुळे याला भरत हे नामाभिधान प्राप्त होईल.

लोकव्यवहारात ज्या वस्तू किंवा व्यक्ती ज्या नावाने प्रसिध्द आहेत त्यांची शाकुंतलातील उल्लेखांधारे नोंद खाली केली आहे. प्रसिध्द नावापुढे गुणवाचक अभिधान दाखल करून कंसात नाट्यसंहितेचा पृष्ठांक नेहमीप्रमाणे नोंदवला आहे.

(१) इन्द्र -- बलभित (४५), पौरुहूत (४५), शतक्रतू (१६६,१६९, १७३), मघवत (१६६, १६८, १९०), दिवस्पती (१६७), मरुत्वत (१६८), अमरेश्वर (१६९), बिडौजस (१९७)

(२) कामदेव -- मदनबाणं (६५), मनसिजं (१४१)

(३) चन्द्र -- 'ओषधीनां पति:' (७८), शशांक (१२२)

(४) दुष्यन्त -- राजर्षी (१३६), 'स्निग्धबन्धु:' (१५९), वासवनियोज्य (१९१)

(५) देव -- दिवौकस: (१६८, १७०)

(६) नदी -- आपगा (१७२)

(७) नृसिंह -- पुरुषकेसरी (१६९)

(८) पर्वत -- सानुमत (१७२)

(९) पृथ्वी -- वसुधा (१२४), मनुष्यलोक: (१७१), मेदिनी (१७१)

(१०) मच्छीमार -- मत्स्यबंध (१२८), जालोपजीवी (१३०), मात्स्यिक (१३१)

(११) मारीच -- सुरासुरगुरू (१७२), प्रजापती (१७४), इंद्रगुरू (१७५), देवगुरू (१८१)

(१२) मारीच व अदिती -- 'दिवौकसां पितरौ' (१९०)

(१३) मेनका -- 'स्त्रीसंस्थानं ज्योति:' (१२४)

(१४) राजा -- षष्ठांशवृत्ती (१०४), क्षितिप (१२२), पार्थिव (१९८)

(१५) वसुमती राणी -- अन्त:पुरकालकूट (१५७)

(१६) वामनावतारी विष्णु: -- हरी (१७०)

(१७) वारा -- गंधवह (१०४)

(१८) वृक्ष -- पादप (१७१)

(१९) शकुन्तला -- मुनेस्तनया (१२५), मुनिसुता (१४१)

(२०) शिव -- पिनाकी (४), नीललोहित (१९८), परिगतशक्ती (१९८)

(२१) सूर्य -- सविता (१२२), सप्तसप्ती (१६६), सहस्रकिरण (१६९)

(२२) हिमालय -- गौरीगुरू (१५२)

(३) परोक्ष संबोधन

पाश्चात्यांनी Apostrophe हा अलंकार मानला आहे, त्याचे लक्षण असे : "the addressing of a usu. absent person or a usu. personified thing rhetorically < Carlyle's "O Liberty, what things are done in thy name" is an example of - >"[५२] ह्यावरून प्रत्यक्षात उपस्थित नसलेल्या व्यक्तीला किंवा मानुषीकरण केलेल्या वस्तूला संबोधणे अशी ह्या अलंकाराची दोन् स्वरूपे आहेत. त्यांपैकी पहिल्या स्वरूपाचा परामर्श पूर्वी [२.६.१] मध्ये विस्ताराने घेतला आहे. म्हणून येथे फक्त दुसऱ्या स्वरूपाचा विचार करू.

शाकुंतलात एकूण अठरा परोक्ष संबोधने आहेत, त्यांचे वर्गीकरण असे :

अनुक्रमांक	संबोध्य वस्तू	संबोधक	पृष्ठांक
१	आंगठी	दुष्यंत	१४५, १४८
२	कामदेव	- " -	५१, ५२
३	तपोवनतरू	काश्यप	८९
४	पुरुवंशीय पूर्वज	दुष्यंत	१६१
५	भुंगा	- " -	१६, १५४, १५४
६	मातली	- " -	१६४
७	लतावलय	शकुंतला	६९
८	हरिणबालक("दीर्घापांग")	- " -	९३
९	हृदये	दुष्यंत	२४
१०	- " -	शकुंतला	२०, ६९, ११०, ११३,१८६

यांचे स्वरूप स्पष्ट व्हावे ह्यासाठी प्रत्येक पात्राचे एकेक 'परोक्ष संबोधन' खाली उतरून घेऊ.

काश्यप: -- भो भो: संनिहितास्तपोवनतरव:,
पातुं न प्रथमं व्यवस्यति जलं युष्मास्वपीतेषु या
नादत्ते प्रियमण्डनापि भवतां स्नेहेन या पल्लवम् ।
आद्ये व: कुसुमप्रसूतिसमये यस्या भवत्युत्सव:
सेयं याति शकुन्तला पतिगृहं सर्वैरनुज्ञायताम् ॥ (८९)

अर्थात -- अहो तपोवनातील आसपासच्या वृक्षांनो,
तुमच्या बुंध्यापाशी पाणी घातल्याशिवाय (जी) स्वत: पाणी पिण्याचा विचारही करीत नाही, अलंकारांची खूप आवड असूनही (जी) तुमच्यावरील प्रेमाखातर तुमची पालवी खुडत नाही, तुमच्या अंगाखांद्यावर पहिली फुले उमलली की (जी) आनंदोत्सव साजरा करते, ती (ही) शकुंतला आज पतिगृही जाण्यास निघाली आहे, तिला तुम्ही सर्वांनी अनुमती द्यावी.

दुष्यन्त: -- भव हृदय साभिलाषं संप्रति संदेहनिर्णयो जात: ।
आशङ्कसे यदग्निं तदिदं स्पर्शक्षमं रत्नम् ॥(२४)

अर्थात -- हे हृदया, अभिलाषा बाळग. (कारण) आता संदेहाचे निराकरण झाले आहे. जो अग्नी असल्याची तुला धास्ती वाटत होती, ते हे स्पर्श करण्यास योग्य (असे) रत्न आहे.

शकुन्तला -- (आत्मगतम्) हृदय मोत्ताम्य । एषा त्वया चिन्तितमनसूया मन्त्रयते । (२०)

अर्थात -- (स्वत:शी), हृदया, अधीर होऊ नकोस. तू जो विचार केला होतास तो(च) अनसूयेने उच्चारला आहे.

वरील एकूण १८ परोक्ष संबोधनांत २६ गद्य वाक्ये, एक गद्यांश, एक शब्द व ११ श्लोक आहेत. येथे अलंकार या शैली-उपायाचा विचार संपला.

[३.९] 'आणि' अव्यय

'आणि' हे उभयान्वयी अव्यय असून त्याचे स्वरूप "an uninflected linguistic form that joins together sentences, clauses, phrases or words"[५३] असे आहे. अर्थात 'आणि' हे मराठीतील अव्यय शब्दांना, शब्दसमूहांना, वाक्यखंडांना किंवा वाक्यांना परस्परांशी जोडण्याचे कार्य करते. ह्याचा वापर दोन प्रकारांनी केला जात असतो. ते दोन प्रकार असे :-

"1. used as a function word to indicate connection or addition esp. of items within the same class or type - used to join sentence elements of the same grammatical rank or function. 2. used as a function word to express logical modification, consequence, antithesis, or supplementary explanation."[५४]

मातलि: -- 'दिष्ट्या धर्मपत्नीसमागमेन पुत्रमुखदर्शनेन च आयुष्मान् वर्धते । (१८९) या शाकुंतलातील उक्तीत [(मातली म्हणतो-) धर्मपत्नीबरोबर (पुनर्)मिलन झाल्याबद्दल आणि पुत्रमुखाचे दर्शन झाल्याबद्दल मी महाराजांचे अभिनंदन करतो.] दोन अनुकूल किंवा सुखावह घटनांच्या समुच्चयाचे वर्णन आहे. हा वरीलपैकी पहिला प्रकार झाला. दुसऱ्या प्रकाराचे

उदाहरण अवलोका - 'वयस्य, उपस्थिता देवी बहुमानगर्विता च ।' (१५७), अर्थात (राजा विदूषकाला म्हणतो -) 'मित्रा, पट्टराणी येत आहे आणि मी तिला बहुमानाने वागवतो ह्याबद्दल तिला गर्व आहे'. यात 'च'-काराने पट्टराणीविषयी पूरक स्पष्टीकरण केले आहे. अशा प्रकारे सूक्ष्म दृष्टीचा व मर्मज्ञ लेखक एखाद्या साध्या अव्ययाचाही प्रभावी उपयोग करीत असतो, हे दिसून येईल. संस्कृतात 'आणि' ह्या अर्थी अथ, अन्यच्च, अपरं च, अपि, च, तथा, पुनः, वा इत्यादींचा उपयोग होत असतो. आता शाकुंतलातील काही प्रयोगांकडे दृष्टी वळवू. शाकुंतलात असे सुमारे नव्वद प्रयोग आढळतात.

(१) वैखानसः -- क्व बत हरिणकानां जीवितं चातिलोलं
क्व च निशितनिपाता वज्रसाराः शरास्ते । (७)

अर्थात -- त्या हरिणबालकांचा कोवळा जीव कोठे आणि जोराने पडणारे व वज्राचे सामर्थ्य असणारे तुझे बाण कोठे ? (येथे दोन विरुध्द-धर्मयुक्त वस्तू 'च'-काराने जोडल्या आहेत.)

(२) पिसाळलेला हत्ती आश्रमाकडे येत असल्याचे वृत्त ऐकताच भयभीत झालेल्या शकुंतलाप्रभृती तिघी झोपडीकडे परतू लागतात. मात्र शकुंतला राजाच्या प्रेमात पडलेली असल्यामुळे तिची जाण्याची इच्छा नसते. ती थोडा वेळ तेथेच काढता यावा ह्यासाठी पुढीलप्रमाणे निमित्ते पुढे करते.

शकुन्तला -- अनसूये, अभिनवकुशसूच्या परिक्षतं मे चरणम् । कुरबकशाखापरिलग्नं च वल्कलम् । तावत् परिपालयतां मां यावदेनं मोचयामि । (२९)

अर्थात -- कोवळ्या कुशगवताचे टोकदार पाते पायात घुसले आहे. एवढेच नाही ग, तर कुरबकवृक्षाच्या फांदीत माझे वल्कल अडकले आहे. तेव्हा (पहिल्यांदा गवताच्या पात्याचे टोक उपटून काढते, नंतर) हे वल्कल सोडवून घेते. तोपर्यंत तुम्ही दोघी माझ्यासाठी थांबा.

राजाकडे पुन्हा एकदा डोळे भरून पाहावयास मिळावे आणि 'लब्धं नेत्रनिर्वाणम्' असा (जसा राजाला आला तसा) सुखद अनुभव यावा यासाठी ती दोन कारणे पुढे करते. कालिदासप्रयुक्त 'च'-काराने शकुंतलेला किती 'मधुर' मदत केली आहे !

(३) विदूषक राजाला स्नेहभरे सल्ला देतो की, जर 'तुझे मन खरोखरच तिच्यावर जडले असेल तर तिला, वेळ न दवडता, हस्तगत कर. नाहीतर एखादा तपस्वी तिला पटकावील'. त्यावर विवेकी राजा म्हणतो :

राजा -- परवती खलु तत्रभवती । न च संनिहितोऽत्र गुरुजनः । (४१)

अर्थात -- ती परावलंबी आहे आणि (शिवाय) तिचे वडील (सध्या) येथे नाहीत.

ह्या दोन कारणांमुळे तुझ्या सल्ल्यानुसार आचरण करता येत नाही.

(४) पतिगृही जाण्यास निघताना आश्रमातील वृक्षवेली, पशुप्राणी आणि स्निग्ध आप्तजन यांच्या वियोगाच्या कल्पनेने शकुंतला व्याकुळ होते आणि ह्या सर्वांवाचून त्या परक्या प्रदेशात आपण जिवंत राहू शकू का, अशी काळजी तिला वाटू लागते. तेव्हा तिची समजूत घालताना वात्सल्यमूर्ती कण्व म्हणतात :

काश्यप: -- वत्से, किमेवं कातरासि ।
अभिजनवतो भर्तुः श्लाघ्ये स्थिता गृहिणीपदे
विभवगुरुभिः कृत्यैस्तस्य प्रतिक्षणमाकुला ।
तनयमचिरात् प्राचीवार्कं प्रसूय च पावनं
मम विरहजां न त्वं वत्से शुचं गणयिष्यसि ॥ (९७)

अर्थात -- मुली, अशी दुःखाकुल का होतेस ?
तू एका कर्तबगार व आदरणीय राजाची पत्नी होणार आहेस. त्याचे स्पृहणीय गृहिणीपद तुला लाभणार आहे. त्याच्या प्रचंड वैभवाला साजेशी कार्ये त्याच्या हातून होत राहतील आणि तू प्रतिक्षण कामांत मग्न राहशील. तुला लवकरच पुत्ररत्नाची प्राप्ती होईल. हे सारे इतके पाहता-पाहता घडणार आहे की, माझ्या वियोगाचे दुःख तुला जाणवणारसुध्दा नाही.

येथील 'च'-काराने गृहिणीपद, राणीची कर्तव्ये, कामांची गजबज, पुत्रप्राप्ती ह्या साऱ्या घटना कधी घडल्या हे शकुंतलेला जणू कळणारही नाही असे सुचवले आहे. त्यायोगे ती पितृवियोगदुःख विसरेल. कालिदासाने येथे 'च'ची मदत घेऊन कालाचा जणू संक्षेप केला आहे.

(५) हंसपदिका एका गीताद्वारे राजाला त्याच्या भ्रमरवृत्तीबद्दल टोमणा मारते. ते गीत ऐकून राजा कमालीचा बेचैन होतो. तेवढ्यात त्याच्या मनात दुसराच विकल्प तरळून जातो. तो पुढील श्लोकात व्यक्त झाला आहे.

राजा -- --- रम्याणि वीक्ष्य मधुरांश्च निशम्य शब्दान्
पर्युत्सुकी भवति यत् सुखितोऽपि जन्तुः ।
तच्चेतसा स्मरति नूनमबोधपूर्वं
भावस्थिराणि जननान्तरसौहृदानि ॥ (१०३)

अर्थात -- रमणीय (वस्तू) पाहून आणि गोड शब्द ऐकून सुखासीन मनुष्यही अतिशय बेचैन होतो. मग त्याला पूर्व जाणिवेच्या अभावीही (उत्कट) भावनांमुळे स्थिरपद झालेली जन्मजन्मांतरींची मित्रत्वाची बंधने मनोमन आठवू लागतात.

(६) काश्यप ऋषी दुष्यंत-शकुंतला यांच्या विवाहाला संमती देतात. त्याविषयीचे कारण पुढील शब्दांत सांगतात -

त्वमर्हतां प्राग्रसर: स्मृतोऽसि न:
शकुन्तला मूर्तिमती च सत्क्रिया।
समानयंस्तुल्यगुणं वधूवरं
चिरस्य वाच्यं न गत: प्रजापति: ॥ (१११)

अर्थात -- तू सत्पात्र व्यक्तींमध्ये सर्वांत अग्रगण्य आहेस, शकुंतला ही तर आदरसत्काराची मूर्ती आहे. परस्परतुल्य गुण असलेल्या वधूवरांना एकत्र आणून प्रजापतीने दीर्घ कालावधीनंतर स्वत:वर दोष ओढवून घेतला नाही. येथील 'च'-कार दोन समान गुणी व्यक्तींना समर्थपणे जोडतो.

(७) सानुमती ----- मेनकासम्बन्धेन शरीरभूता मे शकुन्तला। तया च दुहितृनिमित्तमादिष्टपूर्वास्मि। (१३२)

अर्थात -- --- मेनकेशी असलेल्या संबंधामुळे शकुंतला माझे (जणू) शरीर बनली आहे आणि माझ्या मुलीसाठी काहीतरी प्रयत्न कर, असे मला मेनकेने सांगूनही ठेवले आहे.

येथील 'च'-काराने शरीरभूतत्व हे पर्यवसान (consequence) आणि मेनकेचा आदेश (supplementary explanation) या दोन गोष्टी एकत्र आणल्या आहेत.

(८) राजा प्रमदवनातील सावलीच्या एका जागी विश्रांतीसाठी येऊन बसतो. जवळ विदूषक असतो. त्याला राजा 'छिद्र दिसले की संकट त्यातून आत घुसते', या सार्वत्रिक अनुभूतीची सत्यता पुढील शब्दांत पटवून देतो.

राजा -- --- मुनिसुताप्रणयस्मृतिरोधिना। मम च मुक्तमिदं तमसा मन:।
मनसिजेन सखे प्रहरिष्यता। धनुषि चूतशरश्च निवेशित: ॥
(१४१)

अर्थात -- ऋषिकन्येवरील प्रेमाच्या आठवणीला अडथळा आणणाऱ्या अंधकाराने ज्या क्षणी माझे मन मुक्त केले त्या क्षणी, मित्रा, प्रहार करू इच्छिणाऱ्या कामदेवाने आम्रमंजरीरूप बाण आपल्या धनुष्यावर चढवला.

राजाचे मन तमोमुक्त होणे आणि त्याच क्षणी कामदेवाने धनुष्याला बाण जोडणे, अशा दोन घटना एकाच वेळी/क्षणी घडल्याचे वर्णन आहे. अशा वर्णनातील 'च-च' No sooner than, किंवा As soon as असा अर्थ व्यक्त करतो.

(९) दुष्यंताने शकुंतलेचे चित्र काढलेले असते. त्यातील प्रत्येक न्यून तो 'पुरते' करतो आणि अधिक ते 'सरतो' करतो. ते चित्र परिपूर्ण व सर्वथा निर्दोष करण्याचे त्याचे आटोकाट प्रयत्न चाललेले असतात. त्यांवरील सानुमतीची कौतुकपूर्ण टिप्पणी अशी :

सानुमती -- सदृशमेतत् पश्चात्तापगुरोः स्नेहस्यानवलेपस्य च। (१४९)

अर्थात -- ज्याला खूप पश्चात्ताप झाला आहे अशा दुष्यंताच्या प्रेमभावनेला आणि निगर्वीपणाला हे (कृत्य) साजेसे(च) आहे. येथे सानुमतीच्या तोंडी कवीने घातलेल्या 'च'-काराने प्रेम आणि निगर्वीपणा ह्या विजातीय गुणधर्मांचे संमेलन घडवून आणले आहे !

(१०) वरील चित्रात आणखी काय-काय रेखाटणार आहेस असे विदूषक राजाला विचारतो. त्याचे उत्तर राजा पुढील शब्दांत देतो :

राजा -- श्रूयताम्।

कार्या सैकतलीनहंसमिथुना स्रोतोवहा मालिनी
पादास्तामभितो निषण्णहरिणा गौरीगुरोः पावनाः।
शाखालम्बितवल्कलस्य च तरोर्निर्मातुमिच्छाम्यधः
शृङ्गे कृष्णमृगस्य वामनयनं कण्डूयमानां मृगीम्॥ (१५२)

अर्थात -- ऐकावे,

जिच्या वाळवंटावर हंसांच्या जोड्या विसावल्या आहेत, अशी मालिनी नदी, तिच्या दोन्ही तीरांवर हिमालयालगतच्या छोट्या पवित्र टेकड्या, त्यांवर बसलेली हरिणे आणि ज्या झाडावर वल्कले टांगलेली आहेत अशा झाडाच्या खाली आपला डावा डोळा काळविटाच्या शिंगावर घासणारी हरिणी (एवढ्या गोष्टी) रेखाटावयाच्या आहेत.

डब्ल्यू. वेदर्सच्या[५५] भाषेत बोलावयाचे म्हणजे कालिदासाने येथे four-part-series(हंसलीन मालिनी, छोट्या टेकड्या, हरणे व हरिणी ह्या चार भागां)चा अवलंब करून आधिक्य किंवा वैपुल्य साधले आहे.

एकंदरीने कालिदास सधर्मीय व विधर्मीय अशा उभयविध गोष्टींच्या एकत्र उल्लेखासाठी च व तदर्थक इतर अव्यये प्रभुत्वाने वापरतो.

[३.१०] आवृत्ती

आवृत्ती म्हणजे पुनरुक्ती, अर्थात पुन्हा तेच सांगणे, बोलणे किंवा उच्चारणे. मनुष्याच्या मनात हर्ष, खेद, भय, विस्मय, क्रोध, उत्साह, कुतूहल इत्यादी भावना दाटून आल्या की, त्याच्या तोंडून त्याच शब्दाची किंवा शब्दावलीची स्वाभाविकपणे पुनरुक्ती होत असते. तिचा विचार पूर्वी [२.८.१८] मध्ये केलाच आहे. त्याशिवाय, शाकुंतल ही एक नाट्यकृती आहे ही

वस्तुस्थिती ध्यानात घेऊन आणखी काही प्रकारच्या पुनरुक्ती वर्ज्य समजावयास हव्यात, कारण त्यांचा भाषासौंदर्याशी किंवा शैलीशी काडीमात्र संबंध नसतो. उदाहरणार्थ, राजाच्या भेटीस जाताना 'जयतु जयतु भवान्।', 'जयतु जयतु भर्ता।', 'जयतु जयतु स्वामी।', 'जयतु जयतु देव:।' इत्यादी पुनरुक्त शब्दांनी जयजयकार करणे हा एक राजशिष्टाचार आहे व पात्रांना त्याच नात्याने त्याचे पालन करावे लागते. एखादे पात्र दुसऱ्या एखाद्या पात्राला मार्ग वा दिशा दाखवताना 'इतो इतो भवती', 'इतो इत: सख्यौ'/भवन्तौ', 'इतो इत आर्या गौतमी', अशी पुनरुक्ती करते. तद्वत 'एतु एतु भवान्', 'उत्तिष्ठतु उत्तिष्ठतु आर्यपुत्र:', अशा शब्दांत ज्या विनंतीवजा सूचना केल्या जातात किंवा 'एहि एहि', 'क: कोऽत्र भो:' इत्यादी शब्दांनी जे आवाहन वा पाचारण केले जाते, ते सगळे औपचारिक असते. ते सामान्य संभाषणातच मोडते. त्याला कल्पकतेचा स्पर्श झालेला नसतो. त्यामुळे अशा आवृत्त्यांचा विचार कर्तव्य ठरत नाही.

कवी एखाद्या कल्पनेवर, अर्थावर, अभिप्रायावर वा भावनेवर भर देण्यासाठी किंवा तिच्यावर वाचकांचे लक्ष खिळवून ठेवण्यासाठी जेव्हा शब्द, वाक्यांग किंवा संपूर्ण वाक्य यांची जी जाणूनबुजून पुनरावृत्ती करतो तेव्हा तिचा अन्तर्भाव आवृत्ती ह्या शैली-उपायात होतो. विवेचकपणे केलेली अशी आवृत्ती वाचकाच्या मनाची पकड घेते व इष्ट तो परिणाम सौष्ठवपूर्ण रीतीने साधते. बॉवडेनने म्हटलेच आहे :

"... One of the simpler means (of emphasis) is by repetition of the word or phrase or idea .... repetition carefully and deliberately employed, can be most effective in gaining emphasis."[५६]

कोहेनचेही असेच मत आहे. तो म्हणतो - "Repetition can be effective if used for stylistic effect for transitions, or for maintenance of focus on a theme idea".[५७]

मार्जोरी बोल्टनने[५८] हिचे एखाद्या भाषिक रूपाची, शब्दाची, वाक्यखंडाची, शब्दसमूहाची, कडव्याची आवृत्ती इत्यादी अनेक प्रकार नमूद केले आहेत.

एखाद्या शब्दाची, शब्दावलीची किंवा वाक्याची आवृत्ती करण्याने इष्ट तो परिणाम साधता येईल असे लेखकास वाटत असल्यास त्याने तशी आवृत्ती बिनदिक्कतपणे करावी, असा 'हितोपदेश' बॉवडेनने 'If the word needs repeating - repeat it',[५९] ह्या शब्दांत केला आहे. आता शाकुंतलाकडे वळू.

(१) नटी -- तथा (गायति)

ईषद् ईषच्चुम्बितानि भ्रमरै: सुकुमारकेसरशिखानि।
अवतंसयन्ति दयमाना: प्रमदा: शिरीषकुसुमानि॥ (३)

अर्थात -- बरे. गाते.

ज्यांना भ्रमरांनी हळुवारपणे चुंबले आहे आणि ज्यांच्या परागांचे शेंडे

नाजूक आहेत, अशी शिरीषपुष्पे सहृदय स्त्रिया कर्णभूषणे म्हणून (कानांत) घालतात.

कवीने 'ईषत्'-च्या आवृत्तीद्वारे भ्रमरही प्रमदांइतकेच 'सदय' असल्याचे सुचवले आहे !

(२) राजा -- ....

एते चार्वागुपवनभुवि छिन्नदर्भाङ्कुरायां
नष्टाशङ्का हरिणशिशवो मन्दमन्दं चरन्ति । (९)

अर्थात -- ज्याच्यावरील दर्भगवताचे अंकुर छाटलेले आहेत अशा ह्या जवळच्या उपवनाच्या मैदानावर ही हरिणबालके नि:शंकपणे रमतगमत चरत आहेत. उपवनभूमी निर्धास्त असल्याबद्दलची हरिणांची खात्री 'मन्दमन्दं' शब्द व्यक्त करतो.

(३) अनसूया -- .... कतम आर्येण राजर्षेर्वंशोऽलंक्रियते, कतमो वा
विरहपर्युत्सुकजन: कृतो देश:, किंनिमित्तं वा सुकुमारतरोऽपि
तपोवनगमनपरिश्रमस्यात्मा पदमुपनीत: । (१९)

अर्थात -- .... मान्यवर कोणत्या राजर्षीच्या वंशाला भूषवतात, मान्यवरांनी कोणत्या देशातील लोकांना स्वत:च्या विरहाने व्याकुळ बनवले आहे, आणि अत्यंत सुकुमार असूनही तपोवनात येण्याच्या कष्टाने स्वत:ला का शिणवले आहे ?

(४) विदूषक: -- .... अयं मृगोऽयं वराहोऽयं शार्दूल इति मध्याह्नेऽपि
ग्रीष्मविरलपादपच्छायासु वनराजीष्वाहिण्ड्यते ... । (३०)

अर्थात -- हे हरीण, हे डुक्कर, हा वाघ असे करीत भर दुपारीही, ग्रीष्म ऋतूमुळे ज्यांतील झाडांच्या सावल्या विरळ झाल्या आहेत अशा जंगलांच्या रांगांतून हिंडावे लागते.

येथील 'अयं' ची आवृत्ती एकीकडे विदूषकाची निर्विण्णता 'बोलकी' करते आणि दुसरीकडे वाचकाच्या कानांना आनंद देते.

(५) राजा -- ....

क्व वयं क्व परोक्षमन्मथो । मृगशावै: सममेधितो जन: ।
परिहासविजल्पितं सखे । परमार्थेन न गृह्यतां वच: ॥ (४९)

अर्थात -- आम्ही कोठे (आणि) हरिणबालकांबरोबर वाढविलेली आणि प्रणयभावनेशी अपरिचित असलेली ती व्यक्ती कोठे ! मित्रा, (मी जे सांगितले ते) थट्टेतले बोलणे होते (असे समज), ते खरे मानावयाचे

नाही. येथील 'क्क' ची आवृत्ती दुष्यंत व शकुंतला यांच्यातील फरक भेदकपणे दाखवते.

(६) प्रियंवदेच्या विनंतीस मान देऊन राजा शकुंतलेला पदरात घेण्याचे मान्य करतो. त्यावर शकुंतला शंका काढते. तिकडे अंत:पुरातील स्त्रिया ह्याच्या विरहाने व्याकुळ झालेल्या असतील. अशा स्थितीत ह्याला गळ घालण्यात काय फायदा ? त्यावर राजा आपले हृद्गत पुढील श्लोकात व्यक्त करतो.

इदमनन्यपरायणमन्यथा। हृदयसंनिहिते हृदयं मम।
यदि समर्थयसे मदिरेक्षणे। मदनबाणहतोऽस्मि हत: पुन: ।। (६५)

अर्थात -- माझ्या हृदयाच्या जवळ असलेल्या हे सुंदरी ! माझे हृदय कोणत्याही स्त्रीवर जडलेले नसूनही तुला ते वेगळे (म्हणजे अन्यस्त्रीवर जडलेले असल्याचे) वाटत असेल तर (एकदा) कामदेवाच्या बाणांनी घायाळ झालेला मी पुन्हा (तुझ्या ह्या आशंकेने) घायाळ झालो आहे.
येथील 'हत'ची आवृत्ती राजाची शकुंतलेवरील 'अनन्यप्रीती' दर्शवते !

(७) गौतमी -- आर्य, किमपि वक्तुकामास्मि। न मे वचनावसरोऽस्ति। कथमिति।
नापेक्षितो गुरुजनोऽनया न त्वयापि पृष्टो बन्धु:।
एकैकस्य च चरिते किं भणत्वेक एकस्य। (११२)

अर्थात -- महाराज, मीही काही बोलू इच्छिते. तसा माझ्या बोलण्याला (फारसा) वाव नाही (म्हणा !) का ? तर -
हिने वडीलधाऱ्या मंडळींशी विचारविनिमय केला नाही; तूदेखील हिच्या नातलगांना विचारले नाहीस. तुमच्यापैकी प्रत्येकाने एकेकट्याने हे सारे केलेत, त्यात तिसऱ्या माणसाने तुम्हांपैकी कोणाला काय सांगावे ?

इतरांना न जुमानता एकेकट्याने केलेल्या कृतीच्या बाबतीत तिऱ्हाईताला बोलण्यास वावच कोठे उरला, असे म्हणून गौतमीने दोघांची सौम्य निर्भर्त्सना केली आहे आणि त्याच वेळी आपला हताशपणाही प्रकट केला आहे.

(८) 'पतिवियुक्त मुलीचे दु:ख तिच्या आईवडिलांना फार दिवस पाहवणार नाही, त्यामुळे तुम्हां दोघांचे पुनर्मिलन कालांतराने होईलच होईल', अशा शब्दांत विदूषक राजाला धीर देतो. ते ऐकून राजा उद्गारतो:

राजा -- वयस्य,
स्वप्नो नु माया नु मतिभ्रमो नु। क्लिष्टं नु तावत्फलमेव पुण्यम्।
असंनिवृत्त्यै तदतीतमेते। मनोरथा नाम तटप्रपाता: ।। (१४५)

अर्थात -- मित्रा, ते स्वप्न होते, की ती माया होती, की तो बुद्धीला झालेला भ्रम होता की तेवढेच फळ पदरात टाकून पुण्य संपुष्टात आले? ते कधीही न परतण्यासाठी दूर निघून गेले आहे. हे मनोरथ म्हणजे कड्यावरून कोसळणारे धबधबे होत (ह्या चवथ्या चरणाचे टीकाकारांनी वेगवेगळे अर्थ दिले आहेत.) येथेही [३.९.१०] प्रमाणे four-part-series आहे.

येथील 'नु'ची आवृत्ती राजाची क्षणचंचल भावनिक आंदोलने व्यक्त करते.

(९) विदूषक राजाला विचारतो : शकुंतलेच्या ह्या चित्रात आणखी काय रेखाटणार आहेस? त्यावर सानुमती म्हणते : 'यो य: प्रदेश: सख्या मेऽभिरूपस्तं तमालेखितुकामो भवेत् ।' (१५१), अर्थात - माझ्या मैत्रिणीला जो-जो प्रदेश आवडतो तो-तो रेखाटण्याची त्याची इच्छा असावी.

(१०) धनमित्र नावाच्या एका व्यापाऱ्याची संपत्ती त्याच्या निधनामुळे गर्भवती असलेल्या त्याच्या एका विधवेच्या पोटातील अपत्याला मिळावी, असा आदेश दुष्यंत देतो. तेवढ्यात त्याचे मन पालटते आणि तो न्यायमंत्र्याकडे जाण्यास निघालेल्या प्रतीहारीस परत बोलावून म्हणतो :

राजा -- किमनेन संततिरस्ति नास्तीति ।
येन येन वियुज्यन्ते प्रजा: स्निग्धेन बन्धुना ।
स स पापादृते तासां दुष्यन्त इति घुष्यताम् (१५९)

अर्थात -- एखाद्याला संतती असली काय किंवा नसली काय, त्याने काय फरक पडतो? प्रजाजनांपैकी ज्याचा-ज्याचा आपल्या प्रेमळ आप्तजनापासून वियोग झालेला असेल त्याचा-त्याचा, पापी मनुष्य वर्ज्य करून, दुष्यंत हा प्रेमळ आप्तजन आहे, अशी घोषणा केली जावी. ही आवृत्ती दुष्यंताचे प्रजावात्सल्य प्रकट करते.

[३.११] उत्तरगर्भ प्रश्न

वक्तृत्वकलेकडून ज्या काही खुब्या वारसारूपाने लेखनकलेला लाभल्या आहेत, त्यांपैकी उत्तरगर्भ प्रश्न ही एक आहे. ज्याप्रमाणे एखादा कसलेला वक्ता आपल्या श्रोत्यांवर छाप पाडण्यासाठी किंवा त्यांची मने वळवण्यासाठी प्रभावी साधने शोधून काढतो, त्याप्रमाणेच ललित लेखकही आपल्या वाचकांच्या मनाची पकड घेण्यासाठी नानाविध युक्त्या हाताळतो. प्रस्तुतची युक्ती त्यांपैकीच एक होय. हिला rhetorical question किंवा dramatic question असेही म्हणतात. बोल्टनने उत्तरगर्भ (म्हणजे उत्तर आहे गर्भात किंवा पोटात ज्याच्या अशा) प्रश्नाची व्याख्या 'A question that assumes its own answer'[६०] (अर्थात - ज्या प्रश्नात त्याचे उत्तर गृहीत धरलेले असते असा प्रश्न) ह्या शब्दांत केली आहे. मॉरिसनने केलेली

Presented free of cost with compliments
from the Central Institute of Indian Languages
(Goveroment of India) Mysore 570006

व्याख्याही जवळजवळ अशीच आहे. ती व्याख्या अशी : "Rhetorical questions have an implied answer."[६१] (अर्थात, उत्तरगर्भ प्रश्नात उत्तर अध्याहृत/सूचित असते.) ह्याचे मुख्यत: दोन प्रकार असून ते टर्नरने पुढील शब्दांत प्रतिपादिले आहेत : "A positive question sometimes functions as a negative statement.....Conversely, a negative question.... represents a positive statement."[६२] (अर्थात - कधीकधी सकारात्मक प्रश्न नकारात्मक विधानाचे कार्य करतो तर उलट, कधीकधी नकारात्मक प्रश्न सकारात्मक विधान सूचित करतो).

शाकुंतलात ह्या उपायाची सुमारे बासष्ट उदाहरणे आढळतात. त्यांतील प्रातिनिधिक दहा उदाहरणांची आता चर्चा करू.

(१) राजा -- सरसिजमनुविध्दं शैवलेनापि रम्यं
मलिनमपि हिमांशोर्लक्ष्म लक्ष्मीं तनोति।
इयमधिकमनोज्ञा वल्कलेनापि तन्वी
किमिव हि मधुराणां मण्डनं नाकृतीनाम्। (१३)

अर्थात -- कमळ चहूकडून शेवाळाने व्यापलेले असले तरी रमणीय दिसते. चंद्रावरील डाग काळा असूनही त्याचे (चंद्राचे) सौंदर्य खुलवतो. ही (म्हणजे) शकुंतला वल्कल नेसलेली असली तरीही जास्त मोहक दिसत आहे. कारण सुबक अंगलटीच्या व्यक्तींना कोणती वस्तू अलंकार म्हणून शोभून दिसत नाही ?

ह्या नकारात्मक प्रश्नाचे 'कोणतीही वस्तू शोभून दिसते', हे सकारात्मक उत्तर प्रश्नातच गर्भित आहे. (जातीच्या सुंदरीला काहीही शोभते ही सूक्ती प्रसिद्धच आहे.)

(२) दुष्यंताला अनसूया व प्रियंवदा ह्या दोघी प्रश्नामागून प्रश्न विचारून तो कोण, कोठून आला, कशासाठी आला इत्यादी सर्व माहिती काढून घेतात. त्या संभाषणाच्या ओघात शकुंतला ही काश्यपांची मुलगी आहे हे त्याला कळलेले असते. ती त्याला आवडलेली असते. त्यामुळे तिच्याविषयी चौकशी करण्यासाठी तो विचारतो :

राजा -- भगवान् काश्यप: शाश्वते ब्रह्मणि स्थित इति प्रकाश:। इयं च व: सखी तदात्मजेति कथमेतत्। (२१)

अर्थात -- पूज्यपाद काश्यप आजन्म ब्रह्मचारी आहेत, ही बाब सर्वप्रसिद्ध आहे. मग तुम्हां दोघींची ही मैत्रीण त्यांची मुलगी हे कसे (शक्य आहे) ? ब्रह्मचारी मनुष्याला मुलगी असावी हे राजाला अनैसर्गिक व विचित्र वाटते. त्यातूनच हा प्रश्न उद्‌भवला आहे. 'हे शक्य नाही', हे गर्भित उत्तर.

(३) राजाच्या वरील प्रश्नाला उत्तर देऊन, विश्वामित्र हे शकुंतलेचे खरे जन्मदाते असून मेनका

ही तिची आई आहे; पण त्या दोघांनी हिला टाकल्यामुळे काश्यपांनी हिला वाढविले, हिचे पालनपोषण केले एवढ्याच नात्याने ते हिचे वडील होत, असा खुलासा अनसूया करते. तो ऐकून शकुंतला ही अप्सरेची मुलगी आहे ह्या सत्य परिस्थितीची खात्री पटल्यावर तो शकुंतलेची प्रशंसा पुढील शब्दांत करतो :

राजा -- उपपद्यते ।
मानुषीषु कथं वा स्यादस्य रूपस्य सम्भव: ।
न प्रभातरलं ज्योतिरुदेति वसुधातलात् । (२२)

अर्थात -- (मग) बरोबर आहे. अशा असामान्य लावण्यवतीचा जन्म मानवी स्त्रीच्या पोटी कसा संभवेल ? प्रकाशाने लवलवणारी ज्योत (ओबडधोबड) पृथ्वीच्या पृष्ठभागातून उगवणार नाही.

यातील सकारात्मक प्रश्नाचे उत्तर 'अशा लावण्यवतीचा जन्म मानवी स्त्रीच्या पोटी कदापि संभवणार नाही', हे आहे. ह्या नकारात्मक निर्जीव विधानापेक्षा मुळातला सकारात्मक प्रश्न अधिक सजीव व परिणामकारक आहे.

(४) राजा प्रियंवदेला आपली आंगठी देऊ करून तिच्या ऋणातून शकुंतलेला मुक्त करू इच्छितो. आंगठीवरील राजाचे नाव वाचून प्रियंवदा मिस्किलपणे म्हणते : 'सखे शकुंतले, महाराजांनी तुला मुक्त केले आहे ! आता तू स्वेच्छेनुसार जाऊ शकतेस.'

शकुन्तला -- (आत्मगतम्) यद्यात्मन: प्रभविष्यामि । (प्रकाशम्) का त्वं विसर्जितव्यस्य रोध्दव्यस्य वा ।' (२६)

अर्थात -- (स्वत:शी) जर माझा स्वत:वर ताबा राहिला असला (तर जाऊ ना !). (प्रकटपणे) मला जा म्हणून सांगणारी किंवा मला अडवणारी तू कोण (लागून गेलीस)?

शकुंतलेचा अभिप्राय असा की, 'मी राजाला पाहिल्यापासून मी 'माझी' राहिलेली नाही; मी 'त्याची' झालेली आहे ! त्यामुळे तू माझी बोळवणही करू शकत नाहीस किंवा अडवणूकही करू शकत नाहीस. तुझ्या कोणत्याही आदेशाला माझ्या लेखी किंमत शून्य !'

(५) शिकारीच्या नादापायी राजा जंगलामागून जंगले तुडवत आहे. त्याच्याशी असलेल्या मैत्रीमुळे आपले जेवण, विश्रांती, झोप इत्यादी सर्वच बाबतींत कसे आत्यंतिक हाल होत आहेत, त्याचे मोठे गंमतीदार वर्णन विदूषक करतो. शकुंतलेचे दर्शन झाल्यापासून तर राजा दिवसरात्र तिचेच चिंतन करीत असतो. ह्या दु:स्थितिवर्णनानंतर विदूषक 'का गति:' । (३१) एवढाच प्रश्न विचारतो. त्याचा अर्थ, 'कोणता उपाय/इलाज आहे ?' हा आहे. विदूषकाचा अभिप्राय असा की, ही दुर्दशा भोगण्याचे ललाटी आले आहे. तेव्हा ती भोगावीच लागणार. हिच्यापासून सुटका नाही. पूर्णपणे हताश होऊन त्याने विचारलेला हा उत्तरगर्भ प्रश्न त्याच्या,

'काल माझ्या अनुपस्थितीत त्याने शिकारीच्या निमित्ताने कण्वाश्रमात प्रवेश केला. तेथे माझ्या दुर्दैवाने शकुंतला त्याच्या दृष्टीस पडली. तेव्हापासून स्वारी राजधानीकडे परतण्याची गोष्टच काढीनासा झाला आहे' (३१), ह्या पूर्वोक्तीशी मिळताजुळताच आहे.

(६) राजा आपल्या आईने केलेल्या उपवासाचे पारणे फेडण्यासाठी विदूषकाला आपला प्रतिनिधी म्हणून जाण्यास सांगतो. ते ऐकून विदूषक राजाला म्हणतो : 'मी राक्षसांना भितो म्हणून तुझ्या सूचनेचा स्वीकार केला आहे,असे मात्र समजू नकोस हं !' (४८). त्यावर राजा उपहासाने म्हणतो :

राजा -- (सस्मितम्) भो महाब्राह्मण। कथमेतद् भवति संभाव्यते।' (तत्रैव)

अर्थात -- (हसून) हे श्रेष्ठ ब्राह्मणा ! हे तुझ्या बाबतीत कसे शक्य आहे ?

'हे तुझ्या बाबतीत मुळीच संभाव्य नाही', हे ह्या प्रश्नाचे सरळ उत्तर झाले. पण राजाला मनातून म्हणावयाचे आहे : 'हे महाब्राह्मणा, तू केवढा निर्भय, केवढा निधड्या छातीचा ! तू आणि राक्षसांना भिणार ? शक्यच नाही !' हेच वाक्य 'भवति' शब्दावर जोर देऊन व तो शब्द वाक्यारंभी योजून उच्चारले तर क्रमविपर्यय ह्या शैली-उपायाचे (ह्या उपायाचा विचार [३.१२ मध्ये] करावयाचाच आहे) उदाहरण ठरू शकते.

(७) शकुंतला राजाविषयी वाटणाऱ्या आपल्या प्रेमाची कबुली आपल्या मैत्रिणींपाशी देते. ती त्यांना निर्वाणीची विनवणी करते. 'ज्या योगे राजाला माझ्याविषयी अनुकंपा वाटेल असे काहीतरी त्वरित करा. नाहीतर मला तिलांजली देण्याची तुमच्यावर वेळ येईल'. हे ऐकून अनसूया व प्रियंवदा या दोघी चरकतात व आता वेळ न दवडता शकुंतलेचे अभिनंदन करून तिला आनंदित केले पाहिजे असे ठरवतात. लपून बसलेला व हे संभाषण ऐकणारा राजा ह्या बेतात सामील होतो आणि मग तिघं तीन उत्तरगर्भ प्रश्न एकामागोमाग एक असे विचारतात :

अनसूया -- (प्रकाशम्) सखि,दिष्ट्यानुरूपस्तेऽभिनिवेशः। सागरमुज्झित्वा कुत्र वा महानदी अवतरति। (५९)

अर्थात -- (प्रकटपणे), गडे, सुदैवाने तुझे प्रेम अनुरूप (पुरुषावर) जडले आहे. नाहीतरी महानदी सागराला सोडून दुसरीकडे कोठे जाणार ? महानदी सागरातच विलीन होणार, हे उत्तर प्रश्नातच दडलेले आहे.

प्रियंवदा -- क इदानीं सहकारमन्तरेण अतिमुक्तलतां पल्लवितां सहते। (तत्रैव)

अर्थात -- पूर्णपणे पालवलेल्या अतिमुक्त वेलीचा भार आम्रवृक्षाखेरीज दुसरा कोणता वृक्ष सहन करू शकतो ? (कोणताही नाही, हे उत्तर)

राजा -- किमत्र चित्रं यदि विशाखे शशाङ्कलेखामनुवर्तेते। (तत्रैव)

अर्थात -- जर विशाखा नक्षत्रे चंद्रकोरीच्या मागोमाग गेली तर त्यात नवल ते काय ? (अनसूया व प्रियंवदा म्हणजे जणू दोन विशाखा. ह्यांनी जर

आपल्या चंद्रकलावत मैत्रिणीचा अनुनय केला / तिचे मन जपले, तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काय आहे ?)

येथील तिन्ही प्रश्नांची सूचित उत्तरे नकारात्मक आहेत. शिवाय पहिल्या दोन्ही प्रश्नांची शब्दकळा संबंधित व्यक्तींच्या स्वभावधर्मास अनुरूप आहे. अनसूयेचा प्रौढगंभीरपणा आणि प्रियंवदेचा स्वाभाविक प्रसन्नपणा. राजाची उक्ती त्या दोघींच्या कृतीचे अनुमोदन करणारी आहे. कालिदासाला असे सलग तीन उत्तरगर्भ प्रश्न सुचले यातच त्याच्या 'अपूर्ववस्तुनिर्माणक्षमतेची' महत्ता आहे.

(८) शकुंतला गौतमी व ऋषिजन यांच्यासह राजाच्या दरबारात येते. तिला पत्नी म्हणून स्वीकारण्याची विनंती ऋषी राजाला करतात. तो दुर्वासाच्या शापामुळे तिला विसरून गेलेला असतो. तेव्हा ती त्याला पूर्वीच्या एकेका प्रसंगाची आठवण करून देऊ लागते. राजा तिला फसवी किंवा खोटारडी म्हणतो. गौतमी राजाच्या ह्या आरोपाचा निषेध करते. तेव्हा राजा तिला उद्देशून म्हणतो :

राजा -- तापसवृद्धे, स्त्रीणामशिक्षितपटुत्वममानुषीषु
संदृश्यते किमुत याः प्रतिबोधवत्यः । (११९)

अर्थात -- स्त्रियांचे नैसर्गिक शहाणपण मनुष्येतर माद्यांमध्येही दिसून येते. तर मग ते शिक्षित / प्रबुद्ध स्त्रियांत आढळल्यास नवल ते काय ? 'कोणतेही नवल नाही' हे ध्वनित उत्तर.

(९) राजाने वसंतोत्सवावर बंदी का घातली ते जाणून घेण्याचे कुतूहल उद्यानपालिकांच्या मनात असते. कंचुकीने ते शमवावे अशी त्याला त्या विनंती करतात. तेव्हा -

कञ्चुकी -- बहुलीभूतमेतत् किं न कथ्यते । (१३७)

अर्थात -- हे सर्वदूर पसरले आहे (म्हणजे सर्वांना ठाऊक झाले आहे). मग का सांगू नये ? 'बिनदिक्कत सांगून टाकावे', हे अन्तर्निहित उत्तर.

(१०) आपले धर्मपत्नीशी पुनर्मिलन झाले आणि पुत्रमुखदर्शनही झाले, ही हकीकत इंद्राला कळली नसावी असे वाटून दुष्यंत मातलीला म्हणतो :

राजा -- मातले, न खलु विदितोऽयमाखण्डलेन वृतान्तः स्यात् ।

मातलिः -- (सस्मितम्) किमीश्वराणां परोक्षम् । (१८९)

अर्थात -- मातली, ही बातमी इंद्राला कळली नसावी असा माझा कयास आहे.
-- देवांच्या दृष्टीला न दिसणारे असे काय असते ?
ह्या उत्तरगर्भ प्रश्नाचे उत्तर - 'न खलु ईश्वराणां किमपि अप्रत्यक्षं नाम ।' अशा शब्दांत देता येईल.

एकंदरीने कवीने मोठ्या कौशल्याने उत्तरगर्भ प्रश्न हा उपाय हाताळला आहे.

[३.१२] क्रमविपर्यय

क्रम म्हणजे वाक्यातील शब्दांचा क्रम. प्रत्येक भाषेत वाक्यातील शब्दांचा विशिष्ट क्रम पाळावा लागतो. उदाहरणार्थ, मराठीत तो कर्ता, कर्म, क्रियापद असा असतो, तर इंग्रजीत तो कर्ता, क्रियापद, कर्म असा असतो. संस्कृतात शब्दानुक्रमाचे हे बंधन काटेकोरपणे पाळावे लागत नाही. उदाहरणार्थ, 'रामः गोविन्दं पश्यति।' हे वाक्य 'गोविन्दं रामः पश्यति।', 'पश्यति रामः गोविन्दम्' इत्यादींपैकी कोणत्याही प्रकारे लिहिले तरी अर्थ बदलत नाही. परंतु ह्याचा अर्थ असा नव्हे की, ह्याबाबतीत पूर्णपणे अनिर्बंधपणा असतो किंवा खपतो. ह्याविषयीचे नियम व्याकरणात सांगितलेले असतात.

परंतु, ललित लेखकाला जेव्हा एखाद्या अर्थावर, विचारावर वा कल्पनेवर जोर द्यावयाचा असतो तेव्हा तो व्याकरणमान्य शब्दक्रमात बदल करतो व अभीष्ट हेतू साधतो. बॉवडेनने म्हटलेच आहे की, "Still another means of varying the sentence structure to achieve emphasis is inversion"[६३] त्याच्या मते, जेव्हा एखाद्या विशिष्ट शब्दावर जोर देण्यासाठी 'normal, easy, natural word order of English' पाळलेली नसते व तिच्यात उलटफेर केलेला असतो तेव्हा inversion हा रचनाप्रकार घडून येतो. बोल्टन ह्या लेखिकेनेही 'Turning round the order of words so as to give special emphasis to one word of group"[६४] ह्याच शब्दांत inversion च्या स्वरूपाचे वर्णन केले आहे. शाकुंतलातील एक उदाहरण घेऊन हा मुद्दा स्पष्ट करू.

'अयं आभोगस् तपोवनस्य इति अकथितोऽपि ज्ञायते एव।' या वाक्यातील 'अकथितोऽपि' या शब्दांवर जोर देण्याच्या हेतूने कालिदासाने 'अकथितोऽपि ।।यत एव यथायमाभोगस् तपोवनस्येति' । (८) असा शब्दानुक्रम बदलला आहे. तो कालिदासाच्या मनातील हेतू अचूकपणे साधणारा आहे (वरील वाक्याचा अर्थ 'न सांगताही हे समजतेच / लक्षात येतेच की, हा तपोवनाचा परिस्र आहे !, असा आहे). अशा प्रकारे मर्मस्थानीय शब्दाचे स्थानांतर केल्याने बॉवडेनच्या मतानुसार एखाद्या सामान्य विधानाचे संस्मरणीय वचनात रूपांतर साधता येते ("to raise the sentence from a commonplace statement to a memorable expression") [६५] पाश्चात्य शैलीशास्त्रज्ञांनी ह्याबाबतीत असा इशारा देऊन ठेवला आहे की, हा शैली-उपाय कितीही उत्कट परिणाम साधणारा असला तरी त्याच्या प्रयोगामागे नियोजन किंवा प्रयोजन नसल्यास तो चमत्कारिक व दुर्बळ ठरतो. शिवाय, ह्याचा किंवा कोणत्याही शैली-उपायाचा वारंवार उपयोग केल्यास लेखन कृत्रिमतेच्या दोषास पात्र ठरते. आता ह्या पार्श्वभूमीवर शाकुंतलाचे निरीक्षण करू. शाकुंतलात ह्याची सुमारे पन्नास उदाहरणे दिसतात.

(१) आश्रमवासियांना शिकारीपासून त्रास होऊ नये व त्यांना शांतपणे जीवन जगता यावे म्हणून राजा शिकार थांबवण्याचा निर्णय घेतो. तो सेनापतीला आदेश देतो की, हाकाऱ्यांना परत बोलावून घ्या आणि सैनिकांना ताकीद द्या की, त्यांनी तपस्व्यांना त्रास देऊ नये. शिकारीचा

राजाला इतका वीट येतो की, हातात धनुष्यबाण घेऊन शिकारीच्या तयारीने आलेल्या यवनस्त्रियांना उद्देशून तो म्हणतो :

राजा -- (परिजनं विलोक्य) अपनयन्तु भवत्यो मृगयावेशम् । (३८)

अर्थात -- उतरवा बघू (अगोदर) तो शिकारीचा पोशाख.
सेवकांकडे पाहून उच्चारलेल्या या वाक्यात 'अपनयन्तु' वर जोर दिलेला आहे.

(२) अनसूया अतिशय जिव्हाळ्याने शकुंतलेला विचारते - तुझ्या जीवाची अशी उलघाल का चालली आहे ? तुला काय होत आहे ते तू सांगितल्याशिवाय उपाययोजनेस तरी सुरुवात कशी करता येईल ? हे ऐकून झाडाआड लपलेला राजा म्हणतो :

राजा -- अनसूयामपि अनुगतो मदीयस्तर्कः । न हि स्वाभिप्रायेण मे दर्शनम् । (५६)

अर्थात -- अनसूयेलाही माझी (चिंतायुक्त) जिज्ञासा जाणवलेली दिसते. माझे मत (केवळ) स्वतःच्या (स्वार्थी) हेतूनुसार बनलेले नव्हते.
या वाक्यात 'अनसूयां अपि' या शब्दांवर कवीला वाचकाचे लक्ष खिळवावयाचे आहे.

(३) शकुंतला राजाच्या विरहव्याकुळ 'अंतःपुरा'चा उल्लेख करते. तो ऐकून राजा तिला आश्वासक शब्दांत सांगतो की, आपल्या मनात दुसऱ्या कोणत्याही स्त्रीविषयी प्रेम नाही, आपल्या मनात फक्त शकुंतलाच आहे. ते ऐकून गंभीर स्वभावाची अनसूया राजाला एका विदारक सत्याची जाणीव पुढील शब्दांत करून देते :

अनसूया -- वयस्य, बहुवल्लभा राजानः श्रूयन्ते । (६५)

अर्थात -- मित्रा, खूप बायका असतात राजे लोकांना, असे ऐकिवात आहे.

अनसूयेला 'बहुवल्लभा' शब्दावर जोर देऊन 'त्या अनेकींत हिची भर घालून हिला उपेक्षू नकोस; हृदयसंनिहिते असे जे संबोधन तू नुकतेच हिच्या बाबतीत वापरलेस ते खरोखर मनापासूनचे होते हे कृतीने सिध्द कर', अशी जरब राजाला बसवावयाची असते.

(४) शकुंतला दुष्यंताच्या चिंतनात बुडालेली असल्यामुळे दुर्वासाकडे दुर्लक्ष करते, म्हणून तो तिला शाप देतो. ह्याची जाणीव होताच त्याचे मन वळवण्यासाठी व त्याने शकुंतलेचा हा पहिलाच अपराध आहे हे लक्षात घेऊन तिला क्षमा करावी, अशी त्याची मनधरणी करण्यासाठी अनसूया त्याच्या मागे धावत जाते. उःशाप मिळवून परत येताच ती प्रियंवदेला म्हणते : त्या प्रकृतिवक्र ऋषीने थोडीशी सहानुभूती दर्शवली. ते ऐकून -

प्रियंवदा -- (सस्मितम्) तस्मिन् बह्वेतदपि । कथय । (७५)

अर्थात -- (स्मित करून) त्याच्या बाबतीत हे सुद्धा पुष्कळच (असे मानावयास हवे). सांग

प्रियंवदेला असे सुचवावयाचे आहे की, दुर्वास इतकी सहानुभूती दर्शवील असेसुद्धा वाटले नव्हते. तो शीघ्रकोपी आणि आगीसारखा इतरांना जाळून टाकणारा आहे, हे त्याचे स्वभाववैशिष्ट्य ध्यानात घेऊन प्रियंवदेने 'तस्मिन्' शब्द वाक्यारंभी योजिला आहे.

(५) शकुंतला जेव्हा पतिगृही जाण्यास निघते तेव्हा ती काश्यपांना विचारते : बाबा, अनसूया व प्रियंवदा ह्या माझ्या मैत्रिणी येथूनच परतणार का (माझ्याबरोबर येणार नाहीत का?) त्यावर काश्यप खुलासा करतात -

काश्यपः -- वत्से, इमे अपि प्रदेये। न युक्तमनयोस् तत्र गन्तुम्। त्वया सह गौतमी यास्यति। (९७)

अर्थात -- मुली, यांनाही उजवावयाचे आहे. यांनी तेथे जाणे योग्य नाही. तुझ्याबरोबर गौतमी येईल.

काश्यपाच्या मनातील भीती अशी की, राजाला अगोदरच बऱ्याच बायका आहेत. न जाणो, उद्या ह्या दोघींविषयीही त्याच्या मनात प्रेम उत्पन्न झाले तर शकुंतलेची परवड होईल. म्हणून तो वरीलपैकी दुसऱ्या वाक्याचा आरंभ 'न युक्तं' या शब्दांनी विचारपूर्वक करतो.

(६) दुष्यंताला शकुंतलेशी आपण लग्न केल्याचे व ती आपली पत्नी असल्याचे (दुर्वासाच्या शापाच्या परिणामी) आठवत नाही. त्याची खात्री पटवण्यासाठी शकुंतला त्याला आंगठी दाखवण्यास प्रवृत्त होते, पण बोटात आंगठी नसल्याचे तत्क्षणी तिच्या लक्षात येते. तेव्हा 'शचीतीर्थाला वंदन करताना आंगठी तिच्या हातातून निसटली व गंगाप्रवाहात पडली', अशा शब्दांत गौतमी तिची बाजू सावरण्याचा प्रयत्न करते. त्यावरचे राजाचे विदारक भाष्य असे :

राजा -- (सस्मितम्) इदं तत् प्रत्युत्पन्नमति स्त्रैणमिति यदुच्यते। (११७)

अर्थात -- (स्मित करून) स्त्रियांचा हजरजबाबीपणा म्हटला जातो, तो हा. 'प्रत्युत्पन्नमति स्त्रैणं इति यदुच्यते तद् इदम्' हे वाक्य बाळबोध व प्रभावहीन वाटते. तेच वरील परिवर्तित शब्दयुक्त वाक्य चित्तवेधक वाटते.

(७) मच्छीमाराला रोहित माशाच्या पोटात आंगठी कशी सापडली ते ऐकून राजाला शकुंतलेची तीव्रतेने आठवण होते आणि मच्छीमार निर्दोष असल्याचे पटते. राजा श्यालाच्या हस्ते मच्छीमाराला आंगठीच्या किंमतीइतके बक्षीस देतो. तेव्हा रक्षकांपैकी एक जो 'सूचक' तो म्हणतो :

सूचकः -- एष नामानुग्रहो यच्छूलादवतार्य हस्तिस्कन्धे प्रतिष्ठापितः। (१३०)

अर्थात -- याचे नाव कृपाप्रसाद की जो सुळावरून उतरवून हत्तीच्या खांद्यावर (की पाठीवर ?) सन्मानाने बसवतो.

(८) मधुकरिका नावाची उद्यानपालिका परभृतिका नामक आपल्या सहयोगिनीस 'मला जरा धरून ठेव. मी टाचा उंचावून चवड्यांवर उभी राहते, आंब्याचा मोहोर तोडते आणि

कामदेवाची पूजा करते', अशी विनंती करते. तेव्हा -

प्रथमा -- यदि ममापि खल्वर्धमर्चनफलस्य ।

द्वितीया -- अकथितेऽप्येतत् संपद्यते । यत एकं नौ जीवितं द्विधास्थितं शरीरम् । (१३४)

अर्थात -- जर पूजेपासून प्राप्त होणारे अर्धे फल (=पुण्य) मला मिळणार असेल (तर पूजा होईपर्यंत मी तुला धरून ठेवीन).

-- न सांगताही ते तुला मिळेल. कारण आपले दोघींचे जीवित एकच आहे. (केवळ) शरीर दोन ठिकाणी विभागलेले आहे.

'अकथितेऽपि' हे शब्द सुरुवातीस का योजले आहेत त्याचा खुलासा 'यत:...' इत्यादी दुसऱ्या वाक्याने आपोआपच होतो. म्हणून 'अकथितेऽपि' शब्दांचे तेच स्थान योग्य आहे, असा निर्वाळा वाचकांचे मन देते.

(९) राजा स्वत:च रेखाटलेले शकुंतलेचे चित्र घेऊन विदूषकाला खेदाने सांगतो : रात्री झोप लागत नसल्यामुळे प्रियेचे स्वप्नातीलही मिलन थांबले आहे आणि डोळ्यातील हे अश्रू चित्रातीलही प्रियेला पाहू देत नाहीत (१५६). तेव्हा -

सानुमती -- सर्वथा प्रमार्जितं त्वया प्रत्यादेशदु:खं शकुन्तलाया: । (१५६)

अर्थात -- शकुंतलेचा अस्वीकार करून तू जे तिला (दारुण) दु:ख दिलेस त्याचे (तुझ्या ह्या उद्गारांनी) सर्वतोपरी निवारण झाले. आता दु:ख नुरले ! या वाक्यात 'सर्वथा' शब्द सुरुवातीलाच हवा; तेच त्याचे योग्य स्थान.

(१०) पूज्यपाद मारीच मातलीच्या मार्फत राजाला बोलावणे पाठवतात. तेव्हा -

राजा -- शकुन्तले, अवलम्ब्यतां पुत्र: । त्वां पुरस्कृत्य भगवन्तं द्रष्टुमिच्छामि । (१८९)

अर्थात -- शकुंतले, मुलाला धर. तुला पुढे करून मी पूज्यपाद मारीचांचे दर्शन घेऊ इच्छितो.

'त्वां पुरस्कृत्य' शब्द वाक्यारंभी वापरून कालिदासाच्या दुष्यंताने शकुंतलेवर पूर्वी केलेल्या अन्यायाचे मनोमन परिमार्जन करण्याची उत्कट इच्छा दर्शविली आहे, तिच्याविषयी दाक्षिण्यपूर्वक प्रेम प्रदर्शित केले आहे आणि तिचा बहुमान केला आहे. एकंदरीने कालिदासाने हा शैली-उपाय सुज्ञपणे हाताळला आहे.

[३.१३] नकार

ह्यापूर्वी उत्तरगर्भ प्रश्नाच्या [३.११] संदर्भात नकारात्मक विधानांचा विचार केला होता. आता एका वेगळ्या नकाररूप शैलीउपायाचा परामर्श घ्यावयाचा आहे. एखादी गोष्ट सकारात्मक विधानाद्वारे सांगितली तर ती तितकीशी मनावर ठसत नाही, ती तितकीशी खरी आहे असे

वाटत नाही किंवा ती तितकीशी मान्य करावीशी वाटत नाही. पण ती नकारात्मक विधानाने मनावर ठसते, खरी वाटते व मान्य होते. उदाहरणार्थ, शाकुंतलातील नारद नावाच्या ऋषिकुमाराचा खालील नकारयुक्त उद्गार अवलोकनीय आहे.

'नैतच्चित्रं यदयमुदधिश्यामसीमां धरित्री-।
मेकः कृत्स्नां नगरपरिघप्रांशुबाहुर्भुनक्ति ॥ (४५)

अर्थात -- ज्याचे हात नगराच्या प्रवेश (द्वारा-) च्या अडसरासारखे लांब आहेत, असा हा दुष्यंत, जिच्या सरहद्दी महासागरांमुळे कृष्णवर्णीय झाल्या आहेत अशा समग्र पृथ्वीचे, एकटाच संरक्षण करतो यात आश्चर्य (मुळीच) नाही. असे महत्कृत्य त्याच्या प्रखर पराक्रमाला साजेसेच आहे. हा आशय नकाराद्वारे विश्वसनीय वाटतो. ज्याप्रमाणे नकाराद्वारे मनाची दोलायमान स्थिती स्थिर किंवा दृढ करता येते किंवा संदेहाचे निराकरण करता येते, त्याप्रमाणेच दोन नकार वापरून एखाद्या गोष्टीविषयीचा ठामपणाही व्यक्त करता येतो. उदाहरणार्थ, 'राजाने झिडकारल्याने शकुंतलेला दुःख झाले नाही असे नाही', अशा नकारात्मक विधानाचा अर्थ 'खूप दुःख झाले/अवश्य दुःख झाले' असा होतो. अशा प्रयोगांचा अनुभव आपल्या सर्वांनाच येतो. मॉरिसनने नकार ह्या शैली-उपायाची उपयुक्तता पुढील शब्दांत वर्णिली आहे : 'Negatives not only help to describe things, they also help to clarify ideas...''[६६] आता कालिदासाने हा उपाय कसा हाताळला आहे ते लक्षात घेऊ.

(१) राजा जेव्हा वैखानसाच्या विनंतीवरून कण्वाश्रमात जातो तेव्हा त्याला वल्कले नेसलेली शकुंतला झाडांना पाणी घालत असल्याचे दृश्य दिसते. शकुंतलेसारख्या असामान्य लावण्यवतीला ही वल्कले शोभत नाहीत असे त्याचे प्रथमदर्शनी मत बनते. पण लगेच दुसरा विकल्प त्याच्या मनात येतो व तो पुढील शब्दांत प्रकट करतो.

राजा -- अथवा काममननुरूपमस्या वपुषो वल्कलं न पुनरलङ्कारश्रियं न पुष्यति। (१३)

अर्थात -- हिच्या शरीराला वल्कल साजेसे नाही हे जरी मान्य केले तरी हे प्रसाधनाच्या सौंदर्याचा परिपोष करीत नाही असे नाही (अर्थात जरूर करते).

(२) शकुंतलेविषयी माहिती काढून घेण्याच्या ओघात राजाला प्रियंवदेकडून असे कळते की, शकुंतला धार्मिक कर्तव्यांच्या पालनाच्या बाबतीत परावलंबी आहे; शिवाय वडिलांनी तिला अनुरूप वराला देण्याचा संकल्प सोडला आहे. हे ऐकून -

राजा -- (आत्मगतम्) न दुरवापेयं खलु प्रार्थना। (२४)

अर्थात -- ही अभिलाषा खरोखर दुष्प्राप्य नाही.

राजाचे मनोगत असे : काश्यपांची ही अपेक्षा आपण सहजपणे पूर्ण करू शकू. कारण आपल्यासारखा अन्य अनुरूप वर दुसरा कोणता असू शकेल ? आपण मागणी घातली तर

काश्यप ती कशी नाकारतील ? एकंदरीने काश्यपांची व आपली स्वत:ची अशा दोघांच्याही अभिलाषा सुलभतेने पुऱ्या होण्याजोग्या आहेत. न व दुर् ह्या नकारद्वयाने हे सर्व साधले आहे.

(३) आश्रमाला रात्रीच्या वेळी त्रास देणाऱ्या राक्षसांपासून रक्षण करण्याची विनंती करण्यासाठी दोन ऋषिकुमार राजाच्या मुक्कामाच्या ठिकाणी येतात. दोघेही राजाच्या रुबाबदार व्यक्तित्वाकडे पाहतात. त्यांपैकी एकजण-गौतम-म्हणतो-

प्रथम: -- अहो दीप्तिमतोऽपि विश्वसनीयतास्य वपुष: । अथवोपपन्नमेतदृषिभ्यो नातिभिन्ने राजनि । (४४)

अर्थात -- अहो, ह्याचे व्यक्तित्व तेजस्वी असूनही किती विश्वासोत्पादक आहे ! अथवा ऋषींहून फार वेगळ्या नसलेल्या राजाच्या बाबतीत असे (वाटणे) योग्य(च) आहे.

येथील नातिभिन्ने शब्दाद्वारे'ऋषींसारख्याच असलेल्या' हा आशय अंत:करणापर्यंत पोचवला गेला आहे.

(४) अनसूया व प्रियंवदा ह्या दोघींना शकुंतलेची प्रणयबाधेमुळे झालेली शारीरिक दुर्दशा बघवत नाही. 'तुझ्या ह्या मनोव्यथेचे खरे स्वरूप आम्हांला समजावून सांग, म्हणजे योग्य ती उपाययोजना करता येईल', असे अनसूया शकुंतलेला विनवते तर 'आपली उपेक्षा का करीत आहेस ?' ह्या शब्दांत प्रियंवदा आपली चिंता व्यक्त करते. तेव्हा -

राजा -- अवितथमाह प्रियंवदा । (५६)

अर्थात -- प्रियंवदा जे बोलली ते खोटे नाही.

म्हणजेच ती जे काही बोलली त्यात शंभर टक्के सत्य आहे. हा भावात्मक (positive) प्रत्यय नकारात्मक शब्दांद्वारे येतो. राजा वरील वाक्य उच्चारल्यानंतर 'क्षामक्षाम ....' इत्यादी श्लोकाद्वारे शकुंतलेच्या शारीरिक कृशतेचे जे वर्णन करतो त्याची पुष्टीच होते.

(५) वरील (४) मधील संभाषण चालू ठेवून अनसूया व प्रियंवदा शकुंतलेला आपल्या व्यथेची कथा मोकळेपणाने सांगण्याचा आग्रह धरतात. त्या तिला आपुलकीभऱ्या शब्दांनी हेही पटवून देतात की, आपले दु:ख जिव्हाळ्याच्या व्यक्तींना सांगितले की सुसह्य बनते. हे सर्व ऐकून राजा म्हणतो -

राजा -- पृष्टा जनेन समदु:खसमेन बाला ।
नेयं न वक्ष्यति मनोगतमाधिहेतुम् । (५७)

अर्थात -- ह्या मुलीच्या सुखदु:खांशी एकरूप झालेल्या व्यक्तींनी विचारले असता ही आपल्या मनातील व्यथेचे कारण सांगणार नाही, असे (होणार) नाही.

येथील नकाराची द्विरुक्ती 'ही आपल्या मनाला बोचत असणारे शल्य निश्चितपणे सांगेल, किंबहुना सांगेलच सांगेल', असा सकारात्मक अर्थ ठाशीवपणे व्यक्त करते. कालिदासाने

नकाराचे हे सामर्थ्य अचूकपणे हेरून वापरले आहे.

(६) शकुंतलेचा व ऋषिजनांचा निरोप घेऊन राजा राजधानीला परत जातो. त्यानंतर बराच कालावधी लोटतो. पण राजाकडून पत्रही येत नाही किंवा शकुंतलेला घेऊन जाणारा सेवकही येत नाही. त्यामुळे 'राजाला आश्रमातील घटनांची आठवण तरी आहे की नाही, कुणास ठाऊक', अशा शब्दांत अनसूया काळजी व्यक्त करते. पण प्रियंवदेचा रुबाबदार व्यक्तित्वाच्या राजावर विश्वास असतो. ती म्हणते -

प्रियंवदा -- विस्रब्धा भव । न तादृशा आकृतिविशेषा गुणविरोधिनो भवन्ति । (७२)

अर्थात -- निश्चिंत अस. तशा प्रकारच्या म्हणजे असाधारण व्यक्तित्वाच्या व्यक्तीकडून (व्यक्तित्वाला अनुरूप अशा) गुणांच्या विरुद्ध वर्तन होणारच नाही.

'तादृशा आकृतिविशेषा गुणसंवादिन: भवन्ति एव ।' अशा सकारात्मक वाक्यापेक्षा कालिदासाने योजलेले वरील नकारात्मक वाक्य अधिक विश्वासोत्पादक वाटते. शिवाय त्यात प्रियंवदेचा राजावरील विश्वासही मुखरित होतो.

(७) काश्यप ऋषी राजाला सांगावयाचा संदेश शाङ्र्गरवाला ऐकवून झाल्यावर शकुंतलेकडे वळून तिला म्हणतात : मुली, तुलाही काही उपदेश करावयाचा आहे. जरी आम्ही 'वनवासी' असलो तरी लौकिक व्यवहार-आचार आम्हाला चांगले कळतात बरं ! हे ऐकून शाङ्र्गरव काश्यपांबद्दल पुढील आदरोद्गार काढतो :

शाङ्र्गरव:-- न खलु धीमतां कश्चिदविषयो नाम । (९६)

अर्थात -- खरोखर बुद्धिमंतांना अनाकलनीय (असा एकही) विषय नसतो, हे खरेच (आहे).

बुद्धिमान व्यक्तींना प्रत्येक विषयात गती असते. त्यांना अगम्य असा कोणताही विषय नसतो. वरील वाक्याऐवजी 'धीमतां खलु सर्व: विषय: गम्य: एव'असे सकारात्मक वाक्य वापरले गेले असते तर ते सपाट ठरले असते, हे कोणताही रसिक सानंद मान्य करील.

(८) शकुंतलेला राजासमोर हजर करता-करताच शाङ्र्गरव आपली प्रतिक्रिया पुढील शब्दांत व्यक्त करतो :

शाङ्र्गरव:-- शारद्वत,

महाभाग: कामं नरपतिरभिन्नस्थितिरसौ ।
न कश्चिद् वर्णानामपथमपकृष्टोऽपि भजते ।। (१०८)

अर्थात -- हा वैभवशाली राजा आपल्या कर्तव्यापासून ढळत नाही, हे मान्य. अगदी निकृष्ट वर्णाचाही कोणी कुमार्गाचा अवलंब करीत नाही.

म्हणजेच कर्तव्यपरायण असलेल्या ह्या सम्राटाच्या राज्यात उच्चवर्णीयांपासून तो नीचवर्णीयांपर्यंत सर्व जण शास्त्रविहित मार्गानुसारच आचरण करतात. राजाने स्वत:च्या आचरणाने सर्वांसमोर एक आदर्श ठेवला आहे त्याचा हा परिणाम आहे, हा शाङ्गरवाच्या नकारोक्तीचा मथितार्थ आहे.

(९) राजाला शकुन्तलेची ओळख (दुर्वासाच्या शापाच्या प्रभावामुळे) पटत नाही. म्हणून गौतमी शकुंतलेच्या चेहऱ्यावरील बुरखा दूर करते. तेव्हा राजा तिच्याकडे निरखून पाहतो. त्याला तिचे असामान्य लावण्य प्रतीत होते, पण तिच्याशी विवाह केल्याचे आठवत नाही. अशा गोंधळलेल्या मन:स्थितीत तो जो 'इदं उपनतं ...' (११४) इत्यादी श्लोक म्हणतो, त्याचा शेवटचा चरण असा आहे.

-- न खलु सपदि भोक्तुं नैव शक्नोमि हातुम् । (तत्रैव)

अर्थात -- मी एकाएकी हिचा उपभोगही घेऊ शकत नाही, तसेच हिचा त्यागही करू शकत नाही. राजाची ही 'तळ्यात की मळ्यात' अशी जी स्थिती झाली आहे, ती नकाराने सौष्ठवपूर्ण रीतीने व्यक्त झाली आहे.

(१०) मारीच व राजा यांच्या भेटीची वेळ ठरविण्यासाठी राजाला एकट्याला आश्रमाच्या परिसरात सोडून मातली निघून जातो. राजा तेथे आत्मनिखंदना करीत उभा असताना पडद्यामागून एकाएकी 'मा खलु मा खलु चापलं कुरु । कथं गत एवात्मन: प्रकृतिम् ।' (१७६), अर्थात, अरे, असा अविचार करू नकोस. शेवटी गेलाच का आपल्या वळणावर !, हे अनपेक्षित शब्द ऐकून -

राजा -- (कर्णं दत्वा) अभूमिरियमविनयस्य । को नु खलु एष निषिध्यते । (१७६)

अर्थात -- (कान देऊन) अविनयाने/दांडगाईने वागण्याचे हे स्थळ नाही. हा (येथे) कोणाला प्रतिबंध केला जात आहे ?

येथे नम्रतेनेच वागावयास हवे, हे नकाराद्वारे मनावर ठसविले आहे.

[३.१४] प्रच्छन्न संदर्भोल्लेख /

बहुश्रुत ललित लेखकाला लेखनाच्या ओघात प्राचीन ऐतिहासिक किंवा पौराणिक व्यक्ती, घटना, प्रसंग, हकीगती, कथा यांचे स्मरण होते व तो त्यांची गुंफण आपल्या लेखनात औचित्याचे व आवश्यकतेचे बंधन पाळून करतो. अशी गुंफण ललित लेखकाच्या साहित्यिक कौशल्याचे एक अंग मानली जाते. अशा गुंफणीला allusion म्हणतात. कोहेनने ह्या शैली-उपायाची व्याख्या पुढील शब्दांत केली आहे :

"An allusion is a reference, real or fictional, to someone, some event, or something in the Bible, History, literature, or any phase of culture. The reference will have an original meaning, but it must be studied in the context of the literary work in which it appears."[६७]

पाश्चात्य समीक्षकांनी अशा बऱ्याच संदर्भोल्लेखांची चर्चा केली असून आनंदवर्धनोक्त अनेक ध्वनि-प्रकारांचा उलगडा अशा उल्लेखांद्वारे करता येतो, असे विवेचन राजेन्द्रन् यांनीही केले आहे.[६८]

अशा उल्लेखांना मूळचा अर्थ असतो हे खरे, परंतु कविकृत प्रयोगात तो मूळचा अर्थ अभिप्रेत नसतो; तर ज्या संदर्भात त्याचा प्रयोग झालेला असतो, त्या संदर्भात त्याच्या अर्थाचे ग्रहण करावयाचे असते. आता ह्या दृष्टीने शाकुंतलाचे निरीक्षण करू.

(१) शाकुंतलाच्या 'या सृष्टिः स्रष्टुराद्या....' (१) इत्यादी नांदीश्लोकात भगवान शंकराची जल, अग्नी, यजमान, सूर्य, चंद्र, आकाश, पृथ्वी व वायू ही पुराणोक्त आठ रूपे वर्णिलेली आहेत. ही अष्टरूपे म्हणजे संपूर्ण सृष्टी. ही रूपे प्रत्यक्षात डोळ्यांना दिसणारी असतात. भविष्यपुराणात ह्या आठ रूपांना पुढीलप्रमाणे वंदन केले आहे : 'शर्वाय क्षितिमूर्तये नमः । भवाय जलमूर्तये नमः । रुद्राय वायुमूर्तये नमः । भीमाय आकाशमूर्तये नमः । पशुपतये यजमानमूर्तये नमः । महादेवाय सोममूर्तये नमः । ईशानाय सूर्यमूर्तये नमः । मूर्तयः अष्टौ शिवस्य एताः ।' कालिदासाने नांदीमध्येच ह्या संपूर्ण सृष्टीला वंदन करून आपल्या नाटकाला जणू व्यापक अधिष्ठान प्राप्त करून दिले आहे.

(२) नांदी गायिली गेल्यावर हातात धनुष्यबाण घेतलेला रथारूढ राजा प्रवेश करतो. तेव्हा राजाला व हरिणाला पाहून सूत म्हणतो :

सूतः -- ... आयुष्मन्, कृष्णसारे ददच्चक्षुस्त्वयि चाधिज्यकार्मुके ।
मृगानुसारिणं साक्षात् पश्यामीव पिनाकिनम् ।। (४)

अर्थात -- दीर्घायुषी राजा, काळविटावर आणि ज्याने आपल्या धनुष्यावर बाण चढवला आहे अशा तुझ्यावर नजर टाकली असता साक्षात शंकरच जणू हरणाचा पाठलाग करीत आहेत, असे मला दिसते.

पिनाक हे शिवाच्या धनुष्याचे नाव आहे. म्हणून शिवाला 'पिनाकिन्' म्हणतात. एकदा देवांनी यज्ञाचे आयोजन केले, पण महादेवाचे महत्त्व न ओळखून त्याला यज्ञात सहभागी करून घेतले नाही. तेव्हा संतापलेल्या शिवाने हातात धनुष्यबाण घेऊन व यज्ञस्थळी जाऊन यज्ञपुरुषाच्या हृदयावर बाण मारला. त्यायोगे घायाळ झालेला यज्ञपुरुष हरणाचे रूप धारण करून आकाशात उडाला, तेव्हा शिवाने त्याचा पाठलाग केला. ही कथा थोड्याफार फरकाने सौप्तिकपर्व, शांतिपर्व, वायुपुराण, महिम्नस्तोत्र इत्यादी प्राचीन ग्रंथांत वर्णिलेली आहे. तिचाच येथे प्रच्छन्न संदर्भ आहे.

(३) जेव्हा राजा शकुंतलेविषयी अधिक जाणून घेण्याची इच्छा बोलून दाखवतो आणि आजन्म ब्रह्मचारी असलेल्या काश्यपांची ही मुलगी, हे कसे, असा प्रश्न करतो तेव्हा -

अनसूया -- शृणोत्वार्यः । अस्ति कोऽपि कौशिक इति गोत्रनामधेयो
महाप्रभावो राजर्षिः । (२१)

अर्थात -- मान्यवरांनी ऐकावे. कौशिक हे गोत्रनाव असलेला कोणीतरी एक मोठा प्रभावशाली राजर्षी आहे.

कौशिक म्हणजे विश्वामित्र. हा कुशाचा पणतू. हा राजा होता, पण त्याने कठोर तपश्चर्या करून ऋषित्व प्राप्त केले होते. म्हणून हा राजर्षी झाला. त्याने वरुणाच्या तावडीतून शुन:शेपाची सुटका केली; त्रिशंकूला अंतराळात लोंबकळत ठेवले व ब्रह्मदेवाप्रमाणे अपरा सृष्टी निर्माण केली. अशा त्या महासामर्थ्यशाली महर्षीच्या कथेचा येथे निसटता उल्लेख आहे.

(४) मृगयाभक्त सेनापती शिकारीमुळे राजाच्या शरीरावर कसा अनुकूल परिणाम झाला आहे त्याचे वर्णन करणारा 'मेदश्छेदकृशोदरं ...' (३६) इत्यादी श्लोक म्हणतो. त्याचा चवथा चरण असा आहे : 'मिथ्यैव व्यसनं वदन्ति मृगयामीदृग्विनोद: कुत: । (३७) अर्थात -- लोक शिकारीला उगीचच व्यसन असे मानतात. (वस्तुत:) शिकारीइतका दुसरा विरंगुळा कोणता आहे ? ह्या उक्तीत सेनापतीने मनूच्या एतद्विषयक विचारांना विरोध केला आहे. मनुस्मृतीत (७/५०) मद्यपान, द्यूत, स्त्रीसंग व शिकार ही क्रमश: कष्टतम चार व्यसने कामविकारापासून उत्पन्न होतात, असे प्रतिपादन केले आहे. कामंदकाने तर शिकारीत गुण तर नाहीतच, उलट तिच्यात प्राणहरण करणारे दोष असल्यामुळे ती पूर्णपणे वर्ज्य मानली आहे. येथे मनुस्मृती, कामन्दकीय नीतिसार इत्यादी प्राचीन शास्त्रीय ग्रंथांचा अप्रत्यक्ष उल्लेख आहे.

(५) शकुंतला पतिगृही जाताना आपल्या वडिलांच्या पायांवर मस्तक ठेवते. 'बाबा, मी तुम्हांला नमस्कार करीत आहे', असे तोंडानेही म्हणते. तेव्हा तिला काश्यप पुढीलप्रमाणे भरघोस आशीर्वाद देतात :

काश्यप: -- वत्से, ययातेरिव शर्मिष्ठा भर्तुर्बहुमता भव ।
सुतं त्वमपि सम्राजं सेव पूरुमवाप्नुहि ॥ (८७-८८)

अर्थात -- मुली, जसा ययाती शर्मिष्ठेला सन्मानाने वागवीत असे, तसाच तुझा पतीही तुला बहुमानाने वागवो. जसा शर्मिष्ठेला पुरू झाला तसाच तुलाही सम्राट पुत्र प्राप्त होवो.

शर्मिष्ठा ही ययाती राजाची सर्वांत धाकटी पत्नी. तिचा ययातीशी गांधर्वविवाह झालेला होता. (शकुंतलेचाही दुष्यंताशी गांधर्वविवाहच झालेला होता.) ययातीला इतर अनेक राण्या असल्या तरी त्याने गुणवती शर्मिष्ठेलाच पट्टराणीपद बहाल केले होते. (तसेच शकुंतलेलाही प्राप्त होवो, हा काश्यपांचा आंतरिक भाव.) शर्मिष्ठेला पुरू नावाचा मुलगा प्राप्त झाला होता, तो ययातीच्या पश्चात सिंहासनावर बसला. शकुंतलेलाही असाच सम्राट पुत्र होवो, असा समयोचित आशीर्वाद काश्यप देतात. येथे ययाति-शर्मिष्ठा यांच्या महाभारतीय आख्यानाचा स्पष्ट संदर्भ आहे.

(६) शकुंतलेची पतिगृही पाठवणी करण्याच्या प्रसंगी सर्व मंडळी एका तळ्यापाशी येतात. तेथे एका झाडाखाली बसतात. इकडे काश्यप दुष्यंताला कोणता योग्य संदेश पाठवावा याचा विचार करू लागतात. तेव्हा -

शकुन्तला -- (जनान्तिकम्) हला पश्य । नलिनीपत्रमात्रान्तरितमपि सहचरमपश्यन्त्यातुरा चक्रवाकी आरटति । दुष्करं खल्वंह करोमि । (९५)

अर्थात -- (एकीकडे) गडे, बघ. (चक्रवाक व चक्रवाकी या दोघांच्या) मध्ये फक्त एक कमळाचे पान आहे. तरीदेखील चक्रवाकी आपल्या जोडीदाराला पाहू शकत नाही, त्यामुळे व्याकुळ होऊन ओरडत आहे. खचित मी दुष्कर कार्य करीत आहे.

असा एक संकेत आहे की, रात्रीच्या वेळी चक्रवाक व चक्रवाकी यांचा विरह होतो. केवळ एका पानाआड असूनही त्यांचे मिलन होऊ शकत नाही. ह्याला कारण रामाचा शाप होय, असे सांगितले जाते. जेव्हा रामाचा सीतेपासून वियोग झाला तेव्हा चक्रवाक पक्षी रामाला हसले. त्यामुळे रामाने त्यांना शाप दिला. त्याच्याच परिणामी त्यांचा रात्री वियोग होतो. येथे रामचरित्रातील एका घटनेचा अप्रकट उल्लेख आहे.

(७) राजा नुकताच न्यायालयातून, न्यायदानाचे कार्य पार पाडून, राजमहालात परतलेला असतो. तेवढ्यात शकुंतलेला घेऊन गौतमी व ऋषी तेथे थडकतात. थकलेल्या-शिणलेल्या राजाला ह्या ऋषींच्या आगमनाची वर्दी देण्याची कंचुकीला मनापासून इच्छा नसते. पण लोकशासकाला विश्रांती नसते हे सत्य ध्यानात येताच तो पुढील श्लोक गातो -

भानुः सकृद् युक्ततुरङ्ग एव । रात्रिंदिवं गन्धवहः प्रयाति ।
शेषः सदैवाहितभूमिभारः । षष्ठांशवृत्तेरपि धर्म एषः ॥ (१०४)

अर्थात -- सूर्याने आपल्या रथाला जे एकदा घोडे जोडले ते कायमचे. (सूर्याला, घोड्यांना व सारथ्याला कधीच विश्रांती घेता येत नाही.) वारा रात्रंदिवस वाहत असतो. (त्याचे वाहणे, विश्रांती न घेता, अव्याहतपणे चालू असते.) शेषनाग पृथ्वीचा भार सदैव आपल्या डोक्यावर वागवतो. (त्यालाही कधी विसावा म्हणून नाही). राजाचाही धर्म हाच (म्हणजे असाच) आहे.

शेष हा प्रसिध्द नाग. तो काश्यप व कद्रू यांचा मुलगा. ब्रह्मदेवाच्या विनंतीस मान देऊन त्याने पृथ्वीचा भार आपल्या मस्तकावर पेलण्याचे कार्य एकदा स्वीकारले आणि ते आजतागायत, खंड न पडू देता, चालू ठेवले आहे. ह्या पौराणिक कथेचा येथे निर्देश आहे.

(८) पोलीस अधीक्षक व दोन शिपाई एका कोळ्याला राजाची नाममुद्रा असलेली आंगठी विकत असताना पकडतात. ती आंगठी त्याला कशी मिळाली ह्याबद्दल त्याला प्रश्न विचारतात. त्याच्याकडून मिळालेली माहिती राजाच्या कानांवर घालण्यासाठी अधीक्षक राजमहाली जातो. इकडे त्या दोन शिपायांपैकी एक

प्रथमः -- जानुक, स्फुरतो मम हस्तावस्य वधस्य सुमनसः पिनध्दुम् । (१२९)

अर्थात -- जानुका, मृत्यूची फुलांची माळ ह्याच्या गळ्याभोवती आवळण्यासाठी माझे हात शिवशिवत आहेत.

ज्याला मृत्युदंडाची शिक्षा ठोठावण्यात आलेली असेल अशा अपराध्याला किंवा एखाद्या देवतेला बली म्हणून अर्पण करण्यासाठी जिची निवड झालेली असेल अशा व्यक्तीला जास्वंदीच्या म्हणजेच लाल रंगाच्या फुलांनी किंवा माळांनी सजवण्याचा प्रघात प्राचीन भारतात होता. 'वधस्य सुमनसः' शब्दांनी तो प्रघात येथे निर्देशिलेला आहे. प्रच्छन्न संदर्भोल्लेखात सांस्कृतिक संदर्भांचाही समावेश होतो, हे प्रस्तुत शैलीउपायाच्या प्रास्ताविकात उद्धृत केलेल्या कोहेनच्या विचारांत म्हटलेच आहे.

(९) दुर्जय नामक दानवगणाचा नायनाट करून दुष्यंत इंद्राच्या रथात बसून पृथ्वीवर परत येत असतो. तेव्हा तो मातलीला विचारतो : आपण वायूच्या कोणत्या मार्गावर आहोत ? त्यावर मातली 'त्रिस्रोतसां वहति...' इत्यादी जे श्लोकबद्ध उत्तर देतो त्याचा चवथा चरण असा आहे : 'मार्गो द्वितीयहरिविक्रमपूत एषः ।' (१७०), अर्थात - विष्णूच्या दुसऱ्या पावलाने पुनीत झालेला हा मार्ग आहे. यात बली व विष्णू (अर्थात वामनावतार) यांच्या कथेचा संदर्भ आहे. विरोचनपुत्र बली हा बलिष्ठ दानव होता. त्याने तिन्ही लोक (पृथ्वी, स्वर्ग व पाताळ) जिंकून इंद्राचे सार्वभौमत्व नष्ट केले होते. विष्णूने 'वामन'(बटु-)रूप धारण केले आणि तीन पावलांपुरती जमीन बलीकडून मागितली. बलीने विष्णूच्या विनंतीस मान दिला. तेव्हा विष्णूने प्रचंड स्वरूप धारण करून दोन पावलांत पृथ्वी व स्वर्ग पादाक्रांत केले व तिसरे पाऊल बलीच्या डोक्यावर ठेवून त्याला पाताळात ढकलून दिले. तेथे तो राजा बनला.

(१०) सर्वदमनाच्या मनगटावर बांधलेला ताईत जमिनीवर पडतो. तेथे उभा असलेला दुष्यंत तो ताईत उचलतो. ते पाहून तपस्विनींना आश्चर्याचा धक्का बसतो. दुष्यंत त्यांना आश्चर्याचे कारण विचारतो. तेव्हा-

प्रथमा -- शृणोतु महाराजः । एषापराजिता नाम औषधिरस्य जातकर्मसमये भगवता मारीचेन दत्ता । (१८३)

अर्थात -- महाराज, (कृपया) ऐका. ह्याच्या जातकर्मसंस्काराच्या वेळी भगवान मारीचांनी अपराजिता नावाची ही वनस्पती दिली.

मुलाच्या जन्मानंतर सोन्याच्या चमच्याने त्याच्या तोंडात मध व तूप भरवतात, त्यावेळी मंत्र म्हटले जातात व मग मुलाची नाळ कापली जाते. हा संस्कार मुलाचे वडील किंवा त्यांच्या अभावी दुसरी कोणतीही व्यक्ती करू शकते. (मनुस्मृती २.२९). वरील उक्तीत धर्मशास्त्राच्या एका परंपरागत व महत्त्वाच्या संस्काराचा उल्लेख आहे.

वरील संदर्भोल्लेख त्या-त्या पात्राच्या तोंडी शोभतील असेच असून मुळातील संवादांशी एकजीव झाले आहेत. ह्या उल्लेखांमुळे रसिक वाचकाला भूतकाळाशी नाते जोडण्याची एक सुसंधी मिळते. त्यायोगे त्याच्या वाङ्मयानंदाला एक अधिकचे परिमाण लाभते.

वरील सर्व संदर्भ-स्पष्टीकरणे प्रस्तुत ग्रंथासाठी शाकुंतलाची जी आवृत्ती प्रमाण मानली आहे तिच्यातील Notes on the Abhijñāna Śākuntala च्या आधारे केली आहेत.

[३.१५] वाक्प्रचार व म्हणी

प्रत्येक समृद्ध व विकसित भाषेत असंख्य वाक्प्रचार व म्हणी असतात. पैकी वाक्प्रचार म्हणजे शब्दयोजनेची विशिष्ट रूढी. उदाहरणार्थ, शाकुंतलातील 'यदि तावदस्य शिशोर्मातरं नामतः पृच्छामि'। (१८२) यातील 'नामतः' शब्दाचा प्रयोग वाक्प्रचारात्मक आहे. 'न खलु यस्मिन् कस्मिन् अपि'। (७५) यातील 'यस्मिन् कस्मिन्', 'त्वमपि स्वं नियोगं अशून्यं कुरु।' (१४०) मधील 'नियोगं अशून्यं कुरु', 'वपुरभिनवं अस्याः पुष्यति स्वां न शोभाम्।' (१३) मधील 'शोभां पुष्यति', इत्यादी सगळ्या शब्दयोजनेच्या रूढीच आहेत. थोडक्यात, अमुक विचार व्यक्त करावयाचा असता अमुक शब्दाच्या शेजारी अमुकच शब्द, अमुकच रूपात व अमुकच क्रमाने आले पाहिजेत असा जो भाषेचा प्रचार असतो त्याला वाक्प्रचार म्हणतात. असा वाक्प्रचार सामान्य माणसांच्या भाषेत पहिल्यांदा जन्माला येतो, तेथेच तो रुळतो, रूढ होतो व हळूहळू त्याचा सर्वत्र प्रचार-प्रसार होऊन कालांतराने तो भाषेत स्थिरावतो. वाक्प्रचाराची काही वैशिष्ट्ये व्हॅलिन्सने नमूद केली आहेत, ती अशी : "An idiom....is an entity like a word. It has a fixed form, and a 'Properness' to the context....So, too, like words, idioms reflect life..."[६९] अशा प्रकारे वाक्प्रचारात जीवन प्रतिबिंबित होत असल्यामुळे ललित लेखकाला त्यांचा विवेचकपणे उपयोग करून आपले लिखाण जिवंत, परिणामकारक व अविस्मरणीय बनवता येते.

वाक्प्रचाराच्या शब्दसंहतीचे लक्षवेधक व संस्मरणीय स्वरूप म्हणजे म्हण. म्हणीच्या स्वरूपाविषयी व तिच्यात गोवलेल्या अर्थाविषयी मॉरिसनने पुढील उद्‌गार काढले आहेत :

"Proverbs are brief statements, usually with a rather catchy phrasing easily remembered, the product of common sense and experience."[७०] म्हणीत मनुष्यजातीचा शेकडो वर्षांचा अनुभव तर संकलित झालेला असतोच पण त्याशिवाय तिच्या शब्दरचनेत अनुप्रास, यमक, आवृत्ती, समानान्तरता इत्यादी शैलीउपायही प्रयुक्त झालेले दिसतात. त्यामुळेच म्हणी पटकन कानात शिरतात आणि मनात रुतून बसतात. एवढ्या प्रास्ताविकानंतर आता शाकुंतलातील वाक्प्रचारांची व म्हणींची ओळख करून घेऊ.

(१) राजाच्या शिकारीच्या नादामुळे आपले कसे हालहाल होत आहेत ह्याचे (ऐकणारा व्यथित व्हावा अशा शब्दांत) वर्णन करून झाल्यावर विदूषक त्यात पुढील शब्दांनी भर घालतो :

विदूषकः -- - ततो गण्डस्योपरि पिण्डकः संवृत्तः। (३१)

अर्थात -- (एवढ्यावरच दुर्दैव संपले नाही.) गळवावर पुटकुळी आली आहे.

मुळात गळू ठुसठुसते, त्यावर पुटकुळी आली की, त्या गळवाच्या वेदना दुप्पट होतात. तसेच आपल्या बाबतीत झाले आहे असे विदूषकाला म्हणावयाचे आहे. मुळात तो

शिकारीच्या दगदगीमुळे बेजार झाला आहे. त्यात भरीस भर म्हणून कण्वाश्रमात राजाच्या दृष्टीस शकुंतला पडल्यापासून त्याला तिच्याशिवाय दुसरे काही सुचत नाहीसे झाले आहे. शकुंतला ही विदूषकाच्या दृष्टीने 'पुटकुळी'!

(२) जेव्हा शकुंतला राजाच्या दृष्टीला पडली तेव्हा नेमका विदूषक तेथे हजर नव्हता. असता तर कदाचित त्याने 'मित्रा, अंत:पुरात अशा कित्येक 'उद्यानलता'(=लावण्यवती ललना) आहेत, तेव्हा ह्या वनलतेचा (=ग्रामीण रूपवतीचा) नाद सोड', असा हितोपदेश केला असता ! पण तशी संधी त्याला मिळाली नाही. म्हणून तो म्हणतो की, 'राजाला झालेले शकुंतला-दर्शन हे माझे दुर्दैव होय'. या दर्शनाचा परिणाम त्याने पुढीलप्रमाणे शब्दांकित केला आहे :

विदूषक: -- सांप्रतं नगरगमनस्य कथामपि न करोति । (३१)

अर्थात -- सध्या (तो शकुंतलेच्याच चिंतनात अहोरात्र इतका बुडाला आहे की) पठ्ठ्या राजधानीकडे परतण्याची गोष्टच काढत नाही.

विदूषकाने 'कथां न करोति' या वाक्प्रचाराच्या द्वारे राजाच्या मन:स्थितीचे अचूकपणे वर्णन केले आहे. विदूषकाला असे सुचवावयाचे आहे की, राजा राजधानी, आपले कर्तव्य, आपले मित्रमंडळ ह्या सर्वांना पार विसरून गेला असून दिवसरात्र मनात शकुंतलेचाच जप करीत आहे !

(३) राजाच्या शिकारीच्या नादामुळे हैराण झालेल्या विदूषकाला विश्रांती हवी असते. स्वत: राजालाही शकुंतलेची वारंवार आठवण येते व त्यामुळे शिकारीविषयी स्वारस्य उरलेले नसते. तो स्वत:शीच बडबडतो : 'शिकारीबद्दल आता आस्था उरलेली नाही. धनुष्याला बाण जोडून ते संधानासाठी वाकवण्याची शक्तीही शरीरात राहिलेली नाही'. विदूषक राजाच्या तोंडाकडे बघून म्हणतो -

विदूषक: -- (राज्ञो मुखं विलोक्य) अत्रभवान् किमपि हृदये कृत्वा मन्त्रयते । अरण्ये मया रुदितमासीत् । (३४)

अर्थात -- (राजाच्या तोंडाकडे पाहून) मित्रा, तुझ्या मनात काहीतरी आहे आणि ते तू पुटपुटत आहेस. मी जे बोललो ते (सगळे) अरण्यरुदन ठरले.

ह्यातील अरण्यरुदित किंवा अरण्यरुदन (अर्थात, निष्फळ बडबड) हा वाक्प्रचार प्रसिद्ध असून मराठीतही प्रचलित आहे.

(४) शाकुंतलाच्या तिसऱ्या अंकाच्या सुरवातीस कामबाधेने निरतिशय पीडित असा दुष्यंत प्रवेश करतो. त्याचे कशातही मन लागत नाही. प्रियेवाचून आता दुसरा कोणताही आधार नाही, असे त्याला वाटते. ती ह्या सुमारास वेळूंनी वेढलेल्या लतामंडपात आपल्या मैत्रिणींसह विश्रांती घेत असेल असा कयास बांधून तो तेथे जातो आणि झाडाआड लपून पाहातो :

राजा -- ... (परिक्रम्य तथा कृत्वा । सहर्षम्) अये लब्धं नेत्रनिर्वाणम् । (५३)

अर्थात -- (थोडे चालून झाडाआड लपून पाहातो. अतिहर्षाने), अरे वा:, डोळ्यांना परमोच्च सुख लाभले (म्हणजे डोळ्यांचे पारणे फिटले) !

वस्तुत: निर्वाण म्हणजे मोक्ष किंवा आत्म्याचे परमात्म्याशी पुनर्मिलन. कालिदासाने हा शब्द येथे अवर्णनीय सुख ह्या अर्थी वापरला आहे. अर्थात 'नेत्रनिर्वाणम्' हा रूपकात्मक प्रयोग आहे आणि व्हॅलिन्सच्या मते वाक्प्रचार ही जणू गोळीबंद रूपके असतात (''Idioms are, in fact, crystallised metaphors...''[७१])

(५) अनसूया व प्रियंवदा या दोघींनी पुन्हापुन्हा प्रेमळपणाने आग्रह केल्यावर शकुंतला आपल्या मनोव्यथेला वाचा फोडते. ती मैत्रिणींना आपल्या मनींचे गूज सांगते की, जेव्हापासून तिने त्या राजर्षीला बघितले तेव्हापासून तिच्या मनात त्याच्याविषयी अभिलाषा उत्पन्न झाली आणि ती आता अनावर झाली आहे.

शकुन्तला -- तद्यदि वामनुमतं तदा तथा वर्तेथां यथा तस्य राजर्षेरनुकम्पनीया भवामि। अन्यथावश्यं सिञ्चतं मे तिलोदकम्। (५८)

अर्थात -- तेव्हा जर तुम्हां दोघींना मान्य असेल तर तुम्ही त्या राजर्षीशी अशा प्रकारे वागा की, ज्यायोगे त्याच्या मनात माझ्याविषयी जिव्हाळा/ प्रीती उत्पन्न होईल. नाहीतर मला (सरळ) तिलांजली द्या (म्हणजे मी मरून जाईन). येथील वाक्प्रचार स्वत:स्पष्ट व प्रसिद्ध आहे. (मात्र 'निसर्गत:च अप्रगल्भ' असलेली, 'मदनगतवृत्तान्ताशी अपरिचित' असलेली आणि 'राजाच्या नजरेला नजर न भिडवणारी' ही भोळीभाबडी 'तपस्विकन्या' इतकी टोकाची भाषा बोलते हे काहीसे विचित्र वाटते. अथवा 'ईदृश: मदनप्रभाव:' असावा !)

(६) शकुंतला पतिगृही जाण्यास निघाली असता तिच्या डोळ्यांत गोळा झालेले अश्रू पाहून काश्यप तिला दु:ख आवरण्याचा सल्ला देतात. तेव्हा -

शार्ङ्गरव:-- भगवन्, ओदकान्तं स्निग्धो जनोऽनुगन्तव्य इति श्रूयते। तदिदं सरस्तीरम्। अत्र संदिश्य प्रतिगन्तुमर्हसि। (९४)

अर्थात -- गुरुवर्य, आपल्या प्रिय व्यक्तीला जलाशयाच्या काठापर्यंत घेऊन जावे व तेथे तिला निरोप द्यावा, असा संकेत असल्याचे ऐकतो. हा येथे सरोवराचा काठ आहे. येथे (दुष्यंतासाठी) संदेश देऊन आपण आश्रमाकडे परत जावे. येथे लौकिक आचारावर आधारित वाक्प्रचार वापरलेला आहे. तो कालांतराने भाषेत बद्धमूल झाला आहे.

(७) दुर्वासाच्या शापामुळे दुष्यंताला आपले शकुंतलेशी लग्न झाल्याचे आठवत नाही. तेव्हा व्यथित आणि संतप्त झालेली शकुंतला राजाला लग्नाची आठवण करून देण्यासाठी बोलण्यास सुरुवात करते, 'महाराज' असे संबोधन उच्चारते, पण तसे संबोधणे योग्य नाही असे ठरवून त्याला उद्देशून म्हणते :

शकुन्तला -- पौरव, युक्तं नाम ते तथा पुराश्रमपदे स्वभावोत्तानहृदयमिमं जनं समयपूर्वं प्रतार्य सांप्रतमीदृशैरक्षरैः प्रत्याचष्टुम्।

राजा -- (कर्णौ पिधाय) शान्तं पापम्। (११६)

अर्थात -- हे पुरुवंशीय पुरुषा, पूर्वी आश्रमात तशा प्रकारचे आश्वासन देऊन माझ्यासारख्या मोकळ्या मनाच्या व्यक्तीला आता अशा प्रकारच्या शब्दांनी धुडकावणे हे तुला शोभते काय ?

-- (हातांनी कान झाकून) अनिष्टाचे निवारण होवो !

'शांतं पापम्' हा वाक्प्रचार 'इडापिडा टळो' या अर्थी सामान्य भाषेतही वापरला जातो. जे अनिष्ट ऐकावे लागत आहे ते असह्य आहे. म्हणून त्याचे निवारण होवो, हा भावार्थ.

(८) शकुंतला राजाला खोटारडा म्हणते, त्यावर राजा तिला स्वैरिणी म्हणतो. तेव्हा संतापून ती पुढील उद्‌गार काढते :

शकुन्तला -- सुष्ठु तावदत्र स्वच्छन्दचारिणी कृतास्मि याहमस्य पुरुवंशप्रत्ययेन मुखमधोर्हृदयविषस्य हस्ताभ्याशमुपगता। (१२०)

अर्थात -- ठीक आहे, पुरुवंशावर विश्वास ठेवून ज्याच्या जिभेवर मध आहे पण हृदयात विष आहे अशा ह्याच्या हाती मी पडले (आणि अशा प्रकारे) मी स्वतःला स्वैरिणी बनवून घेतले. 'मुखमधोर् हृदयविषस्य' या शब्दांनी 'मधु तिष्ठति जिह्वाग्रे हृदये तु हलाहलम्।' या सुभाषिताची आठवण होते.

(९) मच्छीमाराला रोहित माशाच्या पोटात आंगठी कशी मिळाली ते सगळे राजा श्यालाकडून समजून घेतो आणि ह्या प्रकरणात मच्छीमार निर्दोष असल्याची खात्री पटल्यामुळे त्याला सोडून देण्याचा हुकूम श्यालाला देतो. त्याप्रमाणे श्याल राजाचा तो आदेश सूचकाला ऐकवतो. तेव्हा जानुक आपली प्रतिक्रिया वाक्प्रचाराच्या मदतीने व्यक्त करतो ती अशी :

द्वितीयः -- एष यमसदनं प्रविश्य प्रतिनिवृत्तः। (१३०)

अर्थात -- हा यमाच्या घरी जाऊन (तेथून जिवंत) परत आला.

यमसदनी जाणे म्हणजे मरणे. ह्या वाक्प्रचाराचा अचूक प्रयोग कवीने येथे केला आहे. खरे म्हणजे मच्छीमाराची सुटका झाल्याबद्दल जानुकाला हेवा वाटत असतो !

(१०) धनमित्र नावाचा कोणी एक मोठा व्यापारी नौकेच्या अपघातात मरण पावतो. त्याला मूलबाळ नसते. तेव्हा नियमाप्रमाणे त्याची संपत्ती राजकोषात जमा व्हावी अशा शिफारसीचे कागदपत्र मंत्री राजाच्या संमतीसाठी त्याच्याकडे पाठवून देतो. राजा चौकशी करून असा हुकूम फर्मावतो की, दिवंगत व्यापाऱ्याची जी पत्नी सध्या गरोदर आहे तिच्या गर्भाला त्याच्या जनकाची संपत्ती मिळावी. राजाला स्वतःलाही अपत्य नसल्यामुळे आपल्याही संपत्तीची

आपल्या मरणानंतर अशीच विल्हेवाट लागणार ह्या विचाराने कमालीची अस्वस्थता वाटते व तो म्हणतो :

राजा -- (दीर्घमुष्णं च नि:श्वस्य)....ममाप्यन्ते पुरुवंशश्रिय: एष वृत्तान्त: ।

प्रतीहारी -- प्रतिहतममङ्गलम् । (१५९-१६०)

अर्थात -- (दीर्घ व उष्ण नि:श्वास सोडून)... माझ्याही मरणानंतर पुरुवंशाच्या संपत्तीची अशीच गत होणार !

-- इडापिडा टळो !

ह्या वाक्प्रचाराचा प्रयोग प्रतीहारीच्या तोंडी अतिशय स्वाभाविक असाच आहे.

एकंदरीने कालिदासाने ह्या शैलीउपायाचा प्रयोग विविध स्त्रीपुरुष पात्रे, त्यांचा स्वभाव, त्यांची मन:स्थिती, लोकाचार व वातावरण हे सगळे घटक लक्षात घेऊन समर्पकपणे केला आहे.

[३.१६] विचलन

विचलन हा शब्द इंग्रजीतील deviation शब्दासाठी वापरला आहे. Deviation हा शब्द 'to turn aside esp.from a norm''[७२] ह्या अर्थाच्या to deviate या क्रियापदापासून बनलेला आहे. Norm म्हणजे सर्वमान्य नियम किंवा बहुमान्य रूढी/प्रघात. एखादी विशिष्ट भाषा बोलणारे भाषक सर्वांच्या वापरात असलेले, सर्वांना समजणारे व सर्वांची कार्ये प्राय: साधणारे असे जे भाषेचे स्वरूप हाताळतात त्याला norm म्हणतात. त्याच्यापासून दूर सरकलेले किंवा मुद्दाम वेगळे बनवलेले असे जे भाषिक रूप असते त्याला deviated form म्हणतात. असे विचलित प्रयोग भाषकाने/लेखकाने अज्ञानाने केलेले नसतात. शिवाय ते भाषेच्या पूर्णपणे अंगवळणी पडलेले असतात. बोलणाऱ्याला किंवा लिहिणाऱ्याला जेव्हा आपल्या मनोगताच्या विशिष्ट भागावर जोर द्यावयाचा असतो, तो भाग 'प्रकाशित' करावयाचा असतो, त्याचे सर्वाधिक महत्त्व श्रोत्यांच्या वा वाचकांच्या निदर्शनास आणावयाचे असते आणि त्यांचे लक्ष त्या भागाकडे वेधावयाचे असते, तेव्हा वक्ता किंवा लेखक असे विचलित प्रयोग करतो.

ललित साहित्यात होणारा भाषेचा प्रयोग विशिष्ट असतो. ललित लेखक सामान्य भाषेच्या मर्यादा ओलांडतो. त्याची भाषा जितकी अधिक विचलित असते तितकी ती अधिक चित्तवेधक व आनंददायक बनते. भाषेच्या अशा अधिकाधिक विचलित उपयोगालाच शैली असे म्हणतात; हाच भाषेचा सर्जनशील किंवा प्रतिभासंपन्न उपयोग होय. लीचने ह्या मुद्याचे प्रतिपादन असे केले आहे : ''...Literature is distinguished from other varieties of linguistic activity above all by the number and the importance of the deviant features it contains...The literary writer's object, after all, is to transcend the

limitations of ordinary language, and this is the real sense in which he can be said to use language creatively''[७३]

ललित लेखकाच्या ठायी लेखनोपयोगी समस्त भाषिक साधनांचे नियमन व व्यवस्थापन करण्याचा बौद्धिक वकूब असतो. शिवाय, त्याला भाषेच्या अंगची विविध व विपुल सामर्थ्ये वापरण्याची मनापासून हौस असते. असा प्रतिभासंपन्न लेखक वाचकांसाठीच लिहीत असल्यामुळे त्याला भाषेची सुस्थापित व्यवस्था सांभाळावी लागते. पण त्याचवेळी 'एक स्वतंत्र व्यक्ती' ह्या नात्याने त्याला आपले मनोगत आपल्या विशिष्ट भाषेत व्यक्त करावे असेही वाटत असते. अशा वेळी तो उपलब्ध भाषिक साधनांची निराळ्या पद्धतीने मांडणी करतो किंवा त्यांची नवीन रीतीने जोडणी किंवा जुळणी करतो. हेच विचलन होय. कालिदासाने असे कोणते प्रयोग केले आहेत, ते आता लक्षात घेऊ.

(१) रंगसूचना -- (ततः प्रविशत्यात्मना तृतीयो वैखानसः ।) (६)

अर्थात -- आपण स्वतः तिसरा असा वैखानस प्रवेश करतो. येथे 'ततः प्रविशति द्वाभ्यां ऋषिकुमाराभ्यां सह वैखानसः ।' असा सरळ प्रयोग न करता चाकोरीला सोडून प्रयोग केला आहे. '---तत् कतिपयरात्रं सारथिद्वितीयेन भवता सनाथीक्रियतामाश्रम इति ।' (४६) व 'स मे हस्तादन्तरा तरलिकाद्वितीयया देव्या वसुमत्या... गृहीतः ।' (१५६) हे दोन्ही असेच विचलित प्रयोग आहेत.

(२) शकुंतला जात्याच सुंदर आहे. तिने कोणतेही सौंदर्यप्रसाधन वापरलेले नाही (१२). शिवाय ती नवमालिकेच्या फुलाप्रमाणे नाजूक आहे (११). अशा नाजूक व सुंदर शकुंतलेला तिच्या वडिलांनी झाडांना पाणी घालण्याच्या कामावर नेमले आहे (११). वस्तुतः हे काम कणखर शरीराच्या व्यक्तीलाच साध्य (१२). ते शकुंतलेने करावे ही काश्यपांची इच्छा असल्याचे कळल्यावर दुष्यन्ताला एकदम कल्पना सुचते व ती तो पुढील शब्दांत मांडतो :

दुष्यन्तः -- ध्रुवं स नीलोत्पलपत्रधारया । शमीलतां छेत्तुमृषिर्व्यवस्यति । (१२)

अर्थात -- नीळकमळाच्या नाजूक पाकळीच्या धारेने एखाद्याने कडक शमीलता कापण्याचा प्रयत्न करावा तसाच ह्या ऋषीचा हा प्रयत्न आहे.

कवीने येथे केलेली कल्पना सामान्य कवीला न सुचणारी आणि अपूर्व (unusual) आहे. यातच तिची रम्यता सामावलेली आहे.

(३) राजाच्या मनात शकुंतलेविषयीचे आकर्षण उत्तरोत्तर वाढत चालले आहे, हे लक्षात घेऊन प्रियंवदा त्याला-'तुम्हाला आणखी काही विचारावयाचे आहे का ?' असा प्रश्न मुद्दाम विचारून राजाला प्रतिप्रश्न विचारण्याची संधी देते. तिचा लाभ उठवून राजा पुढील दोन प्रश्न विचारतो : (१) तुमची ही प्रिय मैत्रीण लग्न होईपर्यंत हे तपस्विनीचे व्रत आचरत राहणार काय ?; (२) ही आजन्म ह्या आश्रमातील हरिणींच्याच सहवासात राहणार काय ? ह्या दोन्ही प्रश्नांचे एकच संयुक्त उत्तर प्रियंवदा 'ह्या बाबतीतील अंतिम निर्णय तात काश्यपच घेतील', असे देऊ शकली

असती. पण कल्पक कालिदासाची चतुर प्रियंवदा पुढीलप्रमाणे दोन प्रश्नांची दोन स्वतंत्र उत्तरे देते :

प्रियंवदा -- आर्य, धर्मचरणेऽपि परवशोऽयं जन: । गुरो: पुनरस्या अनुरूपवरप्रदाने संकल्प: । (२३)

अर्थात -- मान्यवर, धार्मिक विधींच्या आचरणाच्या बाबतीतही ही व्यक्ती पराधीन आहे. पण हिच्या वडिलांनी हिला अनुरूप वराला देण्याचा संकल्प सोडला आहे.

ह्या दुसऱ्या उत्तराद्वारे ही कायमची आश्रमात राहणार नाही, योग्य वर मिळाल्यावर हिचे लग्न होऊन ही सासरी निघून जाईल, हे सुचवून प्रियंवदेने राजाला सुखावले आहे.

(४) शकुंतलेला प्रियंवदेचे वरील सगळे बोलणे 'असंबद्ध प्रलापां'सारखे वाटते (पण मनोमन तिला ते आवडलेलेच असते). म्हणून ती लटक्या रागाने तेथून जाऊ लागते. राजा इतका प्रेमविव्हल झालेला असतो की, तो तिला धरून ठेवू इच्छितो. पण तेवढ्यात भानावर येतो, तसे काही वेडेवाकडे वागत नाही; पण आपल्या मन:स्थितीचे मात्र यथावत वर्णन पुढील श्लोकात करतो :

राजा -- अनुयास्यन् मुनितनयां सहसा विनयेन वारितप्रसर: ।
स्थानादनुच्चलन्नपि गत्वेव पुन: प्रतिनिवृत्त: ॥ (२५)

अर्थात -- मी एकाएकी ऋषिकन्येच्या मागोमाग निघालो होतो, पण शिष्टाचाराने माझे पुढे जाणे रोखून धरले. मी आपल्या स्थानावरून (मुळीसुद्धा) न हलतादेखील जणू जाऊन पुन्हा परतलो.

मनुष्य जागचा हलल्याशिवाय पुढे सरकणार कसा ? तसेच पुढे सरकल्याशिवाय (इच्छा झाल्यास) मागे परतणार कसा ? पुढे गेल्यानंतरच मागे येण्याची क्रिया शक्य असते. या दृष्टीने विचार करता राजाने आपेल्या प्रातिभासिक आचरणाचे जे वर्णन केले आहे ते अतर्क्य व अविश्वास्य आहे. पण व्यक्तीच्या विशिष्ट मन:स्थितीत तिला असा आभास होणे संभाव्य ठरते. म्हणूनच येथील विचलित शब्दबंध दूषणीय न ठरता भूषणीय व रमणीय ठरतो.

(५) राजाच्या शिकारीच्या वेडामुळे आपली कशी दुर्दशा झाली आहे तिचे विस्तृत वर्णन विदूषक करतो, राजा राजधानीकडे जाण्याची गोष्टच काढत नाही असे गाऱ्हाणेही गातो आणि पुढे राजाच्या अहोरात्र जाग्रणाबद्दल म्हणतो :

विदूषक: -- .....अद्यापि तस्य तामेव चिन्तयतोऽक्ष्णो: प्रभातमासीत् । (३१)

अर्थात -- अजूनही तिचेच चिंतन करणाऱ्या त्याच्या डोळ्यांवर पहाट उतरली आहे.

वस्तुत: रात्र सरली आहे, पृथ्वीवर पहाट उगवली आहे. पण दुष्यंत शकुंतलेचे चिंतन करीत रात्रभर जागा आहे, पहाट कधी झाली हे त्याला कळलेही नाही. पण त्याने जेव्हा बाहेर

डोकावून पाहिले तेव्हा त्याच्या नजरेला पहाट झाल्याचे दिसले. कालिदासाने 'पहाट झाली' (उपस्थितं प्रभातम्) असा प्रयोग केला असता तर त्यात वरील प्रयोगातील 'वक्रता' लवमात्र जाणवली नसती. वाचकाला ती जाणवावी हा वरील प्रयोगाचा हेतू आहे.

(६) कण्वर्षींच्या अनुपस्थितीमुळे राक्षस रात्रीच्या वेळी येऊन यज्ञादी धर्मकृत्यांत अडथळा आणत आहेत, म्हणून राजाने काही रात्री आश्रमात व्यतीत कराव्यात, अशी विनंती आश्रमीय ऋषिकुमार राजाला करतात. राजा ती मान्य करतो. त्याबद्दल राजाची प्रशंसा करून ऋषिकुमार जाऊ लागतात. तेव्हा त्यांना राजा प्रणाम करून म्हणतो : 'गच्छतां पुरो भवन्तौ । अहमपि अनुपदमागत एव ।' (४६), अर्थात -- आपण दोघे पुढे व्हा. मीसुद्धा आपल्या मागोमाग आलोच.

येथील 'आगत:' हे आ+गम् धातूचे भूतकालीन रूप आहे. पण ते भविष्यकाळात केल्या जाणाऱ्या गमनक्रियेच्या अभिव्यक्तीसाठी वापरलेले आहे. जरी ह्या रूपाला व्याकरणाचा आधार असला तरी येथे भविष्यार्थी भूतकाळ असे विचलन झाले आहे.

(७) राक्षसांपासून ऋषिजनांचे रक्षण करण्यासाठी राजाला आश्रमात थांबणे प्राप्त असते. तिकडे राजाच्या आईने उपवासाचे पारणे फेडण्यासाठी राजाला बोलावणे धाडलेले असते. राजा पेचात पडतो. तेवढ्यात त्याला विदूषकाला राजधानीत आपला प्रतिनिधी म्हणून पाठवण्याची युक्ती सुचते. विदूषक राजाला अट घालतो : 'मी जाईन-पण तुझ्या धाकट्या भावासारखा रुबाबात किंवा बरोबर लवाजमा घेऊन जाईन'. राजा ही अट स्वीकारतो. तेव्हा विदूषक म्हणतो : -

विदूषक: -- तेन हि युवराजोऽस्मीदानीं संवृत्त: । (४९)

अर्थात -- आज मी खरोखर युवराज झालो आहे.

खरे म्हणजे विदूषक विदूषकच राहणार. तो युवराज कसा होणार ? पण तो म्हणतो की, मी युवराज म्हणजे 'स्वत:हून वेगळा' होणार. हे चाकोरीबाहेरचे बोलणे झाले.

(८) राजा आपल्या मित्राला म्हणजे विदूषकाला व्याकुळ होऊन सांगतो की, आपण आपल्या प्रियेला झिडकारल्यानंतर तिची जी दुर्दशा झाली ती आठवली की, मनात अतिशय कालवाकालव होते; आपण असहाय आहोत, असे वाटू लागते (१४३). तिने निघून जाताना अश्रूंनी डबडबलेल्या डोळ्यांनी माझ्याकडे पाहिले पण तेव्हा निर्दय बनलेल्या मी तिला घालवून लावले. ते शल्य माझ्या मनाला सतत बोचत आहे. ते ऐकून -

सानुमती -- .... अस्य संतापेनाहं रमे । (१४४)

अर्थात -- (पश्चात्तापापासून होणारे) याचे दु:ख पाहून मला आनंद वाटतो.

राजाचा पश्चाताप पाहून त्याचे शकुंतलेवरील उत्कट प्रेम सानुमतीला जाणवते व म्हणून तिला राजाचे दु:ख पाहून सुख होते. असेच होणे स्वाभाविक आहे.

(९) राजाने शकुंतलेचे चित्र रेखाटलेले असते. त्यातील भुंगा शकुंतलेचे चुंबन घेत असल्याचे चित्रण राजाने केलेले असते. राजाला तो खरोखरचा भुंगा वाटतो. म्हणून तो त्या भुंग्याला तंबी

भरतो की, जर तू तिच्या अधराला आता स्पर्श केलास ना तर तुला कमळाच्या दलांच्या आत अडकवून टाकीन. हे ऐकून विदूषक राजाला जाणीव करून देतो की, 'मित्रा, हे चित्र आहे'. ह्या शब्दांनी भानावर आलेला राजा पुढील दु:खोद्गार काढतो :

राजा -- वयस्य, किमिदमनुष्ठितं पौरोभाग्यम् ।
दर्शनसुखमनुभवतः साक्षादिव तन्मयेन हृदयेन ।
स्मृतिकारिणा त्वया पुनरपि चित्रीकृता कान्ता ॥ (१५५)

अर्थात -- मित्रा, ही नसती लुडबूड कशाला केलीस ?
ती जणू प्रत्यक्ष समोर होती. मी तिच्या दर्शनाचा आनंद लुटत होतो. माझ्या हृदयात ती भरून राहिली होती. तू मला हे चित्र असल्याची आठवण करून देऊन तिला पुन्हा चित्रात बंदिस्त करून टाकलेस.

राजाचा आशय असा की, 'सजीव भासणाऱ्या तिला तू निर्जीव केलेस आणि सुखी अशा मला दु:खी केलेस. मित्रा, असे करून तू काय साधलेस ?' चित्रीकृता हा समर्पक विचलित शब्द आहे.

(१०) राजाची शकुंतलेशी पुनर्भेट झाली असता ज्या आंगठीने त्या दोघांना दारुण दु:ख दिलेले असते ती आंगठी राजा शकुंतलेला, पुढील वाक्य उच्चारून, देऊ इच्छितो :

राजा -- तेन हि ऋतुसमवायचिह्नं प्रतिपद्यतां लता कुसुमम् । (१८९)

अर्थात -- तर मग वसंतऋतूशी झालेल्या समागमाची खूण म्हणून वेलीला हे फूल मिळो.

या वाक्यातील वसंतऋतू म्हणजे राजा, वेल म्हणजे शकुंतला आणि फूल म्हणजे आंगठी. मूळ वाक्यातील त्या-त्या वस्तु-व्यक्तींचे अप्रत्यक्ष उल्लेख विचलनात्मकच आहेत.

[३.१७] शब्दविवेक

पाश्चात्य शैलीशास्त्रज्ञांनी choice of words, diction व vocabulary असे तीन शब्द ह्या संदर्भात वापरले आहेत. त्यांच्यासाठी मराठीत शब्दविवेक हा सुटसुटीत शब्द योजला आहे. जरी सध्याचे शैलीशास्त्रज्ञ शैली वाक्यनिष्ठ मानून तिचा परामर्श वाक्याच्या अंगाने घेत असले, तरी वाक्य सिद्ध करणाऱ्या शब्दाचे महत्त्व कमी मानता येत नाही. कोणत्याही लेखनात सर्वत्र शब्दांचाच वापर केलेला असतो. कथानक, घटनाप्रसंगादींची वर्णने, पात्रांचे स्वभावरेखाटन इत्यादी सर्व साकार करण्याचे अमोघ व अटळ साधन शब्द हेच होय. अर्थात लेखनात सर्वत्र शब्दांचाच संचार व विहार चालू असतो. त्यामुळे शब्दविचार अनिवार्य ठरतो.

प्रत्येक लेखकाला त्याच्या-त्याच्या भाषेतील प्रचंड शब्दभांडार वापरासाठी उपलब्ध असते. ह्या शब्दांत अनेकार्थक, समानार्थक, संदिग्ध, वाचक (denotative), सूचक (connotative), सर्वसाधारण व विशिष्ट अशा अनेक प्रकारांचा समावेश होतो. शिवाय लेखकाला ह्या शब्दांच्या वापराच्या संदर्भातील प्रघात किंवा रूढी, तिची स्थित्यंतरशीलता, शब्दांचे परस्परांशी असलेले साहचर्यसंबंध इत्यादी वैशिष्ट्यांकडेही लक्ष पुरवावे लागते. अशा

प्रकारे अनेक घटक, प्रकार, वैशिष्ट्ये व नियामके ध्यानात ठेवून लेखकाला आपले मनोगत व्यक्त करण्यासाठी योग्यतम (mot juste) शब्दाची निवड व योजना करावी लागत असते. एकंदरीने लेखकाला योग्य संदर्भासाठी योग्य शब्द निवडता व योजता येतो की नाही, ह्यावरून त्याचे शब्दकौशल्य ठरविले जात असते. तेच त्याच्या भाषाप्रभुत्वाचे गमक असते.

शब्दांच्या नाम(संज्ञा), सर्वनाम, विशेषण, क्रियापद, क्रियाविशेषण, शब्दयोगी अव्यय, उभयान्वयी अव्यय व केवलप्रयोगी अव्यय अशा ज्या एकूण आठ जाती मानल्या जातात, त्यांपैकी उभयान्वयी अव्ययांचा परामर्श [३.९] मध्ये घेतला आहे, केवलप्रयोगी अव्ययांचा विचार [३.८.७(३)] मध्ये थोड्या वेगळ्या स्वरूपात केला आहे. ललित लेखकाला आपले लेखन अविस्मरणीय बनविण्यास नामे, विशेषणे, क्रियापदे व क्रियाविशेषणे ह्या चार जातींचे शब्द उपकारक ठरत असतात. कारण ते कार्यकारी (functional) असतात. पण अनेक ठिकाणी सर्वनामेही 'बोलकी' असल्याचे आढळते. क्रियाविशेषणे व शब्दयोगी असे दोन वेगळे वर्ग मानण्याऐवजी अव्यये असा एकच वर्ग मानणे अधिक सुटसुटीत आहे. म्हणून आता शाकुंतलातील नामे, सर्वनामे, विशेषणे, क्रियापदे व अव्यये ह्या पाच जातींच्या शब्दांपैकी प्रत्येकाच्या दोन-दोन उदाहरणांचे विवेचन करू, म्हणजे ग्रंथविस्तार होणार नाही (शब्दविवेकाच्या दृष्टीने विचारात घेण्याजोगे अक्षरश: शेकडो शब्द शाकुंतलात आहेत, त्या सर्वांचे निरूपण करणे शक्य नाही. म्हणून ही मर्यादा घालून घेतली आहे).

[३.१७.१] नामे

(१) सेनापती शिकारीविषयी खूप उत्साह दर्शवितो. राजा त्याच्याशी असहमती दर्शविताना म्हणतो की, आपण आश्रमाच्या परिसरात आहोत; हे धर्मक्रियांचे व तप:साधनेचे स्थान आहे. येथे शांतता नांदणे आवश्यक आहे. शिकारीने शांतताभंग होईल. शिवाय खुद्द आपल्याला स्वत:लाच विश्रांती हवी आहे. म्हणून शिकार थांबवण्याचा आदेश सर्व नोकरांना दे. त्यावर सेनापती म्हणतो :

सेनापतिः -- यत् प्रभविष्णवे रोचते। (३७)

अर्थात -- जे महाराजांना आवडते (ते महाराजांनी करावे).

यातील प्रभविष्णवे हे नाम अर्थवाहक आहे. त्याचा अर्थ आपण सर्वशक्तिमान, सर्वाधिकारी व राज्याचे स्वामी आहात; तेव्हा शिकार चालू ठेवावयाची की नाही, ह्याचा निर्णय तुम्हीच करावयाचा आहे. जरी कालिदासाने शाकुंतलात राजा, पार्थिव, प्रभू, नृप, षष्ठांशवृत्ती, क्षितिप इत्यादी अनेक 'नृप'वाचक शब्द वापरले असले तरी त्यांपैकी 'प्रभविष्णू' हाच शब्द येथे योग्य.

(२) राजा शकुंतलेवर आपले नितांत प्रेम असल्याचे आपल्या मित्राला, विदूषकाला, सांगतो. सर्व उत्तमोत्तम सौंदर्यसाधने एकत्र करून विधात्याने तिला घडवले आहे. ती असामान्य

लावण्यवती आहे. ती म्हणजे न हुंगलेले फूल, वेज न पाडलेले रत्न, न चाखलेला मध इत्यादी शब्दांत तिची खूप स्तुती करतो. ते सर्व ऐकून व्यावहारिक दृष्टीचा विदूषक त्याला विचारतो :

विदूषक: -- 'अथ भवन्तमन्तरेण कीदृशस्तस्या दृष्टिरागः ।' (४२)

अर्थात -- (मित्रा, ते सगळे मान्य) पण आता हे सांग की, तिने आपल्या नजरेने तुझ्याविषयी कोणत्या प्रकारची भावना व्यक्त केली ?

दृष्टिरागः = कटाक्षांनी सुचवलेले प्रेम. जर तिने तुझ्याकडे प्रेमाने ओथंबलेल्या दृष्टीने पाहिले असेल तर मग पुढची योजना आखावयास हरकत नाही. स्त्री ही मुळात मितभाषिणी व शालीन असते, ती आपल्याला आवडलेल्या पुरुषाबद्दलचे प्रेम स्पष्ट व उत्तान शब्दांत बोलून दाखवत नाही; तर ती ते नजरेने सुचवते, हा सार्वत्रिक अनुभव आहे. विदूषकाने त्याच्याच आधारे राजाला वरीलप्रमाणे प्रश्न विचारला आहे. त्यातील दृष्टिराग शब्द इतका अचूक आहे की, त्याला पर्यायी शब्द योजण्यासारखाच नाही. तो mot juste आहे.

३.१७.२] सर्वनामे

(१) काश्यपः -- सा त्वमितः पतिकुलं प्राप्य (९६)

अर्थात -- ती तू येथून पतिगृही गेल्यावर/गेलीस की,

यातील 'सा' हे सर्वनाम तात काश्यपांच्या मनातील पुढील भाव सूचित करणारे आहे: ज्या तुला मेनकेने टाकलेल्या स्थितीत मी आश्रमात आणले, ज्या तुला मी लहानाची मोठी केली, ज्या तुझ्यावर मी प्राणांपलीकडे प्रेम केले, जी तू 'तात काश्यपांचा उच्छ्वास' म्हणून लोकांच्या कौतुकाचा विषय बनलीस, ज्या तुझ्यावरील संभाव्य अरिष्ट टळावे म्हणून मी सोमतीर्थी जाऊन तपश्चर्या केली, जी तू वस्तुतः 'तनया' नसूनही आज पतिगृही जाणार ह्या जाणिवेने माझ्या मनाची चलबिचल झाली आहे व सगळे अवयव जड झाल्यागत निष्क्रिय झाले आहेत, ज्या तुझ्या अनिवार्य वियोगाने माझे मन व्याकुळ झाले आहे, पण जी तू स्वतःच्या पुण्याईच्या बळावर स्वतःला अनुरूप अशा प्रभावी व कर्तबगार राजपुरुषाची पत्नी झालेली असल्यामुळे माझे मन हर्षनिर्भरही झाले आहे, अशी ती तू आश्रमातून पतिगृही गेलीस की (शुश्रूषस्व गुरून् --- इत्यादी). शब्दमर्मज्ञ कवीने योजिलेले एखादे सर्वनामही किती भावगर्भ असू शकते त्याचे हे उत्तम उदाहरण आहे.

(२) राजाशी पुनर्मिलन झाल्यावर शकुंतलेचे लक्ष राजाच्या बोटातील आंगठीकडे जाते. तेव्हा तिच्या मनात गत जीवनातील सर्व कडू-गोड आठवणी उचंबळून येतात व ती म्हणते :

शकुन्तला -- (नाममुद्रां दृष्ट्वा) आर्यपुत्र, एतत् तदङ्गुलीयकम् । (१८८)

अर्थात -- (आंगठीकडे बघून) महाराज, ही ती आंगठी.

यातील 'ती' हे सर्वनाम भावस्निग्ध आहे. शकुंतलेचे मन आक्रंदून जणू स्वतःशी म्हणते : ही ती आंगठी जी तुम्ही माझ्या बोटात घातली होतीत; जी स्नानाच्या वेळी दुर्दैवाने

सोमतीर्थात पडली; परिणामी, माझी ओळख पटवण्याच्या वेळी जी मी तुम्हांला दाखवू शकले नाही; जिच्या 'दर्शना'च्या अभावी तुम्ही मला झिडकारलेत, चार-चौघांसमोर अपमानित केलेत; जिच्या अभावी मला तुमचा दारुण विरह सहन करावा लागला; जिच्यामुळे मी कमालीची दु:खी झाले आणि जिने तुम्हांला अत्यंत असुखी बनवले, ती ही आंगठी (तिच्यावर आता माझा विश्वास नाही. ती तुमच्याच बोटात राहू दे.). या वाक्यातील 'तद्' हे सर्वनाम इतके भावोत्कट व हृदयस्पर्शी आहे.

[३.१७.३] विशेषणे

(१) अनसूया -- अद्य स राजर्षिरिष्टिं परिसमाप्य ऋषिभिर्विसर्जित आत्मनो नगरं प्रविश्यान्त:पुरसमागत इतोगतं वृत्तान्तं स्मरति वा न वेति।

प्रियंवदा -- विस्रब्धा भव। न तादृशा आकृतिविशेषा गुणविरोधिनो भवन्ति। (७२)

अर्थात -- आज यज्ञ संपल्यावर ऋषींनी त्या राजर्षीला निरोप दिला. तो राजधानीत गेल्यावर अंत:पुरातील स्त्रियांशी रममाण झाला की, इकडे आश्रमात काय घडले ते त्याला आठवेल की नाही (की येथले तो पार विसरून जाईल ?)

-- खात्री बाळग. त्याच्यासारख्या (म्हणजे असाधारण) व्यक्तित्वाच्या व्यक्तीकडून गुणांना हरताळ फासणारे वर्तन होणार नाही.

प्रियंवदेचा आशय असा की, देखण्या व्यक्तींच्या ठायी देखणेच गुण असतात. देखण्या व्यक्तींकडून, अपेक्षिलेल्या गुणांच्या बाबतीत, तद्विरुध्द आचरण होत नाही. जणू काही 'Handsome is what handsome does' हे कालिदासाची प्रियंवदा दीड हजार वर्षांपूर्वीच बोलून गेली ! येथील 'असाधारण' अर्थाचे व्यंजक 'तादृशा' विशेषणही असाधारणच आहे.

(२) राजा स्वत: रेखाटलेले शकुंतलेचे चित्र हातात धरतो आणि त्यात रेखाटलेल्या अनसूयाप्रभृती तिघींपैकी शकुंतला कोणती ते विचार करून सांग बघू, असे विदूषकाला आह्वान देतो. ते स्वीकारून विदूषक म्हणतो :

विदूषक: -- (निर्वर्ण्य) तर्कयामि यैषा शिथिलकेशबन्धनोद्वान्तकुसुमेन केशान्तेन उद्भिन्नस्वेदबिन्दुना वदनेन विशेषतोऽपसृताभ्यां बाहुभ्यां अवसेक - स्निग्धतरुणपल्लवस्य चूतपादपस्य पार्श्व ईषत्परिश्रान्तेव आलिखिता सा शकुन्तला। इतरे सख्याविति। (१५०)

अर्थात -- (निरखून पाहून) माझा असा तर्क आहे की, जिचा अंबाडा सैल झाल्यामुळे ज्याच्या केसांतील फुले गळून पडली आहेत, जिच्या चेहऱ्यावर घामाचे थेंब जमा झाले आहेत, जिचे खांदे खूप झुकलेले आहेत, ज्याची कोवळी पालवी जलसिंचनामुळे चमकत आहे अशा

आंब्याच्या झाडाजवळ किंचित थकलेली अशी जी रेखाटली गेली आहे ती शकुंतला ! दुसऱ्या दोघी तिच्या मैत्रिणी.

विदूषककृत हे चित्रमय वर्णन वाचून रसिकाच्या मनात असा विचार त्वरित येतो की, 'अरे राजा, हे चित्र आहे', ह्या शब्दांत शकुंतलेला ज्या विदूषकाने चित्रात बंदिस्त करून टाकले, त्याच विदूषकाने समर्पक विशेषणांनी विनटलेल्या वरील शब्दचित्राद्वारे तिला रसिकांपुढे जणू सजीव व साकार केले आहे.

[३.१७.४] **क्रियापदे**

(१) 'वाचवा, वाचवा', असा ओरडा ऐकल्यावर प्रतीहारी बातमी घेऊन येते की, अदृश्य स्वरूपातील कोण्या प्राण्याने विदूषकाला मेघप्रतिच्छन्द महालाच्या गच्चीवर फेकून दिले आहे. ते ऐकून राजा खेदाने म्हणतो - 'अरेरे ! माझ्या घरातही भुते शिरली तर !' पुन्हा एकदा पडद्यामागून 'घात झाला ! घात झाला !' असे दु:खोद्गार ऐकू येतात. तेव्हा राजा 'मित्रा, घाबरू नकोस, घाबरू नकोस' ह्या शब्दांत विदूषकाला धीर देतो. त्यावर विदूषक विव्हळून म्हणतो :

(नेपथ्ये) कथं न भेष्यामि। एष मां कोऽपि प्रत्यवनतशिरोधरमिक्षुमिव त्रिभङ्गं करोति। (१६३)

अर्थात -- (पडद्याआड) कसा भिऊ नको ? हा (येथे) कोणीतरी माझी मान मागच्या बाजूला वाकवून उसाच्या कांड्याचे (जसे तीन तुकडे करावेत) तसे माझ्या मानेचे तीन तुकडे करीत आहे.

येथील 'त्रिभङ्गं करोति' हे क्रियापद असहाय विदूषकाची मूर्तीच डोळ्यांसमोर उभी करते.

(२) मारीच ऋषींच्या आश्रमात सर्वदमनाला बघितल्यावर राजाच्या मनात त्याच्याविषयी आपुलकी उत्पन्न होते. तेव्हा तो स्वत:लाच प्रश्न विचारतो :

राजा -- किं नु खलु बालेऽस्मिन्नौरस इव पुत्रे स्निह्यति मे मन: । नूनमनपत्यता मां वत्सलयति। (१७७)

अर्थात -- ह्या बालकाविषयी माझ्या मनाला, स्वत:च्या मुलाविषयी वाटावे असे, प्रेम का बरे वाटत आहे ? आले लक्षात, माझी अनपत्यता मला वत्सल बनवीत (माझ्या ठायी वात्सल्यभाव उत्पन्न करीत) आहे.

खरे म्हणजे, राजा अनपत्य नाही. सर्वदमन हा त्याचाच मुलगा आहे (पण हे सत्य त्याला अजून कळलेले नाही). त्यामुळे त्याच्याविषयी राजाच्या मनात वात्सल्य दाटून येणे स्वाभाविक आहे. ही वस्तुस्थिती ठाऊक असणाऱ्या सहृदय वाचकाच्या डोळ्यांत मात्र 'वत्सलयति' हे क्रियापद पाणी आणते !

[३.१७.५] अव्यये

(१) राजाने काढलेले शकुंतलेचे चित्र घेऊन चतुरिका माधवीमंडपात येते. तेथे एका दगडी आसनावर बसून राजा व विदूषक त्या चित्राचे अवलोकन करू लागतात. तेव्हा सानुमती (मेनकेची मैत्रीण) एका वेलीआड लपून आपल्या मैत्रिणीचे चित्र बघू या, असा निश्चय करून तशी लपून बसते व म्हणते :

सानुमती -- ततस्तस्यै भर्तुर्बहुमुखमनुरागं निवेदयिष्यामि। (१४२)

अर्थात -- नंतर मग तिला (शकुंतलेला) तिच्या पतीचे तिच्यावर किती प्रगाढ प्रेम आहे ते जाऊन सांगेन किंवा नंतर मग मी तिच्यावरील त्याच्या प्रेमाचे विविध प्रकारांनी वर्णन करून सांगेन.

प्रस्तुत वाक्यातील 'बहुमुखं' शब्द विशेषणवाचक घेतल्यास 'प्रगाढ प्रेम' असा अर्थ होतो; पण तोच शब्द क्रियाविशेषण अव्यय मानल्यास 'विविध प्रकारांनी' असा अर्थ होतो. कालिदासाने खुबीने हा शब्द निवडून योजलेला दिसतो.

(२) राजा चतुरिकेला ब्रशांची पेटी घेऊन येण्यास सांगतो. त्याप्रमाणे ती पेटी घेऊन येत असताना काय घडले त्याचे निवेदन असे करते :

चतुरिका -- स मे हस्तादन्तरा तरलिकाद्वितीयया देव्या वसुमत्याहमेवार्यपुत्रस्योपनेष्यामीति सबलात्कारं गृहीतः। (१५६)

अर्थात -- (मी ती ब्रशांची पेटी घेऊन इकडे येत असताना) वाटेत तरलिकेबरोबर असलेल्या महाराणी वसुमतींनी, 'मीच ही पेटी महाराजांकडे घेऊन जाईन', असे म्हणून माझ्या हातातून जबरदस्तीने घेतली. यातील सबलात्कारं या क्रियाविशेषणाने वसुमतीचा 'फणकारा' सूचित झाला आहे. ह्या शब्दप्रयोगात अशी अन्वर्थकता आहे.

एकंदरीने, कालिदासाने शब्दांची निवड करताना त्यांचा अचूकपणा, त्यांची कार्यक्षमता व त्यांचे सौष्ठव या तिन्ही गुणधर्मांकडे पुरेपूर लक्ष दिले आहे.

[३.१८] श्लेष

अलीकडच्या काळात श्लेष किंवा व्द्यर्थीपणा हा एक महत्त्वाचा शैली-उपाय मानण्यात येऊ लागला आहे. हा उपाय शब्दाची अनेकार्थता (Polysemy) ह्या मानवी भाषेच्या मूलभूत वैशिष्ट्यावर आधारित आहे. कोणत्याही भाषेत ज्यांना केवळ एकच अर्थ आहे असे शब्द जवळजवळ नसतात. संस्कृत भाषाही ह्या नियमाला अपवाद नाही हे अमरकोषाच्या अभ्यासकांना ठाऊक आहेच. उलमन [७४] ने शब्दांच्या अनेकार्थकत्वाची पुढीलप्रमाणे पाच उगमस्थाने मानली आहेत : (१) एकाच शब्दाचे वेगवेगळ्या संदर्भांत वेगवेगळे अर्थ होणे, (२) प्रत्येक व्यवसायागणिक शब्दाला वेगळा अर्थ असणे, (३) आलंकारिक भाषाप्रयोग,

(४) सारखे ध्वनी असलेले पण वेगळे अर्थ असलेले शब्द (homonyms) व (५) परभाषेतून घेतलेले शब्द.

अशा प्रकारे भाषेच्या ठिकाणी जी अनेकार्थक्षमता मुळात असते तिच्यावर श्लेष (Pun) ह्या शैली-उपायाची उभारणी झालेली आहे. शैली-उपायरूप 'संदिग्धता' ही एकाच शब्दात दडलेल्या विविध अर्थांवर अधिष्ठित असते. श्लेषाची कोशगत व्याख्या अशी : "The humorous use of a word in such a way as to suggest different meanings or applications or of words having the same or nearly the same sound but different meanings" [७५]

तसे पाहता ललित साहित्य हा अथपासून इतीपर्यंत सारा शब्दांचाच खेळ आहे. प्रस्तुतचा शैली-उपाय हा त्या व्यापक खेळाचा एक पोटप्रकार आहे. हा श्लेष अनेकार्थता (Polysemy) व ध्वनिसमानता (homonymy) ह्या दोन साधनांनी साधला जातो. ह्याचे प्रकट (explicit) व प्रच्छन्न (implicit) असे दोन प्रकार आहेत. ह्याचा अतिरेक वर्ज्य आहे हे खरे, पण हा विवेकाने वापरल्यास विनोद, उपहास, आघात (emphasis), विरोध इत्यादी शैली-परिणाम साधण्यास सहायक ठरतो. [७६] शाकुंतलात श्लेषाची सुमारे वीस उदाहरणे आढळतात. त्यांपैकी दहांची चर्चा करू.

(१) प्रियंवदा व अनसूया या शकुंतलेच्या मैत्रिणी दुष्यंतासारख्या वाक्चतुर व प्रभावी व्यक्तिमत्त्वाच्या पुरुषाकडे बघून शकुंतलेला म्हणतात की, आज जर तात काश्यप येथे हजर असते तर त्यांनी तुझे ह्याच्याशी लग्न लावून देऊन ह्याला कृतार्थ केले असते (२०). ह्या प्रशंसोद्गारांनी मनोमन सुखावलेली शकुंतला लटक्या रागाने म्हणते -

शकुन्तला -- युवामपेतम् । किमपि हृदये कृत्वा मन्त्रयेथे । न युवयोर्वचनं श्रोष्यामि ।
राजा -- वयमपि तावद् भवत्योः सखीगतं किमपि पृच्छामः । (२०-२१)
अर्थात -- तुम्ही दोघीजणी जा कशा ! मनात काहीबाही विचार आणता आणि बोलता झालं. मी तुम्हां दोघींचं बोलणं ऐकणार(च) नाही ती !
-- आम्ही सुद्धा आपल्या (दोघींच्या) मैत्रिणीविषयी थोडेसे विचारू इच्छितो.

शकुंतला 'किमपि' शब्द 'काहीबाही, न पटणारे, काल्पनिक' या अर्थाने वापरते. राजा तिचाच 'किमपि' शब्द उचलून धरून पुन्हा उच्चारतो, पण त्याच्या मनात मात्र त्या शब्दाचा 'ही कोण, कोणाची मुलगी, क्षत्रियकन्या की ब्राह्मणकन्या' असा वेगळाच अर्थ असतो. येथे एकच शब्द दोन वेगवेगळी कार्ये कशी सफलतेने साधतो, ते बघण्यासारखे आहे. यात राजाची समयसूचकता उठून दिसते.

(२) शकुंतलेला प्रियंवदेच्या ऋणातून मुक्त करण्यासाठी राजा आपली आंगठी तिला देऊ करतो. ती हातात घेऊन प्रियंवदा व अनसूया आंगठीवरील राजाच्या नावाची अक्षरे वाचतात.

ती 'दुष्यन्त' अशी असल्याचे पाहून त्या दोघी एकमेकींकडे साभिप्राय बघतात व त्या दोघींनाही मनोमन कळून चुकते की हा प्रभावशाली पुरुष म्हणजे स्वत: राजा दुष्यंतच आहे, त्याचा अधिकारी नव्हे. हे लक्षात आल्यावर प्रियंवदा मार्मिकपणे म्हणते : 'तेन हि नार्हत्येतद् अङ्गुलीवियोगम् । (२६)

अर्थात -- तर मग ही आंगठी (ज्या बोटात आहे) त्या बोटापासून वेगळी होणे योग्य नाही. हा सरळ असा पहिला अर्थ. तो दुष्यंताशी संबध्द आहे. पण जर दुष्यंताने ती आंगठी प्रियंवदेला दिली तर तिच्याच बोटात कायमची असणे योग्य, त्या बोटापासून तिचा वियोग होणे योग्य नाही. कारण जिच्यावर राजाचे नाव कोरलेले आहे अशी ती राजाच्या मालकीची ('राजकीय') आंगठी असल्यामुळे बहुमूल्य आहे. ती कुठेतरी पडणे किंवा हरवणे योग्य नाही, हा दुसरा अर्थ. असा हा श्लेष. प्रियंवदा औदार्याने म्हणते 'आर्यस्य वचनेन अनृणा इदानीं एषा ।' ('मान्यवरांच्या आश्वासनानेच ही कर्जमुक्त झाली आहे').

(३) वरील वाक्य उच्चारून व किंचित हसून प्रियंवदा म्हणते :

-- 'हला शकुन्तले, मोचितास्यनुकम्पिनार्येण, अथवा महाराजेन।' (२६)

अर्थात -- गडे शकुंतले, कनवाळू मान्यवरांनी किंवा महाराजांनी तुला मुक्त केले आहे. (तू आता जाऊ शकतेस).

येथे प्रियंवदेला प्रत्यक्षात 'अभिलषिणा' हा शब्द वापरावयाचा आहे, कारण शकुंतला दुष्यंताच्या मनात भरली आहे, हे तिच्या दोघी मैत्रिणींनी हेरले आहे. येथे भाषेच्या फसवेपणामुळे श्लेष झाला आहे.

(४) शकुंतला राजाला उद्देशून लिहिलेले प्रेमपत्र आपल्या मैत्रिणींना वाचून/गाऊन दाखवते. त्यातील 'निर्घृण' हे राजाला उद्देशून वापरलेले संबोधन ऐकून झाडाआड लपलेला राजा एकाएकी प्रकट होतो. त्याला बघून अनसूया व प्रियंवदा दोघी हर्षनिर्भर होतात, उठून उभ्या राहतात आणि उद्गारतात :

सख्यौ -- स्वागतमविलम्बिनो मनोरथस्य । (६३)

अर्थात -- विलंब न करता प्रकट झालेल्या मनोरथाचे स्वागत असो !

खरे म्हणजे त्या दोघी दुष्यंताचे स्वागत करीत असतात. पण त्यांना अचानकपणे प्रकट झालेला दुष्यंत म्हणजे शकुंतलेचा मूर्तिमंत मनोरथ वाटतो. खुद्द शकुंतलेने आपल्या प्रेमपत्रात 'मनोरथ' शब्द वापरलेला असतो. (निर्घृण तपति बलीयस्त्वयि वृत्तमनोरथाया अङ्गानि । (६२), अर्थात - हे निर्दया, माझी गात्रं न् गात्रं (तुझी प्राप्ती व्हावी) ह्या मनोरथावर उत्कटतेनं केंद्रित झाली आहेत.) त्याचाच पुनरुच्चार करण्याची विचक्षणता त्या दोघी दाखवतात.

(५) शकुंतलेला व दुष्यंताला एकान्त लाभावा म्हणून हरिणबालकाची त्याच्या आईशी गाठ घालून देण्याचे निमित्त सांगून अनसूया व प्रियंवदा जाऊ लागतात तेव्हा-

शकुन्तला -- हला, अशरणास्मि । अन्यतरा युवयोरागच्छतु ।

उभे -- पृथिव्या यः शरणं स तव समीपे वर्तते । (६६)

अर्थात -- गडे, मी असहाय आहे. तुम्हां दोघींपैकी एकजण माझ्या आधारासाठी या.

-- (अग, एवढी काय घाबरतेस ?) ज्याचा (समग्र) पृथ्वीला आधार (आहे) तो(च प्रत्यक्षात) तुझ्याजवळ आहे. (मग तू असहाय किंवा एकाकी असे स्वतःला का मानतेस ?)

यात राजा तुला आता ह्या मदनबाधेच्या अवस्थेत आधार देईल, हा भाव दोघींच्या मनात आहे. ह्या दृष्टीने 'शरणं' शब्द श्लेषोत्पादक आहे.

(६) शकुंतला कामज्वराने पीडित असते. त्यामुळे ती काहीशी अस्वस्थ असते. तिची ही अस्वस्थता शारीरिक तापाने असावी असे गौतमीला वाटते. ती विचारते :

गौतमी -- (शकुन्तलामुपेत्य) जाते अपि लघुसंतापानि तेऽङ्गानि । (६९)

अर्थात -- (शकुंतलेच्या जवळ जाऊन) बाळे, आता (उन्हाळ्यामुळे होणारा) शरीराचा दाह कमी झाला आहे ना ?

यातील संताप शब्दाचा गौतमी एक अर्थ घेत असते, तर प्रेक्षक/वाचक (शकुंतलेच्या कामपीडित अवस्थेनुसार) दुसराच अर्थ घेत असतात. अशा प्रकारे येथील 'संताप' 'श्लेषजनक' ठरतो !

(७) गौतमीच्या वरील प्रश्नाला शकुंतला खालील, वरकरणी सरळ भासणाऱ्या, शब्दांत उत्तर देते.

शकुन्तला -- आर्ये, अस्ति मे विशेषः । (६९)

अर्थात -- आत्ते, आता माझ्यात (पुष्कळच) सुधारणा आहे (म्हणजे पहिल्यापेक्षा बरे वाटत आहे).

गौतमी सरळपणे हेच उत्तर ग्रहण करते. पण शकुंतलेच्या मनात मात्र 'नवलविशेष सांगण्याजोगे असे काही आहे किंवा मला काही विशेष असे तुला सांगावयाचे आहे', हा भाव आहे. तो ती सांगण्यास कचरते. पण प्रेक्षकांना मात्र हा दुसरा अर्थ चटकन प्रतीत होतो व सूक्ष्म आनंद होतो.

(८) शकुंतलेच्या वरील उत्तरानंतर गौतमीच्या सांगण्यावरून शकुंतला झोपडीकडे परतण्यास निघते. तथापि दुष्यंत झाडाआड लपलेला असल्याचे ती विसरू शकत नाही, पण गौतमीच्या उपस्थितीमुळे त्याला भेटूही शकत नाही. ती एकदोन पावले पुढे जाऊन लतासमूहाला उद्देशून म्हणते :

शकुंतला -- लतावलय संतापहारक, आमन्त्रये त्वां भूयोऽपि परिभोगाय। (६९)

अर्थात -- माझ्या संतापाचे हरण करणाऱ्या लतासमूहा, मी तुझा सर्वांगांनी उपभोग घेण्यासाठी पुन्हा येईन (हं) !

हे वाक्य प्रत्यक्षपणे लतासमूहाला पण अप्रत्यक्षपणे लतासमूहामागे दडून बसलेल्या दुष्यंताला उद्देशून शकुंतलेने उच्चारलेले असते हे ठाऊक असलेला प्रेक्षक सुखावतो.

(९) काश्यपांचा संदेश घेऊन काही ऋषी दुष्यंताच्या दरबारात येतात. संदेश सांगण्यापूर्वी नेहमीच्या प्रथेनुसार ते राजाला पुढीलप्रमाणे हार्दिक आशीर्वाद देतात.

ऋषय: -- इष्टेन युज्यस्व। (११०)

अर्थात -- इष्टा(वस्तू)शी तुझा संयोग होवो (=तुला इष्टाची प्राप्ती होवो)

प्रेक्षक किंवा वाचक इष्ट म्हणजे इष्ट व्यक्ती असा अर्थ ग्रहण करतात, कारण शकुंतला आता राजमहालात आलेली असल्याचे त्यांना ठाऊक असते. आंगठी दाखवून ती राजाची खात्री पटवणार व दोघांचे मिलन होणार, असे प्रेक्षक/वाचक धरून चालतात. म्हणून ते मनातल्या मनात 'इष्टजनेन युज्यस्व' अशी पुस्ती जोडतात !

(१०) सर्वदमनाने सिंहाच्या छाव्याशी खेळून जीव धोक्यात घालून घेऊ नये, म्हणून एक तापसी सुव्रता नामक दुसऱ्या तापसीला मातीचा रंगीबेरंगी मोर हे खेळणे घेऊन येण्यास सांगते. सर्वदमन त्या मोराशी खेळेल अशी तिची (भाबडी) कल्पना असते. सुव्रता तसा मातीचा मोर घेऊन येते. तेव्हा -

तापसी -- सर्वदमन, शकुन्तलावण्यं प्रेक्षस्व। (१८२)

अर्थात -- बाळा सर्वदमना, (ह्या) पक्ष्याचे सौंदर्य बघ.

तापसीच्या वरील संस्कृत उक्तीचे मूळ प्राकृत रूप 'सव्वदमण, सउन्दलावण्णं पेक्ख।' असे आहे. पैकी सउन्दलावण्ण-ची फोड सउन्दला-वण्णं = शकुन्तला-वर्ण=शकुन्तलाया: रूपम्' अशी सर्वदमन मनातल्या मनात करतो. त्याला तापसीने आपल्या आईच्या नावाचा (शकुंतलेचा) उच्चार केला असे वाटते व तो विचारतो : कुत्र वा मम माता। (तत्रैव). यामुळेच श्लेष उत्पन्न होतो.

ह्यावरून कालिदास भाषा 'वाकवण्यात' व वापरण्यात कसा निष्णात आहे, ते जाणवते.

[३.१९] समानान्तरता

ह्या शैली-उपायाला इंग्रजीत Parallelism म्हणतात. लिखाणात समतोल (balance) व लय (rhythm) साधण्याचा हा एक हुकमी उपाय आहे. ज्याप्रमाणे दोन रेषांमध्ये सारखे अंतर असता त्यांना समान्तर रेषा म्हणतात त्याप्रमाणे दोन शब्दसमूह, वाक्यखंड किंवा वाक्ये ह्यांची जेव्हा एक ओळीत पध्दतशीरपणे रचना केलेली असते तेव्हा समानान्तरता झाली असे म्हणतात. बॉवडेनने अतिशय मोजक्या व समर्पक शब्दांत ह्या शैली-उपायाची व्याख्या

पुढीलप्रमाणे केली आहे -

"Another structural device in the sentence, parallelism, gives emphasis to the equal and parallel quality of two or more ideas. Parallelism is simply the careful stylistic balancing of sentence members which are equal in importance and in function" [७७].

अर्थात हा एक वाक्यनिष्ठ शैली-उपाय आहे. ह्यात शब्द, वाक्यांग व वाक्यखंड हे वाक्याचे घटकावयव समांतर पध्दतीने पुनरावृत्त केलेले असतात. थोडक्यात, सारखे आशय व सारखे शब्दबंध म्हणजे समानांतरता. ह्या प्रकारच्या वाक्यांना समतोलयुक्त वाक्ये म्हणतात.

रीडने [७८] प्रतिपादिले आहे की समांतर वाक्यांत कधी दोन, तीन किंवा चार घटकांचीही समानता साधलेली असते. तर कधी दोन विरुध्दार्थक वाक्यखंड किंवा वाक्ये यांची रचनादृष्ट्या समांतरता आढळून येते. जेव्हा असे विरुध्दार्थक वाक्यखंड असतात तेव्हा तद्युक्त वाक्य दोन सारख्या शक्तीच्या पण विरुध्द ताणांच्या समतोलाचे उदाहरण बनते.

क्रुइझर व कोगन [७९] ह्यांच्या मते जरी हा वाक्याकार शैली-उपाय असला तरी ह्याच्या योगे अर्थाच्या सूक्ष्म छटा व्यक्त होण्यास मदत होते; शिवाय शब्दांचा विस्तार टाळता येतो.

ह्या शैली-उपायाचा इतर सर्वच शैली-उपायांप्रमाणे प्रमाणाबाहेर वापर केल्यास सदभिरुचीस धक्का बसतो व लेखन कृत्रिम वाटू लागते. असा धोक्याचा इशारा प्राय: सर्वच शैलीशास्त्रज्ञांनी दिला आहे. आता शाकुंतलातील उदाहरणांकडे पाहू.

(१) शकुंतलेला छळणाऱ्या भुंग्याला घालवून लावण्यासाठी म्हणून दुष्यंत एकाएकी उपवनात प्रकट होतो. त्याला पाहून प्रभावित झालेल्या अनसूया व प्रियंवदा यांना त्याच्याविषयी जिज्ञासा उत्पन्न होते. अनसूया प्रत्यक्षपणे 'आपण कोण, कोठून आलात', इत्यादी प्रश्नांचा त्याच्यावर भडिमार करते. तेव्हा राजा पेचात पडतो व स्वत:शी म्हणतो :

राजा -- (आत्मगतम्) कथमिदानीमात्मानं निवेदयामि, कथं वात्मापहारं करोमि। (२०)

अर्थात -- (स्वत:शी) आपण कोण ते आता सांगून टाकू या की, आपले खरे स्वरूप लपवू या ?

येथे मोकळेपणाने सांगून टाकणे आणि मनातला भाव लपवणे अशा दोन परस्परविरुध्द क्रियांनी युक्त अशी दोन वाक्ये समांतर 'मांडली' आहेत. वस्तुत: दुष्यंताला 'काय उत्तर द्यावे ?', 'काय करावे बरे ?' असे 'स्वगत' म्हणता आले असते. पण त्यायोगे मनातील परस्परविरुद्ध विचारांची ओढाताण यथार्थपणे व्यक्त झाली नसती आणि प्रेक्षकांपर्यंत किंवा वाचकांपर्यंत स्पष्ट स्वरूपात पोचली नसती. परंतु ते कार्य वरील समांतर वाक्यांद्वारे अचूकपणे होते. म्हणून ही वाक्यरचना अपरिहार्य ठरते.

(२) काश्यपांच्या अनुपस्थितीमुळे राजा राक्षसांपासून यज्ञयागादींचे संरक्षण करण्यासाठी काही

दिवस आश्रमात राहण्याचा निर्णय घेतो. त्याच सुमारास उपवासाचे पारणे फेडण्यासाठी राजाला त्याच्या आईकडून बोलावणे येते. राजाची द्विधा मन:स्थिती होते. ऋषिकार्य करावे की, आईच्या बोलावण्यानुसार राजधानीकडे जावे, हे त्याला कळेनासे होते; तो निर्णय घेऊ शकत नाही. तेव्हा तो म्हणतो :

राजा -- इतस्तपस्विकार्यम्। इतो गुरुजनाज्ञा। द्वयमप्यनतिक्रमणीयम्। (४८)

अर्थात -- एकीकडे हे ऋषिजनांचे कार्य. दुसरीकडे वडीलधाऱ्यांची आज्ञा. दोन्हीही डावलता/उपेक्षिता येत नाहीत अशी कार्ये.

राजा या नात्याने ऋषिजनांचे कार्य करणे हेही त्याचे कर्तव्य आणि आईची आज्ञा मानणे हेही त्याचे कर्तव्य. ह्या दोन कर्तव्यांच्या कात्रीत तो सापडतो. येथेही त्याने 'अधुना किं करणीयम् ?' असा प्रश्न विचारला असता तर तो दोन कर्तव्यांपैकी एकाची निवड करण्याची दुष्करता वाचकांच्या मनावर ठसवू शकला नसता. मात्र वरील समांतर वाक्यरचना ते कार्य सफलपणे साधते.

(३) अनसूया व प्रियंवदा शकुंतलेची दु:स्थिती पाहून व्याकुळ होतात व तिच्या ह्या दु:स्थितीचे कारण तिने मोकळेपणाने सांगावे म्हणून आग्रह धरतात. सरतेशेवटी शकुंतला खुलासा करते की, जेव्हापासून तो राजर्षी दृष्टीस पडला आहे तेव्हापासून आपल्या मनात त्याच्याविषयी आकर्षण उत्पन्न झाले आहे. तेव्हा झाडाआड लपून बसलेला दुष्यंत तिचे हे सुस्पष्ट निवेदन ऐकून हर्षनिर्भर होऊन म्हणतो :

राजा -- (सहर्षम्) श्रुतं श्रोतव्यम्। (५८)

अर्थात -- (आनंदाने) जे ऐकावयाचे (होते ते) ऐकले.

शकुंतलेचेही आपल्यावर (आपले जसे तिच्यावर आहे तसे) प्रेम आहे हे त्याला तिच्या मुखातून ऐकावयाचे होते; ते ऐकण्यास तो आसुसलेला होता. शेवटी जेव्हा ते शब्द तिच्या मुखातून निघाले तेव्हा त्याची जणू 'लब्धं श्रोत्रनिर्वाणम्' अशी स्थिती झाली. हर्षातिरेकामुळे त्याच्या तोंडून नेमके दोनच शब्द निघाले आणि त्यातही ऐकल्याचा हर्षातिरेक प्रकट करणारा 'श्रुतं' शब्द मुखातून प्रथम बाहेर पडला. पूर्वी राजाने 'दर्शनीयं न दृष्टम्' (३९) असा जो प्रयोग केला होता त्या धर्तीवर 'श्रोतव्यं श्रुतम्' असे म्हटले असते तर ते प्रभावी ठरले असते की नसते, हा प्रश्न विचारणीय आहे.

(४) काश्यप शाङ्र्गरवाने दुष्यंताला कोणता संदेश सांगावा ते त्याला ऐकवतात व मग शकुंतलेकडे वळून तिला म्हणतात -

काश्यप -- वत्से, त्वमिदानीमनुशासनीयासि। वनौकसोऽपि सन्तो लौकिकज्ञा वयम्। (९६)

अर्थात -- मुली, आता तुला (थोडा) उपदेश करावयाचा आहे. आम्ही वनात राहणारे असलो तरीही लोकाचार जाणणारे आहोत.

वनवासी लोकांना शहरवासियांचे रीतिरिवाज, शिष्टाचार, जीवनशैली इत्यादींचे ज्ञान नसते अशी सर्वसाधारण समजूत आहे. पण काश्यप येथे वरील समानांतर वाक्याद्वारे हे सुचवू इच्छितात की, आम्ही जंगलात राहणारे असलो तरी (बुध्दिमान असल्यामुळे) लोकाचारही जाणणारे आहोत.

(५) शकुंतला राजदरबारात येते. पण दुर्वासाच्या शापामुळे राजाला तिची ओळख पटत नाही; तिच्याशी लग्न केल्याचे आठवत नाही. तेव्हा गौतमी शकुंतलेच्या चेहऱ्यावरील बुरखा बाजूला सारते; राजा तिच्या चेहऱ्याकडे बघतो. तिचे असामान्य लावण्य बघून तो कमालीचा प्रभावित होतो व 'इदं....' इत्यादी श्लोकात आपली प्रतिक्रिया व्यक्त करतो. त्या श्लोकाच्या चवथ्या चरणात समानांतरतेचा कवीने कौशल्याने वापर केला आहे. तो चरण असा : 'न खलु सपदि भोक्तुं नैव शक्नोमि हातुम् ।' (११४), अर्थात - मी एकदम हिचा (उप)भोगही घेऊ शकत नाही, तसेच हिचा (एकाएकी) त्यागही करू शकत नाही. ही अपरिचित असल्यामुळे उपभोगास योग्य नाही, पण त्याच वेळी ही असामान्य लावण्यवती असल्यामुळे म्हणजेच उपभोगयोग्य असल्यामुळे त्याज्यही नाही. राजाच्या मनातील हे द्वंद्व समांतर रचनेमुळेच ठसठशीतपणे मनावर बिंबते.

(६) शकुंतला राजदरबारात गेली असता राजा तिला ओळखू शकत नाही वा तिच्याशी लग्न झाल्याचे त्याला आठवतही नाही. गौतमी शकुंतलेचा बुरखा दूर सारते तरी राजाला तिची ओळख पटत नाही. स्वत: शकुंतला काही जुने प्रसंग व घटना त्याला ऐकवते तेव्हा तर तो तिला 'गोडगोड बोलून विषयलंपट पुरुषांना आपल्या जाळ्यात ओढणारी स्वैरिणी' म्हणून धिक्कारतो. जेव्हा बरीच कडवट प्रश्नोत्तरे झाल्यावर वातावरण खूप तापते तेव्हा शारद्वत हताश होऊन दुष्यंताकडे वळून त्याला म्हणतो :

शारद्वत: -- (राजानं प्रति) तदेषा भवत: पत्नी त्यज वैनां गृहाण वा ।
उपपन्ना दि दारेषु प्रभुता सर्वतोमुखी ॥ (१२१)

अर्थात -- ही आपली पत्नी आहे. हिला टाक किंवा पदरात घे. कारण पत्नीवरील प्रभुत्व हे सर्वव्यापक मानले जाते.

यातील 'त्यज वैनां गृहाण वा' याचे दोन वाक्यखंड आहेत, प्रत्येकात चार-चार अक्षरे आहेत. पण हे समानांतर वाक्यखंड अर्थदृष्ट्या परस्परविरुध्द आहेत ('टाक' किंवा 'स्वीकार'). अर्थात, अशी रचना शारद्वताच्या मन:स्थितीतील कोणत्याही व्यक्तीला स्वाभाविकपणे स्फुरली असती, हेही तितकेच खरे.

(७) शाकुंतलाच्या सहाव्या अंकाच्या प्रारंभीच एक पोलीस निरीक्षक व दोन शिपाई एका मच्छीमाराला बडवतात आणि 'राजाची नाममुद्रा असलेली ही रत्नजडित आंगठी तू कोठून मिळवलीस ते सांग', म्हणून दरडावून विचारतात. भयभीत होऊन तो मच्छीमार आपल्याला आंगठी कशी मिळाली ते सांगतो.

पुरुष: -- एकस्मिन् दिवसे खण्डशो रोहितमत्स्यो मया कल्पितः। यावत् तस्योदराभ्यन्तरे प्रेक्षे तावदेतद् रत्नभासुरमङ्गुलीयकं दृष्टम्। पश्चादहं तस्य विक्रयाय दर्शयन् गृहीतो भावमिश्रैः। मारयत वा मुञ्चत वा। अयमस्यागमवृत्तान्तः। (१२८)

अर्थात -- एके दिवशी मी एका रोहित माशाचे तुकडे केले. तेव्हा मी जो त्याच्या पोटात पाहतो तो रत्नाने चमकणारी ही आंगठी मला दिसली. नंतर मी तिच्या विक्रीसाठी (व्यापाऱ्यांना) दाखवीत असताना आपण मला पकडलेत. (आता) मारा किंवा मुक्त करा. ह्या आंगठीच्या प्राप्तीची ही हकीगत आहे.

ह्या वाक्यांपैकी 'मारयत वा मुञ्चत वा' या दोन वाक्यांत समानांतरता आहे. दुसऱ्या एखाद्याने 'मी आता तुमच्या तावडीत सापडलो आहे, तेव्हा माझ्या जीवाचे जे काही बरेवाईट करावयाचे असेल ते करा', अशी शब्दयोजना केली असती. पण तसले लांबलचक वाक्य वरील टोकदार व आटोपशीर वाक्याच्या तुलनेने परिणामशून्य ठरले असते. वरील संस्कृत वाक्याची 'झोडा किंवा सोडा', 'मारा किंवा तारा', 'ठोकून काढा किंवा सुटका करा', अशी वेगवेगळी भाषांतरे करता येतील.

(८) मच्छीमाराचे काय करावयाचे ते विचारण्यासाठी श्याल (पोलीस निरीक्षक) प्रकरण राजाकडे घेऊन जातो. इकडे दोघे शिपाई मच्छीमाराला ठार करण्यास उतावळे झालेले असतात. त्यांपैकी एक त्या मच्छीमाराला म्हणतो :

द्वितीय : -- (विलोक्य) ... गृध्रबलिर्भविष्यसि, शुनो मुखं वा द्रक्ष्यसि। (१२९)

अर्थात -- (पाहून)...गिधाडाचा बळी होशील किंवा कुत्र्याच्या तोंडचे भक्ष्य बनशील (म्हणजे दोन्ही स्थितींत मृत्युमुखी पडशील.).

अपराध्याला फाशी देणाऱ्यांच्या तोंडची ही भाषा स्वाभाविक आहे. शिवाय, दोन समानार्थक कल्पनांची समानांतरता साधली आहे.

(९) मच्छीमाराकडून मिळालेली आंगठी पाहिल्यावर राजाला पूर्वीच्या सर्व घटना आठवू लागतात आणि आपण शकुंतलेचा अकारण धिक्कार केला ह्याबद्दल पश्चात्ताप वाटू लागतो. विदूषक राजाला दिलासा देताना म्हणतो की, 'कोणत्याही दुःखी मुलीच्या आईवडिलांना तिचे दुःख दीर्घकाळ पाहवणार नाही, त्यामुळे तुझे लवकरच शकुंतलेशी पुनर्मिलन होईल असा विश्वास बाळग.' त्यावरील राजाची प्रतिक्रिया-

राजा -- वयस्य, स्वप्नो नु माया नु मतिभ्रमो नु।
क्लिष्टं नु तावत्फलमेव पुण्यम्॥....(१४५)

अर्थात -- मित्रा, हे स्वप्न, की ही माया, की हा बुद्धीला झालेला भ्रम की तेवढेच फळ देऊन संपुष्टात आलेले पुण्य ?

स्वप्न, माया व मतिभ्रम ही तिन्ही भ्रामक ज्ञाने होत. त्या तिहींचे समानांतर रचनेने एकत्रीकरण करून कवीने वैचित्र्य उत्पन्न केले आहे. शिवाय 'नु'च्या पुनरावृत्तीने रचनेत लय उत्पन्न झाली आहे.

(१०) शकुंतलेचे पुनर्दर्शन अशक्यप्राय आहे असे वाटून राजा दु:खीकष्टी होतो. पण दुर्जय नामक दानवगणाशी लढण्यासाठी इंद्राला राजाची मदत हवी असते. तेव्हा राजाच्या मनाची मरगळ झांझडून टाकण्यासाठी आणि त्याचा पराक्रमरूपी 'वन्ही चेतवण्यासाठी' मातली विदूषकाला बदडून काढून राजाला डिवचतो. त्यावर -

राजा -- भोस्तिरस्करिणीगर्वित, मदीयं शस्त्रं त्वां द्रक्ष्यति । एष तमिषुं संदधे यो हनिष्यति वध्यं त्वां रक्ष्यं रक्षिष्यति द्विजम् ।... (१६४-६५)

अर्थात -- अरे, पडद्याआड लपून गर्व वाहणाऱ्या, माझे शस्त्र तुला पाहील. मी हा बाण (धनुष्याला) जोडतो जो वधाला योग्य अशा तुझा वध करील आणि रक्षणास योग्य अशा ब्राह्मणाचे रक्षण करील.

यातील 'यो हनिष्यति वध्यं त्वां' व 'रक्ष्यं रक्षिष्यति द्विजम्' ही दोन विरुद्धार्थक वाक्ये केवळ समानांतर आहेत असे नाही, तर राजाचे पौरुष उसळून आले असल्याची जाणीव करून देणारीही आहेत. एकंदरीने कालिदासाने हा शैली-उपाय प्रभुत्वाने व अर्थानुरोधाने वापरला आहे.

[३.२०] समानार्थकता (Synonymy)

एकच अर्थ, विचार किंवा कल्पना व्यक्त करण्यासाठी सामान्यपणे प्रत्येक भाषेत एकाहून अधिक शब्द असतात. भाषेचा वापर करणाऱ्याला अशा शब्दांच्या मदतीने अर्थाच्या बारीक छटा व्यक्त करता येतात. अशा समानार्थक शब्दांचा ललित लेखकाला खूप उपयोग करून घेता येतो. म्हणूनच समानार्थकता हा एक समर्थ शैली-उपाय ठरतो. मात्र ह्या शब्दांच्या बाबतीत एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. ती अशी की कोणत्याही दोन समानार्थक शब्दांत किंचित फरक अवश्य असतो. पण तो आंशिक किंवा किरकोळ स्वरूपाचा असतो तर साम्य मोठ्या प्रमाणावर व मूलभूत स्वरूपाचे असते. ट्रेन्च[८०] ने म्हटल्याप्रमाणे समानार्थक शब्द पूर्णपणे समानही नसतात किंवा एकदम भिन्नही नसतात.

संस्कृतातील अमरकोषात समानार्थक शब्दांच्या लिंगश: वर्गीकृत याद्या दिलेल्या आहेत, ही बाब सर्वश्रुत आहे.

कॉलिन्सने अशा समानार्थक शब्दांचे पारस्परिक संबंधांच्या व/वा प्रभावांच्या आधारे सर्वसाधारण, तीव्र, भावव्यंजक, स्तुति/निंदा-सूचक, तटस्थ, व्यवसायनिदर्शक, साहित्यिक, बोलीस्वरूपाचे, स्थानीय व बालभाषागत असे अनेक प्रकार मानले आहेत.[८१]

ललितलेखक कधी दोन समानार्थक शब्दांपैकी एकाची निवड करतो तर कधी एखादा

विशिष्ट परिणाम साधण्यासाठी तसे दोन शब्द जोडतो. उलमनने[८२] ह्या बाबतीत असे विचार मांडले आहेत की, लेखकाला एकच 'अर्थ' व्यक्त करण्यासाठी दोन शब्द उपलब्ध असतील तर तो संदर्भ, भावना, जोर (आघात), वाक्याची एकूण ध्वनिरचना आणि अभिप्रायाचा रोख ह्या सर्व गोष्टी ध्यानात ठेवून त्या दोहोंपैकी एकाची निवड करतो.

मात्र कल्पक व भाषाप्रभू साहित्यिकाला समानार्थक शब्दांखेरीज शाब्दिक पुनरुक्ती टाळणे, समीकरण साधणे, एकच 'अर्थ' एकदा सकाराने व एकदा नकाराने व्यक्त करणे, भिन्नभिन्न वाक्यविन्यास साधणे, अशी समानार्थकतेची निरनिराळी स्वरूपे लीलया हाताळता येतात. आता शाकुंतलात या शैली-उपायाचा विलास कसा प्रतीत होतो, त्याचा अभ्यास करू.

[३.२०.१] समानार्थक शब्द

(१) अलंकरण - अलंकार (१३), मण्डन (८४), समालंभन (८४), इत्यादी

(२) आगतस्वागत - आतिथ्य (१८), पुरस्कृत: (२८)

(३) ऋषिपुत्र - महर्षिपुत्र: (१७९), ऋषिकुमार (१८०), मुनिकुमार (१८१)

(४) ऋषी - तपस्विन: (१०४), ऋषय: (१०७), मुनय: (१०८)

(५) कुल - गोत्र (२१), अन्वय (१८१), वंश (१८१)

(६) फुले - पुष्प (६), कुसुमानि (७३), सुमनस: (८२)

(७) मच्छीमार - धीवर (१२६), मत्स्यबन्ध: (१२८), जालोपजीवी (१३०), मात्स्यिक (१३१)

(८) मुली (संबोधन) - पुत्रिके (८३), वत्से (८४), जाते (८४)

(९) सहावा हिस्सा - षड्भाग (४३), पष्ठभाग (४३)

(१०) सिंहाचा छावा - सिंहशिशु (१७६), बालमृगेन्द्र (१७७), इत्यादी.

[३.२०.२] समीकरणे

(१) राजा--...पिबसि रतिसर्वस्वमधरम् । (१६) येथे अधर=रतिसर्वस्व.

(२) राजा--अहो चेष्टाप्रतिरूपिका कामिजनमनोवृत्ति: । (२४) येथे मनोवृत्ती=चेष्टा (शारीरिक हालचाली).

(३) (नेपथ्ये)--...मूर्तो विघ्नस्तपस:...गज:...। (२८) येथे हत्ती=तपश्चर्येचे मूर्तिमंत विघ्न.

(४) शिष्य: --सा खलु भगवत: कुलपतेरुच्छ्वसितम् । (५०) येथे सा=शकुन्तला=कण्व कुलपतींचा उच्छ्वास.

(५) काश्यप:--अर्थो हि कन्या परकीय एव । (१००) येथे कन्या=परक्याचे धन.

(६) शाङ्गरव:--शकुन्तला मूर्तिमती च सत्क्रिया । (१११) येथे शकुंतला=सत्क्रिया

(७) राजा--मनोरथा नाम तटप्रपाता: । (१४५) येथे मनोरथ=(पर्वतकड्यावरून कोसळणारे) धबधबे.

(८) राजा--कष्टं खलु अनपत्यता। (१५८) येथे अनपत्यता=यातना.

(९) राजा--धर्मपत्नी...कुलप्रतिष्ठा। (१६०) येथे धर्मपत्नी=कुळाचा आधार किंवा कुळाची अब्रू/प्रतिष्ठा.

(१०) मारीचः--(एकैकं निर्दिशन्) दिष्ट्या शकुन्तला साध्वी सदपत्यमिदं भवान्।
श्रद्धा वित्तं विधिश्चेति त्रितयं तत् समागतम्। (१९२)

येथे शकुंतला=श्रद्धा, अपत्य=वित्त (धनदौलत) आणि भवान्=दुष्यंत=क्रियाविधी.

[३.२०.३] एकाच श्लोकात किंवा वाक्यात एकच अर्थ व्यक्त करण्यासाठी भिन्न शब्दांचा प्रयोग

(१) राजा -- (शकुन्तलां विलोक्यात्मगतम्) किं नु खलु यथा वयमस्यामेव-
मियमप्यस्मान् प्रति स्यात्। (२६)

येथील 'यथा वयं अस्यां' व 'इयं अस्मान् प्रति' ह्या दोन्ही शब्दबंधांचा अर्थ 'प्रेमयुक्त' असाच आहे. पण कालिदासाने शाब्दी पुनरुक्ती टाळली आहे.

(२) राजा -- चित्रे निवेश्य....विधिना कृता नु।
स्त्रीरत्नसृष्टिरपरा...धातुर्विभुत्वं...तस्याः। (४०-४१)

या श्लोकातील 'विधि' व 'धातु' या दोन्ही शब्दांचा अर्थ ब्रह्मदेव असा आहे. पण तो अर्थ दोन वेगवेगळ्या शब्दांनी व्यक्त केला गेला आहे.

(३) राजा -- ....समस्तापः कामं मनसिजनिदाघप्रसरयो-
र्न तु ग्रीष्मस्यैवं सुभगमपराध्दं युवतिषु॥ (५४)

येथील निदाघ व ग्रीष्म हे दोन शब्द उन्हाळा (म्हणजे ज्येष्ठ व आषाढ हे महिने) हा एकच अर्थ व्यक्त करणारे आहेत.

(४) राजा -- किं तावद्....दूषितं
धर्मारण्यचरेषु केनचिदुत...चेष्टितम्।
आहोस्वित् प्रसवो....वीरुधा-। (१०७)

या श्लोकातील उत व आहोस्वित् हे दोन्ही शब्द 'की' किंवा 'अथवा' या अर्थाचे आहेत.

(५) राजा -- ...प्रजागरात् खिलीभूतस्तस्याः स्वप्ने समागमः।
बाष्पस्तु न ददात्येनां द्रष्टुं चित्रगतामपि। (१५६)

जागरणामुळे राजाचा शकुंतलेशी स्वप्नात होणारा समागम थांबला आहे. अर्थात त्याला आता तिचे दर्शन स्वप्नात होत नाही आणि डोळे अश्रूंनी डबडबल्यामुळे चित्रातल्याही तिचे दर्शन होत नाही. अशा प्रकारे 'दर्शन होत नाही' हा अर्थ भिन्न शब्दबंधांनी व्यक्त केला आहे.

(६) मारीचः -- ...पुत्रस्य ते रणशिरस्ययमग्रयायी

....

....

तत् कोटिमत् कुलिशमाभरणं मघोनः । (१९०)

या श्लोकात 'ते पुत्रस्य' = तुझ्या (म्हणजे अदितीच्या) मुलाचा=इंद्राचा आणि मघोनः म्हणजेही इंद्राचा, हा एकच अर्थ दोन भिन्न शब्दांत व्यक्त झाला आहे.

[३.२०.४] एकाच अर्थाच्या अभिव्यक्तीसाठी भिन्नभिन्न ठिकाणी निरनिराळ्या शब्दावलीचा प्रयोग

(१) वैखानसः-- ...आर्तत्राणाय वः शस्त्रं न प्रहर्तुमनागसि । (७)

(हे राजा) तुझे शस्त्र पीडितांच्या रक्षणासाठी आहे, निष्पापांवर प्रहार करण्यासाठी नाही.

(नेपथ्ये) -- ...आर्तानां भयमपनेतुमात्तधन्वा । (१६४)

(हे राजा), पीडितांची भयभीती घालवण्यासाठी तू धनुष्य घेतले आहेस.

(२) राजा -- (स्वगतम्) भवतु । एवं तावदभिधास्ये । (१७)

राजा -- (आत्मगतम्) भवतु । एवं तावदेनां वक्ष्ये । (२०)

राजा -- (स्वगतम्) भवतु । एनमेवं वक्ष्ये । (४९)

या सर्व ठिकाणी 'असो. ह्याला/हिला असे सांगू या', हाच अर्थ आहे.

(३) प्रियंवदा -- आर्य,...। गुरोः पुनरस्या अनुरूपवरप्रदाने सङ्कल्पः । (२३)

अनसूया -- गुणवते कन्यका प्रतिपादनीयेत्ययं तावत् प्रथमः सङ्कल्पः । (७३)

ह्या दोन्ही वाक्यांचा अर्थ 'हिला गुणवान वराला देण्याचा वडिलांचा आद्य संकल्प आहे', हाच आहे.

(४) राजा -- ...वेगावतरणादाश्चर्यदर्शनः संलक्ष्यते मनुष्यलोकः । तथाहि शैलानामवरोहतीव शिखरादुन्मज्जतां मेदिनी...(१७१)

येथे तर लागोपाठच्या दोन वाक्यांत मनुष्यलोकः व मेदिनी (म्हणजे मधू व कैटभ यांच्या विष्णुकृत वधानंतर त्यांची चरबी जिच्यावर पसरली आहे अशी पृथ्वी) हे पृथ्वी या एकाच अर्थाचे वाचक शब्द वापरण्यात आले आहेत.

(५) राजा -- उदारः कल्पः । (११६), अर्थात -- उत्तम कल्पना (आहे).

मातलिः -- प्रथमः कल्पः । (१७३), अर्थात -- उत्तम कल्पना (आहे).

(६) विदूषकः -- (आत्मगतम्) गृहीतोऽनेन पन्था उन्मत्तानाम् । (१४८)

विदूषकः -- (प्रहस्य । आत्मगतम्) एष तावदुन्मत्तः । (१५५)

अर्थात -- झालं, वेड्यासारखा वागू लागला आहे.

वरील वाक्ये शैलीदृष्ट्या विचारणीय नसली तरी कवीने शाब्दिक पुनरुक्ती टाळण्याच्या दृष्टीने घेतलेली दक्षता त्याच्या निवडक शब्दयोजनेची द्योतक ठरते.

[३.२०.५] एकच अर्थ एकदा सकाराने व एकदा नकाराने व्यक्त करणे

दुष्यंताने शकुंतलेचे चित्र रेखाटलेले असते. त्यात तो वारंवार 'अधिक ते सरते व न्यून ते पुरते', करीत राहतो (यद्यत् साधु न चित्रे स्यात् क्रियते तत् तदन्यथा। (१४९). ही 'घडामोड' बघून विदूषक राजाला विचारतो -

विदूषक: -- ...(प्रकाशम्) भो:, अपरं किमत्र लेखितव्यम्। (१५१)

अर्थात -- (प्रकटपणे) मित्रा, ह्या चित्रात आणखी काय रेखाटावयाचे आहे ?

यावर राजाने 'कार्या सैकतलीनहंसमिथुना --' (१५२) इत्यादी श्लोकात 'काय रेखाटावयाचे आहे', त्याचे वर्णन केले आहे, तर 'कृतं न कर्णार्पितबन्धनं ---' (१५३) इत्यादी श्लोकात 'विस्मरणामुळे काय रेखाटावयाचे राहून गेले आहे', म्हणजेच 'काय रेखाटावयाचे आहे' त्याचे वर्णन केले आहे. थोडक्यात, 'आलेख्य' तपशील एकदा सकाराने व एकदा नकाराने वर्णिला आहे.

अशा प्रकारे शाकुंतलात समानार्थकतेचे बहुरूपी व बहुमुखी दर्शन घडते.

(३.२१) स्वल्पविराम

स्वल्पविराम हे विरामचिन्हांपैकी एक आहे. ही चिन्हे इंग्रजी भाषेतून आपण स्वीकारली आहेत. संस्कृतात पूर्णविरामाखेरीज विरामचिन्ह नाही. स्वल्पविरामाचे कार्य किंचित विश्राम (pause) दाखवणे हे आहे. जेव्हा उभयान्वयी अव्यय वगळून (म्हणजे न वापरून) स्वल्पविरामाचा उपयोग केला जातो तेव्हा एकता, अभिन्नता किंवा संश्लिष्टता या गुणाचा प्रत्यय येता, असे वेदर्सने [३] म्हटले आहे. स्वल्पविरामाचा उपयोग करून शाकुंतलातील काही वाक्यांचे पुनर्लेखन खालीलप्रमाणे करून दाखवता येईल :

(१) राजा -- (आत्मगतम्) कथं इदानीमात्मानं निवेदयामि, कथं वा आत्मापहारं करोमि। (२०) येथील स्वल्पविराम विचारांतर दर्शवतो.

(२) राजा -- इदं च मे मनसि वर्तते।

अनाघ्रातं पुष्पं, किसलयमलूनं कररुहैर्,
अनाविध्दं रत्नं, मधु नवमनास्वादितफलम्,
अखण्डं पुण्यानां फलमिव च तद्रूपं अनघं।
न जाने भोक्तारं कमिह समुपस्थास्यति विधि: ॥ (४१)

(३) शारद्वत:-- अभ्यक्तमिव स्नात:, शुचिर् अशुचिमिव, प्रबुध्द इव सुप्तम्।
बध्दमिव स्वैरगतिर्, जनमिह सुखसङ्गिनमवैमि ॥ (१०८)

(४) शकुन्तला -- भगवति वसुधे, देहि मे विवरम् । (१२४)

(५) विदूषक: -- .... तत्र मे चित्रफलकगतां, स्वहस्तलिखितां, तत्रभवत्या: शकुन्तलाया: प्रतिकृतिमानयेति । (१४१)

(६) सानुमती --अनभिज्ञ: खलु ईदृशस्य रूपस्य, मोघदृष्टिरयं जन: । (१५०)

(७) राजा -- युज्यते । अयि भो:, कुसुमलता-प्रिय-अतिथे, किमत्र परिपतनखेदं अनुभवसि । (१५४)

(८) राजा -- मातले, कतमोऽयं पूर्वापर-समुद्र-अवगाढ:, कनकरस-निस्यन्दी, सान्ध्य इव मेघपरिघ: सानुमान् आलोक्यते । (१७२)

(९) मारीच: -- आखण्डलसमो भर्ता, जयन्तप्रतिम: सुत: ।
आशीरन्या न ते योग्या, पौलोमीसदृशी भव । (१९१)

(१०) मारीच: -- दिष्ट्या शकुन्तला साध्वी, सदपत्यं इदं, भवान् ।
श्रध्दा, वित्तं, विधिश्चेति त्रितयं तत् समागतम् ॥ (१९२)

[३.२२] निष्कर्ष

मौखिक संभाषण ही कानाची भाषा असून तात्कालिक स्वरूपाची असते. ललितलेखक हा भाषेचा सर्जनशील वापर करण्यात प्रवीण असतो. त्यामुळे तो आपल्या अंगच्या कल्पकतेने ह्या संभाषणांना देखणे पैलू पाडतो. परिणामी, त्या संभाषणांना एक वेगळीच झळाळी प्राप्त होऊन त्यांचे चित्तवेधक संवादांत रूपांतर होते. असे प्रतिभास्पृष्ट संवाद वाचकांना पुन्हापुन्हा गुणगुणावेसे अथवा वाचावेसे वाटतात, त्यांच्या कायमचे लक्षात राहतात, त्यांना अपूर्व आनंद देतात आणि कधीकधी अक्षरश: वेड लावतात.

नाटकातील संवाद गद्य व पद्य या दोन माध्यमांत व शाकुंतलासारख्या भाषादृष्ट्या मिश्र नाटकातील संवाद संस्कृत व प्राकृतप्रभृती अन्य भाषांतही रचलेले असतात.

नाटकातील संवाद हे ललित साहित्याच्या भाषेचे एक विशिष्ट स्वरूप असते. ते आनंददायक व संस्मरणीय बनविण्याचे कार्य संबंधित भाषेच्या अंगभूत सामर्थ्यांचा नेटकेपणाने, काटकसरीने व सदभिरुचीने (म्हणजेच सौंदर्यदृष्टीने) वापर केल्याने साध्य होत असते. भाषेच्या ह्या अंगभूत सामर्थ्यांनाच उल्मन, क्रुइझर, बॉवडेन, ब्रूक्स, मॉरिसन, हफ् इत्यादी शैलीशास्त्रज्ञांनी शैलीचे उपाय असे संबोधिले असून ते असंख्य असतात किंवा संभवतात, असे प्रतिपादिले आहे. पण त्यांतल्या त्यात अनुप्रास, अन्यधर्मारोप, अलंकार, क्रमविपर्यय, नकार, विचलन इत्यादी १६ उपाय प्रमुख मानले आहेत. पाश्चात्यांनी इंग्रजी साहित्याच्या विश्लेषणात्मक अभ्यासाच्या आधारे हे उपाय विरामचिन्हे, शब्दकळा, वाक्यरचना, भाषेची रूढी, भाषेचे शोभाकर धर्म, शब्दार्थ, विदग्धोक्ती इत्यादी विविध वर्गांत मोडतात असे साधार दाखवून दिले आहे.

दीड हजार वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या कालिदासाला विसाव्या शतकातील पाश्चात्यांचे वरील विचार ठाऊक असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. पण त्याने संस्कृत व्याकरणात निरूपिलेल्या सुंदर रूपसिध्दीच्या नियमांचे कसून अध्ययन करून, स्वपूर्वकालीन साहित्यिकांच्या कृतींचे सूक्ष्म बुध्दीने अनुशीलन करून आणि आजूबाजूस प्रत्यक्षात होणाऱ्या विविध, विपुल व वैचित्र्यपूर्ण भाषाप्रयोगांचे साक्षेपाने श्रवण करून पाश्चात्यांनी निदर्शनास आणलेल्या शैली-उपायांसारख्या भाषिक रचना स्वयंप्रेरणेने व लीलया केलेल्या आढळतात. त्याने संस्कृत भाषेची अंगभूत सामर्थ्ये अतिशय कुशलपणे व सुभगतेने हाताळली आहेत. त्यांतही 'च' हे अव्यय, उपमा व मानुषीकरण हे अलंकार, उत्तरगर्भ प्रश्न, क्रमविपर्यय,नकार, विरुध्दोक्ती, समानांतरता, वाक्प्रचार व म्हणी आणि विचलन ह्या शैली-उपायांच्या हाताळणीत प्रशंसनीय मार्मिकता, परिपक्वता व प्रभुता प्रदर्शित केली आहे. ती अनुभवणाऱ्या रसिकाला एकीकडे कविकुलगुरूच्या तरल सौंदर्यदृष्टीचा, भाव-प्रसंगांच्या मर्मज्ञतेचा आणि संस्कृत-प्राकृत गद्य-पद्य भाषा वाकवण्याच्या असाधारण सामर्थ्याचा प्रत्यय येतो तर दुसरीकडे तितकाच उत्कट व 'विगलितवेद्यान्तर' आनंद लाभतो.

संदर्भ

१. "...the very division into colloquial and literary is unsound. One cannot, or does not, exist without the other. Basically, the language is one entity; and, in any case, communication by speech precedes communication by writing ... But the spoken language imparts to the written its own peculiar quality of life or 'livingness'... the literary language finds its own level..." - प्रकरण दुसरे, संदर्भ १, पृ. १७५-७६

२. Donald C. Freeman, ed., Linguistics and Literary Style, New York, Holt, Rinehart and Winston Inc., 1970, p. 85

३. Herbert Read, English Prose Style, first Indian edition, Ludhiana, Lyall Book Depot, 1968, Intro. p. ix-xii.

४. G. H. Vallins, The Best English, London, Andre Deutsch, 1960, p. 161

५. J. M. Murry, The Problem of Style, Oxford, Oxford University Press,1922, pp.67,125

६. Marjorie Boulton, The Anatomy of Poetry, Fifth impression, London, Routledge and Kegan Paul Ltd., 1968, p. 122

७. ____________, The Anatomy of Prose, Third impression, London, Routledge and Kegan Paul Ltd., 1962, pp. 2-4

८. हे मत वामन ह्या प्राचीन भारतीय काव्यालंकारशास्त्रकाराला मान्य होणार नाही. त्याने

गद्याचे वृत्तगंधी, चूर्ण व उत्कलिकाप्राय असे तीन प्रकार मानले असून ज्या गद्यात पद्यांश असतो ते वृत्तगंधी असे त्याचे लक्षण केले आहे. पाहा : वामन, काव्यालंकारसूत्राणि, स्ववृत्तिसमलंकृतानि, संशोधक, नारायण राम आचार्य, चतुर्थ, मुंबई, निर्णयसागर प्रेस, १९५३, पृ. १२ /

९. C. Brooks and R. P. Warren, Fundamentals of Good Writing (A Handbook of Modern Rhetoric), Fourth impression, London, Dennis Dobson, 1968, p. 435

१०. "Every device must be, and is, functional. It must help to delineate fine points of meaning". प्रकरण दुसरे, संदर्भ ३, पृ. २१४

११. तत्रैव.

१२. Stephen Ullmann, Semantics An Introduction to the Science of Meaning, reprinted, Oxford, Basil Blackwell, 1972 (A Blackwell Paperback), pp. 129-37

१३. प्रकरण दुसरे, संदर्भ ३, पृ. १९९-२१९

१४. Edwin T. Bowden, An Introduction to Prose Style, New York, Rinehart and Company, Inc., 1956 (English Pamphlet Series), pp. 17-24

१५. संदर्भ ७, पृ. १४६

१६. संदर्भ ९, पृ. ४१२, ४२८-२९

१७. K. Morrison, In Black and White, New York, The Free Press, 1972, pp. 20-21, 69, 118

१८. संदर्भ ४, पृ. ११३-१३५

१९. संदर्भ १३, पृ. ३७

२०. Graham Hough, Style and Stylistics, Reprinted, London, Routledge and Kegan Paul, 1972, p. 37

२१. वामन केशव लेले, 'परिवर्तनाङ्कित वाक्यसाधक व्याकरण और संस्कृत भाषा', Journal of Ganganath Jha Kendriya Sanskrit Vidyāpītha, Allahabad, Vol. XLVI (1990), pp. 111-128.

२२. Winifred Nowottny, The Language Poets Use, Fifth impression, London, The Athlone Press, 1975, p. 113

२३. 'न शास्त्रं अद्रव्येषु अर्थवत् ॥ ४ ॥' - संदर्भ ८, पृ. ३

२४. Vāman Shivarām Āpte, The Student's Guide To Sanskrit Composition, Nineteenth, Poona, Poona Anath Vidyarthi Griha, 1947, p. 274

२५. R. Wellek and A. Warren, Theory of Literature, Third edition, London, Peregrine Books, 1963, p. 178

२६. संदर्भ २२, पृ. २४

२७. संदर्भ २०, पृ. ३७

२८. B. B. Cohen, Writing About Literature, Chicago, Scott, Foresman and Company, 1963, p. 111

२९. पाहा : 'नहि चमत्कारविरहितस्य कवेः कवित्वं, काव्यस्य वा काव्यत्वम् ।' - क्षेमेन्द्र, कविकण्ठाभरण, संपा., वा. के. लेले, प्रथम, दिल्ली-पटना-वाराणसी, मोतीलाल बनारसीदास, १९६७, पृ. ७६

३०. 'आपः क्षीरं कुशाग्रं च दधि सर्पिः सतण्डुलम् ।
यवः सिध्दार्थकश्चैव अष्टाङ्गोऽर्घः प्रकीर्तितः ।' (२५१)

३१. "The most potent lexical device available for emotive and expressive purposes is figurative language." - संदर्भ १२, पृ. १३६

३२. "...Figurative language properly used seems to grow naturally out of the subject and to contribute effectively to the subject". - संदर्भ १४, पृ. ७

३३. प्रकरण दुसरे, संदर्भ ३, पृ. ३१२

३४. W. R. Winterowd, Rhetoric A Synthesis, New York, Holt, Rinehart And Winston, Inc., 1968, pp. 102-03

३५(अ) तत्रैव, पृ. १०३

(ब) पीचॅम (Peacham) नावाच्या ग्रंथकाराने सुमारे दोनशे अलंकारांची यादी दिली आहे. (तत्रैव)

३६. संदर्भ ७, पृ. १४९

३७. संदर्भ २८,पृ. ८

३८. संदर्भ ३३, पृ. ३११

३९. Good English How To Speak And Write It, London, Odhams Press Limited, p. 204

४०. संदर्भ ३३, पृ. ३११.

४१. संदर्भ २८, पृ. १३८

४२. दण्डी, काव्यलक्षणम्, संपा. अनन्तलाल ठक्कुर व उपेन्द्र झा, दरभंगा, मिथिला विद्यापीठ, १९५७, पृ. ८५

४३. संदर्भ १४, पृ. ७

४४. प्रकरण दुसरे, संदर्भ ७, पृ. १२६

४५. प्रकरण दुसरे, संदर्भ २, पृ. ८५६

४६. प्रकरण दुसरे, संदर्भ ६, पृ. २१२-१३

४७. संदर्भ ३४, पृ. ११३-१४

४८. संदर्भ ९, पृ. ३८४

४९. वामन केशव लेले, ललितलेखन व शैली, प्रथम, नागपूर, साहित्य प्रसार केन्द्र, १९ मार्च, १९८४, पृ. १२९-

५०. प्रकरण दुसरे, संदर्भ २, पृ.५१

५१. तत्रैव, पृ. ६७२

५२. तत्रैव, पृ. ५४

५३. तत्रैव, पृ. २३९

५४. तत्रैव, पृ. ४३.

५५. G. A. Love and M. Payne, Contemporary Essays on Style, Chicago, Scott, Foresman and Company, 1969, pp. 22-26

५६. संदर्भ १४, पृ. २३

५७. संदर्भ २८, पृ. ८६

५८. संदर्भ ६, पृ. ७४-८०

५९. संदर्भ १४, पृ. २३

६०. संदर्भ ७, पृ.१६६

६१. संदर्भ १७, पृ. ६८

६२. प्रकरण दुसरे, संदर्भ ७, पृ. २०७

६३. संदर्भ १४, पृ. २४

६४. संदर्भ ७, पृ. १५८

६५. संदर्भ १४, पृ. २४

६६. संदर्भ १७, पृ. १२८

६७. संदर्भ २८, पृ. ५

६८. C. Rajendran, A Transcultural Approach to Sanskrit Poetics, First , Calicut, The author, April, 1994, pp. 70-71

६९. संदर्भ ४, पृ. ५०-५१

७०. संदर्भ १७, पृ. १५१

७१. संदर्भ ४, पृ. ५०

७२. प्रकरण दुसरे, संदर्भ २, पृ. ३११

७३. 'Linguistics And The Figures of Rhetoric', in Essays on Style and Language, ed., Roger Fowler, second impression, London, Routledge and Kegan Paul, 1967, p.140

७४. संदर्भ १२, पृ. १५९-६५

७५. प्रकरण दुसरे, संदर्भ २, पृ. ९३५

७६. संदर्भ १२, पृ. १९२

७७. संदर्भ १४, पृ. २३-२४

७८. संदर्भ ३, पृ. ४०-४२

७९. प्रकरण दुसरे, संदर्भ ३, पृ. २१४

८०. R. C. Trench, The Study of Words, First Indian print, New Delhi, Asian Publication Services, 1979, p.179

८१. संदर्भ १२, पृ. १४२-४३ च्या आधारे.

८२. तत्रैव, पृ. १५१

८३. "When it (normal conjunction) is omitted, the effect so produced, is that of oneness, unity or integration." 'The Rhetoric of the Series', संदर्भ ५५, पृ. २५

* * *

४. कालिदास-कल्पित शैली-उपाय

[४.१] कालिदास-कल्पित शैली-उपाय

संस्कृत भाषेला दीर्घकालीन परंपरा असल्यामुळे, ती भाषा प्राचीन काळात नित्याच्या वापरातील भाषा असल्यामुळे आणि ती अनेक अंगांनी समृध्द व विकसित झालेली असल्यामुळे तिच्या ठायी अर्थाच्या अगणित छटा प्रभावीपणे व्यक्त करण्याचे अमर्याद सामर्थ्य कालिदासाच्या उदयाच्या काळापर्यंत उत्पन्न झालेले होते. कालिदासाने परिश्रमपूर्वक अभ्यास करून त्या सामर्थ्याच्या विविध पैलूंशी उत्तम परिचय करून घेतला होता आणि म्हणूनच त्याने अनुप्रासादी अर्वाचीनोक्त शैली-उपाय सुमारे दीड हजार वर्षांपूर्वीच अतिशय परिणामकारकपणे व यशस्वीपणे शाकुंतलात उपयोजिले आहेत, हे आपण गेल्या प्रकरणात लक्षात घेतले. कोणताही अपूर्व-वस्तु-निर्मिति-क्षम लेखक भाषेच्या विद्यमान सौंदर्यसाधनांचा उपयोग तर करून घेतोच, पण तो स्वत:च्या प्रतिभासामर्थ्याने त्यांत यथाशक्ती भरही घालत असतो; त्यायोगे भाषेची अभिव्यक्ति-क्षमता वृध्दी पावत असते. (ह्या मुद्याचा संक्षिप्त उल्लेख पूर्वी [३.५.५] मध्ये केलेलाच आहे.) कालिदासानेही आपल्या कल्पकतेच्या साहाय्याने १. अर्थाचे स्तर, २. आत्मोक्ती, ३. शब्दाऐवजी पूर्ण वाक्याची योजना, ४. विकल्पोक्ती आणि ५. विशिष्ट व्याकरण-प्रयोग असे पाच अधिकचे शैली-उपाय शाकुंतलात वापरलेले आढळून येतात. त्यांचाच ह्या प्रकरणात क्रमश: परिचय करून घेऊ. (पाश्चात्यांनी न सुचवलेले / प्रतिपादिलेले ह्या अर्थाने ह्या शैली-उपायांना कालिदास-कल्पित म्हटले आहे.)

[४.२] अर्थाचे स्तर

कवीला निरनिराळ्या पात्रांच्या वेगवेगळ्या भावनात्मक प्रतिक्रिया, वर्ण्य विषयाचा तपशील, घटना-प्रसंगांतील बारकावे इत्यादींची अभिव्यक्ती करताना अर्थाच्या सूक्ष्म पातळ्या हेरून वर्णाव्या लागत असतात. तशा वर्णनांत अर्थांचे चढाव-उतार, तीव्रता-मंदता, अर्थाचा प्रकर्ष-अपकर्ष इत्यादी छटा व्यक्त होत असतात व त्या लेखनाची रंगत वाढवीत असतात. शाकुंतलातील एका उदाहरणाद्वारे हा मुद्दा अगोदर स्पष्ट करू.

नाटकाच्या सुरुवातीलाच राजा रथात बसून काळविटाचा पाठलाग करीत असतो. काळवीट खूप जोराने पळत असते, त्यामुळे रथारूढ राजाला त्याने बरेच मागे टाकलेले असते. राजा 'ग्रीवाभङ्गाभिरामं...' (४-५) इत्यादी श्लोकात त्याचे जे वर्णन करतो त्या वर्णनाचा शेवटचा चरण असा आहे -

'पश्योदग्रप्लुतत्वाद्वियति बहुतरं स्तोकमुर्व्यां प्रयाति । (५)

अर्थात -- बघ (ते काळवीट) लांबलांब उड्या मारीत असल्यामुळे अधिकतर आकाशात (म्हणजे हवेत) चालत आहे; पृथ्वीवर फार थोडे चालत आहे. येथील 'बहुतर' शब्द 'बहु' ह्या विशेषणाचा 'तर'-भाव (comparative degree) व्यक्त करणारा आहे. [पूर्वी २.८.१ मध्ये निरूपिलेल्या अत्युक्तीहून ह्या 'तर'-भावाचे स्वरूप भिन्न आहे.] हा काळविटाच्या दोन 'चालीं'-तील स्तराचा द्योतक आहे. आता ह्याच प्रकारची अन्य उदाहरणे लक्षात घेऊ.

(१) अनसूया -- हला शकुन्तले, त्वत्तोऽपि तातकाश्यपस्याश्रमवृक्षकाः प्रियतरा इति तर्कयामि। (११)

अर्थात -- गडे शकुंतले, माझा असा अंदाज आहे की, तातकाश्यपांना आश्रमातील हे वृक्ष तुझ्याहूनही अधिक प्रिय वाटतात.

(२) अनसूया -- .... (प्रकाशम्) ... किंनिमित्तं वा सुकुमारतरोऽपि तपोवनगमनपरिश्रमस्यात्मा पदमुपनीतः। (१९)

अर्थात -- .... (उघडपणे) ... आणि आपण इतके अधिक सुकुमार असूनही तपोवनात येण्याचे परिश्रम घेऊन स्वतःला का शिणवलेत ?

(३) राजा -- ... एषा मे मनोरथप्रियतमा सकुसुमास्तरणं शिलापट्टमधिशयाना सखीभ्यामन्वास्यते। (५३-५४)

अर्थात -- ही माझी सर्वोत्तम इच्छा फुले अंथरलेल्या शिळेवर बसली असून तिच्या दोन मैत्रिणी तिची शुश्रूषा करीत आहेत.

(४) राजा -- अवितथमाह प्रियंवदा। तथा हि

....

मध्यः क्लान्ततरः प्रकाशमविनतावंसौ छविः पाण्डुरा। .... (५६)

अर्थात -- प्रियंवदा जे बोलली ते खोटे नाही. कारण

तिची (म्हणजे शकुंतलेची) कंबर अत्यंत बारीक (झाली आहे), खांदे खूप झुकले (आहेत) व (त्वचेचा) रंग फिकुटला (आहे).

(५) काश्यपः -- श्रूयताम् .... दौष्यन्तिमप्रतिरथं तनयं निवेश्य। ... (९८)

अर्थात -- दुष्यंतापासून तुला होणाऱ्या व अतुल योध्दा असणाऱ्या आपल्या मुलाचे लग्न केल्यावर.

दुष्यंताचा मुलगा तो दौष्यंती. अप्रतिरथ म्हणजे रथात बसून लढणारा प्रतिस्पर्धिरहित योध्दा. म्हणजेच सर्वश्रेष्ठ लढवय्या. अर्थात येथे 'तम'-भावार्थ अभिप्रेत आहे.

(६) शाङ्गर्रवः-- त्वमर्हतां प्राग्रसरः स्मृतोऽसि नः। (१११)

अर्थात -- तू योग्यतासंपन्न व्यक्तींमध्ये सर्वांत अग्रगण्य (आहेस असे) आम्ही

मानतो. येथील 'प्र' ने, आत्यंतिक प्रकर्ष सुचवला आहे. येथेही 'सर्वश्रेष्ठ योग्यतासंपन्न व्यक्ती' हाच अर्थ अध्याहृत आहे.

(७) श्याल: -- धीवर, महत्तरस्त्वं प्रियवयस्क इदानीं मे संवृत्त: । (१३२)

अर्थात -- (मच्छीमाराकडून बक्षिसातील अर्धी रक्कम मिळाल्यानंतर), हे मच्छीमारा, आता तू माझा फार मोठा प्रिय मित्र झाला आहेस.

येथील महत्तर हा तर-भाव-वाचक शब्द, घटकेपूर्वी 'वध्य' वाटणारा मच्छीमार जेव्हा स्वत:ला मिळालेल्या बक्षिसाच्या रकमेपैकी निम्मी रक्कम श्यालाला देतो, तेव्हा त्याला तोच मच्छीमार एकाएकी 'वंद्य' कसा वाटू लागतो, ह्या मनुष्यस्वभावाच्या वैशिष्ट्यावर प्रकाश टाकतो व म्हणून अतिशय समर्पक आहे.

(८) द्वितीया -- ....पथिकजनयुवतिलक्ष्य: पञ्चाभ्यधिक: शरो भव । (१३५)

अर्थात -- हे आम्रमंजरी, ज्यांचे पुरुष प्रवासाला गेले आहेत अशा तरुणींना लक्ष्य बनवून प्रसिध्द पाच बाणांहून वरचढ असा बाण हो.

येथील 'पंचाभ्यधिक:' शब्दाचा अर्थ सर्वाधिक प्रभावकारी किंवा सर्वोत्तम असा आहे. म्हणजेच येथे 'तम'-भाव (superlative degree) सुचवला आहे.

(९) राजा इंद्राच्या रथात बसून मारीचाश्रमात येतो. तेथील अत्युदात्त व पवित्र वातावरणाचे वर्णन करताना म्हणतो -

राजा -- स्वर्गादधिकतरं निर्वृतिस्थानम् । अमृतऱ्हदमिवावगाढोऽस्मि । (१७४)

अर्थात -- हे स्थान स्वर्गापेक्षाही खूप अधिक आनंद देणारे आहे. मी जणू अमृताच्या सरोवरात बुडून गेलो आहे, असे वाटते.

तात्पर्य, कालिदासाने वरीलसारखी सूक्ष्म अर्थबोधक स्थाने आवर्जून लक्षात घेऊन ती अन्वर्थक शब्दांनी सजवली आहेत. पाश्चात्य शैलीशास्त्रज्ञांनी scaler consideration of poetic expression म्हणून जी संकल्पना मांडली आहे तिच्याशी हा मुद्दा तुलनीय आहे.

[४.३] आत्मोक्ती

आपण एकमेकांशी संभाषण करीत असताना आपल्या मनातील विचार, भाव किंवा अर्थ समोरच्या संभाषकांपैकी एखादा नकळत बोलून जातो तेव्हा आपण, 'अरे, अगदी कसे माझ्या मनातले बोललास', 'माझ्याही मनात अगदी हाच विचार आला होता', 'जणू माझेच मनोगत तुझ्या मुखातून बाहेर पडले', असे उद्गार कधी आनंदाने, कधी विस्मयाने तर कधी संमती दर्शविण्यासाठी काढतो. सामान्य व्यावहारिक संभाषणाचा हा बारकावा अचूकपणे हेरून कालिदासाने त्याला विलोभनीय संवादाची डूब दिली आहे. ह्या शैली-उपायाची मोजकीच उदाहरणे शाकुंतलात आढळतात, म्हणून ती सगळीच समजून घेऊ.

(१) एकाएकी तपोवनात आलेल्या राजाला पाहून अनसूयाप्रभृती तिघी गोंधळून जातात. मधुर

व प्रिय बोलणारा राजा हा प्रियंवदेला प्रभावशाली पुरुष वाटतो. अनसूया तिला दुजोरा देते. तिच्याही मनात त्याच्याविषयी कुतूहल असते. म्हणून ती विचारते :

अनसूया -- आर्यस्य मधुरालापजनितो विस्रम्भो मां मन्त्रयते । कतम आर्येण राजर्षेर्वंशोऽलंक्रियते, कतमो वा विरहपर्युत्सुकजनः कृतो देशः, किंनिमित्तं वा सुकुमारतरोऽपि तपोवनगमनपरिश्रमस्यात्मा पदमुपनीतः । (१९)

शकुन्तला-- हृदय मोत्ताम्य । एषा त्वया चिन्तितमनसूया मन्त्रयते । (२०)

अर्थात -- मान्यवरांच्या मधुर बोलण्यामुळे माझ्या मनात विश्वास उत्पन्न झाला आहे. म्हणून विचारते की, आपला राजवंश कोणता, कोणत्या देशातील प्रजेला आपण विरहव्याकुळ करून आला आहात आणि इतके सुकुमार असून तपोवनातील ह्या आश्रमात येण्याचे कष्ट का घेतलेत ?

-- हृदया, अधीर होऊ नकोस. तुझ्या मनातील विचाराला अनसूयेने वाचा फोडली आहे.

खरे म्हणजे, शकुंतलेचे मन अनसूयेने विचारलेले प्रश्न विचारण्यास उतावीळ झालेले असते. पण स्वाभाविक शालीनतेमुळे ती आपल्या मनाला आवर घालते.

(२) शकुंतला ही अप्सरेची मुलगी आहे हे कळल्यावर राजा स्वतःशी पुटपुटतो :

राजा -- (आत्मगतम्) लब्धावकाशो मे मनोरथः । किंतु सख्याः परिहासोदाहृतां वरप्रार्थनां श्रुत्वा धृतद्वैधीभावकातरं मे मनः ।

प्रियंवदा -- (सस्मितं शकुन्तलां विलोक्य नायकाभिमुखी भूत्वा) पुनरपि वक्तुकाम इवार्यः ।

(शकुन्तला सखीमङ्गुल्या तर्जयति ।)

राजा -- सम्यगुपलक्षितं भवत्या । ... (२२-२३)

अर्थात -- (स्वतःशी) माझ्या मनोरथाला अवसर मिळाला आहे. परंतु (तिच्या) मैत्रिणीने थट्टेत वरनिर्णयाविषयी जे म्हटले ते ऐकून माझे मन द्विधा व बेचैन झाले आहे.

-- मान्यवरांना आणखीही काही विचारावयाचे आहे असे वाटते.

(शकुंतला प्रियंवदेला तर्जनीने खूण करून गप्प राहण्यास सुचवते.)

-- आपण बरोबर ताडलेत.

खरे म्हणजे 'पुनरपि वक्तुकाम इवार्यः ।' असे शकुंतलेलाच म्हणावयाचे असते.

(३) कामबाधेने होणारी शकुंतलेची तगमग बघून अनसूया तिला विचारते :

अनसूया -- हला शकुन्तले, --- कथय। किंनिमित्तं ते संताप:। विकारं खलु परमार्थतोऽज्ञात्वानारम्भ: प्रतीकारस्य।

राजा -- अनसूयामप्यनुगतो मदीयस्तर्क:। न हि स्वाभिप्रायेण मे दर्शनम्। (५५-५६)

अर्थात -- गडे शकुंतले, सांग. तुझी ही उलघाल का होत आहे ? विकाराचे खरेखुरे स्वरूप कळल्यावाचून त्याच्यावरील प्रतिबंधक उपाय योजण्यास आरंभ करता येत नाही.

-- माझा कयास अनसूयेलाही जाणवला तर ! माझे मत स्वत:च्या स्वार्थी हेतूने बनलेले नव्हते. (राजा अनसूयाप्रभृतींचे बोलणे झाडामागे लपून ऐकत असतो.)

एक म्हणजे 'माझ्या ह्या अस्वस्थतेचे कारण राजावर माझे प्रेम बसले आहे', हे शकुंतलेच्या तोंडून ऐकण्यास राजा अधीर झाला आहे. आणि दुसरे म्हणजे, तसे असेल तर प्रतीकाराच्या उपाययोजनेस प्रारंभ करण्यास तो सहर्ष राजी आहे ! म्हणून तो आपलेच मनोगत अनसूया बोलून गेली, असे म्हणतो.

(४) विदूषक: -- भो:, इयं नाममुद्रा केनोद्घातेन तत्रभवत्या हस्ताभ्याशं प्रापिता।

सानुमती -- ममापि कौतूहलेनाकारित एष:। (१४६)

अर्थात -- अगे मित्रा, ही आंगठी कोणत्या प्रसंगाच्या निमित्ताने बाईसाहेबांच्या हातात (म्हणजे बोटात) घातलीस ?

-- ह्यालाही माझ्याप्रमाणे ह्याविषयी कुतूहल वाटत आहे.

सानुमतीदेखील विदूषकाचे बोलणे वेलीआड उभी राहून ऐकत असते. नाट्यप्रयोग बघणाऱ्या प्रेक्षकांना दोन्ही पात्रे दिसत असतात. त्यामुळे अशा संवादांमुळे नाटकाची रंगत वाढते. असे संवाद प्रेक्षकांचा आनंद वृध्दिंगत करतात.

(५) दुष्यंत व शकुंतला यांच्या आनंददायी पुनर्मिलनानंतर अदिती मारीचांना सुचवते.

अदिति: -- भगवन्, अस्या दुहितृमनोरथसंपत्ते: कण्वोऽपि तावच्छ्रुतविस्तर: क्रियताम्। दुहितृवत्सला मेनकेहैवोपचरन्ती तिष्ठति।

शकुन्तला-- (आत्मगतम्) मनोरथ: खलु मे भणितो भगवत्या। (१९६)

अर्थात -- महाराज, ह्या मुलीच्या मनोरथांची पूर्तता झाली आहे, हे वृत्त कण्वांनाही ताबडतोब सविस्तर कळवण्यात यावे. मुलीची ही प्रेमळ आई मेनका येथेच सेवाभावे उभी आहे.

-- आदरणीय अदितींनी खरोखर माझीच इच्छा बोलून दाखवली आहे.

कण्वाश्रम सोडल्यापासून शकुंतलेची कण्वांशी भेट झालेली नसते. तरी ती आपल्या त्या पित्याला विसरलेली नसते. किंबहुना 'जा. तुझा मार्ग (राजधानीपर्यंतचा प्रवास) मंगलमय

होवो', असा आशीर्वाद देण्यापूर्वी त्यांनी, 'मुली, झोपडीच्या दाराशी तू टाकलेल्या नीवारबलींची वाढ दररोज पाहात असताना मला आपला शोक कसा आवरता येईल ?' (९९) असे करुणोद्गार काढलेले असतात. ते तिला पुनर्मिलनाच्या आनंद-सोहळ्याच्या वेळी आठवतात व म्हणूनच ती 'माझे मनोगत अदितिमाता बोलून गेल्या' असे म्हणते. अशा आत्मोक्ती निवडक जागीच कालिदासाने योजल्या आहेत व आपली नाट्यमर्मज्ञता प्रकर्षाने प्रकट केली आहे.

[४.४] शब्दाऐवजी पूर्ण वाक्याची योजना

कालिदासाने शाकुंतलात एकूण अठरा ठिकाणी पात्रांच्या तोंडी उत्तरादाखल एका शब्दाऐवजी पूर्ण वाक्य किंवा श्लोक योजला आहे. ग्रंथविस्तार टाळण्यासाठी त्यांपैकी फक्त सहा वाक्ये निवडून ती उद्धृत करू.

(१) राजा -- अपि तपो वर्धते ।

अनसूया -- इदानीमतिथिविशेषलाभेन । (१८)

अर्थात -- तपश्चर्या वाढत्या प्रमाणावर चालू आहे ना ?

-- आता विशिष्ट अतिथींचा लाभ झाल्याने ती वृध्दिंगत झाली आहे.

वस्तुत: 'आम्' इतके उत्तर पुरेसे होते. पण मग राजाबद्दलचा आदरभाव व्यक्त झाला नसता व त्याचा गौरवही झाला नसता. त्यासाठी कवीने वाक्यखंड योजला आहे.

(२) राजा -- इतस्तपस्विकार्यम् । इतो गुरुजनाज्ञा । द्वयमप्यनतिक्रमणीयम् । किमत्र प्रतिविधेयम् ।

विदूषक: -- त्रिशङ्कुरिवान्तराले तिष्ठ । (४८)

अर्थात -- एकीकडे (राक्षसांच्या उपद्रवापासून यज्ञादींचे रक्षण करण्याचे) तपस्विजनांचे कार्य आणि दुसरीकडे आईची (उपवासाचे पारणे फेडण्यासाठी जातीने येण्याची) आज्ञा. पुन्हा ही दोन्ही कार्ये न टाळता येण्याजोगी. अशा स्थितीत काय करावे ?

-- त्रिशंकूप्रमाणे अंतराळात (लोंबकळत) राहा.

विदूषकाने 'द्वयोर् एकं अनुतिष्ठ ।' असे म्हटले असते तर राजाला समुचित सल्ला मिळाला असता. विदूषकाच्या वरील उत्तराने राजाला अपेक्षित सल्ला मिळत नसला तरी प्रेक्षकांना निर्मळ विनोदाचा आनंद लुटावयास मिळतो, यात शंका नाही.

(३) राजा -- बलवदस्वस्थशरीरा शकुन्तला दृश्यते । (सवितर्कम्) तत् किमयमातपदोष: स्यात् । उत यथा मे मनसि वर्तते । (५४)

अर्थात -- शकुंतलेची प्रकृती खूपच खालावलेली दिसत आहे. (विचार करून)

तर मग हा (तिला होणारा) उन्हाळ्याचा त्रास समजावयाचा की, जसे माझ्या मनात आहे (तसे समजावयाचे) ?

येथे 'उत मयि अभिलाष:' (की माझ्यावरील प्रेम) असे म्हटले असते तरी अपेक्षित अर्थ व्यक्त झाला असता, पण मग आपल्या मनात तिच्याविषयी किती गाढ प्रेम आहे हे त्याला कौतुकाने आणि अभिमानाने सांगण्याची संधी कशी मिळाली असती ? त्याने योजलेल्या वाक्याने ती संधी त्याला मिळाली आहे.

(४) शकुन्तला-- पौरव, रक्ष विनयम् । मदनसंतप्ताऽपि न खलु आत्मन: प्रभवामि । (६७)

अर्थात -- हे पुरुवंशीया, मर्यादा पाळ, जरी मी कामविव्हल असले तरी खरोखर स्वत:ची स्वामिनी नाही.

वस्तुत: 'परवती अहं', इतके पुरेसे असताना शकुंतलेला राजाला, 'माझ्या वत्सल व सदय पित्याचा मला विचार करावयास हवा. कारण माझ्यावर त्यांचे नियंत्रण आहे. मी मर्यादा ओलांडून वागले तर त्यांना सहन होणार नाही', हे सगळे सुचवावयाचे आहे. त्यासाठी पूर्ण वाक्यच हवे.

(५) अनसूया -- प्रियंवदे, द्वयोरेव नौ मुखे एष वृत्तान्तस्तिष्ठतु । रक्षितव्या खलु प्रकृतिपेलवा प्रियसखी ।

प्रियंवदा -- को नाम उष्णोदकेन नवमालिकां सिञ्चति । (७७)

अर्थात -- प्रियंवदे (दुर्वासाच्या शापाची) ही हकीगत आपल्या दोघींच्या मुखीच राहू दे. शरीराने (नवमालिकेच्या फुलासारख्या) कोमल असलेल्या प्रिय मैत्रिणीचे आपण रक्षण केले पाहिजे.

-- कडकडीत पाणी नवमालिकेवर कोण शिंपडील ?

एकतर अनसूयेने पूर्वी शकुंतलेची नवमालिकेशी तुलना केलेली असते (११). शिवाय, शकुंतला गरोदर असते. त्यामुळे तिला जपणे आवश्यक असते. म्हणूनच प्रियंवदा 'तथा करिष्यामि' असे निर्जीव उत्तर न देता वरीलप्रमाणे उत्कट जिव्हाळ्याने ओतप्रोत प्रश्नात्मक विधानाद्वारे उत्तर देते. तेच सर्वथा भावपूर्ण !

(६) बाल: -- मात:, क एष ।

शकुन्तला-- वत्स, ते भागधेयानि पृच्छ । (१८७)

अर्थात -- आई, हा कोण (आहे) ?

-- बाळा, आपल्या दैवाला विचार.

शकुंतलेने 'तव पिता' म्हटले असते तर मुलाला 'हा कोण' ते कळले असते, पण प्रेक्षकांवर त्या रूक्ष वाक्याचा कोणताही परिणाम झाला नसता. ह्याउलट शकुंतलेच्या वरील

उत्तरामुळे, तिने पतिकृत अस्वीकारापासून तो पतीशी झालेल्या पुनर्मिलनापर्यंतच्या काळात दुर्दैवाचे जे दशावतार पाहिले, त्यांचा चित्रपट सहृदय प्रेक्षकांच्या नजरेसमोरून सरकतो आणि त्यांची अंत:करणे हेलावतात !

[४.५] विकल्पोक्ती

ह्याला अथवोक्ती किंवा वितर्कोक्ती असेही म्हणता येईल. जेव्हा एखादे पात्र एखादे वाक्य उच्चारून त्यानंतर लगेच 'अथवा' शब्द उच्चारून पूर्वोक्ताहून भिन्न वाक्य उच्चारते किंवा पद्य म्हणते, तेव्हा विकल्पोक्ती होते. हिला वितर्काचे निवारण, विचारांतर, संदेहाचे निराकरण, द्विधा मन:स्थिती, स्मरण, निर्णय, शंकानिरसन, पूर्वीच्या विधानाची दुरुस्ती, सहमती, पेचातून सुटका, कोड्याची उकल, सत्यस्थितीची जाणीव, शाश्वत सत्याची अनुभूती, निर्णयातील बदल, संदेह, निश्चयाच्या अयुक्ततेचे भान, मनाची अनिश्चितता इत्यादी अनेक निमित्ते असू शकतात. शाकुंतलात अशी एकूण चोवीस विकल्पवचने आढळतात. त्यांपैकी फक्त सहांचाच परिचय करून घेऊ.

(१) अनसूया -- .... काम इदानीं सकामो भवतु येनासत्यसंधे जने शुध्दहृदया सखी पदं कारिता । अथवा दुर्वाससः शाप एष विकारयति । अन्यथा कथं स राजर्षिस्तादृशानि मन्त्रयित्वैतावतः कालस्य लेखमात्रमपि न विसृजति। (७९-८०)

अर्थात -- ज्या कामदेवाने सरळ अंत:करणाच्या मैत्रिणीला दिलेला शब्द न पाळणाऱ्या व्यक्तीवर विश्वास ठेवावयास लावले त्या कामदेवाची इच्छा आता पुरी होवो. अथवा दुर्वासाच्या शापामुळे हा बदल घडून आला आहे. नाहीतर तशी (मधुर) भाषणे करून इतका काळ लोटला तरी हा राजर्षी पत्रदेखील पाठवीत नाही असे कसे घडले ?

येथे अनसूयेला दुर्वासाच्या शापाची आठवण होताच तिच्या मनाला पहिल्यांदा व्यापून उरणारी असहायता तिने झटकून टाकली आहे आणि हा सारा शापाचाच प्रभाव आहे ह्याबद्दल तिची खात्री पटली आहे.

(२) विदूषकः -- न विस्मरामि । किन्तु सर्वं कथयित्वावसाने पुनस्त्वया परिहासविजल्प एष न भूतार्थ इत्याख्यातम् । मयापि मृत्पिण्डबुध्दिना तथैव गृहीतम् । अथवा भवितव्यता खलु बलवती । (१४३)

अर्थात -- मी विसरलो नाही. परंतु सर्व सांगितल्यावर शेवटी तू पुन्हा, ही सर्व थट्टा समज, हे खरे नव्हे, असे म्हटलेस. मातीच्या गोळ्यासारखी (म्हणजे कोणताही आकार धारण करणारी किंवा मठ्ठ) बुध्दी असलेल्या मीदेखील ते तसेच (म्हणजे खोटे) मानले. अथवा दैव बलवान असते, हेच खरे.

राजाने शकुंतलेचा अस्वीकार करण्यामागील खरे कारण दैवाची अनुल्लंघनीय सत्ता हे होय, हा विदूषकाचा निष्कर्ष आहे.

(३) सानुमती -- अत एव तपस्विन्या: शकुन्तलाया अधर्मभीरोरस्य राजर्षे: परिणये संदेह आसीत्। अथवेदृशोऽनुरागोऽभिज्ञानमपेक्षते। कथमिवैतत्। (१४७)

अर्थात -- (शकुंतला शचीतीर्थाला वंदन करीत असताना तिच्या बोटातून आंगठी गंगेच्या प्रवाहात पडली, हे राजाच्या तोंडून ऐकल्यावर सानुमती म्हणते -) म्हणूनच अधर्माला भिणाऱ्या राजर्षीच्या मनात, तपस्विनी शकुंतलेशी केलेल्या विवाहाच्या बाबतीत, संदेह उत्पन्न झाला होता. अथवा इतक्या उत्कट प्रेमाला खुणेच्या वस्तूची अपेक्षा असते (असे तर नसावे !). हे कसे शक्य आहे ?

(४) राजा -- (स्वगतम्) ... यदि तावदस्य शिशोर्मातरं नामत: पृच्छामि। अथवा अनार्य: परदारव्यवहार:। (१८२)

अर्थात -- (स्वत:शी) ... जर या बालकाच्या आईचे नाव विचारले तर. अथवा दुसऱ्याच्या स्त्रीच्या नावाची उठाठेव करणे सभ्य माणसाला शोभणारे नाही.

राजाच्या मनात क्षणार्धात झालेले हे विचारपरिवर्तन त्याच्या सुसंस्कृतपणाला साजेसेच आहे. ह्या 'अथवा'-ने त्याच्या व्यक्तिरेखाटनात रंग भरला आहे.

(५) शकुन्तला-- विकारकालेऽपि प्रकृतिस्थां सर्वदमनस्यौषधिं श्रुत्वा न म आशा आसीदात्मनो भागधेयेषु। अथवा यथा सानुमत्याख्यातं तथा संभाव्यत एतत्। (१८५)

अर्थात -- सर्वदमनाच्या ताईतामधील अपराजिता वनस्पती (सर्पात) रूपांतरित होण्याच्या वेळीदेखील मूळ स्वरूपात राहिली हे ऐकूनही माझ्या सद्भाग्याच्या बाबतीत मला आशा नव्हती. अथवा जसे सानुमतीने सांगितले तसे हे घडून आलेले दिसते.

राजा स्वत:ला अनपत्य समजून आपल्या पश्चात आपल्या पितरांना कोण पिंडदान करणार असे जेव्हा दु:खोद्‌गार काढतो तेव्हा सानुमती पुढील आशयाचे जे उद्‌गार काढते त्यांचा येथे संबंध आहे : वंशाचा दिवा (म्हणजे सर्वदमन) असूनही व्यवधानामुळे हा राजा अंधकाराचा अनुभव घेत आहे. मी आताच याला आनंदित करू शकेन. अथवा इंद्रमातेच्या तोंडून ऐकले आहे की, देवच तसे करतील. एकंदरीने दुष्यंताचे लवकरच आपल्या धर्मपत्नीशी पुनर्मिलन होणार आहे. तोपर्यंत थांबणे हेच योग्य. दरम्यान मी ही सगळी हकीगत प्रिय मैत्रिणीला (म्हणजे शकुंतलेला) सांगून तिला दिलासा देते (१६१-६२).

(६) शकुन्तला (स्वगतम्)-- दिष्ट्याकारणप्रत्यादेशी नार्यपुत्रः । न खलु शप्तमात्मानं स्मरामि । अथवा प्राप्तो मया स हि शापो विरहशून्यहृदयया न विदितः । अतः सखीभ्यां संदिष्टास्मि भर्तुरङ्गुलीयकं दर्शयितव्यमिति । (१९४)

अर्थात -- (स्वतःशी) महाराजांनी मला निष्कारण झिडकारले नाही हे सुदैव होय. (पण) मला शाप मिळाल्याचे आठवत नाही. अथवा विरहामुळे माझे हृदय व्याकुळ झालेले असल्यामुळे मला मिळालेला शाप कळला नाही. म्हणून (बहुधा) मैत्रिणींनी 'पतिदेवांना आंगठी दाखव' असा सल्ला मला दिला असावा.

एकंदरीने ह्या सर्व अथवोक्ती पात्रांवर व/वा प्रेक्षकांवर परिणाम करणाऱ्या असल्यामुळे शैलीदृष्ट्या कार्यसाधक आहेत.

[४.६] विशिष्ट व्याकरणप्रयोग

काही व्याकरणमान्य प्रयोगांद्वारे कालिदासाने अभिप्रेत अर्थ प्रभावीपणे व्यक्त केला आहे. उदाहरणार्थ,

(१) राजा (सविस्मयम्)-- तदेष कथमनुपतत एव मे प्रयत्नप्रेक्षणीयः संवृत्तः (५)

अर्थात -- (विस्मयाने) मी त्याच्या मागे (वेगाने) धावत असूनही (म्हणजे मी त्याचा आवेगाने पाठलाग करीत असूनही) आता महत्प्रयासाने तो दिसू शकतो (म्हणजे त्याला पाहण्यासाठी महत्प्रयास करावा लागत आहे) हे कसे ?

येथे 'अनुपततः मे' ही अनादरे षष्ठी आहे. राजाचे म्हणणे असे की, आताआतापर्यंत तो (काळवीट) माझ्या दृष्टीच्या टप्प्यात होता. म्हणून मी त्याचा वेगाने पाठलाग करू लागलो. पण पठ्ठ्याने माझ्या वेगाचा जणू अनादर करून इतके अंतर झपाट्याने पार केले की, आता मोठ्या कष्टाने तो दृष्टीस पडत आहे. येथे अनादरे षष्ठी-द्वारे हरिणाने राजाविषयी दर्शविलेली तुच्छता प्रभावीपणाने व्यक्त झाली आहे.

(२) राजा -- चलापाङ्गां दृष्टिं ....

....

करं व्याधुन्वत्याः पिबसि रतिसर्वस्वमधरम् । (१६)

अर्थात -- हात हलवून तुला दूर सारण्याच्या तिच्या (म्हणजे शकुंतलेच्या) कृतीचा अधिक्षेप करून रतिक्रीडेचे सर्वस्व असलेले असे तिच्या अधराचे तू चुंबन घेत आहेस.

येथेही अनादरे षष्ठीचा ('व्याधुन्वत्याः') प्रयोग आहे. भुंगा जणू शकुंतलेला म्हणत आहे : 'तू कितीही निवारण करण्याचा प्रयत्न केलास तरी मी तुझे चुंबन घेतल्याशिवाय राहणार

नाही. हे बघ घेतले तुझे चुंबन !' हा भाव अनादरे षष्ठीने व्यक्त झाला आहे.

(३) राजा -- कः पौरवे वसुमतीं शासति शासितरि दुर्विनीतानाम् । (१७)

अर्थात -- दुर्वर्तनी व्यक्तींना शासन करणारा (म्हणजे वठणीवर आणणारा) एक पुरुवंशीय पृथ्वीवर राज्य करीत असताना -

येथे अनादरे सप्तमीचा (वसुमतीं शासति) प्रयोग आहे. राजाचा आशय असा : 'मी पृथ्वीचे एवढ्या दक्षतेने पालन करीत असूनही, हे मधुकरा, तुझी ही हिंमत ? माझा अधिक्षेप करतोस ? मला कःपदार्थ मानतोस ? आणि ह्या निष्पाप तपस्विकन्यकांशी धटिंगणपणाने वागतोस ? माझ्यासारखा कठोर प्रशासक असताना तुला अशी हिंमत झालीच कशी ?' हा सर्व उत्कट भाव एका व्याकरणिक रूपाद्वारे व्यक्त करण्यात कालिदासाने प्रशंसनीय कौशल्य प्रदर्शित केले आहे.

(४) सूत्रधारः -- आर्ये अभिरूपभूयिष्ठा परिषदियम् । (२)

अर्थात -- आदरणीय महिले, ही प्राधान्याने विद्वत्परिषद आहे.

येथील अभिरूप म्हणजे विद्वान व भूयिष्ठ म्हणजे प्राधान्य. म्हणून अभिरूपभूयिष्ठ म्हणजे विद्वत्प्रधान. हे विशेषण असले तरी ते 'विशेषणमात्रप्रयोगो विशेष्यप्रतिपत्तौ ।' ह्या वामनाच्या [५.१.१० - प्रकरण तिसरे, संदर्भ ८, पृ. ७०] सूत्रानुसार 'विद्वान व्यक्ती' ह्या विशेष्याचा बोध करवते. ह्याच पध्दतीने खालील उदाहरणे समजून घ्यावीत.

(५) सूत्रधारः -- बलवदपि शिक्षितानामात्मन्यप्रत्ययं चेतः । (२)

यातील शिक्षित म्हणजे शिक्षित व्यक्ती.

(६) सूत्रधारः -- प्रच्छायसुलभनिद्रा दिवसाः परिणामरमणीयाः । (३)

यामधील प्रच्छाय म्हणजे दाट सावली असलेले स्थान.

(७) अनसूया -- गुणवते कन्यका प्रतिपादनीयेत्ययं तावत् प्रथमः सङ्कल्पः । (७३)

यामधील 'गुणवते' विशेषण 'गुणवान वराला' अशा विशेष्याचे ज्ञान करवते.

(८) विदूषकः -- भो वयस्य ....वीतरागस्येव नास्तीदानीं मे मोक्षः । (१०२)

या वाक्यातील 'वीतरागस्य' विशेषण 'तपस्वी' ह्या विशेष्याचे बोधक आहे.

(९) राजा -- रम्याणि वीक्ष्य मधुरांश्च निशम्य शब्दान् । (१०३)

यातील 'रम्याणि' हे विशेषण 'वस्तूनि' ह्या विशेष्याचा बोध करवून देते.

(१०) राजा -- किं तावद् व्रतिनामुपोढतपसां विघ्नैस्तपो दूषितम् । (१०७)

येथील उपोढतपसां विशेषण 'ऋषीणां' ह्या विशेष्याचा बोध करवते.

(११) शाङ्गर्रवः--... जनाकीर्णं मन्ये हुतवहपरीतं गृहमिव । (१०८)

जनाकीर्णं (म्हणजे मनुष्यांनी गजबजलेले) विशेषण 'नगर' चे ज्ञान करवते.

(१२) शाङ्गरव:--स्वाधीनकुशला: सिध्दिमन्त: ।(१११)

'सिध्दिमन्त:' विशेषणाद्वारे 'तपस्विन:' ह्या विशेष्याचे ज्ञान होते.

(१३) शाङ्गरव:--त्वमर्हतां प्राग्रसर: स्मृतोऽसि न: । (१११)

ह्यातील अर्हतां विशेषण 'पुरुषाणां' ह्या विशेष्याची प्रतिपत्ती करवते.

(१४) सानुमती -- सदृशमेतत् पश्चात्तापगुरो: स्नेहस्यानवलेपस्य च । (१४९)

'पश्चात्तापगुरो:' हे विशेषण 'दुष्यन्तस्य' ह्या विशेष्याचे आहे.

(१५) राजा -- प्रबलतमसामेवंप्राया: शुभेषु हि वृत्तय: । (१८७)

येथील 'शुभेषु' विशेषण 'वस्तुषु'-चे बोधक मानावयाचे.

एकंदरीने कालिदासाने स्वतंत्रपणे मोजकेच शैलीउपाय कल्पिले असून ते सौंदर्यदृष्टीने वापरले आहेत.

* * *

५. पुस्ती-दुरुस्ती

[५.१] नाटकाच्या संहितेतील उणिवा

आपण मागील दुसऱ्या प्रकरणात कालिदासाने कौशल्याने लिहिलेली स्त्रीपुरुष-पात्रांची संभाषणे किती स्वाभाविक व मनोहर भासतात, ते लक्षात घेतले आहे. तिसऱ्या प्रकरणात त्याने विवेचक सौंदर्यदृष्टीने साधलेल्या संवादांमुळे नाटकाची रंगत कशी वाढली आहे, त्याचा परिचय करून घेतला आहे. चवथ्या प्रकरणात त्याने स्वतंत्र बुध्दीने कल्पिलेल्या शैली-उपायांमुळे नाटकाच्या एकूण सौंदर्यात कशी भर पडली आहे, ते अभ्यासले आहे. शाकुंतलाची ही सर्व समुज्ज्वल अंगे झाली. प्रस्तुत प्रकरणात नाटकाच्या एका अनुज्ज्वल अंगाचा परामर्श घ्यावयाचा आहे.

शाकुंतलाची संपूर्ण मुद्रित संहिता शैलीशास्त्रीय दृष्टिकोणातून अगदी बारकाईने वाचली की, असे लक्षात येते की, काही ठिकाणी अनावश्यक लेखन झाले आहे (ह्याला शैलीशास्त्राच्या दृष्टीने 'अतिलेखन' म्हणतात), काही ठिकाणी अनुचितता, अपूर्णता, अप्रस्तुतता (म्हणजेच असंबध्दता), अश्लीलता व दुर्बोधता असे दोष उत्पन्न झाले आहेत; काही ठिकाणी शब्द 'स्व'-स्थानी न पडता 'अ'-स्थानी पडले आहेत; काही ठिकाणचे शब्दप्रयोग कर्णकटू वाटतात; काही उपमांत विसदृशताप्रभृती दोष आहेत; काही ठिकाणी सलण्याइतकी पुनरुक्ती व खटकण्याइतकी विसंगती जाणवते; काही ठिकाणच्या विचारांत आकस्मिकता भासते तर काही ठिकाणच्या रचना-कल्पनांत क्रमभंग जाणवतो. तात्पर्य, शाकुंतल नाटकाची संहिता सर्वांगांनी परिपूर्ण, सर्वतोपरी निर्दोष व सर्वथा रमणीय आहे, असा निर्वाळा देण्याकडे मनाचा कल होत नाही. अर्थात, संहितेत काही उणिवा राहून गेल्या आहेत, हे स्पष्ट आहे. असा प्रकार का घडला असावा किंवा कोणत्याही साहित्यकृतीत असे दोष का राहून जातात, ह्याविषयी पाश्चात्य शैलीशास्त्रज्ञांनी कोणती तात्त्विक मीमांसा केली आहे ती समजून घेऊ व मग शाकुंतलातील दोषांच्या विवेचनाकडे वळू.

[५.२] संस्करण-परिष्करणाची आवश्यकता

पाश्चात्य शैलीशास्त्रज्ञांनी अनेक साहित्यिकांच्या हस्तलिखितांच्या सूक्ष्म अध्ययनानंतर असा एक निष्कर्ष काढला आहे की, लेखक कितीही मोठा असो, त्याचे लेखन पहिल्याच प्रयत्नात परिपूर्ण व निर्दोष क्वचितच होत असते. असे होण्यास भाषेचा वापर करणाऱ्या मनुष्याचा एक स्वाभाविक दुबळेपणा कारणीभूत असतो. त्या दुबळेपणाचे वर्णन आइव्ज् नामक लेखिकेने "...Hardly anyone consistently writes good sentences without

revision.''[१] ह्या प्रत्ययोत्पादक शब्दांत केले आहे. ए. एच्. गार्डिनरने हेच तथ्य पुढील शब्दांत व्यक्त केले आहे : ''It is a ... true and lamentable fact that, in ultimate analysis, one cannot speak about anything without altering it to some extent.''[२] थोडक्यात, लेखकाने लिहिलेल्या पहिल्या मसुद्यात एकदा किंवा अनेकदा सुधारणा होतहोत सरतेशेवटी अंतिम 'मुद्रण प्रत' तयार होत असते. अशा प्रकारे सुधारणा करण्याच्या पध्दतीला परिष्करण-प्रक्रिया असे पाश्चात्य शैलीशास्त्रज्ञ म्हणतात. हिच्यासाठी त्यांनी revision, refinement व polishing असे तीन शब्द वापरले आहेत. हिचे दोन प्रकार असल्याचे हफ्ने पुढील शब्दांत नमूद केले आहे : ''Most writing involves a process of revision, conducted either on paper or in the mind before anything is written down.''[३] अर्थात, परिष्करण एक तर कागदावर लिहिलेल्या (प्राचीन भारतीय साहित्यकृतींच्या संदर्भात भूर्जपत्रावर किंवा ताडपत्रावर कोरलेल्या) मजकुरात होत असते किंवा तो मजकूर मुखावाटे अथवा लेखणीवाटे बाहेर पडण्यापूर्वी म्हणजे तो मनात असतानाच होत असते.

[५.३] परिष्करणाचे स्वरूप वा प्रमाण

परिष्करणाच्या स्वरूपाच्या किंवा प्रमाणाच्या बाबतीत पर्ल होग्रेफे नावाच्या लेखिकेने असे प्रतिपादन केले आहे की, लेखकाने लिहिलेला मजकूर वाचकाच्या (नाटकाच्या संदर्भात प्रेक्षकाच्या) भूमिकेतून स्वत: वाचून पाहावा व तो स्वत:लाच जोपर्यंत 'जिवंत' अनुभवसा वाटत नाही तोपर्यंत त्यात दुरुस्त्या किंवा सुधारणा करण्याचे कार्य चालू ठेवावे. मग लिखाण तीन वेळा, चार वेळा किंवा कितीही वेळा पुन:पुन्हा लिहावे लागो ! मात्र अशा प्रकारे पुस्त्या-दुरुस्त्या करताना किरकोळ डागडुजी करून समाधान मानून घेऊ नये. सुधारणा पुरेशी झाली की नाही हे ठरविण्याचे गमक असे की, सुधारलेले लेखन लेखकाने आपल्याशीच वाचून पाहावे व ते जणू आपल्या मनात 'रुजून' मग कागदावर (किंवा अन्य लेखनसाहित्यावर) 'उगवले' आहे असे प्रतीत झाले की, परिष्करण पूर्ण झाले असे समजावे.[४]

[५.४] प्राचीन भारतीयोक्त परिष्करण-प्रक्रिया

वरील परिष्करण-प्रक्रिया प्राचीन भारतीय साहित्यशास्त्रकारांनीही जवळजवळ वरील शब्दांतच वर्णिलेली आढळते. त्या प्रक्रियेचा आद्य प्राचीन भारतीय प्रतिपादक भामह हा सहाव्या-सातव्या शतकातील कश्मीरी विचारवंत आहे. त्याने ह्या प्रक्रियेचे वर्णन खालील श्लोकात केले आहे :

एतद्ग्राह्यं सुरभि कुसुमं ग्राम्यमेतन्निधेयम्
धत्ते शोभां विरचितमिदं स्थानमस्यैतदस्य ।
मालाकारो रचयति यथा साधु विज्ञाय मालां
योज्यं काव्येष्ववहितधिया तद्वदेवाभिधानम् ॥[५]

भामहानंतर सुमारे दोन शतकांनी होऊन गेलेल्या वामन नावाच्या अन्य कश्मीरी विद्वानाने ही प्रक्रिया पुढीलप्रमाणे शब्दबध्द केली आहे :

आधानोध्दरणे तावद्यावद्दोलायते मनः ।
पदस्य स्थापिते स्थैर्ये हन्त सिध्दा सरस्वती ॥
यत्पदानि त्यजन्त्येव परिवृत्तिसहिष्णुताम् ।
तं शब्दन्यासनिष्णाताः शब्दपाकं प्रचक्षते ॥[६]

अर्थात - जोवर कवीचे मन (अमुक एक शब्द वापरण्यास योग्य की अयोग्य अशा) दोलायमान स्थितीत असते तोवर शब्द योजणे व काढणे (किंवा खोडणे) चालू राहते. पण एकदा का योग्य शब्द (सुचला व) योजला गेला की, कवीला जणू सरस्वती प्रसन्न झाल्याचा आनंद होतो. शब्दांच्या ह्या काढ-घालीच्या घडामोडीत असा एक क्षण येतो की, ज्या क्षणी शब्दच जणू म्हणू लागतात की, ह्यापुढे आम्ही कोणतेही परिवर्तन सहन करणार नाही. त्या क्षणाला, शब्दयोजना करण्यात निष्णात असणारे कवी, शब्दांची परिपक्कता (perfection of diction) असे म्हणतात.

इसवी सनाच्या नवव्या शतकात होऊन गेलेल्या राजशेखर नामक काव्यशास्त्रकाराने 'काव्यमीमांसा' नावाच्या आपल्या ग्रंथात कवींना लेखनपध्दतीसंबंधी पुढीलप्रमाणे उपदेश केला आहे : कवींनी सकाळच्या दुसऱ्या प्रहरात म्हणजे सकाळी आठ ते अकरा ह्या वेळात काव्यरचना करावी; नंतर दिवसाच्या चौथ्या प्रहरात म्हणजे दुपारी २ ते ५ ह्या तीन तासांच्या कालावधीत, काव्यकलेची उत्तम जाण असणाऱ्या मोजक्या मित्रांच्या मेळाव्यात बसावे व सकाळी रचलेल्या काव्याचे कठोर परीक्षण करावे. तसे करताना स्वतःच्या कृतीत स्वतःला जाणवलेल्या किंवा मर्मज्ञ मित्रांनी निदर्शनास आणून दिलेल्या दोषांचे 'अधिकस्य त्यागो, न्यूनस्य पूरणम, अन्यथास्थितस्य परिवर्तनम्, प्रस्मृतस्य अनुसन्धानं च इत्यहीनम् ।'[७] अर्थात - (वरीलप्रमाणे शब्द काढताना व घालताना) अधिक ते सरते करावे, न्यून ते पुरते करावे; भलत्याच जागी योजला गेलेला शब्द तेथून काढून तो योग्य जागी योजावा आणि जो शब्द विस्मरणामुळे लिहावयाचा राहून गेलेला असेल तो नीटपणे आठवून लिहावा व अशा प्रकारे काव्य सर्वांगपरिपूर्ण (म्हणजेच निर्दोष) करावे, ह्या पध्दतीने संस्करण-परिष्करण करावे. अर्थातच, असे केल्याने काव्य रमणीय व अविस्मरणीय बनते.

[५.५] कालिदासाने हस्तलिखिताचे परिष्करण केले नसावे

कालिदास कोणत्या पध्दतीने काव्यलेखन करीत असे ते कळावयास साधन नाही. खुद्द त्याने स्वतः लिहिलेले हस्तलिखित उपलब्ध नाही. परंतु, ज्याअर्थी त्याचा दुष्यंत स्वतः रेखाटलेल्या शकुंतलेच्या चित्राच्या बाबतीत 'यद्यत् साधु न चित्रे स्यात् क्रियते तत् तदन्यथा ।' (१४९) असे म्हणतो, त्याअर्थी कालिदासाला काव्यकृतीच्या परिष्करणाची महत्ता व

आवश्यकता ठाऊक असावी, असे धरून चालावयास हरकत नाही. असे असूनही वर [५.१] मध्ये नमूद केल्याप्रमाणे शाकुंतल नाटकाच्या संहितेत भाषेच्या सौंदर्याला बाधक ठरणारे दोष आढळून येतात. त्यांचाच परामर्श प्रस्तुत प्रकरणात घ्यावयाचा आहे. तसा तो घेताना प्रथमतः दोषाचा निर्देश करू व त्यानंतर लगेच त्याच्या निवारणाचा उपायही शैलीशास्त्रदृष्ट्या सुचवू (ह्याबाबतीत क्षेमेन्द्राच्या 'औचित्यविचारचर्चे'तील विवेचन-पध्दतीचा अवलंब करू). ज्यांना शाकुंतल नाटक सुरुवातीपासून अखेरीपर्यंत क्रमशः वाचावयाचे असेल त्यांची सोय व्हावी म्हणून हे दोषनिरूपण नाट्यसंहितेच्या पृष्ठानुक्रमाने करू.

(१) नटी -- आर्यपुत्र, इयमस्मि। (१)

'वाच्यौ नटीसूत्रधारौ आर्यनाम्ना परस्परम् ।' (म्हणजे सूत्रधाराने नटीला आर्या संबोधावयाचे व नटीने सूत्रधाराला आर्य संबोधावयाचे.) ह्या संकेतानुसार येथे नटीने सूत्रधाराला उद्देशून वापरलेले 'आर्यपुत्र' संबोधन योग्य नाही; आर्य संबोधन हवे.

(२) आपल्या विनंतीला मान देऊन राजाने बाण आवरून धरला व हरणाचे प्राण वाचवले ह्याबद्दल राजाची प्रशंसा करणारा वैखानस 'तुला चक्रवर्ती पुत्र प्राप्त होईल',असा आशीर्वाद देतो [पुत्रं...चक्रवर्तिनमाप्नुहि। (६-७)], तो आकस्मिक वाटतो.

(३) वैखानस 'आर्तत्राणाय वः शस्त्रं न प्रहर्तुमनागसि'। (७) असे जे वाक्य उच्चारतो त्यातील 'वःशस्त्रं' हा शब्दबंध कर्णकटू वाटतो.

(४) वैखानस प्रथमतः राजाला 'प्रतिसंहर सायकम्।' (७) अशी विनंती करून मग वरील (३) मधील श्लोकार्ध म्हणतो. तो ऐकून राजा 'एष प्रतिसंहृतः।' (७) असे म्हणतो व तसे करतो. पण तत्पूर्वी वैखानसाने 'शस्त्रं' हा नपुंसकलिंगी शब्द वापरला आहे. त्याच्याशी 'प्रतिसंहृतः' जुळणार नाही. म्हणून 'एषः प्रतिसंहृतः सायकः'। असे पूर्ण वाक्य हवे आहे.

(५) वैखानस, वरील कृतीबद्दल, राजाची 'सदृशमेतत् पुरुवंशप्रदीपस्य भवतः'। (७) ह्या शब्दांत स्तुती करतो आणि 'जन्म यस्य पुरोर्वंशे युक्तरूपमिदं तव।' (तत्रैव) ह्या श्लोकार्धात तीच भावना पुन्हा व्यक्त करतो. ती अनावश्यक आहे. हे 'अतिलेखन' झाले!

(६) वैखानसाने वरील संवादात एकदा युष्मत् ह्या सर्वनामाची, मग भवत् ह्या सर्वनामाची व नंतर पुन्हा 'युष्मत्'ची रूपे वापरली आहेत. ह्यात एक क्रम पाळलेला नाही; एकरूपता नाही.

(७) वैखानसः -- जन्म यस्य पुरोर्वंशे युक्तरूपमिदं तव। (७)

उभौ -- (सहर्षम्) अनुकारिणि पूर्वेषां युक्तरूपमिदं त्वयि। (४६)

ह्यावरून कालिदासाला आपली तीच-तीच शब्दावली पुन्हापुन्हा वापरावीशी वाटते. त्याच्यासारख्या भाषाप्रभूला तोच विचार वेगळ्या शब्दांत मांडता आला असता.

(८) आश्रमात प्रवेश करण्यापूर्वी राजाने अंगावरील दागिने काढून ते सूताला सुपूर्त केलेले

असतात (सूतस्याभरणानि धनुश्चोपनीय । १०). मग 'राजभावस्त्वभिज्ञातो भवेत्' । (१७) अशी शंका त्याला का वाटते ?

(९) वैखानस राजाला आश्रमाला भेट देण्याची विनंती करताना 'तुझ्या पराक्रमामुळे यज्ञीय क्रिया कशा निर्विघ्नपणे पार पडत आहेत ते तू स्वत:च पाहा' (८), ह्या शब्दांत त्याचा गौरव करतो. त्यावेळी काश्यप सोमतीर्थी गेलेले असतात, म्हणजे आश्रमसंनिहित नसतात. मग दुसऱ्या अंकाच्या शेवटी दोन ऋषिकुमार येऊन राजाला 'काश्यप आश्रमसंनिहित नसल्यामुळे राक्षस यज्ञकार्यांत विघ्ने आणीत आहेत' (४६) असे कसे म्हणतात ? राजा आश्रमाजवळ असूनही त्याचा दरारा संपतो असा अर्थ घ्यावयाचा काय ?

(१०) 'मी आश्रमीयांना भेटून परत येईपर्यंत घोड्यांच्या पाठी पाण्याने भिजव' (तावदार्द्रपृष्ठा क्रियन्तां वाजिनः । १०), असा आदेश राजा सूताला देतो. त्यावर सूत 'तथा' हे पुनरुक्तिपर व कंटाळवाणे उत्तर देतो. त्याऐवजी 'यथाऽऽज्ञापति आयुष्मान्' असे बरे ठरले असते.

(११) शकुन्तला -- ...शिथिल तावदेतत् (=आवळून बांधलेले वल्कल सैल कर)

अनसूया -- तथा (शिथिलयति) । (१२) (तसे करते)

ही 'तथा'ची कंटाळवाणी पुनरुक्ती 'हला, शिथिलयामि' ह्या वाक्याद्वारे निरस्त करता आली असती.

(१२) अनसूयेने शकुंतलेचे वल्कल सैल केल्याचे पाहून प्रियंवदा म्हणते :

प्रियंवदा -- अत्र पयोधरविस्तारयितृकमात्मनो यौवनमुपालभस्व ।..(१२)

एका आश्रमीय युवतीच्या मुखी हे उत्तान उद्‌गार व्रीडोत्पादक (म्हणजे अश्लील) वाटतात.

(१३) तद्‌वत राजाच्या तोंडचे 'स्तनयुगपरिणाहाच्छादिना वल्कलेन ।' (१३) हेही वचन प्रशस्त वाटत नाही.

(१४) राजा -- वपुरभिनवमस्याः पुष्यति स्वां न शोभाम् ।

कुसुममिव पिनद्धं पाण्डुपत्रोदरेण ॥ (१३)

शकुंतलेचे शरीर हिरव्या वल्कलांनी झाकलेले आहे, तर फूल फिकट पांढऱ्या पानांनी झाकलेले आहे. म्हणजेच वल्कलांच्या व पानांच्या रंगांत विसदृशता आहे. ही सदोष उपमा होय.

(१५) राजा -- प्रियमपि तथ्यमाह शकुन्तलां प्रियंवदा । अस्याः खलु (१४)

यातील 'अस्याः' हे 'इदम्' सर्वनामाच्या 'इयम्' या स्त्रीलिंगाच्या षष्ठीचे एकवचन एखादा प्रेक्षक प्रियंवदेशी संबंधित करून 'प्रियंवदायाः' असा अर्थ करण्याची शक्यता आहे.

अशा प्रकारे हे रूप काहीसे गोंधळात टाकणारे आहे.

(१६) शकुंतलेला भुंगा भंडावून सोडतो. ती त्या छळाचा अभिनय करते. [भ्रमरबाधां निरूपयति (१६)] तेव्हा राजा (सस्पृहमवलोक्य)'चलापाङ्गां...' इत्यादी श्लोक म्हणतो. हे आचरण 'पुण्याश्रमदर्शनेन तावदात्मानं पुनीमहे ।' (८) ह्या भावनेने आश्रमात आलेल्या 'पुरुवंशप्रदीपा'ला (७) योग्य की अयोग्य ?

(१७) जेव्हा शकुंतलेला भुंगा सतावतो तेव्हा ती म्हणते - न एष धृष्टो विरमति। (१६). राजा शकुंतलेच्या चित्राकडे पाहून विदूषकाला म्हणतो - ननु वार्यतामेष धृष्टः। (१५३). धृष्ट शब्दाची पुनरुक्ती करण्याऐवजी त्याच्या धृष्णक्, धृष्णुः, वियातः ह्या पर्यायांपैकी एखाद्याचा वापर करणे इष्ट ठरले असते.

(१८) भुंगा जेव्हा शकुंतलेचा पिच्छा पुरवतो तेव्हा ती मैत्रिणींना म्हणते : हला, परित्रायेथां मामनेन दुर्विनीतेन दुष्टमधुकरेण परिभूयमानाम्। (१७). आता दुर्विनीत म्हणजे दुर्वर्तनी म्हणजेच दुष्ट वृत्तीचा. मग 'मधुकरा'मागे पुन्हा 'दुष्ट' विशेषण वापरण्याचे प्रयोजन कोणते ? की कालिदास 'दु'-च्या अनुप्रासाच्या मोहात पडून अनावश्यक लेखन करता झाला ?

(१९) भुंग्याचे निवारण झाल्यावर राजा शकुंतलेसमोर येऊन उभा राहातो आणि 'अपि तपो वर्धते।' (१८), असा प्रश्न विचारतो. तो अप्रस्तुत वाटतो. वस्तुतः त्याने 'आता भीती गेली ना ?', 'आता मन स्थिर झाले ना ?' असा काहीतरी प्रश्न विचारणे स्वाभाविक ठरले असते.

(२०) आश्रमात अचानकपणे आलेल्या राजाला (एका परपुरुषाला) पाहून अनसूया त्याला जे तीन प्रश्न विचारते त्यांतील शेवटचा प्रश्न असा आहे : किंनिमित्तं वा सुकुमारतरोऽपि तपोवनगमनपरिश्रमस्यात्मा पदमुपनीतः। (१९). ह्यावरून राजा खूप नाजूक असावा. पण पुढे सेनापती शिकारीमुळे राजाचे शरीर गोटीबंद बनले आहे आणि एखाद्या पर्वतावर संचार करणाऱ्या हत्तीप्रमाणे हा भासतो, असे त्याचे वर्णन करतो (३५-३६) ! मुळातला सुकुमारतर राजा शिकारीच्या दगदगीमुळे सुकुमारतम व्हावयास हवा होता. पण होते उलटेच. हे कसे ? की अनसूयेचे शब्द अर्थवादात्मक समजावयाचे ? वरील वाक्य 'किंनिमित्तं वा सुकुमारतरोऽपि तपोवनगमन-परिश्रमेण आत्मा क्लिष्टः/क्लिशितः।' असे असते तर सुलभ झाले असते.

(२१) राजा -- ...इयं च वः सखी तदात्मजेति कथमेतत्। (२१)

येथील 'वः सखी'ही शब्दजोडी श्रवणकटू आहे, हे स्वतःस्पष्ट आहे. 'वः' हे 'युष्मद्'चे षष्ठी बहुवचन आहे. शकुंतला ही अनसूया व प्रियंवदा या दोघींची मैत्रीण आहे (पाहा- तमावयोः प्रियसख्याः प्रभवमवगच्छ ।२१). म्हणून येथे 'युवयोः' किंवा 'वां' रूप हवे होते.

(२२) राजा -- ...(आत्मगतम्) किन्तु सख्याः परिहासोदाहृतां वरप्रार्थनां श्रुत्वा धृतद्वैधीभावकातरं मे मनः । (२२)

यातील 'धृत' अनावश्यक आहे. राजाला आपली द्विधा मनःस्थिती व्यक्त करावयाची आहे. त्या दृष्टीने 'द्वैधीभावकातरं' पुरेसे आहे.

(२३) अनसूया -- पुरा किल तस्य राजर्षेरुग्रे तपसि वर्तमानस्य किमपि ज्ञातशङ्कैर् देवैर्मेनका नामाप्सराः प्रेषिता नियमविघ्नकारिणी । (२२)

हे नटाला उच्चारदृष्ट्या व प्रेक्षक-श्रोत्याला श्रवणदृष्ट्या न पेलणारे वाक्य आहे. शिवाय अंतिम शब्द इतर शब्दांपासून वेगळा पडून लोंबकळत राहातो.

(२४) राजा -- (आत्मगतम्) लब्धावकाशो मे मनोरथः । (२२)

राजा -- अथवा लब्धावकाशा मे प्रार्थना । (२६)

लब्धावकाशाची ही पुनरुक्ती खचित खटकते. ती 'प्राप्तावसरा मे अभ्यर्थना'-ने टाळता आली असती.

(२५) राजा -- ...। अस्ति नः सच्चरितश्रवणलोभादन्यदपि प्रष्टव्यम् । (२३)

येथील 'नः स' वरील (२१) मधील 'वःस'-प्रमाणेच श्रवणदुःखद आहेत.

(२६) राजा -- स्थानादनुच्चलन्नपि गत्वेव पुनः प्रतिनिवृत्तः । (२५)

प्रतिनि+वृत् (१आ.) म्हणजे पुन्हा येणे किंवा मागे फिरणे. ह्या वाक्याचा अर्थ 'जागेवरून न हलताही मी जणू जाऊन पुन्हा पुन्हा आलो' असा केला तर अगदी बटबटीत पुनरुक्ती जाणवते, पण 'पुन्हा मागे फिरलो' असा अर्थ केला तर ती टळते.

(२७) अनसूया -- सखि, न युक्तं तेऽकृतसत्कारमतिथिविशेषं विसृज्य स्वच्छन्दतो गमनम् । (२४)

प्रियंवदा -- (शकुन्तलां निरुध्य) हला, न ते युक्तं गन्तुम् । (२५)

ही पुनरुक्ती केवळ असुखावह आहे असे नव्हे तर घटितांच्या चालनेला खीळ घालणारी आहे. शकुंतलेने जाणे का योग्य नाही त्याचे एक कारण अनसूयेने सांगितले आहे आणि दुसरे प्रियंवदेने 'वृक्षसेचने द्वे धारयसि मे ।' (तत्रैव) ह्या शब्दांत ऐकवले आहे. ह्याचाच आधार घेऊन तिने 'न त्वां अनुजानामि गमनाय' ।, [तुळा - अनुजानीहि न उटजगमनाय । (२८)] असे दटावले असते की (सभ्रूभङ्गम्) 'किंनिमित्तम् ।'हा प्रश्न अगदी स्वाभाविक ठरला असता.

(२८) शकुंतलेच्या ऋणाचे स्वरूप वरील (२७) मध्ये वर्णिले आहे. खरे म्हणजे ते सगळे दोन जिवलग मैत्रिणींमधील थट्टेचे संभाषण आहे. राजा ते जणू आर्थिक ऋण मानून 'अङ्गुलीयं दातुमिच्छति' (२६). पाणी घालण्याचे ऋण आंगठी देऊन फेडण्यासारखे नाही, तशी अपेक्षाही नाही. त्यामुळे राजाची कृती असंबद्ध वाटते.

(२९) राजा -- ...अद्यापि स्तनवेपथुं जनयति श्वासः प्रमाणाधिकः । (२५)

हे ऐकणाऱ्या प्रेक्षकांना निश्चित संकोच वाटेल. हा उत्तान संवाद अश्लील वाटतो.

(३०) प्रियंवदा --...आर्यस्य वचनेनानृणेदानीमेषा।... गच्छेदानीम्। (२६)

एकाच संवादातील 'इदानीं'ची ही द्विरुक्ती कवीचे शब्ददारिद्य दर्शवते. त्याने 'इदानीं'च्या एतर्हि, संप्रति, अधुना, सांप्रतम् ह्या पर्यायांपैकी एखादा पर्याय का योजला नाही ?

(३१) राजा शकुंतलेला प्रियंवदेच्या ऋणातून मुक्त करण्यासाठी आपली नाममुद्रा असलेली आंगठी सर्वथा अपरिचित व्यक्तीला देऊ करतो, यात त्याचा बेजबाबदारपणा दिसतो. अशी अमूल्य भेटवस्तू देण्याचे कोणतेही विश्वसनीय कारण त्या (तथाकथित) राजपुरुषाने सांगितलेले नाही.

(३२) (नेपथ्ये) भो भोस्तपस्विनः, संनिहितास्तपोवनसत्त्वरक्षायै भवत। प्रत्यासन्नः किल मृगयाविहारी पार्थिवो दुष्यन्तः। (२७)

येथे खरे म्हणजे, 'शिकारी दुष्यंत राजा, त्याचे घोडे वगैरे प्राणी, बरोबरचे सैनिक व रान उठवणारे सेवक यांच्यापासून तपोवनातील स्त्रीपुरुषांना व पशुप्राण्यांना उपद्रव संभवतो; म्हणून तपस्व्यांनो, तपोवनातील प्राण्यांचे रक्षण करण्यासाठी आसपासच राहा', असा तार्किक क्रम स्वीकारणे इष्ट ठरले असते. तत्प्रीत्यर्थ, 'भो भोस्तपस्विनः, प्रत्यासन्नः किल मृगयाविहारी पार्थिवो दुष्यन्तः। अतः संनिहितास्तपोवनसत्त्वरक्षायै भवत।' अशी क्रमविपरीत वाक्यरचना इष्ट ठरली असती.

(३३) सख्यौ -- आर्य, असम्भाविताातिथिसत्कारा भूयोऽपि प्रेक्षणनिमित्तं लज्जामहे आर्यं विज्ञापयितुम्। (२८)

यातील 'प्रेक्षण' ऐवजी 'दर्शन' शब्द योग्य ठरला असता आणि तो राजाच्या 'मा मैवम्। दर्शनेनैव भवतीनां पुरस्कृतोऽस्मि'। (२८) या उत्तरातील 'दर्शन' शब्दाच्या वेगळ्या गर्भित अर्थाशी ('अहो मधुरमासां दर्शनम् '-१०) सुसंगत ठरला असता !

(३४) शकुन्तला -- तावत् परिपालयतं मां यावदेनं मोचयामि। (२९)

जेव्हा यावत् व तावत् ही अव्यये एकदम वापरलेली असतात तेव्हा ती अन्योन्यसंबद्ध (correlatives) असतात व ती याच क्रमाने वापरावयाची असतात. उलट्या क्रमाने वापरल्यास अव्यवस्थितपणा उत्पन्न होतो. म्हणून वरील वाक्य 'यावद् एनं मोचयामि तावत् परिपालयतं माम्'। असे हवे होते. [तुळा-सूत, यावदाश्रमवासिनः प्रत्यवेक्ष्याहमुपावर्ते तावदार्द्रपृष्ठाः क्रियन्तां वाजिनः (१०)]

(३५) शकुन्तला -- अनसूये, अभिनवकुशसूच्या परिक्षतं मे चरणम्। कुरबकशाखापरिलग्नं च वल्कलम्'। (२९) यातील दुसरे वाक्य 'कुरबकशाखापरिलग्नं च मे वल्कलम्। असे लिहिले असते की, समानांतरता हा शैलीउपाय साधला गेला असता.

(३६) शकुंतला वरील वाक्यात 'कुरबकशाखापरिलग्नं च वल्कलम्।' म्हणते, पण पुढे राजा 'शाखासु वल्कलमसक्तमपि द्रुमाणाम्।' (४२) असे म्हणतो. यांतले खरे कोणते ? की

शकुंतलेने, थोडा वेळ रेंगाळून राजाकडे पुन्हा एकदा डोळे भरून पाहता यावे यासाठी केलेला, हा बहाणा असतो ? तसे असल्यास ती 'अप्रगल्भ' नाही !

(३७) वरील राजाकृत वर्णनात शाखा व द्रुम शब्द बहुवचनांत वापरले आहेत. म्हणजे शकुंतलेचे एक वल्कल अनेक झाडांच्या अनेक फांद्यांत अडकले असा अर्थ होईल. तो शकुंतलेच्या मूळ उक्तीशी विसंगत तर आहेच, पण 'दुरर्थकारी'ही आहे.

(३८) विदूषक:--भो वयस्य, यद् वेतस: कुब्जलीलां विडम्बयति, तत् किमात्मन: प्रभावेण, ननु नदीवेगस्य । (३३)

या वाक्यात 'ननु' ऐवजी किमु, उत, उताहो, आहोस्वित् असा एखादा शब्द अपेक्षित होता. त्यांतल्या त्यात 'किमु' वा 'उत' उजवा ठरला असता; कारण येथे 'की' हा अर्थ अभिप्रेत आहे. शिवाय 'नदीवेगस्य' शब्दानंतर 'प्रभावेण' शब्द वापरला असता तर वाक्यात समानांतरता हा शैलीगुणही उतरला असता.

(३९) विदूषकाच्या वरील प्रश्नाला राजा 'नदीवेगस्तस्य कारणम् ।' (३३) असे उत्तर देतो. त्यावर विदूषक 'ममापि भवान् । (३३) असे राजाला ऐकवतो. त्याने 'ममापि भवान् कारणम् ।' असे उत्तर दिले असते तर एक तर वाक्य आशयदृष्ट्या पूर्ण झाले असते आणि राजाला ते ऐकून साश्चर्य धक्का बसला असता.

(४०) सेनापति:--(राजानमवलोक्य) दृष्टदोषापि स्वामिनि मृगया केवलं गुणायैव संवृत्ता । (३५)

अर्थात -- सदोष म्हणून ओळखली जाणारी शिकार केवळ हितकारकच ठरली.

यातील 'केवलं' शब्द अयोग्य आहे. त्याच्या जागी 'प्रत्युत' (on the contrary, rather ह्या अर्थाचे) अव्यय वापरणे इष्ट ठरले असते.

(४१) राजाने गायिलेल्या 'गाहन्तां महिषा...।' (३७) इत्यादी श्लोकाच्या प्रथम, द्वितीय व चतुर्थ चरणांत कर्तरी प्रयोग आहेत, तर फक्त तृतीय चरणात कर्मणी प्रयोग आहे. त्यामुळे रचनेची समता बाधित झाली आहे. ती टाळणे इष्ट होते.

(४२) राजा -- सुरयुवतिसम्भवं किल मुनेरपत्यं तदुज्झिताधिगतम् ।
अर्कस्योपरि शिथिलं च्युतमिव नवमालिकाकुसुमम् ।। (४०)

या श्लोकात अर्कवृक्ष (रुईचे झाड) व काश्यप, अपत्य व कुसुम, उज्झित व शिथिल आणि अधिगत व च्युत अशा तुलना आहेत. कोठे अर्कवृक्ष आणि कोठे तपोधन काश्यप ! ही तुलना अप्रिय आहे. शिवाय मेनकेने शकुंतलेला जाणूनबुजून टाकलेले असते (उज्झित) व तशा स्थितीत ती काश्यपांना मिळालेली असते. तर रुईच्या झाडावरील फूल आपोआप सैल होऊन खाली पडलेले असते. त्यामुळे उज्झित व शिथिल यांचीही तुलना होऊ शकत नाही. एकंदरीने ही उपमा सौंदर्यविघातक आहे.

(४३) विदूषक: -- तत् खलु रमणीयं यद् भवतोऽपि विस्मयमुत्पादयति । (४०)

हे वाक्य 'तत् खलु रमणीयं एव भवेत् यद् भवतोऽपि विस्मयं उत्पादयति।' असे लिहिले गेले असते तर त्यात म्हटले तर, विदूषकाने राजाच्या सौन्दर्यदृष्टीची वाखाणणी केली असल्याची छटा उमटली असती; म्हटले तर, राजाच्या भ्रमरवृत्तीला मारलेला सौम्य टोमणा ठरला असता ! शिवाय 'भवेत्'ने वाक्य पूर्ण झाले असते.

(४४) विदूषक: -- तेन हि लघु परित्रायतामेनां भवान्। (४१)

या वाक्यातील 'भवान्' शब्द लोंबकळत राहातो. शिवाय, राजा व विदूषक या दोघांमध्ये संवाद चालू असल्यामुळे 'भवान्' शब्द उन्मेखून योजण्याची गरज नाही.

(४५) विदूषक राजाला विचारतो, 'मित्रा, तिने तुझ्यावरील आपले प्रेम नजरेने तरी सुचवले का ?' त्यावर राजा खुलासा करतो की, 'तिने आपले प्रेम पूर्णपणे उघडही केले नाही, किंवा पूर्णपणे लपवूनही ठेवले नाही' (४२). त्यावरील विदूषकाची 'न खलु दृष्टमात्रस्य तवाङ्कं समारोहति।' (तत्रैव) ही बेछूट प्रतिक्रिया अनुचित वाटते.

(४६) प्रथम:--अहो दीप्तिमतोऽपि विश्वसनीयतास्य वपुष:। (४४)

जरी 'वपुस्' शब्दाचा 'दिसणे', 'अंगलट' असाही अर्थ असला तरी सकृद्दर्शनी तो शरीराची आठवण करून देतो. त्याऐवजी कवीने त्याला प्रिय असलेला 'आकृते:' (हा शब्द नाटकात सात वेळा वापरला गेला आहे) शब्द वापरला असता तर तो विश्वसनीयता ह्या स्त्रीलिंगी शब्दाशी मिळताजुळता ठरला असता.

(४७) विदूषक:--(अपवार्य) एषेदानीमनुकूला तेऽभ्यर्थना। (४६)

वस्तुत: राजाला आश्रमात 'पुन:' जाण्यासाठी सबब हवी असते, 'आता' जाण्यासाठी नको असते. त्या दृष्टीने 'एषा खलु पथ्यकारिणी तेऽभ्यर्थना' असे वाक्य रचले गेले असते तर 'इदानीं' पद बाजूला सारले गेले असते आणि 'पथ्य' शब्द 'खादाड' विदूषकाच्या तोंडी शोभलाही असता. 'पुनराश्रमगमनस्य अपदेश: स्वयमेव उपस्थित:।' असेही वाक्य तितकेच 'अनुकूल' ठरले असते.

(४८) तिसऱ्या अंकाच्या शेवटी आश्रमीय ऋषिकुमार 'आकाशात' राजाला निवेदन करतात की, संध्याकाळची वेळ झाली आहे आणि भुताखेतांच्या सावल्या यज्ञीय धर्मक्रियांवर पडू लागल्या असून त्या सर्वांना घाबरवून सोडत आहेत (७१). पण ह्यापूर्वी त्याच ऋषिकुमारांनी राजाच्या धाकाचेही वर्णन केलेले असते [मागील नोंद ९ पाहा]. ह्यावरून कवी विसंगत वर्णन करतो असे दिसते. शिवाय राजा राक्षसांचा नि:पात करू शकेल, पण अदृश्य भुताखेतांचा नायनाट कसा करणार ?

(४९) राजा--मा भैषी:। ननु मत्समीपे वर्तिष्यसे। (४७)

'भैषी:' हे कर्णकटू रूप ऐकून विदूषक निर्धास्त होण्याऐवजी कदाचित भीतीने दचकलाच असेल ! ह्याच्याऐवजी 'बिभिहि', 'बिभीहि' ह्यांपैकी एक रूप श्रेयस्कर ठरले असते. कवीने 'मा बिभीहि।' (९८) हे रूप वापरलेच आहे.

(५०) राजा -- (सादरम्) किमम्बाभिः प्रेषितः ।...

राजा -- (विचिन्त्य) सखे, त्वमम्बया पुत्र इति प्रतिगृहीतः । अतो भवानितः प्रतिनिवृत्य तपस्विकार्यव्यग्रमानसं मामावेद्य तत्रभवतीनां पुत्रकृत्यमनुष्ठातुमर्हति । (४८)

या लागोपाठच्या वाक्यांत अंबाभिः, अंबया, त्वं, भवान् अशी विभिन्न वचनांची रूपे वापरली आहेत. ह्यात कवीचा अव्यवस्थितपणा दिसतो.

(५१) राजा -- ...परमार्थेन न गृह्यतां वचः ।

विदूषकः -- अथ किम् ।(४९)

विदूषकाने 'तथैव गृह्णामि ।', 'मनसा धारयामि ।', असे काही उत्तर दिले असते तर ते, तो पुढे सहाव्या अंकात '...तथैव गृहीतम् ।'(१४३) असे जे म्हणतो, त्याच्याशी जुळले असते.

(५२) अनसूया -- सखि, प्रष्टव्यासि किमपि ।

शकुन्तला-- हला, किं वक्तुकामासि । (५५)

अनसूयेने 'सखि, किमपि प्रष्टुकामासि ।' असे विचारले असते तर तशा सरळ वाक्यरचनेने तिचा शकुंतलेविषयीचा 'काळजीभरा' जिव्हाळा अधिक प्रकर्षाने व्यक्त झाला असता. शिवाय, तो शकुंतलेच्या 'हला, किं वक्तुकामासि ।' या प्रश्नाशी सुसंगतही ठरला असता.

(५३) अनसूया -- हला शकुन्तले,...किन्तु यादृशीतिहासनिबन्धेषु कामयमानानामवस्था श्रूयते तादृशीं तव पश्यामि । (५५). येथे एकाच वाक्यात कर्तरी व कर्मणी प्रयोगांचा संकर केला आहे. तो टाळण्यासाठी 'तादृशी तव दृश्यते', हा प्रयोग योग्य ठरला असता.

(५४) अनसूया -- सखि, ममापीदृश्याशङ्का हृदयस्य । (५५)

खरे म्हणजे 'मम अपि ईदृशी आशङ्का ।' एवढेच पुरे आहे; 'हृदयस्य' अनावश्यक आहे.

(५५) प्रियंवदा -- ...केवलं लावण्यमयी छाया त्वां न मुञ्चति ।

राजा -- ...मध्यः क्लान्ततरः प्रकामविनतावंसौ छविः पाण्डुरा । (५६)

आता प्रियंवदेच्या म्हणण्यानुसार शकुंतलेच्या सौंदर्याचे तेज अजून टिकून राहिलेले असेल तर राजाचे 'तिची कांती फिकुटली आहे', हे वर्णन तद्विरुद्धार्थक ठरेल.

(५६) राजा -- क्षामक्षामकपोलमाननमुरः काठिन्यमुक्तस्तनम् । (५६)

हे वर्णन उत्तान व व्रीडोत्पादक आहे. ह्यावर अधिक टिप्पणी करणे योग्य नाही.

(५७) वरील 'क्षामक्षाम..' इत्यादी श्लोकाचा शेवटचा चरण खालीलप्रमाणे आहे :

पत्राणामिव शोषणेन मरुता स्पृष्टा लता माधवी। (तत्रैव)

अर्थात-- माधवी वेलीची पाने वाऱ्याच्या स्पर्शामुळे सुकून गेली आहेत. शकुंतलेला मदनबाधा झालेली आहे. मदनबाधा व वारा यांची तुलनाच होऊ शकत नाही. त्यामुळे ह्या उपमेत सादृश्याचा अभाव आहे.

(५८) शकुन्तला-- सखि, कस्य वान्यस्य कथयिष्यामि। आयासयित्रीदानीं वां भविष्यामि।
उभे -- अत एव खलु निर्बन्धः। स्निग्धजनसंविभक्तं हि दुःखं सह्यवेदनं भवति। (५७)

शकुंतला आयास (म्हणजे दुःख किंवा कष्ट) देणारी व्हावी म्हणून तिच्या मैत्रिणी तिला आग्रह करीत आहेत का ? 'आयासयित्री...' इत्यादी वाक्यानंतरचे 'अत एव...' इत्यादी शब्द वाचले की, असा अग्राह्य अर्थ निष्पन्न होतो. तो टाळण्याचा एकच व तर्कशुद्ध उपाय म्हणजे 'आयासयित्री...' इत्यादी खरोखरच 'आयासदायी' वाक्य वर्ज्य समजावयाचे ! म्हणजे मग उरलेला त्रिवाक्यात्मक संवाद 'स्निग्धजनां'ना पूर्णपणे साजेसा ठरेल.

(५९) प्रियंवदा -- ...तद्युक्तमस्या अभिलाषोऽभिनन्दितुम्। (५८)
अनसूया -- तथा यथा भणसि। (५९)

अनसूयेचे प्रतिसादात्मक वाक्य अक्षरशः 'यथातथा' वाटते. त्याऐवजी 'तथैव कुर्वः यथा भणसि।' असे वाक्य अधिक निश्चयार्थ-प्रतिपादक ठरले असते.

(६०) प्रियंवदा -- निभृतमिति चिन्तनीयं भवेत्। शीघ्रमिति सुकरम्। (५९)

शकुंतलेच्या इच्छापूर्तीसाठी कोणता उपाय योजावा ह्याविषयी तिच्या मैत्रिणी-अनसूया व प्रियंवदा-विचारविनिमय करीत आहेत. उपायाची अंमलबजावणी निभृतं (म्हणजे गुप्तपणे)-ही व्हावी व लवकर(शीघ्र)ही व्हावी, अशी त्यांची इच्छा आहे. ह्याबाबतीत प्रियंवदेला निभृतत्व हे चिंतनीय म्हणजे दुष्कर वाटते, पण शीघ्रत्व सुकर वाटते; निभृतत्वाबद्दल ती साशंक आहे, तर सुकरत्वाबद्दल निःशंक आहे. तेच ती वरील वाक्यांत म्हणत आहे. तिच्या मनाचा शीघ्रत्वाबद्दलचा तो ठामपणा उत्तर वाक्यात 'शीघ्रं इति सुकरं विद्यते।' असे एक क्रियापद योजून मनावर ठसवता येईल. शिवाय त्यायोगे दोन्ही परस्परविरुद्धार्थक वाक्ये एकमेकांना उत्तम प्रकारे तोलून धरतील (कारण प्रत्येकात चार-चार शब्द होतील).

(६१) अनसूया -- कः पुनरुपायो भवेद्...। (५९)
प्रियंवदा -- (विचिन्त्य) हला, मदनलेखोऽस्य क्रियताम्।...।
अनसूया -- रोचते मे सुकुमारः प्रयोगः।...। (६०)

अनसूया व प्रियंवदा 'उपाया'-विषयी विचारविनिमय करीत असल्यामुळे अनसूयेने वरील अंतिम वाक्यात 'प्रयोग' शब्द वापरण्याऐवजी प्रथम वाक्यात वापरलेला 'उपाय' शब्दच वापरणे सुसंगत ठरले असते.

(६२) अनसूया--...सागरमुज्झित्वा कुत्र वा महानद्यवतरति। (५९)

या वाक्यात 'सागरं' ऐवजी 'महासागरं' म्हटले असते तर दुष्यंत व शकुंतला (क्रमश: महासागर व महानदी) या दोघांचा महिमा अधोरेखित झाला असता. शिवाय 'महा'-ची सुखावह आवृत्तीही (repetition) साधली गेली असती.

(६३) वरील वाक्यातील 'उज्झित्वा' शब्दाऐवजी अपहाय, अपाहाय व विहाय यांपैकी एखादा शब्द कवीने योजला असता तर कर्णकटुता टळली असती.

(६४) राजा--...कनकवलयं स्रस्तं स्रस्तं मया प्रतिसार्यते। (६०)

येथे राजा आपल्या हातातील सोन्याच्या कड्याचा (म्हणजेच एका आभरणाचा) उल्लेख करीत आहे. पण कण्वाश्रमात प्रवेश करण्यापूर्वी त्याने आपली आभरणे व धनुष्य सूताच्या हवाली केलेली असतात [सूतस्य आभरणानि धनुश्च उपनीय। (१०)]. ती आभरणे त्याने पुन्हा घातल्याचा कोठे उल्लेख नाही. इतकेच नव्हे तर तो दुसऱ्या अंकात सैनिकांनाही 'मृगयावेश' उतरवण्यास सांगतो. तिसऱ्या अंकातही (म्हणजे जेव्हा वरील वाक्य उच्चारले जाते तेव्हाही) तो आश्रमातच आहे. मग हे कनकवलय आले कोठून ? हा उल्लेख अनवधानाने तर झालेला नाही ?

(६५) शकुंतला दुष्यंताला जे एक श्लोकबद्ध प्रेमपत्र लिहिते त्याचा उत्तरार्ध असा आहे:

'निर्घृण तपति बलीयस् त्वयि वृत्तमनोरथाया अङ्गानि। (६२) अर्थात--हे निर्दय राजा, जिचे सर्व मनोरथ तुझ्यावर केंद्रित झालेले आहेत, अशा माझ्या शरीराला कामदेव अतिशय पोळून काढीत आहे.

वस्तुत: राजा शकुंतला व तिच्या मैत्रिणी यांच्याशी झालेल्या पहिल्या भेटीतच त्यांच्या रूपानुरूप सौहार्दाचे गुणगान करतो (१९); शकुंतलेविषयीचा सर्व पूर्ववृत्तांत आमूलाग्र जाणून घेतो (२१-२२); अप्सरेची मुलगी म्हणून तिची प्रशंसा करतो (२२); मानवी स्त्री अशा अलौकिक लावण्यवतीला जन्म देऊ शकणार नाही ह्या शब्दांत तिचा गौरव करतो (२२); तिच्या भावी जीवनाविषयी जिव्हाळ्याने विचारपूस करतो (२६); 'तुम्हां तिघींच्या दर्शनानेच माझा सत्कार झाला' ह्या शब्दांत त्या तिघींना मोठेपणा देतो (२८), प्रियंवदेच्या ऋणातून शकुंतलेला मुक्त करण्यासाठी तो स्वत:ची आंगठी देऊ करतो (२६), आणि आश्रमवासियांना त्रास होणार नाही, ह्यासाठी झटेन असे आश्वासनही देतो (२८). मग शकुंतला त्याला 'निर्घृण' कोणत्या आधारावर म्हणते ? वस्तुत: तिने सदय, सकृप, सकरुण, अनुकम्पिन् ह्यांपैकी एखादे संबोधन वापरून आपली अभिजात कृतज्ञता व्यक्त करावयास हवी होती. तात्पर्य, येथे 'निर्घृण' हा अनुचित शब्दप्रयोग झाला आहे.

(६६) अनसूया -- ...यथा नौ प्रियसखी बन्धुजनशोचनीया न भवति तथा निर्वाहय।
राजा -- भद्रे, किं बहुना। परिग्रहबहुत्वेऽपि ...॥(६५)

येथे राजाने 'किंबहुना' ऐवजी 'मा तथा आशङ्केथाम्।' किंवा 'मा तावत्।' असे

आश्वासनपर शब्द उच्चारावयास हवे होते. त्यानंतर 'यत:' हे अव्यय योजून मग वरील 'परिग्रहबहुत्वेऽपि...' इत्यादी श्लोक म्हणावयास हवा होता. अशा शब्दरचनेच्या योगे दोघी मैत्रिणींचे 'निर्वृते स्व: ।' हे समाधानोद्गार सार्थ ठरले असते. शिवाय राजाचे भाषण तर्कपूत झाले असते.

(६७) राजा -- ...अङ्के निधाय करभोरु यथासुखं ते
संवाहयामि चरणावुत पद्मताम्रौ ॥ (६६)

अर्थात -- 'तुझे कमळासारखे तांबडे पाय मांडीवर घेऊन चुरू काय ?' ही राजोक्ती राजोचित की 'तदन्यथा' ?

(६८) तद्वत शकुंतलेच्या समोर उभे राहून राजाने 'उत्सृज्य कुसुमशयनं नलिनीदलकल्पितस्तनावरणम् ।' (६७) असे म्हणणेही 'चिन्त्य' वाटते !

(६९) राजा--सुन्दरि, अनिर्वाणो दिवस: । इयं च ते समवस्था । (६७)

वस्तुत: राजाने 'सुन्दरि, आतपतप्तो दिवस:' असा शब्दबंध वापरणे योग्य ठरले असते. कारण ह्या उद्गारानंतर राजा 'कथमातपे गमिष्यसि परिबाधापेलवैरङ्गै: ।' (तत्रैव) असे जे पद्य म्हणतो त्यातील शब्दांशी वरीलसारखा शब्दसमूह सुसंगत ठरला असता.

(७०) दुष्यंत शकुंतलेला आपल्याशी गांधर्वविवाह करण्यास सुचवतो आणि पूर्वीही अनेक राजर्षिकन्यांनी असे गांधर्वविवाह करून त्यांना आपापल्या आईवडिलांची संमतीही मिळविली होती, अशी पुष्टीही जोडतो. त्यावर शकुन्तला म्हणते: 'मुञ्च तावन्माम् । भूयोऽपि सखीजनमनुमानयिष्यामि ।' (६७), अर्थात--(तू म्हणतोस ते खरे असले) तरीही मला सोड. ह्या विवाहाला मैत्रिणींची अनुमती आहे का, असे मी त्यांना विचारीन. येथे 'भूयोऽपि सखीजनं प्रक्ष्यामि ।' असे सरळ वाक्य चांगले ठरले असते.

(७१) राजा -- "...अधरस्य पिपासता मया ते । सदयं सुन्दरि गृह्यते रसोऽस्य ॥" (६८)

राजाच्या तोंडचे हे उद्गार प्रेक्षकांना व्रीडोत्पादक वाटत असतील, यात शंका नाही.

(७२) अनसूया -- गुणवते कन्यका प्रतिपादनीयेत्ययं तावत् प्रथम: सङ्कल्प: ।' (७३)

यातील 'तावत्' चे प्रयोजन नाही. त्याच्या ऐवजी 'तातस्य' शब्द योग्य ठरला असता व तो अनसूयेच्याच 'यथाहं पश्यामि, तथा तस्यानुमतं भवेत् ।' (तत्रैव) या पूर्वोद्गाराशी जुळतामिळता ठरला असता.

(७३) अनसूया -- ननु सख्या: शकुन्तलाया: सौभाग्यदेवतार्चनीया । (७३)
येथील विसर्गांनंतरचे 'श'कार व 'स'कार श्रुतिसुभग नाहीत.

(७४) प्रियंवदा -- ननूटजसंनिहिता शकुन्तला ।
अनसूया -- अद्य पुनर् हृदयेनासंनिहिता । (७४)

अनसूयेचे हे वाक्य जितके अर्थवाहक आहे तितकेच 'हला, शरीरमात्रेण, न पुनर्

हृदयेन', असे अपूर्ण वाक्य पूर्ण मनोगत (संनिहिताचे असंनिहिता असे नकारात्मक रूप न बनवता व 'संनिहिता' अध्याहृत ठेवून) चातुर्याने व्यक्त करणारे ठरले असते.

(७५) दुर्वास शकुंतलेला शाप देताना 'विचिन्तयन्ती...' इत्यादी जो श्लोक म्हणतो त्याचे शेवटचे दोन चरण उपमायुक्त आहेत, ते असे :

स्मरिष्यति त्वां न स बोधितोऽपि सन् । कथां प्रमत्तः प्रथमं कृतामिव । (७४)

अर्थात--एखाद्या मद्यप्याला ज्याप्रमाणे आपण पूर्वी काय बोललो ते आठवत नाही त्याप्रमाणे त्याला (तू ज्याचे चिंतन करीत आहेस त्याला) आठवण करून दिली तरीदेखील तो तुला ओळखणार नाही.

मद्यप्याला दारूची नशा चढलेली असते, त्यामुळे तो आपले भान हरपून बसलेला असतो. म्हणून त्याच्या पूर्व-अपर बोलण्यात विसंगती उत्पन्न होते, किंवा तो पूर्वीचे बोललेले विसरूनही जातो. दुष्यंत जेव्हा शकुंतलेला झिडकारतो व तिला ओळखू शकत नाही, तेव्हा तो मद्य प्यालेला नसतो; तो पूर्णपणे भानावर असतो आणि त्याच्या एकूण बोलण्याला मद्यप्याचे 'बरळणे' असे मुळीच म्हणता येत नाही. त्यामुळे दुष्यंताची मद्यप्याशी केलेली तुलना अनुचित आहे.

(७६) अनसूया--न खलु यस्मिन् कस्मिन्नपि । (७४-७५)

या वाक्यातील 'खलु'च्या जागी 'केवलं'चा प्रयोग कवीने केला असता तर (त्याने मुळातच अपि वापरलेला असल्यामुळे) वाक्यार्थ-'केवळ अशातशा महर्षीचा शकुंतलेने अपमान केलेला नाही तर शीघ्रकोपी म्हणून (कु)प्रसिद्ध असलेल्या महर्षी दुर्वासाचा अपमान केला आहे', असा सर्वथा समर्पक झाला असता. ('न केवलं-अपि'चा अर्थ not only but असा आहे व तोच येथे अभीष्ट आहे.)

(७७) प्रियंवदा--कोऽन्यो हुतवहाद् दग्धुं प्रभवति । गच्छ । पादयोः प्रणम्य निवर्तयैनं यावदहमर्घ्योदकमुपकल्पयामि । (७५)

खरे म्हणजे 'जाळून टाकण्याचे सामर्थ्य अग्नीवाचून दुसऱ्या कोणात आहे ?' ह्या सर्वमान्य अनुभूतीच्या अभिव्यक्तीची येथे निकड नाही. तर लागलेली आग विझवण्याच्या उपायाचा तत्काळ अवलंब करण्याची निकड आहे. ती 'कोऽन्यो उपायो वह्निनिर्वपणस्य । शीघ्रं गच्छ ।...उपकल्पयामि ।' अशा शब्दरचनेने पुरी करता आली असती.

(७८) अनसूया -- यदानुनीतो निवर्तितुं नेच्छति तदा विज्ञापितो मया । (७६)

प्रसंग दुर्वासाच्या शापाचाच आहे. दुर्वास हा शीघ्रकोपी तर आहेच, पण दुराग्रहीही आहे. एकदा विनंती करून बधणाऱ्यांतला तो नाही. त्यामुळे अनसूयेने त्याला एकाधिक वेळा विनंती करून पाहिली असेल व त्या प्रयत्नांत अपयश आल्यावर 'शकुंतलेचा हा पहिलाच अपराध असल्यामुळे तिला क्षमा करावी', असे आर्जव केले असेल. म्हणून कवीने 'यदा

पुन:पुन: अनुनीतोऽपि निवर्तितुं नेच्छति तदा विज्ञापितो मया।' अशी वाक्यरचना केली असती तर ती अधिक अर्थवाही व ग्राह्य बनली असती.

(७९) प्रियंवदा -- (विलोक्य) अनसूये, पश्य तावत्। वाम-हस्त-उपहित-वदन-आलिखिता इव प्रियसखी। भर्तृगतया चिन्तया आत्मानमपि नैषा विभावयति। ...। (७७)

यातील पहिले वाक्य 'अनसूये, पश्य इत:।' (अनसूये, इकडे बघ) असे असते तर 'तावत्' हे अनुपयुक्त अव्यय टाळता आले असते आणि अनसूयेचे लक्ष शकुंतलेकडे वळवता आले असते. तिसऱ्या वाक्यात 'विचिन्तया' इतका लहानसा बदल केला असता तर तो दुर्वासाच्या शापातील 'विचिन्तयन्ती' या शब्दाशी जुळला असता. शिवाय त्या शब्दाद्वारे चित्रात जणू रेखाटल्याप्रमाणे नि:स्तब्ध शकुंतलेचे यथावत वर्णन झाले असते.

(८०) शिष्य: -- .... दु:खानि नूनमतिमात्रसुदु:सहानि। (७८)

अतिमात्र म्हणजे अतिशय, सु म्हणजे फार/अतिशय, दु:सह = अत्यंत असह्य. हे सगळेच 'अति-लेखन' झाले आहे. किमान 'सु' वगळणे आवश्यक आहे.

(८१) प्रियंवदा -- सखि, तावदुत्कण्ठां विनोदयिष्याव:। (८२)

अर्थात -- आपण दोघी जणी आपल्यापरीने आपली हुरहूर/विरहव्यथा दूर करू.

या वाक्यातील 'तावद्' ऐवजी 'कथमपि' शब्द अधिक अचूक व प्रभावी ठरला असता. त्यायोगे आपण दोघीजणी आपले दु:ख 'कसेबसे' दूर करू; कारण तुला माझी व मला तुझी सोबत (तरी) आहे; ती बिचारी मात्र एकटी पडणार आहे, ही त्या दोघींची भावव्याकुळता व्यक्त झाली असती. रेवाप्रसाद द्विवेदींनी ' 'कथमपि' पाठच स्वीकारला आहे.

(८२) शकुन्तला-- इदमपि बहु मन्तव्यम्। दुर्लभमिदानीं मे सखीमण्डनं भविष्यति। (८४)

ह्या वाक्यांऐवजी, 'इदमद्य बहु मन्तव्यम्। अद्यप्रभृति हि दुर्लभं मे सखीमण्डनं भविष्यति।' - अर्थात आज ह्याचे मूल्य खूप आहे. कारण आजपासून पुढे माझा मैत्रिणींकडून होणारा साजशृंगार दुर्लभ होणार आहे, ही वाक्ये चांगली झाली असती. कालिदासाने वनज्योत्स्नेच्या बाबतीत 'अद्यप्रभृति दूरवर्तिनी ते खलु भविष्यामि'। (९१) असा प्रयोग केलेला आहेच.

(८३) प्रथम: -- गौतम, एह्येहि। अभिषेकावतीर्णाय काश्यपाय वनस्पतिसेवां निवेदयाव:। (८६)

गौतम व नारद हे ऋषिकुमार आहेत. ते महर्षि-काश्यपांचा उल्लेख वरीलप्रमाणे एकवचनी करतात हे अनुचित आहे. वास्तविकपणे त्यांनी महर्षिकाश्यपेभ्य:, कुलपतये, तातकाश्यपाय असा काहीसा करणे इष्ट व आवश्यक आहे.

(८४) शकुन्तला-- अद्यप्रभृति दूरवर्तिनी ते खलु भविष्यामि। (९१)

ह्या वाक्यातील 'खलु' केवळ वाक्यालंकारपर आहे. नाहीतर त्याची गरज नाही.

(८५) शकुन्तला-- वत्स, किं सहवासपरित्यागिनीं मामनुसरसि। अचिरप्रसूतया जनन्या विना विवर्धित एव। इदानीमपि मया विरहितं त्वां तातश्चिन्तयिष्यति। निवर्तस्व तावत्। (रुदती प्रस्थिता) (९३)

ज्याप्रमाणे काश्यपांनी शकुंतलेचे जिव्हाळ्याने पालनपोषण केले आहे, त्याप्रमाणेच शकुंतलेने त्या मृगशावकाचे लाडाकोडाने पालन केले आहे. 'दीर्घापांग' असे त्याला नाव दिले आहे आणि त्याला आपला मुलगा मानले आहे. कुशगवताच्या टोकदार पात्यामुळे एकदा त्याच्या तोंडाला जखम झाली असता ती त्याच्यावर इंगुदीचे तेल लावते (९३), इतका तिचा त्याच्यावर जीव आहे. म्हणूनच शकुंतला त्या हरिणबालकाला परतण्यास प्रवृत्त करीत आहे. 'ह्यापुढे तात काश्यप तुझी काळजी घेतील, तू निश्चिंत हो', असा ती त्याला दिलासाही देत आहे. त्या दोघांची 'जीवित एकच, केवळ शरीरे भिन्न' [तुळा-यत एकमेव नौ जीवितं द्विधास्थितं शरीरम्। (१३४)] अशी परस्परप्रीती लक्षात घेऊन कवीने 'रुदती प्रस्थिता' ह्या रंगसूचनेऐवजी 'मृगशावकः बाष्पं विहरति।' किंवा 'दीर्घापाङ्गो साश्रुनयनो भवति।' अशी रंगसूचना दिली असती तर बहार झाली असती !

(८६) 'शुश्रूषस्व...' इत्यादी (९६) श्लोकानंतर गौतमीकडे वळून काश्यप तिला विचारतात 'कथं वा गौतमी मन्यते।' त्यावर गौतमी म्हणते : 'एतावान् वधूजनस्य उपदेशः। जाते, एतत् खलु सर्वमवधारय।' (तत्रैव). गौतमीचे हे वाक्य 'अहो वधूजनस्य उपदेशरूपः।' असे असते तर अधिक प्रभावी ठरले असते. उपदेशरूपः म्हणजे उत्तम/प्रशंसनीय उपदेश.

(८७) शाङ्र्गरवः--न खलु धीमतां कश्चिदविषयो नाम। (९६)

यातील खलु व नाम ह्या दोन्ही अव्ययांचा अर्थ 'खरोखर' असा आहे. त्यामुळे येथे पुनरुक्ती झाली आहे. दोहोंपैकी एक वगळून ती टाळता आली असती.

(८८) शकुन्तला-- (पितरमाश्लिष्य) कथमिदानीं तातस्याङ्कात् परिभ्रष्टा मलयतटोन्मूलिता चन्दनलतेव देशान्तरे जीवितं धारयिष्ये। (९७)

या वाक्यात मलय = तात, तट = अंक (मांडी), चंदनलता = शकुंतला, उन्मूलिता = परिभ्रष्टा अशी समीकरणे/साम्ये आहेत. मात्र उन्मूलिता म्हणजे जाणूनबुजून जमिनीतून उपटलेली/जमिनीपासून वेगळी केली गेलेली. येथे शकुंतला वडिलांच्या अंकापासून भ्रष्ट म्हणजे ढळलेली आहे. तिने स्वतःच निर्णय घेऊन राजाशी गांधर्वविवाह केला आहे आणि ती स्वतःहून वडिलांच्या छायाछत्रापासून दूर झाली आहे. म्हणजेच ती उन्मूलित नाही, हा फरक आहे.

(८९) शकुंतला पतिगृही जाण्यापूर्वी तातकाश्यपांच्या पाया पडते. तेव्हा ते तिला 'यदिच्छामि

ते तदस्तु ।' (९८) असा आशीर्वाद देतात. ह्या आशीर्वादाचा नेमका अर्थ काय ? वस्तुतः शकुंतलेला अनुरूप पती मिळावा असा त्यांनी संकल्प सोडलेला असतो (२३, ९२). तदनुसार तिला दुष्यंतासारखा पराक्रमी व वैभवशाली राजा पती म्हणून मिळाल्याचे कळल्यावर ते तिचे सालिंगन अभिनंदन करतात (८१). आपण आता निश्चिंत झालो आहोत ह्या शब्दांत समाधानही व्यक्त करतात (९२). तिला कालोचित उपदेश करतात (९६) आणि शकुंतला ऋषी व गौतमी ह्यांच्याबरोबर पतिगृही गेल्यामुळे आज आपले मन अत्यंत शांत झाले आहे, ह्या शब्दांत संतोषही प्रकट करतात (१००). एकंदरीने त्यांच्या सर्व इच्छा पूर्णपणे तृप्त झालेल्या असताना ते 'यदिच्छामि...' इत्यादी आशीर्वाद का देतात ? खरे म्हणजे, 'वत्से, चिरमङ्गला भव', किंवा 'सदैव भद्राणि पश्य' असा काहीतरी आशीर्वाद देणे उचित ठरले असते.

(९०) गौतमी -- जाते, परिहीयते गमनवेला । निवर्तय पितरम् । अथवा चिरेणापि पुनःपुनरेषैवं मन्त्रयिष्यते । निवर्ततां भवान् । (९९)

गौतमी हे सगळे शकुंतलेला संबोधून बोलत आहे. ह्यातील 'अथवा...' इत्यादी वाक्य गौतमीने शकुंतलेच्या तोंडावर उच्चारणे व भावव्याकुळ स्थितीत असलेल्या तिला दुखावणे प्रशस्त नाही. ही अप्रियता दोन रंगसूचना वरील संभाषणात भरीस घालून पुढीलप्रमाणे टाळता येईल : 'जाते, परिहीयते गमनवेला । निवर्तय पितरम् । (आत्मगतम्) अथवा चिरेणापि पुनःपुनर् एषा एवं मन्त्रयिष्यते । (काश्यपं अवलोक्य) निवर्ततां भवान् ।'

(९१) उभे -- तात, शकुन्तलाविरहितं शून्यमिव तपोवनं कथं प्रविशावः ।
काश्यपः -- स्नेहप्रवृत्तिरेवंदर्शिनी । (१००)

काश्यपाचे वाक्य 'सा खलु वां हृदयसंनिहिता सततम् ।' असे असते तर अधिक चांगले वाटले असते काय ?

(९२) शाङ्गर्रव जेव्हा राजधानीच्या शहरात प्रवेश करतो तेव्हा तो तेथील गजबजाटाविषयीची आपली प्रतिक्रिया पुढील शब्दांत व्यक्त करतो :

तथापीदं शश्वत्परिचितविविक्तेन मनसा ।
जनाकीर्णं मन्ये हुतवहपरीतं गृहमिव ॥ (१०८)

अर्थात -- मला नेहमी निर्जनतेची सवय असल्यामुळे, माणसांनी गजबजलेले हे ठिकाण, आगीने घेरलेल्या घरासारखे वाटते.

येथे जनाकीर्णं व हुतवहपरीतं यांतील साम्य लक्षात घ्यावयाचे आहे. माणसांची गजबज/गर्दी व आगीच्या ज्वाळा यांत साम्य कोणते ? ही तुलना पटत नाही. दुसरी गोष्ट अशी की, काश्यप हे कुलपती आहेत. 'मुनीनां दशसहस्रं योऽन्नपानादिपोषणाद् । अध्यापयति विप्रर्षिरसौ कुलपतिः स्मृतः ।' अशी कुलपती शब्दाची व्याख्या आहे. जर ही व्याख्या काश्यपांना लागू केली तर आश्रमातही शेकडो माणसांची वर्दळ, ये-जा, गजबज हे सारे आहेच. अर्थात त्याची सवय, तेथे कायम राहणाऱ्या शाङ्गर्रवाला आहेच, असे ठरते. मग तो

स्वत:चे वर्णन 'शश्वत् परिचितविविक्तेन' शब्दांनी कसे करतो ? त्याचे म्हणणे यथार्थ मानले व दुष्यंतानेही 'शान्तं इदं आश्रमपदं...' (१०) ही जी प्रतिक्रिया आश्रमात शिरता-शिरताच प्रकट केली आहे, तीही खरी मानली, तर आश्रमात शेकडो माणसांची वर्दळ नाही, असा निष्कर्ष निघतो. तो मान्य केल्यास काश्यप (वरील व्याख्येनुसार) कुलपती की अ-कुलपती, ह्या प्रश्नाचे उत्तर द्यावयास हवे. शहरी माणसे सुखाच्या पाठीमागे धावणारी आहेत, ही जी स्वत:ची धारणा शारद्वताने बोलून दाखवली आहे, ['अभ्यक्तमिव स्नात:...' (१०८)] ती पटते. पण शाङ्गर्रवाचे वर्णन पटत नाही.

(९३) (तत: प्रविशन्ति गौतमीसहिता: शकुन्तलां पुरस्कृत्य मुनय: । पुरश्चैषां कञ्चुकी पुरोहितश्च । -१०८) अशी रंगसूचना आहे. वस्तुत: कण्वाश्रमातील व्यक्तींना राजासमोर घेऊन येताना सर्वांच्या पुढे कंचुकी व पुरोहित असतात, त्यांच्यामागे गौतमी, शकुंतला व इतर ऋषी असतात. म्हणून वरील रंगसूचना 'ततोऽग्रत: कञ्चुकीद्वितीय: पुरोहित: प्रविशति । तत्पश्चात् गौतमीसहिता: शकुन्तलां पुरस्कृत्य मुनय: ।' अशी असती म्हणजे ती व्यक्ति-क्रम व्यवस्थितपणे पाळणारी झाली असती.

(९४) ऋषय: -- कुतो धर्मक्रियाविघ्न: सतां रक्षितरि त्वयि ।
तमस्तपति घर्मांशौ कथमाविर्भविष्यति ।। (१११)

तू त्राता असताना सज्जनांच्या धार्मिक क्रियाविधींत विघ्न कुठले उपस्थित व्हायला/ विघ्न कोठून उत्पन्न होणार ? हा जो वरील श्लोकाचा आशय आहे तो नाटकात ८, १८, २०, २८, ४३, ४६, ५०, १०४, १०५, १०६, १०८ इतक्या पृष्ठांवर थोड्या शाब्दिक फेरफारांनी व्यक्त झाला आहे. ही अर्थाची पुनरुक्ती टाळावयास हवी होती.

(९५) शाङ्गर्रव:--त्वमर्हतां प्राग्रसर: स्मृतोऽसि न: । शकुन्तला मूर्तिमती च सत्क्रिया ।
समानयंस्तुल्यगुणं वधूवरं । चिरस्य वाच्यं न गत: प्रजापति: ।। (१११)

अर्थात -- दुष्यंत व शकुंतला समान गुणी व म्हणून पूर्णपणे परस्परानुरूप आहेत. त्यांना एकत्र आणून ब्रह्मदेव दीर्घ काळानंतर निंदास्पद टीकेस पात्र ठरला नाही.

वस्तुत: दोन गुणिजनांना एकत्र आणणे हे करणात्मक (positive) कार्य आहे, आणि निंदेस पात्र न ठरणे हे अकरणात्मक (negative) कार्य आहे. कवीने 'बऱ्याच काळानंतर ब्रह्मदेवाने प्रशंसनीय कार्य केले आहे' अशा अर्थाचा (चिरस्य स्तुत्यं अकरोत् प्रजापति:) शेवटचा चरण रचला असता तर एकूण रचनेत समानता उत्पन्न झाली असती.

(९६) गौतमी -- आर्य, किमपि वक्तुकामास्मि । न मे वचनावसरोऽस्ति । कथमिति । (११२)

अर्थात -- महाराज, मी काही बोलू इच्छिते. मला बोलण्यास वाव नाही. असे का विचाराल तर -

आता जर गौतमीला बोलण्यास अवसर नसेल तर तिने बोलण्याची इच्छाच का

बाळगावी ? तिच्या वरील दोन गद्य वाक्यांमध्ये 'खरे म्हणजे' किंवा 'जरी' या अर्थाचे (क्रमशः 'वस्तुत:' किंवा 'यद्यपि') संयोजक वापरावयास हवे होते. म्हणजे तर्कसंगती सांभाळली गेली असती व वरीलसारखा आक्षेपार्ह प्रश्न उपस्थितच झाला नसता.

(९७) शकुन्तला-- (आत्मगतम्) किं नु खल्वार्यपुत्रो भणति।

राजा -- किमिदमुपन्यस्तम्। (११२)

उपन्यस्तम् शब्दाचा अर्थ 'माझ्यासमोर ठेवले/आणले गेले आहे', असा आहे. त्याऐवजी 'हे काय माझ्या वाट्याला/नशिबी आले आहे', हा आशय व्यक्त करणारे 'किमिदं उपस्थितम्' असे वाक्य अधिक चांगले झाले असते. (उप+स्था To fall to one's share)

(९८) शकुन्तला-- हृदय, सांप्रतं ते आशङ्का। (११३)

सांप्रतं हे अव्यय आहे, त्याचा अर्थ योग्यपणे, आता, ह्या घटकेस, असा आहे. तर 'सांप्रत' हे विशेषण असून त्याचा अर्थ योग्य, अचूक, प्रस्तुत, बरोबर असा आहे. शकुंतलेला हा विशेषणवाचक अर्थच अभिप्रेत आहे. म्हणून 'हृदय, सांप्रता (=उचिता, प्रस्तुता इ.) ते आशङ्का' असे वाक्य अन्वर्थक ठरले असते.

(९९) शारद्वत:-- .... दीयतामस्मै प्रत्ययप्रतिवचनम्। (११५)

संस्कृतात कर्मणि-प्रयोगांचे प्राचुर्य असले तरी येथे प्रत्यक्ष (direct) वाक्यरचनाच नितान्त आवश्यक आहे. कारण प्रसंग गंभीर व निकराचा आहे. त्यामुळे 'तद् देहि अस्मै प्रत्ययप्रतिवचनम्।' (अर्थात - तेव्हा ह्याची खात्री पटेल असे उत्तर दे) अशी सरळ वाक्यरचना प्रसंगोचित ठरली असती.

(१००) शकुन्तला-- अत्र तावद् विधिना दर्शितं प्रभुत्वम्। (११७)

हेच वाक्य 'अत्र निर्दयेन विधिना दर्शितं प्रभुत्वम्।' असे किंवा 'अत्र अन्ते/अन्ततः विधिना दर्शितं प्रभुत्वम्।' असे लिहिले गेले असते तर त्यायोगे शकुंतलेची असहायता शिगोशीग व्यक्त झाली असती व ती हृदयस्पर्शी ठरली असती.

(१०१) शारद्वत:-- तदेषा भवत: पत्नी त्यज वैनां गृहाण वा। (१२१)

हे वाक्य 'तदेषा तव पत्नी त्यज वैनां गृहाण वा।' असे लिहिले गेले असते तर सर्वनाम व क्रियापद यांची रूपे अन्योन्यानुरूप होऊन शारद्वताकडून राजाचा (अपेक्षित) अधिक्षेपही झाला असता. अशा स्थितीत होणाऱ्या वृत्तभंगाचा परिहार कसा करावयाचा त्याचा विचार कवीने करावयाचा ! पण मूळ वाक्यातील भवत: आणि त्यज-गृहाण ही रूपे एकमेकांना अनुरूप नाहीत. म्हणूनच या वाक्याचे पुनर्लेखन आवश्यक आहे.

(१०२) शार्ङ्गरव:--शकुन्तले, यदि यथा ... (इत्यादी श्लोक) व त्यानंतर 'तिष्ठ। साधयामो वयम्।' (१२२)

यातील 'तिष्ठ' शब्दापूर्वी 'उच्चैः' अशी रंगसूचना कंसात दिली असती की ती 'स्थिता

तिष्ठेत्युच्चैर्वदति गुरुशिष्ये गुरुसमे।' (१४४) या राजोक्तीतील उल्लेखाशी सुसंगत ठरली असती. ह्या राजोक्तीचा अर्थ, वडिलांसमान असलेल्या गुरुशिष्याने 'थांब' असे ओरडून सांगितले असता ती उभी राहिली, असा आहे.

(१०३) पुरोहित: -- ... त्वं साधुभिरादिष्टपूर्व: । प्रथममेव चक्रवर्तिनं पुत्रं जनयिष्यसीति । (१२३)

अर्थात -- तुला जे पहिले अपत्य होईल तो चक्रवर्ती पुत्र असेल असा आशीर्वाद साधूंनी तुला पूर्वी दिला आहे.

दुष्यंताला पूर्वी वैखानस व इतर ऋषी (७) यांनी आणि शकुंतलेला द्वितीया तापसी (८४), व काश्यप (८८, ९७ व ९८) यांनी जे आशीर्वाद दिले आहेत त्यांपैकी कोणत्याही आशीर्वादात 'पहिले अपत्य चक्रवर्ती पुत्र होईल', असा निर्देश नाही. म्हणून पुरोहिताचे वरील विधान पूर्वसंदर्भरहित आहे.

(१०४) शकुन्तला-- भगवति वसुधे, देहि मे विवरम् । (रुदती प्रस्थिता । निष्क्रान्ता सह पुरोधसा तपस्विभिश्च ।) (१२४)

येथील रंगसूचना 'रुदती राजानं सकरुणं दृष्ट्वा निष्क्रान्ता सह पुरोधसा तपस्विभिश्च ।' अशी असती तर पुढे राजा ह्या प्रसंगाचे विदूषकापाशी वर्णन करताना 'इत: प्रत्यादेशात् ...' इत्यादी श्लोकात (१४४) 'पुनर्दृष्टिं बाष्पप्रसरकलुषां अर्पितवती' असा जो चरण म्हणतो, त्याच्याशी पूर्णपणे जुळली असती. रंगसूचनेत केवळ दोन शब्द वाढवले असते की, मूळ प्रसंगाला एकदम उठाव लाभला असता.

(१०५) प्रथम: -- किं शोभनो ब्राह्मण इति कृत्वा राज्ञा प्रतिग्रहो दत्त: । (१२६)
अर्थात -- मग काय मोठा सत्पात्र ब्राह्मण असे मानून राजाने तुला ही आंगठी भेटीदाखल दिली ?

'कृ' धातू कोणत्याही अर्थी वापरता येत असतो हे जरी व्याकरणदृष्ट्या मान्य असले तरी विवक्षित अर्थ व्यक्त करण्यासाठी तद्वाचक धातूचा उपयोग करणेच केव्हाही इष्ट होय. म्हणून येथे 'कृत्वा' ऐवजी 'मत्वा' हेच रूप योग्य ठरले असते.

(१०६) सहाव्या अंकाच्या सुरुवातीपासून श्याल, जानुक व सूचक ही तिन्ही पात्रे पुरुषाला (म्हणजे मच्छीमाराला) उद्देशून कुंभीरक, पुरुष, धीवर, पाटच्चर, विस्रगन्धी, गोधादी, मत्स्यबंध, ग्रंथिभेदक, जालोपजीवी ही विशेषणे व संबोधने वापरतात. पण पुढे जानुक त्या पुरुषाला एकाएकी मात्स्यिकभर्ता (१३१) म्हणजे मच्छीमारांचा मुख्य असे संबोधतो. संबोधनातील हे आकस्मिक परिवर्तन खटकते.

(१०७) श्याल: -- विशुध्द इदानीमाजीव: । (१२७)

मच्छीमार खुलासा करतो की 'मी मासे मारून ते विकतो आणि अशा प्रकारे आपल्या

कुटुंबाचे भरणपोषण करतो' (१२७). त्यावरील श्यालाची टिप्पणी वर उद्‌धृत केली आहे. वस्तुतः श्यालाच्या बोलण्यात उपरोध आहे. तो 'अहो कीदृशो विशुध्द आजीवः' असा शब्दबंध असता तर स्पष्टपणे प्रतीत झाला असता.

(१०८) श्यालः -- अङ्गुलीयकदर्शनमस्य विमर्शयितव्यम् । (१२८)

अर्थात -- ह्याला झालेल्या आंगठीच्या दर्शनाविषयी/ज्ञानाविषयी विचारविमर्श करावयास हवा.

विचारविमर्शाचा खरा प्रश्न दर्शनाचा किंवा ज्ञानाचा नसून मिळण्याचा किंवा उपलब्धीचा आहे. दोघा रक्षकांनी सुरुवातीला 'अरे कुम्भीरक, कथय कुत्र त्वया एतद् .... राजकीयं अङ्गुलीयकं समासादितम् ।' (१२६) असाच प्रश्न मच्छीमाराला विचारला आहे. तो ध्यानात घेता श्यालाच्या वरील विधानात 'दर्शनं' शब्दाऐवजी 'समासादनं' किंवा 'प्रापणं' असा शब्दप्रयोग आवश्यक आहे.

(१०९) श्याल वर (१०८) मध्ये उद्‌धृत केलेल्या वाक्यानंतर 'राजकुलमेव गच्छामः ।'(१२८) असा निर्णय घेतो. तो ऐकून दोघे रक्षक 'तथा। गच्छ अरे ग्रन्थिभेदक।' (तत्रैव), असा त्याला दुजोरा देतात. पण कवीने त्यांच्या तोंडी 'तथा'-ऐवजी 'तथैव कुर्मः' किंवा 'सांप्रतः/उचितः निर्णयः आवुत्तस्य।' असे वाक्य घालणे योग्य ठरले असते.

(११०) श्यालः -- सूचक, इमं पुरद्वारेऽप्रमत्तौ प्रतिपालयतं यावदिदमङ्गुलीयकं यथागमनं भर्त्रे निवेद्य ततः शासनं प्रतीष्य निष्क्रामामि । (१२८)

येथे राजाला आंगठीचा वृत्तांत सांगणे आणि राजाचा आदेश घेऊन येणे अशी दोन कर्तव्ये श्यालाला बजावावयाची आहेत. त्या दृष्टीने वरील वाक्यातील 'ततः' नंतर 'च' आवश्यक आहे. कारण एका कर्तव्यानंतर दुसरे कर्तव्य असे ह्या दोहोंत पृथक्त्व आहे.

(१११) 'एकस्मिन् दिवसे-पासून भावमिश्रैः ।' पर्यंतच्या तीन वाक्यात आपण रोहित मासा कापल्यावर त्यात आपल्याला रत्नजडित आंगठी कशी दिसली व ती विकण्याच्या प्रयत्नात असताना आपण कसे पकडले गेलो, ते श्यालाला सांगून पुरुष पुढे म्हणतो : 'मारयत वा मुञ्चत वा। अयमस्यागमवृत्तान्तः ।' (१२८). या दोन वाक्यांचा क्रमविपर्यय करणे आवश्यक आहे. कारण आपण कसे पकडले गेलो ह्या खुलाशाचा पुढचा भाग 'अयं अस्य आगमवृत्तान्तः ।' हा आहे. ह्याबरोबर आंगठीच्या उपलब्धीची सर्व हकीगत सांगून संपली. त्यानंतर तो रक्षकांना उद्देशून (ही सगळी हकीगत ऐकून आता तुम्हाला----) माझे जे काही बरेवाईट करावयाचे असेल ते करा, असे म्हणाला असता तर ते तार्किक क्रमाला धरून ठरले असते.

(११२) प्रसंग मच्छीमाराच्या धरपकडीचाच आहे. श्याल राजाचे आदेशपत्र घेऊन येतो तेव्हा-

द्वितीयः -- (विलोक्य) एष नौ स्वामी पत्रहस्तो राजशासनं प्रतीष्य इतोमुखो दृश्यते । (१२९)

अर्थात -- हे आपले वरिष्ठ हातात आज्ञापत्र घेऊन, राजाचा आदेश घेऊन, इकडेच तोंड करून येत आहेत.

वस्तुत: (राजाने लेखी आदेश दिलेला असून ते आदेशपत्र हातात धरून श्याल येत आहे) श्याल राजाचे आदेशपत्र हातातच घेऊन येणार हे उघड आहे. त्यामुळे 'पत्रहस्तो' हा एकच शब्द पुरेसा आहे. वरील काहीशी गुंतागुंतीची रचना 'एष नौ स्वामी पत्रगतं राजशासनं प्रतीष्य इतोमुखो दृश्यते।' अशा सरळ वाक्याने टाळता आली असती. शिवाय वाक्य सुबोध झाले असते.

(११३) प्रथम: -- जानुक, चिरायते खल्वावुत्त:।

द्वितीय: -- नन्ववसरोपसर्पणीया राजान:। (१२९)

हीच वाक्ये प्रश्नोत्तररूपाने खालीलप्रमाणे लिहिली गेली असती तर अधिक स्वाभाविक वाटली असती.

प्रथम: -- जानुक, किमर्थं/किंनिमित्तं चिरायते आवुत्त:।

द्वितीय: -- अयि/अये, अवसरोपसर्पणीया राजान:।

ह्या पध्दतीने 'खलु' व 'ननु' टाळता आले असते व सूचकाचा प्रश्न व त्याला जानुकाचे उत्तर असे संवादात्मक स्वरूप लाभले असते.

(११४) सूचक: -- एष नामानुग्रहो यच्छूलादवतार्य हस्तिस्कन्धे प्रतिष्ठापित:। (१३०)

मच्छीमारापाशी आंगठी कशी आली हे कळल्यावर राजाचा मोह दूर होतो व तो मच्छीमाराला बक्षीसही देतो. ते सर्व पाहून सूचक उद्गारतो : 'ह्याला म्हणावे कृपाप्रसाद ! फासाच्या सुळावरून उतरवून हत्तीच्या खांद्यावर (सन्मानाने) बसवले'. खरे पाहता 'हत्तीच्या पाठीवर बसवून बहुमान केला (हस्तिपृष्ठे प्रतिष्ठापित:।)' असे वाक्य हवे होते.

(११५) श्याल: -- । उपपन्न: खल्वङ्गुलीयकस्यागम:। (१३०)

मच्छीमाराने स्वत:ला आंगठी कशी मिळाली त्याचा जो वृत्तांत सांगितला आहे तो युक्तियुक्त किंवा तर्कसंगत आहे. त्याचा औचित्याशी, अनुरूपतेशी किंवा चूक-बरोबरपणाशी संबंध नाही. त्यामुळे वरील वाक्यातील 'उपपन्न:' शब्दाऐवजी प्रत्यायक: (=खात्रीशीर, आश्वासक) किंवा विश्वसनीय: (=विश्वास ठेवण्यालायक) असा शब्द अपेक्षित आहे.

(११६) श्याल: -- सूचक, मुच्यतामेष जालोपजीवी। ... (१३०)

सूचक: -- यथावुत्तो भणति।

द्वितीय: -- एष यमसदनं प्रविश्य प्रतिनिवृत्त:। (पुरुषं परिमुक्तबन्धनं करोति।) (१३०)

ह्या मच्छीमाराला सोडून द्यावे असे जे श्याल सूचकाला सांगतो, तो राजाचा हुकूम आहे. त्याची प्रथमत: लगेच अंमलबजावणी व्हावयास हवी व ती सूचकाने करावयास हवी.

कारण श्यालाने त्याला राजाज्ञा ऐकवलेली असते. तदनंतर जानुकाची शेरेबाजी हवी. एकंदरीने सूचक व द्वितीय यांच्या उद्‌गारांचे (कृती व उक्ती यांचे) पुनर्लेखन असे व्हावयास हवे :

सूचकः -- यथा आवुत्तः आदिशति । (पुरुषं परिमुक्तबन्धनं करोति ।)

द्वितीयः -- एष यमसदनं प्रविश्य प्रतिनिवृत्तः ।

ही रचना क्रमबध्द व तर्कशुध्द झाली असती.

(११७) श्यालः -- मुहूर्तं प्रकृतिगम्भीरोऽपि पर्यश्रुनयन आसीत् । (१३१)

आंगठी पाहिल्यावर 'राजा क्षणभर स्वभावतः गंभीर असूनही त्याचे डोळे अश्रूंनी डबडबले,' ही प्रतिक्रिया श्याल वर्णन करीत आहे. यातील मुहूर्तं शब्द भलतीकडे ('अन्यथास्थित' - मागील ५.१ पाहा) पडला आहे. म्हणून हे वाक्य 'प्रकृतिगम्भीरोऽपि मुहूर्तं पर्यश्रुनयन आसीत् ।' असे पुन्हा लिहावयास हवे. ह्यायोगे संदिग्धता टळेल.

(११८) श्यालः -- ... तस्य दर्शनेन भर्तुरभिमतो जनः स्मारितः । (१३१)

ह्यापेक्षा 'तस्य दर्शनेन/दर्शनाद् भर्ता अभिमतं जनं सस्मार ।' असे सरळ वाक्य सुबोध/(प्रेक्षकांच्या दृष्टीने) सुगम, झाले असते.

(११९) राजाने वसंतोत्सवाला मनाई केलेली आहे हे ठाऊक नसल्यामुळे मधुकरिका नावाची उद्यानपालिका आंब्याचा मोहोर तोडते, व 'तू कामदेवाचा सर्वश्रेष्ठ बाण हो', असे त्याला विनवते व जमिनीवर टाकून देते. ते पाहून खवळलेला कंचुकी पडदा वर उडवून प्रवेश करतो आणि मधुकरिकेला म्हणतो :

कञ्चुकी -- मा तावत् । अनात्मज्ञे, देवेन प्रतिषिध्दे वसन्तोत्सवे त्वमाम्रकलिकाभङ्गं किमारभसे । (१३५)

कंचुकी रागावलेला आहे आणि मधुकरिकेने आम्रमंजरी तोडून ती जमिनीवर टाकून दिलेली आहे, हे त्याने पाहिले आहे. ह्या दोन गोष्टी ध्यानात घेता त्याचे वरील वाक्य 'अनात्मज्ञे, देवेन प्रतिषिध्दे वसन्तोत्सवे त्वं आम्रकलिकां छित्त्वा/भक्त्वा किं क्षिपसि ।' असे असते तर संक्षिप्त पण पूर्णार्थक झाले असते.

(१२०) राजाने वसंतोत्सवावर बंदी घातली आहे. निसर्गही राजाला सहयोग देत आहे. त्याचे वर्णन करण्याच्या ओघात कंचुकी म्हणतो : 'शङ्के संहरति स्मरोऽपि चकितस्तूणार्धकृष्टं शरम् ।' (१३५-३६), अर्थात - 'कामदेवही अर्धे ताणलेले धनुष्य कदाचित तसेच धरून ठेवून बाण सोडणार नाही.' निसर्गावर राजाचा प्रभाव पडला आहे ही कंचुकीची कल्पना आहे, ती वस्तुस्थिती नाही. म्हणूनच तो कामदेवाच्या वरील वर्णनात 'चकितः' हे विशेषण साभिप्राय वापरतो. तो अभिप्राय लक्षात न घेता सानुमती म्हणते :

सानुमती -- नास्ति संदेहः । महाप्रभावो राजर्षिः । (१३६)

खरे म्हणजे निसर्गावरील राजप्रभावाचे हे वर्णन अद्‌भुत भाव व्यक्त करणारे म्हणजेच

विस्मयकारक आहे. त्याला तसाच प्रतिसाद देताना सानुमतीने 'नास्ति विस्मयः । महाप्रभावो राजर्षिः ।' असे आश्चर्योद्गार काढावयास हवे आहेत.

(१२१) उभे -- ... । यद्यनेन जनेन श्रोतव्यं कथयत्वार्यः किंनिमित्तं भर्त्रा वसन्तोत्सवः प्रतिषिध्दः । (१३६)

सानुमती -- उत्सवप्रियाः खलु मनुष्याः । गुरुणा कारणेन भवितव्यम् । (१३७)

येथे सानुमतीने त्या दोघींचाच निमित्त शब्द उचलून धरून वापरावयास हवा होता, म्हणजे मग वाक्य 'गुरुणा निमित्तेन भवितव्यम् ।', असे होऊन त्या निमित्ताच्या गुरुत्वाविषयी तिचीही खात्री पटल्याचे जाणवले असते. संभाषणात ऐकणारा बोलणाऱ्याचा शब्द पुन्हा उच्चारतो हे पूर्वी [२.८.१०] मध्ये म्हटलेच आहे.

(१२२) उभे -- युज्यते । (१३८)

परभृतिका व मधुकरीका यांना राजाने वसंतोत्सवावर कोणत्या कारणाखातर बंदी घातली आहे, हे जाणून घेण्याचे कुतूहल आहे. ते कारण योग्य की अयोग्य, बरोबर की चूक याच्याशी त्यांना कर्तव्य नाही; त्याबद्दल त्यांना निवाडाही करावयाचा नाही. तेव्हा कंचुकीने राजाच्या शारीरिक व मानसिक स्थितीचे विस्तृत स्पष्टीकरण केलेले ऐकल्यावर 'आता कळले राजाने वसंतोत्सवावर का बंदी घातली ते', अशा आशयाचे 'इदानीं विदित्तनिमित्ते स्वः' किंवा 'इदानीं गृहीतार्थे स्वः', असे वाक्य हवे आहे.

(१२३) राजा -- (ध्यानमन्दं परिक्रम्य)

प्रथमं सारङ्गाक्ष्या प्रियया प्रतिबोध्यमानमपि सुप्तम् । ... (१३९)

येथे 'सारंगाक्ष्या'-चे प्रयोजन काय ? हा चरणातील भरताडीचा शब्द वाटतो. ह्यापूर्वी ['..सदृशेक्षणवल्लभाभिः .. हरिणाङ्गनाभिः ।' (२३)] शकुंतलेचे हे गुणवैशिष्ट्य वर्णिलेले आहे.

(१२४) कञ्चुकी -- .... महाराज, प्रत्यवेक्षिताः प्रमदवनभूमयः । (१३९-४०)

....

राजा -- ... यत् प्रत्यवेक्षितं पौरकार्यमार्येण तत् पत्रमारोप्य दीयतामिति । (१४०)

'प्रत्यवेक्षित' शब्दाची पुनरुक्ती टाळण्यासाठी पुढीलप्रमाणे परिष्करण आवश्यक आहे :

कञ्चुकी -- ... महाराज, समीक्षिताः/समवेक्षिताः प्रमदवनभूमयः ।

राजा -- ... यत् परीक्षितं पौरकार्यं आर्येण तत् पत्रमारोप्य दीयतामिति ।

(१२५) राजा -- वयस्य, रन्ध्रोपनिपातिनोऽनर्था इति यदुच्यते तदव्यभिचारि वचः ।(१४०)

मुनिसुताप्रणयस्मृतिरोधिना । मम च मुक्तमिदं तमसा मनः ।
मनसिजेन सखे प्रहरिष्यता । धनुषि चूतशरश्च निवेशितः । (१४१)

राजा विदूषकाला म्हणजे मित्राला संबोधून हे बोलत आहे. त्यामुळे श्लोकाच्या तृतीय चरणातील 'सखे' संबोधन पुनरुक्तिपर/पादपूरणार्थक आहे. तसेच द्वितीय चरणात इदं व मनः

हे दोन्ही शब्द एकाच वेळी वापरण्याची गरज नाही. 'इदं' हे दर्शक सर्वनाम अनावश्यक आहे.

(१२६) विदूषक: -- तिष्ठ तावद् । अनेन दण्डकाष्ठेन कन्दर्पबाणं नाशयिष्यामि । (१४१)

'तावत्' अव्ययाचे संस्कृतातील सर्व अर्थ ध्यानात घेतले तरी त्याचे या वाक्यात प्रयोजन प्रतीत होत नाही. कवीने हेच वाक्य 'तिष्ठ रे धृष्ट ।' असे लिहिले असते तर निश्चितपणे अधिक ठसठशीत व प्रभावकारी ठरले असते आणि ते विदूषकाच्या तोंडी शोभूनही दिसले असते.

(१२७) राजा -- (सस्मितम्) ... सखे क्वोपविष्ट: प्रियाया: किंचिदनुकारिणीषु लतासु दृष्टिं विलोभयामि । (१४१)

विदूषक: -- नन्वासन्नपरिचारिका चतुरिका भवता संदिष्टा । माधवीमण्डपे इमां वेलामतिवाहयिष्ये ।...। (१४१)

राजा -- ईदृशं हृदयविनोदनस्थानम् । तत् तमेव मार्गमादेशय । (१४२)

राजाच्या तोंडी घातलेले 'ईदृशं' हे विशेषण रंगहीन असून प्रभावकारक नाही. त्याऐवजी 'अस्मात् प्रियतरं/रम्यतरं विनोदनस्थानम् क्व भवेत् । तत् तमेव मार्गं आदेशय' । अशी वाक्यरचना असती तर ती अधिक स्पष्टार्थक झाली असती, राजाच्या प्रसन्न मन:स्थितीशी जुळतीमिळती ठरली असती, राजाने मूळ प्रश्नात वापरलेल्या क्व व प्रिय ह्या दोन्ही शब्दांच्या समर्पक पुन:प्रयोगाने युक्त झाली असती आणि 'तर मग (अशा प्रियतर स्थानाप्रत) जाण्याचा मार्ग दाखव', हे राजाचे अंतिम वाक्यही तर्कसंगत व मनोभावानुरूप ठरले असते. अशा प्रकारे वरीलसारख्या किंचित परिष्करणाने अनेक रमणीय कार्ये साधली असती.

(१२८) राजा -- (ध्यात्वा) सखे, त्रायस्व माम् ।

विदूषक: -- भो:, किमेतत् । अनुपपन्नं खल्वीदृशं त्वयि । (१४३)

वस्तुत: राजाने असे (आपल्या दर्जाला न साजेसे) आचरण करू नये, हा विदूषकाचा अभिप्राय आहे. त्या दृष्टीने 'अनुपपन्नं ईदृशं वृत्तं त्वयि ।' असे प्रस्तुत वाक्याचे पुनर्लेखन करणे आवश्यक आहे. 'खलु'-ची अपेक्षाच नाही. (खलु, तावत् इत्यादी अनेक शब्दांवरील कालिदासाच्या 'भक्ती'-विषयी पुढे यथास्थान खुलासा करूच.)

(१२९) विदूषक वरील वाक्यद्वयानंतर 'कदापि सत्पुरुषा: शोकपात्रात्मनो न भवन्ति । प्रवातेऽपि निष्कम्पा गिरय:' (१४३) अशी आपल्या भूमिकेच्या समर्थनार्थ आणखी दोन वाक्ये उच्चारतो. विदूषकाला अगदी मनोमन असे म्हणावयाचे आहे की, 'झंझावातातही पर्वत न डगमगता स्थिर राहात।त, त्याप्रमाणेच हे राजा, तूही शोकाधीन न होता ठामपणे उभा राहा'. त्या दृष्टीने विचार करता जसे 'कदापि...' इत्यादी वाक्याच्या अखेरीस 'भवन्ति' हे क्रियापद आहे, तद्वत 'प्रवातेऽपि...' वाक्याच्या शेवटीही 'तिष्ठन्ति' क्रियापद असणे आवश्यक आहे. ते वाक्यदेखील 'प्रवातेऽपि गिरय: निष्कम्पास्तिष्ठन्ति ।' असे असते तर अधिक ठाशीव झाले असते.

(१३०) आंगठी पाहिल्यानंतर राजा व विदूषक ह्यांच्या दरम्यान होणाऱ्या संवादाचा गोषवारा असा आहे : राजाने शकुंतलेबद्दलचे आपले प्रेम विदूषकाला सांगितलेले असते. पण विदूषकाला आपला प्रतिनिधी म्हणून राजधानीकडे सैन्यासह परत धाडून देताना, शकुंतलेवरील आपले खरे प्रेम वगैरे नाही, ती सर्व थट्टा आहे असे समज, असेही सांगितलेले असते. मठ्ठ बुद्धीचा विदूषक ते खरे मानून चालतो व मग काहीशा हताशपणे उद्गारतो की, 'होणारे कोणालाही टाळता येत नाही, हेच शेवटी खरे.' हे सारे संभाषण सानुमती वेलीआड लपून ऐकत असते. ती आपले मत पुढील शब्दांत व्यक्त करते : 'एवं नु इदम्।' (१४३), अर्थात-असे आहे तर. वास्तविकपणे तिच्या ठायी ध्यानधारणेच्या साहाय्याने सगळे काही जाणून घेण्याची शक्ती आहे. [पाहा-अस्ति मे विभवः प्रणिधानेन सर्वं परिज्ञातुम्। (१३३)]. अशा सामर्थ्यशालिनी सानुमतीने 'उपपन्नं नु भणितं विदूषकेण' किंवा 'युक्तियुक्तं आह विदूषकः' असे निरीक्षण नोंदवणे स्वागतार्ह ठरले असते.

(१३१) वरील (१२९) नोंदीतील 'सत्पुरुषाः' शब्दाचाही अमळ परामर्श घेणे आवश्यक आहे. खोलवर विचार केला की असे जाणवते की, विदूषकाला 'सत्त्व' अभिप्रेत नाही, तर त्याला 'महत्त्व' अभिप्रेत आहे. म्हणून तर तो सत्पुरुषांची पर्वतांशी तुलना करीत आहे. त्याचा हा अन्तःस्थ आशय ध्यानात घेता 'सत्पुरुषाः'-च्या जागी 'वशिनः/संयमिनः/महानुभावाः' असा शब्द योजणे अधिक अर्थवाहक ठरेल. त्यांतल्या त्यातही महानुभावाः हा शब्द अतिशय चपखल ठरला असता.

(१३२) राजा -- ...। मेनका किल सख्यास्ते जन्मप्रतिष्ठेति श्रुतवानस्मि।
तत्सहचारिणीभिः सखी ते हृतेति मे हृदयमाशङ्कते। (१४४)

ह्या दोन वाक्यांविषयी बराच विचार करावयास हवा. प्रथमतः किल शब्द विचारात घेऊ. नाटकाच्या पहिल्याच अंकात अनसूया शकुंतलेची जन्मकहाणी राजाला ऐकवताना विश्वामित्र मेनकेचे रूप पाहून तिच्यावर भाळले एवढे बोलून लाजून पुढे आणखी काही बोलत नाही. तेव्हा राजा म्हणतो: 'परस्ताज्ज्ञायत एव। सर्वथा अप्सरःसम्भवैषा।' (२२). त्याच्यावर अनसूया 'अथ किम्' म्हणून शिक्कामोर्तब करते. म्हणजेच शकुंतला ही मेनकेची मुलगी आहे हे राजाला ठामपणे ठाऊक झालेले आहे. अशा स्थितीत 'किल' (=खरोखर, निश्चितपणे, असे म्हणतात) ह्या अव्ययाची गरज नाही; किंबहुना त्याला स्थानच नाही. राजाच्या वरील लागोपाठच्या दोन वाक्यांत 'सख्यास्ते' व 'सखी' अशी जी पुनरुक्ती झालेली आहे तीही असुखावह आहे. राजाच्या तोंडचे दुसरे वाक्य कवीने 'तत्सहचारिणीभिः मत्प्रिया हृतेति मे हृदयं आशङ्कते।' असे लिहिले असते तर शकुंतलेला धिक्कारल्याबद्दलचा पश्चात्ताप, तिच्यावरील उत्कट प्रेम, आणि तिला मेनकेच्या मैत्रिणींनी उचलून नेल्यामुळे झालेल्या (कायमच्या) वियोगाबद्दलची हळहळ, ह्या राजाच्या सर्व भावना प्रभावीपणाने व्यक्त झाल्या असत्या. शिवाय उपरिवर्णित अप्रिय पुनरुक्तीही टळली असती.

(१३३) आपण शकुंतलेला निष्कारण झिडकारून तिला व तिच्या आप्तजनांना दु:खी केले आणि तिच्याशी आपण अतिशय क्रूरपणे वागलो ह्याची जाणीव झाल्यावर राजाला कमालीचा पश्चात्ताप होतो व स्वत:चे आचरण त्याला विषदिग्ध बाणासारखे वाटू लागते. त्याचे हे पश्चात्तापाचे उद्‌गार ऐकून सानुमती म्हणते -

सानुमती -- अहो ईदृशी स्वकार्यपरता । अस्य संतापेनाहं रमे । (१४४)

राजाच्या अनुतापयुक्त उद्‌गारांत स्वकार्यपरता नाही, तर स्वत:च्या तीव्र दु:खाची उत्कट अभिव्यक्ती आहे. ती लक्षात घेता कवीने सानुमतीच्या मुखी 'अहो ईदृशो स्वकार्यसन्ताप:' (म्हणजे स्वत:च्या कृतीबद्दलचे आत्यंतिक दु:ख) असे शब्द योजावयास हवे होते. म्हणजे ते समर्पक ठरून शिवाय 'अस्य संतापेनाहं रमे' ह्या सानुमतीच्या उद्‌गारांशी पूर्णपणे एकजीव होऊन गेले असते.

(१३४) सानुमती -- संमोह: खलु विस्मयनीयो, न प्रतिबोध: । (१४४)

सानुमतीच्या ठिकाणच्या प्रणिधानाच्या सामर्थ्याचा उल्लेख मागील (१३०) मध्ये येऊन गेलाच आहे. तो ध्यानात घेता राजाच्या संमोहाबद्दल तिला विस्मय वाटण्याचे काहीच कारण नाही. राजाला झालेला प्रतिबोध (म्हणजेच भान) ही तर तिच्या समोरचीच घटना आहे. (राजाने आंगठी पाहिल्यावर त्याला पूर्वीच्या सर्व गोष्टी आठवल्या व शकुंतलाधिक्काराबद्दल पश्चात्ताप झाला, हे सगळे तिने अदृश्य रूपात स्वत: ऐकलेले व पाहिलेले आहे.) त्यामुळे त्याविषयी तिला विस्मय न वाटणे हेच स्वाभाविक आहे.

(१३५) विदूषक: -- यदि एवमस्ति खलु समागम: कालेन तत्रभवत्या । (१४४)

वरील (१३४) मध्ये 'खलु' आला आहे. तो वगळून 'यदि एवमस्ति समागम: कालेन तत्रभवत्या ध्रुवं भविष्यति।' असे पुनर्लिखित वाक्य अधिक निश्चितार्थवाचक व आश्वासक ठरले असते.

(१३६) सानुमती -- ममापि कौतूहलेनाकारित एष: ।(१४६)

खरे म्हणजे, 'मला वाटणारे कुतूहल ह्यालाही वाटते', असे सानुमतीला म्हणावयाचे आहे. ते तिचे मनोगत 'मम कौतूहलेन एषोऽपि आकारित: ।' अशा शब्दानुक्रमाने अविकृतपणे व व्यवस्थितपणे व्यक्त झाले असते. संस्कृत वाक्यातील प्रत्येक शब्द प्रत्यययुक्त असल्यामुळे त्याला नियत स्थान नसते हे जरी व्याकरणदृष्ट्या खरे असले तरी नाटकातील संवाद हे प्रेक्षागृहातील प्रेक्षकांनी तेथल्या तेथे बसून लगेच ऐकून समजून घ्यावयाचे असतात. असे ऐकणे हे एकदाच संभवते (म्हणजे नटाला मध्येच थांबवून 'ह्या संवादाचा यथावत आशय आम्हांला पूर्णपणे समजलेला नाही, सबब हा संवाद पुन्हा म्हण', असे सांगण्याची मुभा प्रेक्षकांना नसते. कथा-कादंबरीच्या वाचकाला न कळलेला भाग, पुस्तकाची पाने मागेपुढे उलटून, पुन्हा वाचून समजून घेण्याची सोय असते.). म्हणून नाटकातील संवादात सुविशदतेची आवश्यकता व अपेक्षा असते.

(१३७) विदूषक: -- कथं धीवरकल्पितस्य रोहितमत्स्यस्योदराभ्यन्तरे आसीत् ।
राजा -- शचीतीर्थं वन्दमानाया: सख्यास्ते हस्ताद् गङ्गास्रोतसि परिभ्रष्टम् ।
विदूषक: -- युज्यते । (१४७)

युज्यते म्हणजे बरोबर आहे. गंगाप्रवाहात आंगठी पडली हे बरोबर आहे असे विदूषकाला म्हणावयाचे आहे काय ? आंगठीचे तसे प्रवाहात पडणे हे बरोबर की चूक हे ठरवणारा विदूषक कोण ? आणि असा प्रश्न त्याला कोणी विचारला आहे ? वास्तविकपणे 'ती माशाच्या पोटात कशी गेली ही जी माझी जिज्ञासा होती ती शमली किंवा तिचे उत्तर मला मिळाले', असे विदूषकाला म्हणावयाचे आहे. त्या दृष्टीने 'युज्यते' ऐवजी 'अवगतार्थोऽस्मि ।' अधिक समर्पक ठरले असते.

(१३८) आंगठी पाहिल्यावर राजाला शकुंतलेची तीव्रतेने आठवण होते व तो कमालीचा शोकाकुल होऊन 'कथं नु तं ... ।' (१४८) इत्यादी शब्दांत त्या अचेतन आंगठीची निर्भर्त्सना करतो. पण लगेच तो भानावर येतो आणि म्हणतो : ती बिचारी अचेतन आंगठी. तिला माझ्या प्रियेचे गुण कुठले कळायला ? मी एवढा सचेतन असूनही आपल्या प्रियेचा धिक्कार का केला ? ह्या शब्दांत तो स्वत:चीच निखंदना करतो. म्हणजेच त्याचे हे बोलणे पूर्णपणे शुध्दीवर असलेल्या विवेकी पण दु:खी मनुष्याचे बोलणे आहे. ते ऐकून विदूषकाने वस्तुत: राजाविषयी (आपल्या प्रिय मित्राविषयी) 'अत्रभवान् अतिमात्रं पर्याकुल इव लक्ष्यते ।' असे काहीतरी सहानुभूतीचे उद्गार काढावयास हवे होते. त्याऐवजी तो : '(आत्मगतम्) कथं बुभुक्षया खादितव्योऽस्मि ।' (१४८) असे पूर्णतया असंबध्द व प्रस्तुत करुणगंभीर प्रसंगाचा विचका करणारे उद्गार काढतो. विदूषकाच्या तोंडी हे उद्गार घालण्यात कवीने कमालीचे अनौचित्यच प्रदर्शित केले आहे.

(१३९) विदूषक: -- भो: इदानीं तिस्रस् तत्रभवत्यो दृश्यन्ते । सर्वाश्च दर्शनीया: । कतमात्र तत्रभवती शकुन्तला । (१४९)

राजाने शकुंतला, अनसूया व प्रियंवदा या तिघींचे चित्र रेखाटलेले आहे. ते ज्या फलकावर काढलेले आहे तो फलक राजासमोर आहे. शेजारी विदूषक बसलेला आहे. दोघेही त्या चित्राकडे निरखून पाहात आहेत. अशा स्थितीत 'इदानीं' शब्द निष्प्रयोजन व निरर्थक आहे. त्याऐवजी 'अत्र' किंवा 'अस्मिन् चित्रे' असा शब्दप्रयोग करणे अधिक योग्य ठरले असते. मधले वाक्य राजाच्या 'मधुरमासां दर्शनम् ।' (१०) ह्या पूर्वोक्तीशी सुसंगतच आहे. तिसऱ्या वाक्यात 'कतमात्र' ऐवजी 'कतमा एतासु' एवढाच बदल केला की, तो 'ह्या तिघींपैकी शकुंतला कोणती ?' ह्या विदूषकाच्या जिज्ञासेचा आविष्कारक ठरेल.

(१४०) विदूषक: -- (निर्वर्ण्य) तर्कयामि यैषा शिथिल-केश-बन्धन-उद्वान्त-कुसुमेन केशान्तेन उद्भिन्न-स्वेद-बिन्दुना वदनेन विशेषतोऽपसृताभ्यां बाहुभ्यां अवसेक-स्निग्ध-तरुण-पल्लवस्य चूतपादपस्य पार्श्वे ईषत् परिश्रान्ता इव आलिखिता सा शकुन्तला । (१५०)

हे वाक्य गद्यकाव्याचा उत्कृष्ट नमुना आहे. वाक्यात उत्तम लय साधलेली आहे. सर्व विशेष्ये समुचित विशेषणांनी विनटलेली आहेत आणि वर्णनात चित्रमयता आहे, ह्यात वाद नाही. हे वाक्य कालिदासाच्या भाषाप्रभुत्वाचे प्रकर्षाने दर्शन घडवते, यातही शंका नाही. केशान्तेन, वदनेन, बाहुभ्यां व आलिखिता ह्या शब्दांपुढे स्वल्पविराम लिहिला की वाक्यार्थ सुगम होतो, हेही तितकेच खरे. एकंदरीने हे वाक्य 'वाचनीय' आहे, पण ते रंगमंचावरील नटाच्या दृष्टीने 'उच्चार-सुलभ' व प्रेक्षागृहातील प्रेक्षकांच्या दृष्टीने 'आकलन-आस्वादन-सुकर' आहे किंवा नाही, हे ठामपणे सांगता येणार नाही. नाटक हे प्राधान्याने पाहण्या-ऐकण्यासाठी लिहिलेले असते आणि ते नटांनी कायिक, आंगिक, सात्त्विक व वाचिक अभिनयांद्वारे प्रेक्षकांसमोर साकार/सजीव करावयाचे असते. त्या उद्दिष्टाच्या पूर्तीला अशी वाक्ये सहायक ठरण्याची शक्यता कमी वाटते.

(१४१) राजा -- साक्षात् प्रियामुपगतामपहाय पूर्वम् ।
चित्रार्पितां पुनरिमां बहु मन्यमान: ॥ (१५१)
अर्थात -- पूर्वी प्रत्यक्षात आली असता (मी) तिला दूर सारले, परंतु चित्रात रेखाटलेली असता तिचा बहुमान करीत आहे.

या श्लोकाच्या उत्तरार्धात पूर्वम्च्या विरुध्द अर्थाचा एतर्हि, संप्रति, इदानीं, अधुना, सांप्रतम् ह्यांपैकी एखादा ('आता' ह्या अर्थाचा) शब्द हवा आहे. 'पुनर्' शब्दाला स्थान नाही. त्याला 'स्थानभ्रष्ट' करणे आवश्यक आहे.

(१४२) राजा -- वयस्य, अन्यच्च। शकुन्तलाया: प्रसाधनमभिप्रेतमत्र विस्मृतमस्माभि: । (१५२)
अर्थात -- मित्रा, आणखी एक (तपशिलाची गोष्ट रेखाटावयाची आहे.) शकुंतलेचे प्रसाधन रेखाटणे योजले होते पण ते आमच्याकडून विस्मरणामुळे राहून गेले आहे.

राजा शकुंतलेच्या स्वरेखाटित चित्रातील 'न्यून' ते पुरते करण्याच्या म्हणजे उत्साहाच्या मन:स्थितीत असताना त्याच्या मुखातून निघणाऱ्या वाक्यात 'प्रेत' हा शब्द खटकतो. त्याच्या जागी अभीष्ट, अभिप्रार्थित किंवा परिकल्पित शब्द शोभून दिसला असता.

(१४३) राजाच्या वरील निवेदनावरील विदूषकाचा प्रश्न 'किमिव' । (१५२) असा आहे. त्याऐवजी कसे, कोणत्या प्रकारचे किंवा स्वरूपाचे ह्या अर्थाचा 'कीदृशम्' शब्द अधिक समर्पक ठरला असता. तो समर्पक ठरण्याचे दुसरे कारण असे आहे की, विदूषकाचा 'किमिव' हा प्रश्न ऐकून सानुमती वेलीआड लपून त्याला जे उत्तर [वनवासस्य सौकुमार्यस्य विनयस्य च यत् सदृशं भविष्यति । (१५२)] देते त्यातील 'सदृश' शब्दाशी तो पूर्णपणे जुळला असता.

(१४४) प्रतीहारी -- ... तद्देव: पत्रारूढं प्रत्यक्षीकरोत्विति । (१५८)

हेच वाक्य 'पत्रारूढं तद्देव: प्रत्यक्षीकरोतु इति ।' असे असते तर अधिक सरळ, सुबोध व अकृत्रिम झाले असते.

(१४५) सानुमती -- हा धिक् । हा धिक् । सति खलु दीपे व्यवधानदोषेणैषोऽन्धकारदोषं अनुभवति। (१६१)

या एकाच वाक्यात दोन 'दोष' जणू एकमेकांना खेटून उभे आहेत ! हेच वाक्य 'सति खलु दीपे व्यवधानकारणात् एषोऽन्धकारदोषं अनुभवति ।' असे सुधारून लिहिले की, दोहोंपैकी एक 'दोष' अन्तर्धान पावतो !

(१४६) राजा -- अहो दुष्यन्तस्य संशयमारूढाः पिण्डभाजः । (१६१)

हे वाक्य थोडे बुचकळ्यात टाकणारे आहे. त्याऐवजी 'दुष्यन्तस्य पिण्डभाजः संशयमारूढाः' (अर्थात-दुष्यंताचे पूर्वज संशयग्रस्त झाले आहेत)असे लिहिले गेले असते तर ते क्रमबध्द व असंदिग्ध झाले असते.

(१४७) सानुमती -- ... अथवा श्रुतं मया शकुन्तलां समाश्वासयन्त्या महेन्द्रजनन्या मुखाद् यज्ञभागोत्सुका देवा एव तथानुष्ठास्यन्ति यथाचिरेण धर्मपत्नीं भर्ताभिनन्दिष्यतीति। (१६१-६२)

या वाक्यात देवांना 'यज्ञभागोत्सुका' हे विशेषण लावून कोणते खास कार्य साधले आहे ? शकुंतलेशी पुनर्मिलन झाल्यामुळे व पुत्रमुखदर्शनाचे सुख लाभल्यामुळे दुष्यंत यज्ञ करील व त्यात आपल्याला आपला भाग मिळेल ह्यासाठी देव उत्सुक झाले होते काय ? तसे काही खरोखरच देवांच्या मनात असेल तर ते त्यांना कमीपणा आणणारे की त्यांचा गौरव करणारे ? सारासार विचार केला तर उपर्युक्त विशेषण हा वाक्यातील अनावश्यक किंवा अधिकचा शब्द आहे. तो वर्ज्य करणे इष्ट वाटते.

(१४८) राजा -- .... यो हनिष्यति वध्यं त्वां रक्ष्यं रक्षिष्यति द्विजम् ।
हंसा हि क्षीरमादत्ते तन्मिश्रा वर्जयत्यपः ॥ (१६५)

अर्थात -- जो (=माझा बाण) वधाला योग्य असलेल्या (प्राण्याचा वा मनुष्याचा) वध करील आणि रक्षण करण्यास योग्य असलेल्याचे रक्षण करील. हंस दुधाचे ग्रहण करतो आणि दुधात मिसळलेले पाणी वर्ज्य करतो.

आता हनन (म्हणजे मारणे) व रक्षण (म्हणजे वाचवणे) ह्या परस्परविरुद्ध क्रिया आहेत. हंसाच्या बाबतीत ग्रहण व वर्जन अशा कृतींचे (सांकेतिक किंवा कविसमयानुसारी) वर्णन आहे. ग्रहण (म्हणजे घेणे) आणि रक्षण यांची परस्परतुलना होऊ शकत नाही. तद्वत वर्जन (म्हणजे वगळणे) हे कधीही हननाच्या जवळपासही फिरकू शकणार नाही. एकंदरीने, परस्परांशी तुल्य नसलेल्या वस्तूंतील हे साम्य असंबध्द (incompatible) वाटते.

(१४९) मातलिः -- स भवानात्तशस्त्र एव इदानीं तमैन्द्ररथमारुह्य विजयाय प्रतिष्ठताम् । (१६६)

मातलीचा आशय असा आहे : तू वेळ न दवडता म्हणजे आताच हातात शस्त्र घेऊन विजययात्रेसाठी नीघ. म्हणजेच 'एव' अव्यय इदानीं-ला जोडून हवे. युध्दासाठी निघणारा

योध्दा हातात शस्त्र घेऊनच निघणार. तसे उन्मेखून सांगण्याची गरज नाही. म्हणूनच 'इदानीमेव' अशीच शब्दयोजना योग्य ठरते.

(१५०) मातली विदूषकाला बदडून काढतो. 'तू असे का वागलास ?' असे राजाने विचारल्यावर -

मातलि: -- तदपि कथ्यते। किंचिन्निमित्तादपि मन:संतापादायुष्मान् मया विक्लवो दृष्ट:। (१६६)

'तदपि-' मध्ये 'अपि' चे नेमके कार्य कोणते ? वस्तुत: 'मी तसे का वागलो ते आता सांगतो', असे मातलीला म्हणावयाचे आहे. ते लक्षात घेता 'तद् इदानीं कथयामि।' असे सरळ वाक्य चांगले ठरले असते. पुढच्या वाक्यातही 'अपि' निष्प्रयोजन आहे. 'किंचिन्निमित्तात्' एवढे पुरेसे आहे. म्हणजेच अपि शब्द अनावश्यक आहे.

(१५१) मातलि: -- विच्छित्तिशेषै: सुरसुन्दरीणां। वर्णैरमी कल्पलतांशुकेषु। (१७०)

अर्थात -- स्वर्गीय सुंदरींच्या शारीरिक प्रसाधनानंतर उरलेल्या रंगांनी (किंवा स्वर्गीय सुंदरींसाठी सुगंधिद्रव्ये बनवून झाल्यावर उरलेल्या रंगांनी) देव तुझे (म्हणजे दुष्यंताचे) गानयोग्य व अर्थपूर्ण चरित्र कल्पलतांनी पुरवलेल्या वस्त्रांवर लिहीत आहेत. हा संपूर्ण श्लोकाचा अर्थ आहे. वर चर्चेसाठी आवश्यक तेवढे दोनच चरण उद्धृत केले आहेत.

येथे विचारणीय प्रश्न असा की, देव उरलेल्या म्हणजे अवशिष्ट रंगांनी दुष्यंताचे चरित्र लिहीत आहेत, ह्या वर्णनात राजाची स्तुती आहे की त्याच्याविषयी अनादर दर्शवला आहे ? प्रसाधनानंतर उरलेला रंग जणू फुकट जावयास नको म्हणून देव त्याचा दुष्यंताच्या चरित्राच्या लेखनासाठी उपयोग करीत आहेत हा जो अर्थ ध्वनित होतो तो दुष्यंताची मानहानी करणारा वाटतो. देवांना दुष्यंताचे चरित्र खरोखरच तितके समुज्ज्वल व वर्णनीय वाटत असेल तर त्यांनी मुद्दाम रंग तयार करून चरित्र-लेखन करावयास हवे. एकंदरीने मातलिकृत वर्णनात अनौचित्य प्रतीत होते.

(१५२) राजा -- ...गतमुपरि घनानां वारिगर्भोदराणां।
पिशुनयति रथस्ते सीकरक्लिन्ननेमि:। (१७१)

यातील गर्भ व उदर हे दोन्ही शब्द एकाच अर्थाचे वाचक आहेत. कवीने 'वारिगर्भाणाम्' किंवा 'वारि-उदराणां' असा शब्दप्रयोग करावयास हवा होता. दोन एकार्थक शब्द वापरणे हे अतिलेखन आहे. उत्तम लेखन वेचक असणे अपेक्षित असते.

(१५३) राजा -- पर्णाभ्यन्तरलीनतां विजहति स्कन्धोदयात् पादपा:। (१७१)

येथे 'पर्णलीनतां' पर्याप्त आहे, 'अभ्यन्तर' शब्द अनावश्यक आहे.

(१५४) राजाला मारीचाचा आश्रम स्वर्गाहून अधिक आनंददायक वाटतो; तेथे त्याला

आपण अमृताच्या सरोवरात जणू डुंबत आहोत, असे भासते. तेथील ऋषींच्या तपोवनभूमीकडे विस्मयाने पाहून तो जो श्लोक गातो त्यातील प्रत्येक चरणात किंवा चरणार्धात अर्थपूर्तीसाठी जो शब्द पदरचा योजावा लागतो तो खाली उद्धृत केलेल्या संपूर्ण श्लोकात त्या-त्या ठिकाणी कंसात दर्शविला आहे :

प्राणानामनिलेन वृत्तिरुचिता सत्कल्पवृक्षे वने (सम्पाद्यते)
तोये काञ्चन-पद्म-रेणु-कपिशे धर्माभिषेकक्रिया (निषेव्यते)
ध्यानं रत्नशिलातलेषु (साध्यते), विबुधस्त्रीसंनिधौ संयमो (आचर्यते)
यत् काङ्क्षन्ति तपोभिरन्यमुनयस्तस्मिंस्तपस्यन्त्यमी ।। (१७४-७५)

ह्यावरून ह्या श्लोकाचे पहिले तिन्ही चरण अपूर्ण आहेत. ही स्थिती खचित श्लाघ्य नाही.

(१५५) राजा -- (कर्णं दत्वा) अये, प्रतिपाल्यावसरः खलु प्रस्तावः । (१७५)

ह्या वाक्याची ''अहो प्रस्तावस्य महिमा । मातले, यथावसरं उपसर्पावः ।' अशी सुधारित आवृत्ती अधिक परिणामकारक ठरली असती.

(१५६) राजा शुभशकुनाचा अभिनय करून पुढील श्लोक गातो :

मनोरथाय नाशंसे किं बाहो स्पन्दसे वृथा ।
पूर्वावधीरितं श्रेयो दुःखं हि परिवर्तते ।। (१७६)

अर्थात -- माझ्या मनात कोणतीही अभिलाषा नाही, तरीही (उजव्या) हाता, तू उगीच का फुरफुरत आहेस ? पूर्वी श्रेय धिक्कारले, म्हणून दुःखाने वेढला गेलो आहे'.

या श्लोकाच्या उत्तरार्धारंभी पूर्व=पूर्वी हा शब्द आहे, तद्विरुद्धार्थक आता हा शब्द अंतिम चरणात अपेक्षित आहे. ती अपेक्षा त्या चरणाचे 'दुःखं संप्रति वेष्टते' । असे पुनर्लेखन केल्याने पूर्ण होऊ शकेल. ह्यायोगे 'हि' वगळता येईल.

(१५७) द्वितीया -- सुव्रते,...। गच्छ त्वम् । मदीय उटजे मार्कण्डेयस्यर्षिकुमारस्य वर्णचित्रितो मृत्तिकामयूरकस्तिष्ठति । तमस्योपहर ।

प्रथमा -- तथा । (१७८)

यातील तथा ऐवजी 'गच्छामि' किंवा 'आम्' शब्द वापरला असता तर 'तथा'-ची कंटाळवाणी पुनरुक्ती टाळता आली असती.

(१५८) उभे -- मा खलु मा खल्विदमवलम्ब्य । कथं गृहीतमनेन ।
(विस्मयादुरोनिहितहस्ते परस्परमवलोकयतः ।) (१८३)

अर्थात -- तो ताईत उचलू नका, उचलू नका. अरे, ह्यांनी उचलून (हातात) घेतला की ! (दोघीही विस्मयचकित होऊन छातीवर हात ठेवून एकमेकींकडे बघतात.)

या संवादात एक रंगसूचना आवश्यक आहे. 'इदमवलम्ब्य ।' नंतर (राजा रक्षाकरण्डकं

गृह्णाति)' अशी सूचना लिहून मग पुढचे 'कथं गृहीतमनेन' हे वाक्य लिहावयास हवे. राजाने रक्षाकरंडक (ताईत) उचललेला बघितल्यावरच त्या दोघी विस्मित होतील. कंसातील रंगसूचना ही मधली तर्कशुद्ध संयोजिका आहे.

(१५९) प्रथमा -- ...एतां किल मातापितरावात्मानं च वर्जयित्वापरो भूमिपतितां न गृह्णाति।

राजा -- अथ गृह्णाति। (१८३)

राजाच्या वाक्याचा अर्थ करताना 'कोणी' हा शब्द पदरचा वापरावा लागतो (जर कोणी हा ताईत घेतला/उचलला तर ?). म्हणून मुळातल्या वाक्यात 'अथ कश्चिद् गृह्णाति।' असा थोडासा बदल केला तर वरीलप्रमाणे शब्दाची पदरमोड करावी लागणार नाही. कालिदासाच्या दृष्टीने विचार केला तर प्रथमा व राजा यांच्यातील संभाषण संक्षिप्त व गतिमान व्हावे ह्यासाठी त्याने 'कश्चिद्' बुद्धिपुरस्सर वगळला आहे, असेही समर्थन करता येईल व ते नाकारता येणार नाही.

(१६०) शकुन्तला-- (आत्मगतम्) हृदय, आश्वसिहि आश्वसिहि।
परित्यक्तमत्सरेणानुकम्पितास्मि दैवेन। आर्यपुत्रः खल्वेषः। (१८६)

अर्थात -- (स्वतःशी), हृदया, धीर धर, धीर धर. दैवाने आपला क्रोध आवरून माझ्यावर दया केली. हे खरोखर महाराज(च) (म्हणजे ह्याबाबतीत शंका नको).

शकुंतलेने दैवाची दुष्टता दीर्घ काळ अनुभवल्यानंतर काढलेले हे उद्गार आहेत हे ध्यानात ठेवले तर तिच्या बोलण्यात 'सरतेशेवटी' या अर्थाचा शब्द समुचित व आवश्यक ठरला असता. त्या दृष्टीने तिचे दुसरे वाक्य 'परित्यक्तमत्सरेण दैवेन अन्ते अनुकम्पितास्मि।' असे बदलले तर अधिक परिणामकारक ठरेल. शिवाय यातील 'अन्ते' राजाच्या लगेचच्या 'उपरागान्ते' शब्दातील 'अन्ते'-शी भावदृष्ट्या जोडला जाईल.

(१६१) शाकुंतलाच्या १८५ पृष्ठापासून राजा व शकुंतला यांच्यातील संवादाला सुरुवात होते. संवादाच्या ह्या प्रवेशात राजाने आपल्याला झालेल्या 'मोहा'चा (मतिभ्रमाचा किंवा बुद्धिभ्रंशाचा) उल्लेख 'स्मृतिभिन्नमोहतमसो...।' (१८६), 'किमपि मनसः संमोहो...।' (१८७) व 'मोहान्मया सुतनु...।' (१८८) असा तीनदा केला आहे. ही पुनरुक्ती तीव्रतेने सलते. म्हणूनच शकुंतलेच्या 'अथ कथमार्यपुत्रेण स्मृतो दुःखभागी अयं जनः।' (१८८) ह्या प्रश्नाला राजाने 'अस्माद् अङ्गुलीयोपलम्भात् खलु स्मृतिरुपलब्धा।' (१८८) असे सरळ उत्तर (मोहाची पुनरुक्ती टाळून) देणेच इष्ट ठरले असते.

(१६२) शकुन्तला-- (नाममुद्रां दृष्ट्वा) आर्यपुत्र, एतत् तदङ्गुलीयकम्।

राजा -- अस्मादङ्गुलीयोपलम्भात् खलु स्मृतिरुपलब्धा।

शकुन्तला-- विषमं कृतमनेन यत् तदार्यपुत्रस्य प्रत्यायनकाले दुर्लभमासीत्। (१८८)

वरील (१६१) मधील दुरुस्तीवजा सूचनेच्या पार्श्वभूमीवर ही तीन वाक्ये खालीलप्रमाणे लिहिली असती तर अधिक स्वाभाविक व प्रभावी ठरली असती. शिवाय संवाद संक्षिप्त झाला असता.

राजा -- अस्माद् अङ्गुलीयोपलम्भात् खलु स्मृतिरुपलब्धा।

शकुन्तला-- (अङ्गुलीयकं दृष्ट्वा। सनि:श्वासम्) आर्यपुत्र, एतत् तद्
अङ्गुलीयकं यत् तदा आर्यपुत्रस्य प्रत्यायनकाले मत्सकाशं नासीत्।

(१६३) राजा शकुंतलेला आंगठी देऊ करतो. पण त्या आंगठीच्या अभावामुळेच तिला अपार दु:ख भोगावे लागलेले असते. त्यामुळे तिच्या मनात त्या आंगठीविषयी तीव्र अढी उत्पन्न झालेली असते. ती लक्षात ठेवून 'नास्य कदापि विश्वसिमि। आर्यपुत्र एव एतद् धारयतु।' असा थोडा बदल केला असता तर शकुंतलेचे मनोगत तीव्रतेने व्यक्त झाले असते, आणि राजाच्या व प्रेक्षकांच्याही मनावर ठसले असते.

(१६४) शकुन्तला--जिह्रेम्यार्यपुत्रेण सह गुरुसमीपं गन्तुम्। (१८९)

येथील 'जिह्रेमि' या श्रवण-अप्रिय रूपाऐवजी 'लजे' किंवा 'लज्जे' असे रूप अधिक श्रवणीय ठरले असते. कालिदासाने 'लज्जामहे' हा शब्दप्रयोग अनसूया व प्रियंवदा या दोघींच्या तोंडी पूर्वी (२८) घातलेला आहेच.

(१६५). मातलि: -- आयुष्मन्, एतौ पुत्रप्रीतिपिशुनेन चक्षुषा दिवौकसां
पितरावायुष्मन्तमवलोकयत:। (१९०)

या वाक्यातील एकाच सामासिक शब्दात तीन वेळा 'प'हे कठोर व्यंजन आले आहे. ते टाळण्यासाठी 'पुत्रस्नेहव्यंजकेन' किंवा 'वात्सल्यभावव्यंजकेन' असा शब्दप्रयोग केला असता तर तो अधिक श्रुतिसुभग ठरला असता.

(१६६) मारीच व दुष्यन्त या दोघांच्या दरम्यान पृ. १९१ ते १९७ मध्ये जो संवाद झालेला आहे त्यात युष्मत् व भवत् या सर्वनामांची (उदाहरणार्थ, त्वयि, त्वया, भवान्, त्वं, भवतु अशी) सरमिसळ झाली आहे. म्हणजेच मारीचाने वापरलेल्या संबोधनांत एकरूपता नाही. कदाचित 'आदर्श हस्तलिखित प्रतीवर' कालिदासाने बारकाईने नजर न फिरवल्याने अशी विषमता उत्पन्न झाली असावी.

(१६७) मारीच ऋषी दुष्यंत-प्रभृतींचे अभीष्टचिंतन करतात. त्याचा सविनय स्वीकार करताना दुष्यन्त म्हणतो :

राजा -- भगवन्, प्रागभिप्रेतसिद्धि: पश्चाद् दर्शनम्। अतोऽपूर्व: खलु
वोऽनुग्रह:। कुत:। उदेति पूर्वं कुसुमं ... इत्यादी श्लोक (१९२).

वास्तविकपणे मारीचांच्या आश्रमातील हा प्रसंग अतिशय पवित्र व आनंददायक आहे. त्यावेळी राजाच्या मुखातून निघणाऱ्या शब्दांत 'प्रेत'हा अमांगल्याचा स्मारक शब्द वर्ज्य करावयास हवा होता. तो 'प्रागीप्सितसिद्धिः' किंवा 'प्राङ्मनोरथसिद्धिः' अशा शब्दप्रयोगाने वर्ज्य करता आला असता. दुसरी गोष्ट अशी की, राजा एखादे प्रमेय वगैरे सिद्ध करावयास निघालेला नाही. त्यामुळे 'अतोऽपूर्वः' मधील 'अतः'ची आवश्यकता नाही. आणि 'अतः' वापरून पुन्हा 'कुतः' (=कशावरून)ही वापरले आहे. अतः वगळून 'अपूर्वः खलु वोऽनुग्रहः' एवढेच वाक्य पुरेसे आहे. लेखन नेटके व मोजके असावे, हा सर्वमान्य दंडक आहे. [अभिप्रेत-मधील 'प्रेत'-वर्जनासंबंधी मागील नोंद (१४२) देखील बघावी.]

(१६८) मारीचः -- ...ध्यानादवगतोऽस्मि दुर्वाससः शापादियं तपस्विनी सहधर्मचारिणी त्वया प्रत्यादिष्टा नान्यथेति । (१९३)

अर्थात -- ध्यानधारणेने मला असे कळले की, दुर्वासाच्या शापामुळे तू (ह्या) बिचाऱ्या पत्नीस झिडकारलेस, दुसऱ्या प्रकारे (झिडकारले) नाहीस.

अन्यथा म्हणजे नहून, नाहीपेक्षा, दुसऱ्या प्रकारे, अन्य पद्धतीने, वेगळ्या रीतीने, वा निराळ्या प्रकाराने. येथे मारीचांना 'अन्य/दुसऱ्या कारणास्तव' असे म्हणावयाचे आहे. ते 'अन्यस्मात् कारणात्' अशा शब्दप्रयोगाने साध्य झाले असते. अशा शब्दप्रयोगाद्वारे शकुंतलेच्या ह्यानंतरच्या स्वगतातील 'दिष्ट्या अकारणप्रत्यादेशी न आर्यपुत्रः ।' मधील 'अकारण' शब्दाशी उत्तम सांधा जुळला असता.

(१६९) मारीचांच्या वरील वाक्याचा पूर्वार्धही विचारणीय आहे : तो असा आहे. 'यदैवाप्सरस्तीर्थावरणात् प्रत्यक्षवैक्लव्यां शकुन्तलामादाय मेनका दाक्षायणीमुपगता तदैव ध्यानाद्...।' (१९३), अर्थात-जिची विकलता प्रत्यक्ष (=स्पष्टपणे) दिसत होती अशा शकुंतलेला अप्सरस्तीर्थाच्या घाटावरून घेऊन जेव्हाच मेनका दाक्षायणीकडे आली तेव्हाच ध्यानधारणेने मला कळून चुकले की...

येथे 'जेव्हाच' नको आहे, फक्त 'जेव्हा' हे अव्यय हवे आहे. अर्थात मुळातील 'यदा एव' शब्दजोडीपैकी 'एव' अनावश्यक आहे. तदैव-मधील एव अत्यावश्यक आहे.

(१७०) शकुन्तला--(स्वगतम्) दिष्ट्याकारणप्रत्यादेशी नार्यपुत्रः । न खलु शप्तमात्मानं स्मरामि ।(१९४), अर्थात--महाराजांनी मला निष्कारण झिडकारले नाही, हे सुदैव होय. शाप मिळाल्याचे खरोखर मला स्वतःला आठवत नाही.

शकुंतला शापप्रसंगी राजाच्या उत्कट चिंतनात [विचिन्तयन्ती यमनन्यमानसा...। (७४)] गढून गेलेली असल्यामुळे दुर्वासांनी शाप दिल्याचे तिला आठवत नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेता वरीलपैकी दुसरे वाक्य 'किन्तु न शप्तं आत्मानं स्मरामि ।' असे रचले तर ते शकुंतलेचे मनोगत व्यक्त करणारे ठरेल.

(१७१) मारीच ऋषी राजाला विचारतात : ज्याच्या जन्मानंतरचा धार्मिक संस्कार आम्ही

विधिपूर्वक केला त्या आपल्या मुलाला, शकुंतलापुत्राला, तू भेटलास की नाही ? त्यावर-

राजा -- भगवन्, अत्र खलु मे वंशप्रतिष्ठा। (बालं हस्तेन गृह्णाति) (१९५)

अर्थात -- गुरुवर्य, ह्यावर खरोखर माझ्या वंशाचा आधार (किंवा सातत्य) आहे.

हेच वाक्य, 'भगवन् अस्मिन्नेव मे वंशप्रतिष्ठा।' असे अधिक शोभून दिसले असते. (ह्या वाक्याचा अर्थ असा-गुरुवर्य, ह्याच्यावरच (तर) माझ्या वंशाचा आधार (किंवा सातत्य) अवलंबून आहे.) राजाला पूर्वी मूलबाळ झालेले नसल्यामुळे सर्वदमनावरच राजवंशाची सर्व मदार आहे. म्हणून वरीलप्रमाणे 'एव' आवश्यक आहे.

(१७२) अदितिः -- भगवन्, अस्या दुहितृमनोरथसंपत्तेः कण्वोपि तावच् छ्रुतविस्तरः क्रियताम्। दुहितृवत्सला मेनकेहैवोपचरन्ती तिष्ठति।

शकुन्तला-- (आत्मगतम्) मनोरथः खलु मे भणितो भगवत्या। (१९६)

अर्थात -- महाराज, ह्या मुलीचे सर्व मनोरथ पूर्ण झाले आहेत हे (तिच्या वडिलांना म्हणजे) काश्यपांना लगोलग सविस्तर कळवावे. आपल्या मुलीविषयी (मनात) वात्सल्यभाव बाळगणारी मेनका येथेच सेवाभावाने उभी आहे.

-- देवींनी खरोखर माझा(च) मनोरथ बोलून दाखवला.

शकुंतलेला खरे म्हणजे 'देवी खरोखर माझ्या मनातले बोलल्या आहेत', असे म्हणावयाचे आहे आणि ते 'मनोगतं खलु मे भणितं भगवत्या।' अशा वाक्यरचनेने साधता आले असते.

(१७३) प्रत्येक लेखकाला काही विशिष्ट शब्दांविषयी किंवा वाक्प्रयोगांविषयी खास आकर्षण वाटत असते; त्यांचा पुनःपुन्हा उपयोग करण्याकडे त्याचा कल असतो. कालिदासही ह्या नियमाला अपवाद नाही, हे खाली उद्धृत केलेल्या शेलक्या शब्दांवरून वा शब्दसमूहांवरून स्पष्ट होईल. कंसातील आकडा संबंधित शब्दाची किंवा शब्दावलीची शाकुंतलात किती वेळा पुनरावृत्ती झाली आहे, तिचा द्योतक आहे.

अनतिक्रमणीय (३), आकृतिः (७), उपपन्नम् (५), 'क'-प्रत्ययान्त शब्द, उदाहरणार्थ हरिणक, आश्रमवृक्षक इत्यादी (२४), कर्णं दत्वा (१०), कातर (४), कुतूहल/कौतूहल (६), खलु (१००), 'जन'-अन्त शब्द, उदाहरणार्थ तपस्विजन, गुरुजन इत्यादी (२६), तावत् (७३), नियोगः अनुष्ठीयताम् किंवा नियोगं अशून्यं कुरु (५), निर्मक्षिकं कृतम् (२), पुरस्कृत्य (३), मद्वचनात् किंवा मम वचनात् (६), प्रतिष्ठा (४), बलवत् व त्याची विविध रूपे (१३), बहुमत किंवा बहुमान (७), मनोरथ (४), मार्गं आदेशय (५), वपुः (४), विक्लव किंवा वैक्लव्य (६), स्थाने खलु (४). ह्या सर्व कालिदासाच्या भाषाविषयक लकबी (की सवयी ?) आहेत.

कालिदास हा वैदर्भी रीतीचा प्रातिनिधिक कवी असूनही व ती रीती 'अल्पसमासा'

(म्हणजे थोडे व थोड्या शब्दांचे समास) म्हणून प्रसिद्ध असूनही त्याने 'नातिपरिस्फुटशरीरलावण्या' (१०९), 'परपरिग्रहसंश्लेषपराङ्मुखी' (१२२), 'शिथिलकेशबन्धनोद्वान्तकुसुमेन' (१५०), 'अक्लिष्टबालतरुपल्लवलोभनीयं (१५४) इत्यादी एकूण एकशे चार दीर्घ समास गद्यात व पद्यात मिळून वापरले आहेत.

पाश्चात्य शैलीशास्त्रज्ञ नामे, विशेषणे, क्रियापदे व क्रियाविशेषणे[१] ह्या चार प्रकारच्या शब्दांना कार्यसाधक शब्द (function words) म्हणतात. शाकुंतलातील अशा शब्दांची सूची बनवणे खचित उद्बोधक ठरेल.

[५.६] दोषदर्शनाचे प्रयोजन

वरील चर्चेच्या संदर्भात काही गोष्टींचा आवर्जून उल्लेख करणे आवश्यक आहे. त्यांपैकी पहिली गोष्ट अशी की, महाभारतातील शकुंतला-आख्यानावर आधारित कालिदासाच्या ह्या 'नवीन' नाटकाचा [अद्य खलु कालिदासग्रथितवस्तुना अभिज्ञानशाकुन्तलनामधेयेन नवेन नाटकेन उपस्थातव्यं अस्माभिः । (२); ननु आर्यमिश्रैः प्रथममेवाज्ञप्तं अभिज्ञानशाकुन्तलं नामापूर्वं नाटकं प्रयोगेऽधिक्रियतामिति । (३)] प्रयोग झाल्यावर व तो असंख्य रसिक व चोखंदळ प्रेक्षकांनी पाहिल्यावर ह्या नाटकाच्या 'अपूर्व'-त्वाचा बराच बोलबाला झाला असावा. त्यामुळे अनेक वाङ्मयप्रेमींना ह्या नाटकाचे हस्तलिखित-पुस्तक आपल्यापाशी असावे असे वाटले असावे. त्या इच्छेने प्रेरित होऊन त्यांनी स्वतः मूळ हस्तलिखिताच्या नकला केल्या असाव्यात किंवा नकलनविसांकडून करवून घेतल्या असाव्यात (शैलीशास्त्रीय विश्लेषणात्मक अभ्यासाच्या दृष्टीने साहित्यकृतीच्या हस्तलिखिताचे अनन्यसाधारण महत्त्व असते, हे शैलीशास्त्राच्या अभ्यासकांना ठाऊक आहेच.). ह्या प्रतिलिपिकांनी मूळ हस्तलिखितात कोणते, किती, कसे, का, कोणत्या मनःस्थितीत, कितीशा अभिज्ञतेने व दक्षतेने बदल केले, मूळचा पाठ न कळल्यामुळे पदरचा पाठ कसा घुसडला इत्यादी गोष्टी कळण्यास आज आपल्यापाशी कोणतेही साधन नाही. परिणामी, आपल्याला आपल्यासमोर मुद्रित स्वरूपात असलेल्या नाट्यसंहितेवरच विसंबून राहावे लागते. ही आपल्या अभ्यासाला पडणारी एक काल-प्रभावित मर्यादा आहे.

दुसरी गोष्ट अशी की, प्रस्तुत प्रकरणातील विवेचन कालिदासाचे दोष दाखवून आत्मप्रौढी मिरविण्यासाठी मुळीच केलेले नाही, हे प्रांजळपणे नमूद करतो. कालिदासाची महती निर्विवाद आहे. त्याला मिळालेली जागतिक कीर्ती सर्वथा समुचित आहे, ह्यात तिळमात्र शंका नाही. तथापि, एखादा विश्लेषणात्मक अभ्यासक जेव्हा एखाद्या साहित्यकृतीचे, काही सर्वमान्य शास्त्रीय निकषांच्या आधारे, पृथक्करणात्मक अध्ययन करतो तेव्हा त्या अध्ययनातून हाती आलेले निष्कर्ष त्याला पूर्णतया अलिप्तपणे अभ्यासकांसमोर मांडावे लागतात. तसे करताना त्याला संबंधित साहित्यकृतीच्या कर्त्याच्या कीर्तिवलयाचा विचार कर्तव्य नसतो. प्रस्तुत ग्रंथातही पाश्चात्त्य शैलीशास्त्राच्या कसोट्यांच्या अनुरोधाने शाकुंतलाचा विश्लेषणात्मक अभ्यास

सादर करून नाटकाच्या संहितेतील दोष, त्रुटी किंवा उणिवा वस्तुनिष्ठपणे अभ्यासकांच्या निदर्शनास आणल्या आहेत. तसे करण्यात अहंकार लवमात्र नाही, हे पुनश्च उन्मेखून स्पष्ट करतो.

वरील दोन गोष्टींच्या स्पष्टीकरणानंतर आता निष्कर्षरूपाने असे म्हणता येते की, सध्या उपलब्ध असलेल्या शाकुंतल नाटकाच्या संहितेत ध्वनी, शब्द, वाक्य, रचनाक्रम, अर्थ इत्यादी घटकांच्या बाबतीत अनेक उणिवा जाणवतात. कालिदासाने विविध प्रसंगांचे स्वरूप, त्यांत व्यक्त होणाऱ्या भावना, पात्रांची तत्तत्कालीन मन:स्थिती, रचनेची मागणी, प्रेक्षकांच्या प्रतिसादाची अपेक्षा इत्यादी गोष्टींविषयी अधिक दक्षतेने, सूक्ष्म बुद्धीने व संदर्भानुसंधानाने चिंतन केले असते तर उपरिवर्णित उणिवांचे निरसन होऊन शाकुंतल ही नाट्यकृती, सध्या आहे त्यापेक्षा कितीतरी पटींनी अधिक, रोचक, रमणीय व संस्मरणीय झाली असती.

प्रस्तुत प्रकरणातील विवेचन सगळ्याच वाचकांना सर्वतोपरी ग्राह्य वाटेल असे मी मुळीच गृहीत धरलेले नाही. व्याकरण-साहित्य-प्रभृती प्राचीन शास्त्रांच्या विचक्षण विद्वानांपैकी काहींना, वरील १७२ उदाहरणांपैकी काही उदाहरणांचे विश्लेषण स्वीकारार्ह वाटेल, काही उदाहरणांचे तसे वाटणार नाही. अन्य काही विद्वद्रसिक ह्या विश्लेषणावर काही आक्षेप घेतील तर आणखी काही पंडितांना हे सर्वच्या सर्व त्याज्य किंवा हेय वाटेल ! ह्याबाबतीत मतभेदाला भरपूर वाव आहे हे प्रांजळपणे मान्य करून वरील विश्लेषणाच्या योग्यायोग्यतेचा निर्णय 'तद्विदां'वर सोपवतो आणि प्रस्तुत ग्रंथाच्या समारोपाकडे वळतो.

[५.७] समारोप

महाभारतातील शकुंतला-आख्यानाशी कालिदासाचा चांगला परिचय आहे. त्या परिचयाच्या खाणाखुणा शाकुंतल नाटकात जागोजागी जाणवतात. कालिदासाने त्या आख्यानाधारेच आपले हे 'नवे नाटक' रचलेले आहे. त्याने भासप्रभृती पूर्वसूरींच्या नाटकांचा बारकाईने अभ्यास केलेला आहे. शिवाय भरतप्रभृती नाट्यशास्त्रकारांच्या ग्रंथांचेही ज्ञान परिश्रमपूर्वक संपादन केले आहे. ह्या द्विशाख ज्ञानाच्या साहाय्याने त्याने नाट्यशास्त्रीय भाषिक संकेतांचे यथावत पालन केले आहे. शिवाय, नाट्य-संहितेच्या भाषेच्या स्वरूपाची वैशिष्ट्ये व्यवस्थितपणे समजून घेतली आहेत. पाणिनीय व्याकरणाच्या नियमोपनियमांच्या अध्ययनाच्या मदतीने त्याने काव्यार्थाच्या सूक्ष्म छटा समर्पकपणे व्यक्त करण्यात बहुतांशी यश मिळविले आहे. त्याच्या पात्रांच्या संभाषणांना व्यावहारिक जगातील स्त्रीपुरुषांच्या संभाषणांचा 'गंध' आहे. हे कार्य त्याने जाणीवपूर्वक साधले आहे. पाश्चात्य शैलीशास्त्रज्ञांनी निरूपिलेल्या तब्बल बावीस संभाषण-वैशिष्ट्यांची प्रचीती शाकुंतलात येते. पण नाटकातील संभाषणे नेहमीच संभाषणरूप राहात नाहीत, ती यथासमय, यथाप्रसंग व यथाभाव काव्यात्मक संवादांत परिवर्तित होतात, ह्याचेही यथायोग्य भान ठेवून त्याने अनुप्रासप्रभृती सोळा शैली-उपाय कार्यक्षमतेने हाताळले आहेत. त्याशिवाय पाच शैली-उपाय स्वतंत्रपणे कल्पून ते सौंदर्यदृष्टीने

वापरले आहेत. ही सगळी जमेची व उज्ज्वल बाजू झाली. पण कालिदासाच्या शाकुंतलात अशीही जवळजवळ पावणेदोनशे स्थळे आहेत की, त्या स्थळांतील शब्दांचे व/वा वाक्यांचे भाषासौंदर्यदृष्ट्या संस्करण-परिष्करण करणे आवश्यक असल्याचे प्रतीत होते. अशी परिष्करण-परिवर्तनार्ह स्थळे कधी कवीच्या दुर्लक्षामुळे, तर कधी विस्मरणामुळे, तर कधी दक्षतेच्या व/वा सूक्ष्मदर्शित्वाच्या अभावामुळे तर कधी अनवधानामुळे उत्पन्न झाली आहेत. पण ती उपेक्षणीय नाहीत. त्यांच्यामुळे शाकुंतलाच्या संहितेची भाषासौंदर्यदृष्ट्या काहीशी हानी झाली आहे. म्हणजेच पाश्चात्य शैलीशास्त्राच्या दृष्टिकोणातून शाकुंतल ही सर्वथा निर्दोष व परिपूर्ण साहित्यकृती आहे, असे म्हणता येत नाही. तिच्या सौंदर्याला वरील उणिवांचे गालबोट लागले आहे.

संदर्भ

१. Summer Ives, A New Handbook for Writers, New York, Alfred A. Knopf, 1960, p. 58

२. Bonamy Dobree, Modern Prose Style, Reprinted, Oxford, The Clarendon Press, 1956, पृ. २१७-१८ वरून उद्धृत.

३. प्रकरण तिसरे, संदर्भ २०, पृ. ११

४. Pearl Hogrefe, The Process of Creative Writing, Revised edition, New York, Harper and Brothers, 1956, pp.20, 275-76

५. प्रकरण दुसरे, संदर्भ ८, पृ. २८.

६. प्रकरण तिसरे, संदर्भ ८, पृ. ११

७. राजशेखर, काव्यमीमांसा, संपा. सी.डी.दलाल व आर.ए.शास्त्री, तृतीय, बडोदे, ओरिएण्टल इन्स्टिट्यूट, १९३४, पृ.५२

८. कालिदास, कालिदास-ग्रन्थावली, संपा. व संशो. रेवाप्रसाद द्विवेदी, द्वितीय सुधारित आवृत्ती, वाराणसी, काशी हिन्दू विश्वविद्यालय, १९८६, पृ. ५८३

९. प्रकरण तिसरे, संदर्भ ४९, पृ. ८७-१०२

* * *

संदर्भ-ग्रंथ

इंग्रजी

Āpte, Vāman Shivarām, The Student's Guide To Sanskrit Composition, Nineteenth, Poona, Poona Vidyarthi Griha, 1947

Boulton, Marjorie, The Anatomy of Poetry, Fifth impression, London, Routledge and Kegan Paul Ltd., 1968

______, The Anatomy of Prose, Third impression, London, Routledge and Kegan Paul Ltd., 1962

Bowden, Edwin T., An Introduction to Prose Style, New York, Rinehart and Company, Inc., 1956 [English Pamphlet Series]

Brandreth, Gyles, Pears Book of Words, London, Pelham Books, 1979

Brooks, Cleanth and Robert Penn Warren, Fundamentals of Good Writing (A Handbook of Modern Rhetoric), Fourth impression, London, Dennis Dobson, 1968

Cohen, B. Bernard, Writing About Literature, Chicago, Scott, Foresman and Company, 1963

Crystal, David and Derek Davy, Investigating English Style, Fifth impression, London, Longman Group United, 1976 [English Language Series Title No. 5]

Darbyshire, A. E., A Grammar of Style, London, Andre Deutsch, 1971

Dobreé, Bonamy, Modern Prose Style, Reprinted, Oxford, The Clarendon Press, 1956

Fowler, Roger, ed., Essays on Style and Language, Second impression, London, Routledge and Kegan Paul, 1967

Freeman, Donald C., ed., Linguistics And Literary Style, New York, Holt, Rinehart and Winston Inc., 1970.

Good English How To Speak And Write It, London, Odhams Press Limited, 1949

Hogrefe, Pearl, The Process of Creative Writing, Revised edition, New York, Harper and Brothers, 1956.

Hough, Graham, Style and Stylistics, Reprinted, London, Routledge and Kegan Paul, 1972

Ives, Summer, A New Handbook for Writers, New York, Alfred A. Knopf, 1960.

Kreuzer, J. R. and Lee Cogan, Studies in Prose Writing, Alternate Edition, New York, Holt, Rinehart and Winston, 1961

Love, Glen A. and M. Payne, Contemporary Essays on Style, Chicago, Scott, Foresman and Company, 1969

Morrison, K., In Black and White, New York, The Free Press, 1972

Murry, J. M., The Problem of Style, Oxford, Oxford University Press, 1922

Nowottny, Winifred, The Language Poets Use, Fifth impression, London, The Athlone Press, 1975

Rajendran, C., A Transcultural Approach to Sanskrit Poetics, First, Calicut, The author, April 1994

Read, Herbert, English Prose Style, first Indian edition, Ludhiana, Lyall Book Depot, 1968

Trench, R.C., The Study of Words, First Indian Print, New Delhi, Asian Publication Services, 1979

Turner, G. W., Stylistics, reprinted, England, Penguin Books, 1977

Ullmann, Stephen, Semantics An Introduction to the Science of Meaning, Reprinted, Oxford, Basil Blackwell, 1972 (A Blackwell Paperback)

Vallins, G. H., The Best English, London, Andre Deutsch, 1960

_______, Better English, Third impression, London, Andre Deutsch, March, 1963

Warder, A. K., Indian Kāvya Literature, Volumes One to Six, First, Delhi, Motilal Banarsidass, 1972, 1974, 1977, 1983, 1988, 1992

Webster's New Collegiate Dictionary, Springfield, Massachusetts, G. & C. Merriam Company, 1975

Wellek, René and Austin Warren, Theory of Literature, Third edition, London, Peregrine Books, 1963

Winterowd, W. Ross, Rhetoric A Synthesis, New York, Holt, Rinehart And Winston Inc., 1968

मराठी

लेले, वामन केशव, ललितलेखन व शैली, प्रथम, नागपूर, साहित्य प्रसार केन्द्र, १९ मार्च, १९८४

संस्कृत

कालिदास - अभिज्ञानशाकुन्तलम्, संपा. अ. बा. गजेन्द्रगडकर, पंचम, सुरत, दि पॉप्युलर बुक स्टोअर, १९५१

______, कालिदास-ग्रन्थावली, संपा. व संशो. रेवाप्रसाद द्विवेदी, द्वितीय, सुधारित आवृत्ती, वाराणसी, काशी हिन्दू विश्वविद्यालय, १९८६

दण्डिन्, काव्यलक्षणम्, संपा. अनन्तलाल ठक्कुर व उपेन्द्र झा, दरभंगा, मिथिला विद्यापीठ, १९५७

धनंजय, दशरूपकम् (सावलोकम्), हिन्दी व्याख्याकार, भोलाशंकर व्यास, बनारस, चौखम्बा विद्याभवन, १९५५

भामह, काव्यालङ्कार, भाष्यकार, देवेन्द्रनाथ शर्मा, पटना, बिहार-राष्ट्रभाषा-परिषद, १९६२

राजशेखर, काव्यमीमांसा, संपा., सी. डी. दलाल व आर. ए. शास्त्री, तृतीय, बडोदे, ओरिएण्टल इन्स्टिट्यूट, १९३४

वामन, काव्यालंकारसूत्राणि स्ववृत्तिसमलंकृतानि, संशो., नारायण राम आचार्य, चतुर्थ, मुंबई, निर्णयसागर प्रेस, १९५३

क्षेमेन्द्र, औचित्यसिद्धान्त आणि औचित्यविचारचर्चा, समीक्षक व संपादक, वामन केशव लेले, प्रथम, वाराणसी, सौ. मालती वामन लेले, १९६६

______, कविकण्ठाभरण, संपा., वा. के. लेले, प्रथम, दिल्ली-पटना-वाराणसी, मोतीलाल बनारसीदास, १९६७.

हिन्दी (शोधनिबंध)

लेले, वामन केशव, 'परिवर्तनाङ्कित वाक्यसाधक व्याकरण और संस्कृत भाषा', Journal of Ganganath Jha Kendriya Sanskrit Vidyāpitha, Allahabad, Vol. XLVI (1990).

Presented free of cost with compliments
from the Central Institute of Indian Languages
Government of India Mysore 570006

लेखक-परिचय

नाव : डॉ. वामन केशव लेले

जन्मतारीख : २९ मे, १९३३

शिक्षण : बी.ए. (ऑनर्स स्पेशल) प्रथम श्रेणी (१९५४), एम्. ए. प्रथम श्रेणी (१९५६), मराठी विषयात प्रथम क्रमांकाबद्दल न. चिं. केळकर सुवर्णपदक प्राप्त. पीएच्. डी. (१९७०)

व्यवसाय : मराठी व संस्कृत विषयांचे विद्यापीठ-स्तरावर अध्यापन (१९५७-१९९३)

मराठीचा प्राध्यापक व विभागप्रमुख या पदावरून काशी हिन्दू विश्वविद्यालय, (वाराणसी)मधून जून १९९३ मध्ये सेवानिवृत्त.

लेखन : ५० हून अधिक शोधनिबंध व सुमारे ७५ लेख

१४ अभ्यासपूर्ण व इतर ७ पुस्तके.

प्रमुख पुस्तके : १. औचित्यविचारचर्चा, २. भारतीय काव्यशास्त्राची उत्क्रान्ती, ३. विचार और विवेचन (हिन्दी), ४. The Doctrine of the Tantra-yuktis, ५. ललितलेखन व शैली, ६. ज्ञानेश्वरीचा शास्त्रीय अभ्यास, ७. वाग्विलास, ८. भाषा, साहित्य व शास्त्र : काही विचार, ९. शैलीशास्त्रज्ञ भामह, १०. काव्यसूत्रसंहिता

पारितोषिके व पुरस्कार: एकूण १८. प्रमुख असे :

भारत सरकारचा राष्ट्रीय पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कार (तीनदा), महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचे 'अमृत महोत्सव विशेष पारितोषिक', पुणे विद्यापीठाचा संत ज्ञानदेव पुरस्कार, उत्तर प्रदेश हिन्दी संस्थानचा 'सौहार्द सम्मान' पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे 'प्रा. रा. श्री. जोग समीक्षा पारितोषिक', ज्ञानप्रबोधिनी संशोधन संस्थेचा 'पं. राजारामशास्त्री नाटेकर गौरव पुरस्कार', मुंबई विद्यापीठाचे दादोबा पांडुरंग तर्खडकर पारितोषिक (दोनदा)

कायमचा पत्ता : ए१/२, सर्वत्र सोसायटी, पौड रोड, कोथरूड, पुणे - ४११ ०२९.
दूरध्वनी : ३४६५४५

मुद्रक - ज्ञान प्रबोधिनी मुद्रण विभाग, पुणे - ३०.